मोगल–मराठा संघर्ष

V. P. Bhagwat

मोगल-मराठा संघर्ष

(फारसी साधनें)

संपादक

सेतु माधवराव पगडी

चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणें २.

आवृत्ति पहिली

XXXकिंमत XX XXXX २० डिसेंबर १९६४

मुद्रक व प्रकाशक
दा. त्र्यं. जोशी, चित्रशाळा प्रेस, ५६२ सदाशिव पेठ, पुणें २.

माझी नात

प्रियंवदा

हिला—

सेतु माधवराव पगडी

अनुक्रमणिका

श्री. सेतु माधवराव पगडी यांचे

प्रकाशित ग्रंथ

इतिहासविषयक •

वरंगलचे काकतीय राजे.
हैदराबादेंतील स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास.
सूफी संप्रदाय, तत्त्वज्ञान आणि परंपरा.
पानिपतचा संग्राम. (फाटक व पगडी)
मराठे व निजाम. (उर्दू फारसी साधनें)
मराठ्यांचें स्वातंत्र्ययुद्ध. (खाफीखानाचा साधनग्रंथ)
मराठे व औरंगजेब. (मासिरे आलमगिरी)
महाराष्ट्र आणि मराठे.
मराठे व मोगल (तारीखे दिल्कुशा)

ललित •

उषा (लघुकथासंग्रह).
अलकनंदा. (लघुकथासंग्रह)
मराठवाड्यांतील गद्यवाङ्मय. (परीक्षणात्मक)
अशोकाचीं पानें. (निबंधसंग्रह)
त्रिलिंग देशांतील दैनंदिनी. (निबंधसंग्रह)
मिर्जा गालिब आणि त्याच्या उर्दू गजला.
शहनाम्यांतील निवडक कथा. (अनुवाद)
मणिकांचन. (लेखसंग्रह)
उर्दू काव्याचा परिचय.
विडा रंगतो असा.

इंग्रजी •

Among the Gonds of Adilabad.
Grammar of the Gondi Language.
Grammar of the Kolami Language.
Tribal welfare.
Studies in Eighteenth Century Deccan.
Freedom struggle in Hyderabad(1800-1920)
(Edited in three volumes.)

प्रकाशकांचें निवेदन

मराठेशाहीचा संपूर्ण, सर्वांगीण व यथातथ्य इतिहास लिहावयाचा असल तर निरनिराळ्या भाषेंतील तत्कालीन ऐतिहासिक साधनसामुग्रीचा सामग्र्यानें परामर्श घेतला पाहिजे. मराठ्यांच्या इतिहासासाठीं केवळ मराठी साधनांचाच नव्हे, तर इंग्रजी, फ्रेंच, पोर्तुगीज, उर्दू, फारसी इत्यादि साधनांचा उपयोग करणें अवश्य आहे. मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारीं असंख्य फारसी साधनें विखुरलेलीं आहेत. ही साधनसामुग्री पत्रव्यवहार, अखबार, चरित्रें, आत्मचरित्रें, प्रवासवर्णनें अशा स्वरूपाची आहे. मराठी वाचकांना हीं साधनें उपलब्ध करून देण्याचें जें महत्कार्य श्री. सेतु माधवरावांनीं चालविलें आहे तें खरोखर पहातां अत्यंत अमोल असें आहे व त्याबद्दल मराठी इतिहासकारांनीं त्यांचें ऋणी असलें पाहिजे. श्री. सेतु माधवराव पगडी हे जसे उर्दू-फारसीचे पक्के जाणकार आहेत त्याप्रमाणें ते इतिहासाचे खंदे अभ्यासक आहेत. त्यांनीं गेल्या चार पांच वर्षांत 'मराठ्यांचें स्वातंत्र्ययुद्ध', 'महाराष्ट्र आणि मराठे', मराठे आणि औरंगजेब', 'मोगल आणि मराठे', 'मराठे व निजाम' व 'पानिपतचा संग्राम' अशीं सहा पुस्तकें फारसीवरून लिहिलीं असून प्रस्तुतचें त्यांचें सातवें पुस्तक आहे.

या पुस्तकांत 'फुतूहाते आलमगिरी' (औरंगजेबाचा विजय), 'खुतूते शिवाजी' (शिवाजीचीं पत्रें), 'हफ्त अंजुमान' (जयसिंगाचीं पत्रें) व सरदार लुत्फुल्ला याचीं पत्रें अशीं चार प्रकरणें अंतर्भूत झालीं असून त्यांत इ. स. १६६५ ते १७०७ या काळांतील मोंगल-मराठा संघर्ष ग्रथित झालेला आढळतो. श्री. पगडी यांनीं मूळ फारसीवरून हीं साधनें मराठींत अनुवादित केलीं आहेत. मराठी इतिहासाच्या अभ्यासकांना ही साधनसामुग्री अगदीं नवीन व अपूर्व वाटेल व इतिहासलेखनाच्या कामीं ती उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.

श्री. सेतु माधवराव श्रीनिवास पगडी हे सध्यां महाराष्ट्र-सरकारच्या जिल्हा गॅझेटिअर्सचे मुख्य संपादक असून त्यांनीं यापूर्वी कलेक्टर, रेव्हेन्यु सेक्रेटरी, शिक्षणखात्याचे संचालक, गृहखात्याचे सचिव इत्यादि विविध नात्यांनीं काम केलें आहे. हैद्राबाद विलीन होण्यापूर्वी त्यांनीं हैद्राबाद राज्यांत १९३३ ते

१९४८ पर्यंत नोकरी केली. ते मूळचे मराठवाड्याचे. त्यांचा जन्म ता. २७ ऑगस्ट १९१० रोजीं झाला. त्यांचें कॉलेज शिक्षण हैद्राबादच्या निजाम कॉलेजांत झाल्यावर बनारसच्या हिंदु युनिव्हर्सिटींतून ते बी. ए. झाले. बी. ए.च्या परीक्षेंत ते पहिल्या वर्गांत पहिले आले व त्यांना सुवर्णपदक मिळालें. १९३२ सालीं राज्यशास्त्र घेऊन ते अलाहाबाद विद्यापीठाचे एम्. ए. झाले. यावेळींहि त्यांनीं पहिला वर्ग मिळविला होता. श्री. पगडी हे इतिहासाचे अभ्यासक असले तरी ललितवाङ्मयाचे भोक्ते आहेत. ‘ विडा रंगतो असा ! ’ हें त्यांचें पुस्तक म्हणजे रसिकांना रंजविणारी लालित्यपूर्ण कलाकृति आहे असें म्हटल्यास चालेल. उर्दू कवितेवरहि त्यांनीं पुस्तकें लिहिलीं आहेत.

श्री. सेतु माधवराव यांचें हें ऐतिहासिक साधनांचें पुस्तक मराठी वाचकांना व शिक्षणसंस्थांना पुरस्कारार्ह वाटेल अशी आशा आहे.

पुणें, ता. १–१२–१९६४ — प्रकाशक

ईश्वरदास नागरकृत

फुतूहाते आलमगीरी

(१) प्रास्ताविक.

(२) शिवकाल.

(३) संभाजी काल.

(४) संभाजी राजांचा शेवट.

(५) संभाजी राजांच्या वधानंतर.

(६) मोगल सातारा घेतात.

प्रास्ताविक

फुतूहाते आलमगीरी म्हणजे 'आलमगीर विजय' या ग्रंथाचा कर्ता ईश्वरदास नागर हा गुजरातेंतील पाटण या गांवाचा राहाणारा होता. औरंगजेबाचा मुख्य न्यायाधीश शेखुल्इस्लाम (इ. स. १६७५ ते १६८३) याचा हा कारकून होय. शेखुल्इस्लाम यास बादशहाबरोबर नेहमीं राहावें लागत असल्यामुळें ईश्वरदास यालाहि बादशाही छावणींत राहावें लागलें. मराठ्यांचा मोड करण्याच्या उद्देशानें औरंगजेब हा बऱ्हाणपुरास पोहोंचला (तेरा नोव्हेंबर १६८३). तेथून निघून तो औरंगाबादेस आला (बावीस मार्च १६८२). औरंगाबादेस कांहीं काळ घालविल्यानंतर तो अहमदनगरास आला (तेरा नोव्हेंबर १६८३). या मोहिमेंत ईश्वरदास हा बादशाही छावणींत हजर होता. इ. स. १६८३ च्या शेवटीं शेखुल्इस्लाम हा आपल्या जागेचा राजीनामा देऊन मक्केच्या यात्रेस निघून गेला. यानंतरहि ईश्वरदास हा औरंगजेबाच्या सोलापूर आणि विजापूर येथील छावण्यांतून (सप्टेंबर १६८६) असावा. विजापूरच्या वेढ्याचें त्यानें जें तपशीलवार वर्णन दिलें आहे त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते.

यानंतर ईश्वरदास हा गुजरातेंत परत गेलेला दिसतो. तेथील सुभेदार शुजाअतखान याच्या पदरीं त्यानें नोकरी पत्करली. जोधपूरचें राज्य आपल्या ताब्यांत घेतल्यानंतर औरंगजेबानें तें गुजरातेच्या सुभेदाराच्या देखरेखीखालीं ठेविलें होतें. जोधपूरचा प्रमुख अधिकारी म्हणून ईश्वरदास याची नेमणूक झाली. इ. स. १६९६ मध्यें ईश्वरदास यानें दुर्गादास राठोड याचें मन वळवून शहाजादा अकबर याची मुलगी आणि औरंगजेब याची नात सैफुन्निसा ही दुर्गादासाच्या संरक्षणाखालीं होती, तिला औरंगजेबाकडे ब्रह्मपुरी (सोलापूर जिल्हा) येथील छावणींत पोहोंचती केली. इ. स. १६९८ मध्यें ईश्वरदास हा पुन्हां एकदां ब्रह्मपुरीस आला होता. या खेपेस त्यानें शहाजादा अकबर याचा मुलगा याला बरोबर आणिलें. दुर्गादास राठोड हाहि ईश्वरदासाच्या बरोबर ब्रह्मपुरीस येऊन औरंगजेबाला भेटला. या प्रसंगीं औरंगजेबानें ईश्वरदास याला त्याच्या कामगिरीबद्दल मन्सब देऊन त्याचा गौरव केला.

यानंतर लौकरच ईश्वरदासाची जोधपुराहून अहमदाबादेस बदली झाली असावी. औरंगजेबाचा मुलगा शहाजादा आज्जम आणि नातू बेदारबख्त हे गुजरातेचे सुभेदार होते. इ. स. १७०७ मध्यें औरंगजेबाचा मृत्यु झाल्यानंतर थोड्याच काळानें गाजिउद्दिन फीरोजजंग (निजामुल्मुल्काचा बाप) हा अहमदाबादेचा सुभेदार होऊन आला. या तिघांशींहि ईश्वरदासाचा निकटचा

संबंध आला असावा. कारण तो आपल्या ग्रंथांत शहाजादा आज्मम, शहाजादा बेदारबख्त आणि गाजिउद्दीन फीरोजजंग यांचा आदरानें उल्लेख करतो.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर ईश्वरदास यानें 'फुतूहाते आलमगीरी' हा ग्रंथ लिहिण्यास घेतला. पण ग्रंथांतील हकीकत त्यानें साताराच्या वेढ्यापर्यंत म्हणजे इ. स. १७०० पर्यंतच आणून सोडली आहे.

ईश्वरदासाचा हा ग्रंथ अद्याप हस्तलिखिताच्या स्वरूपांत असून त्याची एक प्रत लंडनच्या ब्रिटिश म्युझियममध्यें आहे. त्याची एक प्रत सर जदुनाथ सरकार यांनीं करवून घेतली. या जदुनाथ प्रतीवरून माझे मित्र डॉ. पी. एम्. जोशी (संचालक सरकारी दप्तरखाना) यांनीं एक फोटोस्टाट प्रत तयार करवून मला वापरण्यास दिली.

ईश्वरदासानें आपला ग्रंथ कोणत्या सालीं लिहून संपविला हें नक्की कळत नाहीं. तो काळ इ. स. १७१० आणि इ. स. १७२० च्या दरम्यानचा असावा. ईश्वरदासाचा नातू लाला खुशहाल याच्या अवलोकनासाठीं म्हणून 'फुतूहाते आलमगीरी' या ग्रंथाची एक प्रत इ. स. १७४९ च्या सुमारास तयार करण्यांत आली. या प्रतीवरून कहानसिंग (राहाणार शहाजहानाबाद, दिल्ली) यानें हिजरी १२४६ म्हणजे इ. स. १८३१ मध्यें सातारा मुक्कामीं एक प्रत तयार केली असें ग्रंथांतील उल्लेखावरून समजतें. हीच प्रत ब्रिटिश म्युझियममध्यें आहे.

'फुतूहाते आलमगीरी' हा ग्रंथ फारशी भाषेंत असून अद्याप अप्रकाशित आहे. या ग्रंथाचीं तीनशें एकुणचाळीस पानें आहेत. औरंगजेबाचा मराठ्यांशीं संबंध आला. त्या हकीकतीचा मूळ फारशीवरून मराठींत अनुवाद करून पुढें दिला आहे.

ईश्वरदासाच्या या ग्रंथाचें स्वरूप बखरीप्रमाणें आहे. ईश्वरदास औरंगजेबाबरोबर दक्षिणेंत आला तो इ. स. १६८२ मध्यें. शिवाजी महाराजांबद्दल त्यानें दिलेली माहिती ऐकीव आणि अतिशयोक्तीनें भरलेली आहे. आपल्या माहितीच्या खरेंखोटेंपणाविषयीं त्यानें कांहींच शहानिशा केलेली दिसत नाहीं. त्यामुळें शिवाजी महाराजांविषयीं लिहितांना त्यानें हास्यास्पद चुका केल्या आहेत. शायस्ताखानावरील हल्ल्याचें वर्णन तर विलक्षणच आहे. शिवाजी महाराजांनीं मिठाईच्या पेटाऱ्यांतून निघून जावें असा सल्ला औरंगजेबाचा वजीर सलाबतखान हा जयसिंगाचा मुलगा कीरतसिंग यास देतो, ही थाप विलक्षणच म्हटली पाहिजे. पण शिवाजीचें बळ दिवसेंदिवस कसें वाढत होतें आणि त्यामुळें औरंगजेबाला शिवाजीविरुद्ध आपले प्रमुख सरदार कसे रवाना करावे लागले, दिलेरखानाचा पाठलाग शाहाजादा मुअज्जम यानें केला त्यावेळीं दक्षिणेंत काय गोंधळ

उडाला इत्यादि हकीकतींचीं वर्णनें ईश्वरदासानें चांगलीं दिलीं आहेत. संभाजी राजांच्या कारकीर्दींत ईश्वरदास हा इ. स. १६८६ पर्यंत तरी दक्षिणेंत होता. त्यामुळें शहाजादा अकबर याच्या हालचाली त्यानें दिल्या आहेत. त्या खऱ्या वाटतात. शिवाय दुर्गादास राठोड यांजबरोबर त्याचे घनिष्ठ संबंध होते. त्याच्याकडूनहि ईश्वरदासाला अकबरासंबंधीं माहिती मिळाली असावी. शहाजादा मुअज्जम याची कोंकणची स्वारी (१६८३–८४) ईश्वरदासानें वर्णिली आहे.

संभाजीराजांच्या कारकीर्दींत इ. स. १६८६ च्या अखेरीस मोगलांनीं सातारा भागांत जोराचा हल्ला केला. या मोहिमेंत निजामुल्मुल्काचा आजा ख्वाजा आबिद चिनकिलीचखान हा होता. याशिवाय विजापूर खालसा झाल्यावर तेथील रुस्तुमखान (सर्जाखान) वगैरे सरदार औरंगजेबास मिळाले होते. तेहि या मोहिमेंत हजर होते. संभाजीच्या चरित्रकारांनीं या मोहिमेची दखल घेतली नाहीं. या मोहिमेचें वर्णन ईश्वरदास देतो. या मोहिमेंत मोगलांना माघार घ्यावी लागली असें दिसतें. रुस्तुमखान यास या लढाईंत जबर जखमा झाल्या. या सुमारास औरंगजेब हा गोवळकोंड्याकडे वळल्यामुळें मोगलांचें स्वराज्यावरील दडपण कांहीं काळ तरी कमी झालें. भीमसेन सक्सेना हा आपल्या ‘ तारीखे दिल्कुशा ’ या ग्रंथांत या मोहिमेचा ओझरता उल्लेख करतो.

ईश्वरदासानें कोणत्याहि घटनेची तारीख दिली नाहीं. घटनांचा क्रमहि त्यानें व्यवस्थितपणें दिला नाहीं. गोवळकोंड्याच्या विजयाची हकीकत त्यानें विजापूर विजयाच्या हकीकतीच्या आधीं दिली आहे. रायगड मोंगलांनीं घेतला. हें आधीं सांगून नंतर त्यानें संभाजीच्या वधाची हकीकत दिली आहे.

संभाजीराजांची कैद आणि त्यांचा वध यासंबंधीं ईश्वरदासानें एक दोन गोष्टी सांगितल्या आहेत. त्या अभ्यासकांना नवीन वाटतील. ईश्वरदास हा १६९६ मध्यें ब्रह्मपुरी येथील औरंगजेबाच्या छावणींत होता. तेव्हां तेथें त्याला संभाजीबद्दल बऱ्याच गोष्टी कळल्या असल्या पाहिजेत. औरंगजेबासमोर उभे केल्यावर संभाजी राजांनीं त्याच्यासमोर आपली मान वांकविली नाहीं, तसेंच डोळे काढल्या दिवसांपासून त्यांनीं अन्नग्रहण केलें नाहीं, या गोष्टी ईश्वरदासानें नमूद केल्या आहेत. बादशहाच्या आज्ञेनें त्याचा बक्षी रुहुल्लाखान यानें संभाजी राजांकडे दोनच मागण्या केल्या. संपत्ति, जडजवाहीर याचा ठावठिकाणा देणें आणि मोगल सरदारांपैकीं कोणकोण त्यांच्याशीं संधान बांधून होतें यांचीं नांवें सांगणें. ही माहिती देण्याचें नाकारून त्यांनीं कडक शब्द वापरले असें ईश्वरदास लिहितो. यानंतर संभाजी राजांचे डोळे काढण्यांत आले. धर्मांतराचा प्रश्नच उपस्थित झाला नाहीं, हें विसरतां कामा नये.

कवि कलश हा फितूर झाला होता असें ईश्वरदास म्हणतो. इतर फारसी इतिहासकार अशीं विधानें करीत नाहींत. उपलब्ध मराठी साधनांवरूनहि फितुरीचा पुरावा मिळत नाहीं. रायगडाला वेढा घालण्यापूर्वी औरंगजेबानें महादजी नाईक निंबाळकर आणि कवि कलश याचा मुलगा यांजकडून रायगडाचा मेणाचा नमुना तयार करून घेतला होता अशी ईश्वरदासानें दिलेली माहिती नवीन वाटेल. कवि कलशाचा मुलगा हा आपल्या बापाच्या वधानंतर मोगलाच्या आश्रयाला राहिला असावा असा तर्क करावा लागतो.

संभाजी राजांच्या वधानंतरच्या घडामोडींसंबंधीं ईश्वरदासानें घटनांच्या आणि स्थळांच्या अनेक चुका केल्या आहेत. मराठे सरदारांपैकीं हंबीरराव आणि प्रतापराव या नांवाचा उल्लेख तो इ. स. १७०० च्या घटनांतूनहि करतो. मोगलांनीं बेळगांव घेतला. ईश्वरदासानें त्याचें बेंगळूर केलें आहे. मोगलांनीं पन्हाळगडाला वेढा घातला. राजाराम हा जूनच्या सुमारास पन्हाळगडांत आला होता त्यावेळीं गडाला मोगलांचा वेढा पडला होता. सप्टेंबर महिन्यांत (इ. स. १६८९) राजाराम हा पन्हाळगडांतून निसटून जिंजीकडे रवाना झाला. याची हकीगत आपल्याला केशव पंडितच्या 'राजारामचरितम्' या ग्रंथावरून तपशिलानें कळते. ईश्वरदासानें पण तपशील दिला आहे. पण पन्हाळगडाचा त्यानें राजगड केला आहे. सॉल्हेरचा किल्लेदार कृष्णाजी असें एकदां लिहिल्यावर ईश्वरदासानें साताऱ्यावरहि कृष्णाजी हा किल्लेदार होता असें लिहिलें आहे. यावरून त्यानें दिलेलें वेढ्याचें वर्णन साताऱ्चें नसून साल्हेरचें असावें अशी सर जदुनाथांची समजूत झाली.

राजाराम हा जिंजीकडे रवाना झाला. त्याच वेळीं राजारामाचा सरदार केशव पंडित हा प्रबळ सैन्य घेऊन कर्नाटकाच्या दिशेनें गेला असें ईश्वरदासानें नमूद केलें आहे. हा केशव पंडित म्हणजे राजारामचरितम्चा कर्ता केशव पंडित नव्हे. हा केसो त्रिमल असला पाहिजे.

राजाराम हा दोन नोव्हेंबर १३८९ मध्यें जिंजीला पोहोंचला. इ. स. १६८९ चें साल संपण्यापूर्वीच संताजी घोरपडे आणि इतर मराठे सरदार यांनीं संभाजीराजांना धरणारा मोगल सरदार मुकरबखान याजवर चाल केली. पन्हाळगडाजवळ मोठें युद्ध होऊन मुकरबखानाला भयंकर जखमा झाल्या. आणि तो कोल्हापुराकडे पळून गेला. ईश्वरदासानें तर नमूद केलें आहे कीं खान जमान (मुकरबखान) आणि त्याचा मुलगा यांच्या जखमा बऱ्या करण्यासाठीं बादशहानें सेब्यास्टियन नांवाच्या फिरंगी डाक्टरास त्याच्याकडे पाठविलें. केशव पंडिताच्या राजारामचरितम् या ग्रंथांत वरील युद्धाच्या हकीकतीस दुजोरा मिळतो. केशव पंडित म्हणतो, " शेख निजामाला (मुकरबखान)

जिंकण्यासाठीं पाठविलेल्या संताजी घोरपडे आदींनीं प्रथम निजामाचा पराभव करून नंतर त्याचे हत्ती, घोडे व पुष्कळ द्रव्य हरण केलें तेव्हां सर्व ऐश्वर्याचा नाश झाला आहे व सर्वांगावर जखमा झाल्या आहेत असा तो खल कसाबसा जीव वांचवून पर्वताच्या पायथ्याशीं वसलेल्या करवीरास गेला." (बेंद्रेकृत संभाजी पान ६३५).

राजारामाच्या हालचाली देतांना ईश्वरदासानें लिहिलेला मजकूर केशव पंडिताच्या राजारामचरितम्मधील मजकुराशीं बराच जुळतो. कांहीं ठिकाणीं इतकें साम्य आढळतें कीं, ईश्वरदासानें राजारामचरितम् आपल्या नजरेखालून घातलें असावें अशी शंका येते.

इ. स. १६९० पासून १६९९ पर्यंतच्या मराठ्यांच्या हालचालींची ईश्वरदासानें दखल घेतली नाहीं. इ. स. १६९९ च्या साताराच्या वेढ्याचें मात्र त्यानें वर्णन केलें आहे. यालाच जदुनाथ साल्हेरचा वेढा समजले.

ईश्वरदासानें आपलें औरंगजेब चरित्र इ. स. १७०० पर्यंत आणून सोडलें आहे. या बखरवजा ग्रंथांत स्थलकालविषयक कितीतरी चुकीची माहिती कशी आढळते हें वर सांगितलें आहे. पण इतकें असूनहि मराठ्यांचा इतिहास अभ्यासू पहाणाऱ्यांना या ग्रंथाचें महत्त्व पटल्याशिवाय राहाणार नाहीं.

इ. स. १६८० ते १७०७ या काळाच्या इतिहासावर प्रकाश टाकणारीं मराठी साधनें फार थोडीं आहेत. ही परिस्थिति पाहतां वरील काळाच्या अभ्यासासाठीं आपल्याला खाफीखान, साकी मुस्तैदखान, भीमसेन सक्सेना आणि ईश्वरदास नागर इत्यादि समकालीन फारशी इतिहासकारांच्या ग्रंथांकडेच वळावें लागतें. मराठी साधनांतून ज्यांचा उल्लेख नाहीं, किंवा असलाच तरी अतिशय त्रोटक आहे, अशा कितीतरी घटनांसंबंधीं आपल्याला फारसी साधनांवरून माहिती मिळते. ईश्वरदासाच्या ग्रंथावरून खालील गोष्टी आपल्याला कळतात. तो दुर्गादास राठोड याचा मित्र होता. हें लक्षांत ठेविलें म्हणजे त्यानें अकबराच्या हालचालीसंबंधीं दिलेली माहिती खोटी असेल असें वाटत नाहीं. ईश्वरदासाच्या माहितीवरून कवि कलश हा मोंगलांना फितुर झाला होता, असा प्रवाद रूढ झाला होता असें दिसतें. संभाजीराजांची बाणेदार वागणूक, इ. स. १६८६ च्या शेवटीं मोगल सरदार किलीचखान, रुस्तुमखान इत्यादींनीं केलेली साताराची मोहीम आणि त्यांचा झालेला पराजय, राजारामाचें पन्हाळगडावरून प्रयाण झालें तें कोणत्या परिस्थितींत झालें, संताजीनें मुकरबखानाचा कसा सूड उगविला, रुस्तुमखानाचा पराजय आणि कैद असे अनेक घटनांचे तपशील ईश्वरदासाने दिले आहेत. ते इतिहासाच्या अभ्यासकांना उपयुक्त असेच वाटतील.

औरंगजेब हा एक न्यायी, राजकारणपटु, शूर सेनापति, सारांश असामान्य असा बादशहा होता अशी भूमिका ईश्वरदासाची आहे. मराठ्यांच्यासंबंधीं तो अगदीं त्रयस्थाची भूमिका बाळगतो. औरंगजेबाचा आणि मोंगल बादशाहीचा एकनिष्ठ नोकर म्हणून तो स्वतःला समजतो. पण त्याच्याशीं आपल्याला कर्तव्य नाहीं. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे मिळतील तितके तपशील आपल्याला हवे आहेत. या दृष्टीनें ' फुतूहाते आलमगीरी ' या ग्रंथाचें महत्त्व आहे. या ग्रंथांतील मोंगल मराठा संघर्षापुरताच मजकूर मराठीत दिला आहे. अभ्यासकांच्या सोयी-साठी या मजकुराची पांच प्रकरणें तयार केलीं आहेत. हा अनुवाद इतिहासाच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.

— सेतु माधवराव पगडी

शिवकाल

या सुमारास औरंगजेब बादशहाला जी बातमी कळली ती ही कीं, दुष्ट शिवाजीनें अनेक बेकार माणसांना एकत्र करून दक्षिणेंत बंडाळी माजविली आहे. त्यानें आदिलशहाच्या ताब्यांत असलेले तळकोंकण आणि त्यांतील अनेक किल्ले आपल्या ताब्यांत आणले आहेत. याशिवाय बागलाण्यांतील साल्हेर, मुल्हेर, अंकी, टंकी, महोना, त्र्यंबक इत्यादि किल्लेहि त्यानें हस्तगत केले आहेत.

ही बातमी कळल्यावर बादशहानें महाराज जसवंतसिंग यास गुजरातेच्या सुभेदारीवरून बदललें; त्याच्या जागीं गुजरातेच्या सुभ्यावर महाबतखान याची नेमणूक करण्यांत आली. अमीरूल उमरा शायस्ताखान यास दक्षिणचा सुभेदार म्हणून नेमण्यांत आलें. त्याच्या बरोबर महाराजा जसवंतसिंग, रावसिंग, राव रामसिंग, राजासिंग शिसोदिया, आसफखान, नामदारखान, मुखलिसखान, कुतुबुद्दिनखान व राजा देवीसिंग वगैरे सरदार देण्यांत आले. एकंदरींत पन्नास हजार सैन्य जमलें. सफशिकनखान याच्या नेतृत्वाखालीं जय्यत तोफखाना तयार करण्यांत येऊन या सैन्यांबरोबर देण्यांत आला. शिवाजीचा मोड करण्यासाठीं हें सैन्य आणि वर उल्लेखिलेले सरदार रवाना करण्यांत आले.

त्याप्रमाणें शायस्ताखान हा कूच करीत एक महिन्यानें अहमदनगराजवळ पोहोंचला. तेथें गनिमांबरोबर युद्ध झालें. त्यांत त्यांचा मोड होऊन ते पळून गेले. शायस्ताखानानें गनिमाच्या हालचाली होत होत्या त्या प्रत्येक ठिकाणीं आपल्या तुकड्या नेमल्या. तो स्वतः पुणें आणि चाकण यांना वेढा घालण्याच्या उद्देशानें निघाला. त्यानें या स्थळांना चहूंकडून कोंडून मोर्चे बांधले. या स्थळांना रसद पोंहोंचणार नाहीं अशी त्यानें व्यवस्था केली. पण गनीम मोंगलांच्या कहीवर हल्ले करीत, उभयपक्षांत चकमकी घडत (पानें ९४ ते ९५). किल्ल्यांत असलेल्या आपल्या शिबंदीची परिस्थिति रसदेच्या अभावीं हलाखीची झाली आहे, ही बातमी शिवाजीला कळली. त्यानें आपले सरदार प्रतापराव आणि शेख इब्राहीम यांना चाळीस हजार स्वार बरोबर देऊन मोंगलांवर पाठविलें. हे सरदार परंडा प्रांताच्या बाजूनें मोंगलांवर चालून आले. त्यांचें सैन्य संख्येनें जास्त होतें. पण परमेश्वरावर भार ठेवून शायस्ताखान आणि महाराज जसवंतसिंग यांनीं गनिमांची गांठ घेतली. दिवस ढळण्याच्या वेळीं उभय दळांची गांठ पडली. घनघोर युद्ध झालें. उभय पक्षांतील स्वारांनीं घोडयावरून उडया टाकून हातघाईची मारामारी केली. इतक्यांत अंधार पडला. आणि गनिमांचा टिकाव न लागल्यामुळें ते पुरंदरच्या दिशेनें पळून गेले. मोगलांनीं त्या अंधारांतहि त्यांचा पाठलाग करून अनेकांना

ठार मारलें, आणि कित्येकांना धरलें. रात्रीचा एक प्रहर उलटून गेल्यानंतर मोगल सैनिक आपल्या गोटांत परत आले. पण मोगलांचें लष्कर एकंदरींत हैराण झालें होतें. कित्येक सैनिक जखमी झाले होते आणि औषधोपचार करण्यांत गुंतले होते. पुष्कळ सैनिक थकून भागून निपचित पडले होते. यामुळें मोंगलांनीं आपल्या छावणीच्या रक्षणाचा हवा तसा बंदोबस्त केला नाहीं. गस्त घालणें, किंवा मोर्चावर खबरदारी बाळगणें या गोष्टी त्यांना करतां आल्या नाहींत.

मध्यरात्रीच्या सुमारास किल्ल्यांतून दोन हजार कसलेले भालाईत (मराठे) बाहेर पडले. इकरामखानाच्या मोर्चांतून ते मोंगल छावणींत घुसले. त्यांपैकीं कांहीं जण नगारखान्याच्या दरवाजावर पोहोंचले, नंतर त्यांनीं नगारच्यांना भीति दाखवून त्यांना नगारे, कर्णे वगैरे वाद्यें मोठमोठ्यानें वाजविण्यास भाग पाडलें. वाद्यांच्या गोंगाटापुढें कुणालाहि कांहीं ऐकूं येऊं नये असा त्यांचा हेतु होता. यानंतर मराठ्यांची एक तुकडी शायस्ताखानाच्या तळावर चालून गेली. शायस्ताखानाची जीं कांहीं माणसें तळावर होतीं तीं लढून ठार झालीं. ही संधि साधून शायस्ताखान एके ठिकाणीं जाऊन लपून बसला. त्यानें आपल्या हातानें आपल्या कांहीं बायकांना आणि दासींना ठार मारलें. शायस्ताखानाच्या मुलीला पळून जाण्याची संधि मिळाली नाहीं. मराठे तिला घेऊन गेले. ही बातमी औरंगजेबाला कळली. तो अतिशय रागावला. त्यानें दक्षिणेंतील मोहिमेचें आधिपत्य शायस्ताखानाकडून काढून तें महाराजा जसवंतसिंग यांजकडे सोंपविलें.

जसवंतसिंगानें दोन वर्षेंपर्यंत मराठ्यांशीं निकराचें युद्ध केलें, पण मराठ्यांचें बळ कांहीं मोडलें नाहीं. उलट त्यांचें बळ अधिकच वाढलें (पान ९६). ही परिस्थिति पाहून बादशहानें जसवंतसिंगाच्या हातून ती मोहीम काढून घेतली. ती मिर्झा राजा जयसिंग यांजकडे देण्यांत आली.

जयसिंग आणि शिवाजी महाराज

जयसिंगाच्या आघाडीच्या सैन्याचें नेतृत्व दिलेरखान यांजकडे देण्यांत आलें. जयसिंग हा मुत्सद्दीगिरींत आणि योजकतेंत अद्वितीय होता. तो दक्षिणेंत येऊन पोहोंचला. त्यानें आपल्या सैन्याचे चार भाग केले. त्यावर त्यानें दिलेरखान, दाऊदखान, सफशिकनखान आणि कुतुबुद्दीनखान यांची नेमणूक करून शिवाजीचा मुलूख उध्वस्त करण्यासाठीं त्यांना रवाना केलें. तो स्वतः पुरंदरच्या पायथ्याशीं तळ देऊन राहिला. जयसिंगाच्या सेनापतींनीं निकराचीं युद्धें करून मराठ्यांना ठिकठिकाणीं हैराण केलें. जयसिंग यानेंहि युक्तीनें पुरंदरचा किल्ला जिंकून घेतला.

मराठ्यांनीं एक लाख तीस हजार स्वार आणि पायदळ असें सैन्य जमविलें. त्यांचें बळ दिवसेंदिवस वाढत होतें. त्यांनीं फिरंग्यांचे अनेक किल्ले जिंकून

घेतले. आदिलशहा आणि कुतुबशहा यांनीं खंडणी देण्याचें कबूल केलें. आणि
अशा रीतीनें त्यांनीं आपला मुलूख सांभाळला. मराठ्यांनीं सुभे वऱ्हाड, सुभे
खानदेश, सुभे तेलंग आणि सुभे बागलाण या प्रांतांतून चौथाई मुक्रर केली.
शिवाजीनें औरंगाबादेच्या भोंवतालच्या इलाख्यांत खंडणी वसूल केली. तो सुर-
तेला पोंहोचला. तेथून त्यानें तीन कोटी रुपये वसूल केले. सुरतेवरील त्याच्या
आक्रमणानें गुजरातेंत भयंकर घबराट पसरली (पान ९७). शिवाजीचीं आक्र-
मणें पाहून औरंगजेबानें स्वतः दक्षिणेकडे निघण्याचा बेत केला. दिल्लीच्या सुभ्यावर
त्यानें दानिशमंद खान याची नेमणूक केली. तो स्वतः मथुरेपर्यंत आला (पा.
१००). बादशहाला कळलें तें हें कीं, शिवाजीनें दक्षिणेंत विलक्षण बंडाळी
माजविली आहे. त्यानें अनेक मोठमोठीं गांवें उध्वस्त केलीं आहेत. त्यानें जागजागीं
आपलीं ठाणीं कायम केलीं आहेत. त्याच्या या आक्रमणामुळें प्रजा हैराण झाली
आहे. त्या भागांतील जमीनदारांना शिवाजीचा प्रतिकार करण्याची शक्ति न
राहिल्यामुळें ते त्याच्या अंकित बनले आहेत. यानंतर शिवाजीनें दंडराजपुरीला
वेढा घातला.

(पान १०१)

दंडराजपुरी (जंजिरा) हें एक बेट असून तेथील किल्ला अतिशय
मजबूत आहे. परशुरामानें हें बेट निर्माण केलें अशी आख्यायिका आहे.
हिंदु लोक परशुरामाला अवतार समजतात. तो किल्ला ताब्यांत घेऊन समुद्रांतून संचार
करणाऱ्या इंग्रजी व इतर व्यापारी गलबतांना त्रास द्यावा असा शिवाजीनें बेत
केला. त्यानें कोंकणांतील लोकांना आपल्याकडे वळविलें. आणि तो दंडराजपुरी-
जवळ पोहोंचला. सिद्दी याकूब हा येथील किल्लेदार होता. त्यानें तोफांचा मारा
करून मराठ्यांना जवळ येऊं दिलें नाहीं. आपलें कांहीं चालत नाहीं हें पाहून
शिवाजीनें जंजिऱ्याच्या समोरच एक बेट होतें त्यावर ताबा मिळविला. येथें त्यानें
एक मजबूत किल्ला बांधला आणि त्यावर तोफा चढवून शिद्याच्या किल्ल्यावर
मारा करण्यास सुरुवात केली. सिद्दी याकूब याची परिस्थिति फार कठीण झाली.
त्यानें आपल्या कांहीं अटी कळवून मिर्जा राजा जयसिंग याजकडे मदतीची
याचना केली.

(पान १०२)

सिद्दी याकूबनें आपल्या अटी कळविल्या त्या ह्याः—मी मोंगलांची चाकरी
पत्करीन. दक्षिणेच्या सुभेदाराच्या सेवेंत जातीनें हजर होण्यासंबंधीं मला माफी
मिळावी. मला आपल्या किल्ल्याच्या बंदोबस्तासाठीं आणि इतर खर्चासाठीं
म्हणून सुरतेच्या खजिन्यांतून दरसाल दीड लाख रुपये देण्यांत यावेत, म्हणजे
मराठ्यांच्या जहाजांना इकडच्या भागांत मी वावरूं देणार नाहीं. बादशाही
जहाजाचें येणें निर्वेध राहील याची मी व्यवस्था करीन.

मिर्जा राजा जयसिंग यानें सिद्दी याकूब याची अर्जी बादशहाकडे पाठविली. त्या सोबत पाठविलेल्या पत्रांत शिवाजीची बंडाळी, त्यानें दंडराजपुरीला घातलेला वेढा आणि सिद्दी याकूब यानें केलेली मदतीची याचना याचा उल्लेख होता. सिद्दी याकूब याचें म्हणणें कबूल करावें अशी शिफारस जयसिंगानें बादशहापाशीं केली. बादशहानें जयसिंगाची शिफारस कबूल केली. त्यानें एक फर्मान जयसिंगाला आणि दुसरें सिद्दी याकूब याला पाठविलें. जयसिंगाला पाठविलेल्या फर्मानांत त्यानें सिद्दी याकूब याची मदत करून शिवाजीचा मोड करावा असें म्हटलें होतें. सिद्दी याकूबला पाठविलेल्या फर्मानांत म्हटलें होतें कीं, तुमचें म्हणणें कबूल आहे. आणि जयसिंग लवकरच तुमच्या मदतीसाठीं येतील. बादशहाचें फर्मान आल्यावर जयसिंग हा मोठी फौज घेऊन दंडराजपुरीला पोहोंचला. तेथें पोहोंचून त्यानें शिवाजीचे दोन-तीन मातब्बर सरदार फोडले (पान १०३). त्यानें त्यांना पांच-हजारी मन्सबदारी आणि नगारे नौबतीचा मान मिळवून देऊन शिवाजीपासून वेगळें केलें. यामुळें शिवाजीच्या सैन्यांत फूट पडली. आतांपर्यंत तो प्रबळ आणि विजयी होता. आतां तो दुर्बळ झाला होता. आपण बाहेर पडलों तर आपले निमकहराम सरदार आपल्याला विरोध करतील आणि आपण फजीत होऊं असें शिवाजीला वाटलें. बादशहाला शरण जावें असा विचार करून त्यानें मिर्जा राजाशीं बोलणें सुरू केलें. आणि तो मिर्जा राजापाशीं आला. तो आपल्याकडे येत आहे असें कळल्यावर राजा जयसिंग यानें इखलासखान आणि कुंवर कीरतसिंग यास त्याला सामोरे जाण्यासाठीं पाठविलें. शिवाजी दारापर्यंत आला तसें जयसिंगानें पुढें होऊन त्याचें स्वागत केलें आणि त्याला आलिंगन देऊन मसनदीवर आपल्या जवळ बसविलें. शिवाजीनें त्याला एक रत्न [लाल माणिक] नजर म्हणून दिलें. यानंतर त्यानें आपल्या अपराधाची क्षमा मागून मोंगलांना बारा किल्ले दिले. किल्ल्यांच्या किल्ल्या त्यानें जयसिंगाच्या हवालीं केल्या. यानंतर चार घटका जयसिंगाबरोबर राहून तो आपल्या तळावर गेला. सारांश, जयसिंगानें घडलेली सर्व हकीकत लिहून बादशहाला कळविली. बादशहानें उत्तरादाखल जयसिंगाची स्तुति करून त्याला हत्ती, घोडे, रत्नजडित समशेर आणि मानाचे पोशाख इत्यादि वस्तु पाठविल्या, कुंवर कीरतसिंग यानें शिवाजीला दरबारांत आणावें आणि जयसिंगानें दक्षिणेंत राहून तेथील बंदोबस्त करावा, अशी बादशहानें आज्ञा केली. शिवाजीला बादशहानें फर्मान पाठवून त्याला दरबारांत बोलाविलें. आज्ञेप्रमाणें जयसिंग यानें कीरतसिंगाला शिवाजीबरोबर देऊन त्यांना बादशहाकडे रवाना केलें.

आग्र्यांत शिवाजी महाराज

कीरतसिंग आग्र्याजवळ पोहोंचला. बादशहानें दरबार भरवून सर्व अमीर-उमराव यांना हजर राहण्याची आज्ञा केली. दिवाणे आमपासून किल्ल्याच्या

दरवाजापर्यंत दोन्ही बाजूंला सुसज्ज आणि उंची जामानिमा केलेले सैनिक उभे करण्यांत आले होते. किल्ल्याच्या बाहेर प्रचंड हत्ती दोन रांगांतून उभे करण्यांत आले होते. खुद्द दिवाणे आममध्यें सेवक आणि अधिकारी आपापल्या जागीं शिस्तींत उभे होते.

यानंतर दिवसाच्या एक प्रहर आणि चार घटका झाल्या असतां बादशहाच्या आज्ञेनें शिवाजी दरबारांत आला. दरबारचा रुबाब आणि थाटमाट पाहून तो विस्मयचकित झाला. त्यानें बादशहाला कुर्निसात केली. आणि भेटी समोर ठेविल्या. यानंतर बादशहानें आपल्या अधिकाऱ्यांना आज्ञा केली कीं—शिवाजीला पांच हजारी मन्सबदारांत राजा रायसिंग याच्या खालीं (मागें) उभें करावें. या गोष्टीनें शिवाजीला फार चीड आली. पण तो तेथें चार घटका तसाच उभा राहिला.

(पान १०६) यानंतर बादशहानें सलाबतखान यास आज्ञा केली कीं, तुम्ही शिवाजीला त्याच्या मुक्कामावर घेऊन जावें. तुमच्या आणि पोलादखान यांच्या माणसांनीं त्याच्यावर नजर ठेवावी. त्या दिवसापासून शिवाजीचें दरबारांत जाणें-येणें बंद झालें.

यानंतर कांहीं दिवसांनीं बादशहानें कुंवर कीरतसिंग यास इषारा केला कीं, शिवाजीचा निकाल लावावा म्हणजे जगाला सलणारा हा कांटा नाहींसा होईल. पण जयसिंगानें शिवाजीबरोबर सुरक्षिततेच्या आणशपथा केल्या होत्या तें लक्षांत घेऊन कीरतसिंगानें बादशहाच्या आज्ञेची टाळाटाळ केली.

कीरतसिंगानें शिवाजीला बादशहाचा हेतु कळविला. हें ऐकून शिवाजी अतिशय सचिंत होऊन तेथून सुटका करून घेण्याचा विचार करूं लागला. त्यानें कीरतसिंगाला सांगून पाठविलें कीं, 'मी तुमच्या वडिलाबरोबर [जयसिंग] सुरक्षिततेसंबंधीं कौल करार झाल्यानंतर येथें आलों आहे. त्याच्या उलट येथें प्रकार घडावा ही किती दुःखाची गोष्ट आहे. मी जर मारला गेलों तर दीर्घ कालपर्यंत जयसिंगाचा या जगांत भयंकर दुर्लौकिक होईल.' यावर कुंवर कीरतसिंग यानें उत्तरांत शिवाजीला कळविलें कीं, 'तुमच्या सुटकेची मला तुमच्यापेक्षांहि अधिक काळजी लागून राहिली आहे. तुम्ही निश्चिंत असावें.'

यानंतर संधि पाहून कीरतसिंगानें सलाबतखान यास म्हटलें, "शिवाजी आग्र्यास आला आहे. लहानापासून थोरापर्यंत सर्वांना हें ठाऊक आहे कीं, माझ्या वडिलांनीं त्याला आश्वासनें दिलीं आहेत. म्हणून तो तेथें आला आहे. आतां बादशहाचा हेतु विपरीत दिसतो. असें कांहीं घडलें तर सगळी बदनामी माझ्या वडिलांची होईल. यामुळें आपल्याला योग्य वाटेल त्या मार्गानें आपण शिवाजीची सुटका होईल असें करा.

सलाबतखान याचे जयसिंगाशीं स्नेहाचे संबंध होते. सलाबतखान हा पट्टीचा मुत्सद्दी म्हणून प्रसिद्ध होता. त्यानें म्हटलें, "शिवाजीची सुटका होणें कठीण आहे. पण एक उपाय केला तर उपयोग होण्यासारखा आहे. त्यानें रोज चार मण मिठाई पेटाऱ्यांतून बाजारांत पाठवावी आणि गोरगरीब, साधूफकीर यांच्यांत वांटावी. उरलेली मिठाई अमीरउमराव आणि राजेमहाराजे यांच्याकडे पाठवावी. असें कांहीं दिवस केल्यानंतर शिवाजीनें एक दिवस पेटाऱ्यांत बसून-निघून जावें. याशिवाय सुटकेचा मला दुसरा उपाय दिसत नाहीं."

कुंवर कीरतसिंग याला हा सल्ला पटला. त्यानें शिवाजीला तसें कळविलें. शिवाजीनें रोज संध्याकाळीं मिठाई मागवावी, गोरगरिबांस वांटावी. आणि शिवाय मिठाईचे पेटारे राजेमहाराजे आणि अमीरउमराव याजकडे पाठवावे असा उपक्रम आरंभिला. अशा रितीनें एक महिना झाला. या सुमारास शिवाजीवर नजर ठेवणारा पोलादखान कोतवाल यानें एक दिवस बादशहाला विनंति केली कीं, "शिवाजीच्या या उपक्रमाच्या मागें कांहीं तरी हेतु दडलेला आहे. आपण आज्ञा करीत असाल तर मी हा उपक्रम बंद करून शिवाजीवर चांगली नजर ठेवीन." पण बादशहानें त्याच्या म्हणण्याकडे विशेष लक्ष दिलें नाहीं आणि त्या बाबतींत तांतडीची उपाययोजनाहि केली नाहीं.

याचा परिणाम असा झाला कीं, एक दिवस शिवाजी कैदेंतून निसटून निघून गेला. एके संध्याकाळीं पेटाऱ्यांत बसून तो बाहेर पडला. आणि रातोरात प्रवास करून तो मथुरेला पोहोंचला (पान १०८). तेथें कोकल नांवाचा एक ब्राह्मण त्याचा पुरोहित होता. त्याच्या घरीं तो राहिला. शिवाजी पळून गेला ही बातमी पहाटे बादशहाला कळली. त्यानें अधिकाऱ्यांना आज्ञा केली कीं, एकेक स्थळ तपासावें आणि तो सांपडेल तेथून त्याला धरून आणून हजर करावें. मोंगल अधिकारी तीन दिवसपर्यंत त्याला शोधण्याचा प्रयत्न करीत होते. पण त्याचा पत्ता म्हणून लागला नाहीं. बादशहाला तसें कळविण्यांत आलें. बादशहा कीरतसिंगावर अतिशय चिडला. त्यानें त्याची मन्सब वगैरे काढून घेऊन त्याला बडतर्फ केलें.

इकडे शिवाजी कांहीं दिवस आपल्या पुरोहिताच्या घरीं राहिला. त्यानंतर त्यानें साधु संन्यासी यांचा वेष घेतला. आपल्या पुरोहिताला घेऊन तो बाहेर पडला आणि बनारस व गया या तीर्थस्थानीं पोहोंचला. तेथें त्यानें धर्मकर्में पार पाडलीं. त्यानंतर झाडखंडाच्या वाटेनें तो आपल्या देशीं जाण्यास निघाला. जंगल झाडांतून प्रवास करीत तो शेवटीं राजगड येथें पोहोंचला. मथुरेचा पुरोहित त्याच्या बरोबर होता. त्याला त्यानें संपत्ति, जहागिरी, हत्ती, घोडे, इत्यादि देऊन संतुष्ट केलें. त्याला त्यानें कवि कलश ही पदवी देऊन त्याला मोठ्या योग्यतेला चढविलें.

शिवाजीनें आपलें सैन्य जमवून खूप धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. या सुमारास मिर्जा राजा जयसिंग यानें विजापुरावर हल्ला केला होता. विजापूरचे सरदार शर्जाखान आणि सिद्दी मसुद यांच्या बरोबर त्याचीं युद्धें चालू होतीं.

(पान १०९)

या युद्धांत उभय सैन्यांतील हजारों माणसें ठार झालीं. शेवटीं विजापूरकरांच्या संख्येनें अधिक असलेल्या सैन्यापुढें जयसिंगाचें कांहीं चालेना. ही बातमी बादशहाला कळली. त्यामुळें जयसिंगावर बादशहाची गैरमर्जी होऊन त्यानें जयसिंगाला दरबारीं बोलाविलें. दिलेरखान आणि इतर सरदार यांना दक्षिणेकडे रवाना करण्यांत आलें. राजा जयसिंग हा दक्षिणेतून निघाला. तो बुऱ्हाणपुरापर्यंत पोहोंचल्यावर तेथें मरण पावला.

शहाजादा मुअज्जम याची नेमणूक

बादशहांना कळविण्यांत आलें कीं, दिलेरखान हा दक्षिणेंत पोहोंचला आहे. पण मराठ्यांचा जोर वाढलेला पाहून बादशहानें शहाजादा मुअज्जम याची दक्षिणच्या सुभेदारीवर नेमणूक केली. जसवंतसिंग आणि इतर सरदार यांना दक्षिणेकडे रवाना करण्यांत आलें. शहाजादा मुअज्जम, हा आपल्या सरदारांसहित औरंगाबादेस पोहोंचला.

(पान ११०)

याच सुमारास दिलेरखान हा देवगड, चांदा या प्रांतांतून बरीच खंडणी घेऊन औरंगाबादेस आला. त्यानें बादशहाला कळविलें कीं, दोन वर्षेपर्यंत ही मोहीम (मराठ्यांविरुद्ध) माझ्याकडे द्यावी. तोफखाना व इतर युद्धसामुग्री मला देण्यांत यावी. म्हणजे मी मराठ्यांचा असा मोड करीन कीं, त्यांनीं पुन्हां डोकें म्हणून वर उचलू नये. यावर बादशहानें शहाजाद्याला आज्ञा केली कीं, दिलेरखानाला लागेल तो सरंजाम द्यावा. दिलेरखानाला आपल्या सैन्याचा आणि शक्तीचा गर्व चढला होता. त्यामुळें त्याची विचारशक्ति नष्ट झाल्यासारखी झाली होती. शहाजाद्याच्या भेटीस आपण गेलों तर न जाणों आपल्याला दगाफटका व्हावयाचा अशी शंका त्याला आली. शहाजाद्याला भेटण्यासाठीं म्हणून तो दोन-तीन वेळेस स्वार होऊन निघाला, पण वाटेंतच तो परत फिरला. आपण आजारी असल्याचें निमित्त करून त्यानें कांहीं दिवस घालविले.

शहाजाद्यानें त्याला बादशहाची आज्ञा कळविली. यावर त्यानें उत्तर केलें कीं, महाराजा जसवंतसिंग हे आपले मुख्य कारभारी आहेत. कुणाच्या मध्यस्थीनें मी आपल्या भेटीस येणें म्हणजे मी आपला अपमान समजतों. सारांश, बऱ्याच वाटाघाटीनंतर टरलें कीं, दिलेरखानानें शहाजाद्याची भेट घ्यावी. आणि शहाजाद्यानें त्याला युद्धसामुग्री उपलब्ध करून द्यावी. त्याप्रमाणें करण्यांत आलें.

(पान १११)

दिलेरखान हा दाऊदजाई रोहिला असून तो शौर्यामध्यें अद्वितीय होता. त्याच्यापाशीं चांगलाच सरंजाम असून त्याचें सैन्यहि कसलेलें होतें. फकीर आणि मौलवी यांचा सहवास त्याला आवडे. तो धर्मनिष्ठ होता. हे गुण असूनहि तो अत्यंत क्रूर आणि कठोर म्हणून प्रसिद्ध होता. बराच काळ तो गोंडवान्यावर अधिकारी म्हणून होता. तेथें त्यानें तेथील पुंड जमीनदारांची बंडें मोडून त्याच्याकडून बरीच खंडणी वसूल केली.

दिलेरखानाच्या गर्विष्ठपणाची आणि उद्धटपणाची तक्रार शहाजादा मुअज्जम आणि जसवंतसिंग यांनीं बादशहापाशीं केली. यावर बादशहानें त्यांना आज्ञा केली कीं, शक्य असल्यास त्याला शिक्षा करा.

याच सुमारास प्रतापराय (प्रतापराव गुजर) या सरदारानें मुंगी पैठण लुटलें होतें. बादशहाचें पत्र येण्यापूर्वीं दोन दिवस दिलेरखान यानें गोदावरी ओलांडून प्रतापरावाचा पाठलाग चालविला होता. आधींच आपल्याला कशी वागणूक मिळणार याबद्दल त्याला शंकाकुशंका होत्या. बादशहाचें फर्मान आलें असें कळतांच तो घाबरला. पावसाळ्याचे दिवस होते. जिकडे तिकडे चिखल झाला होता. पण दिलेरखानानें आपले तंबू वगैरे सरंजाम जाळून टाकले.

त्यानें बरेंचसें सामान गोदावरींत फेकून दिलें आणि तो तेथून पळत सुटला. राव रायसिंग, जगतसिंग हाडा, आणि शुभकर्ण (बुंदेला) हे सरदार आपापला सरंजाम असाच जाया करून त्याच्या बरोबर निघाले.

(पान ११२)

ही बातमी कळतांच शहाजादा मुअज्जम आणि महाराजा जसवंतसिंग यांनीं त्याचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. दिलेरखान हा फार घाबरला होता. त्यानें रात्रीचा दिवस करून नर्मदा गांठली. तो अकबरपूरच्या उताऱ्यावर आला. नदीला पूर आला होता. नावांची वाट न पाहतां दिलेरखानानें नदींत आपला घोडा घातला. त्याचे सहकारी सरदारहि त्याच्या मागोमाग नदींत उतरले. ती मंडळी कांहीं स्वारांनिशीं सुरक्षितपणें परतीराला लागली. पण त्याच्या सैन्यांतील अनेक शिपाई नदी पार करीत असतांना बुडून मेले. यानंतर दिलेरखान उज्जयिनीस पोहोंचला. तेथें त्यानें कांहीं काळ विश्रांति घेतली.

ह्या सुमारास महाबतखानाची गुजरातेच्या सुभेदारीवरून बदली होऊन त्याच्या जागीं बहादुरखान कोका याची नेमणूक झाली होती. दिलेरखान हा उज्जयिनीला आला असें कळल्यावरून बहादुरखान स्वतः तेथें गेला, आणि दिलेरखानाला आपल्या बरोबर अहमदाबादेस घेऊन गेला. तेथून त्यानें बादशहाला लिहून

कळविलें कीं, दिलेरखान हा पूर्णपणें राजनिष्ठ आहे. स्वार्थी लोकांच्या सल्ल्यानें शहाजादा मुअज्जम हा विनाकारण दिलेरखानाच्या मागें लागला आहे. बहादुरखानानें दिलेरखानाची सोरठचा फौजदार म्हणून नेमणूक करून त्याला सोरठकडे रवाना केलें. नेमणुकीचें पत्रहि त्यानें बादशहाकडे पाठविलें.

(पान ११३)

बादशहानें बहादूरखानाची विनंती मान्य केली. शहाजादा मुअज्जम यास बादशहानें आज्ञा केली कीं, दिलेरखानाचा पाठलाग थांबवावा आणि स्वतः औरंगाबादेस परत जावें. या हुकुमाची अंमल बजावणी करविण्यासाठीं त्यानें मीर हुसेनी या अधिकाऱ्यास शहाजाद्याकडे पाठविलें. शहाजादा आणि जसवंतसिंग हे औरंगाबादेस रवाना झाले. ते बुऱ्हाणपुरापर्यंत पोहोंचले. तोंच बादशहानें आज्ञा केली कीं, जसवंतसिंगाने बुऱ्हाणपुरांतच राहावें. शहाजादा औरंगाबादेस परत गेला. (सप्टेंबर अखेर इ. स १६७०). जसवंतसिंग हा नऊ महिनेपर्यंत बुऱ्हाणपुरांत होता. त्यानंतर गुजरातच्या सुभेदारीवर त्याची नेमणूक झाली आणि बहादूरखानाची नेमणूक दक्षिणच्या सुभेदारीवर झाली. इखलासखान आणि इतर सरदार यांना त्याच्या दिमतीस देण्यांत आले. शहाजाद्याला दरबारांत बोलावून घेण्यांत आलें.

बादशहानें आज्ञा केली कीं, मोंगलांनीं साल्हेरचा किल्ला जिंकून घ्यावा. आज्ञेप्रमाणें बहादुरखानानें साल्हेरचा किल्ला जिंकून घेण्याचा प्रयत्न केला. मराठ्यांची फौज साल्हेर जवळ मोंगलावर चालून आली (फेब्रुवारी १६७२). मोंगल आणि मराठे यांचें निकराचें युद्ध झालें इखलासखान हा जखमी झाला. आणि आपल्या पन्नास माणसांसहित मराठ्यांच्या कैदेंत सांपडला. या युद्धांत मोगलांची पांच हजार माणसें ठार झालीं. मराठ्यांचींहि अनेक माणसें मारलीं गेलीं. पण साल्हेरचा किल्ला कांहीं मोंगलांना मिळाला नाहीं.

(पान ११४)

बहादुर खानाला हात हालवीत औरंगाबादेस जावें लागलें. पुढें बहादुरखानानें दक्षिणेंत मोठमोठ्या कामगिऱ्या बजाविल्या.

येथें शिवाजी महाराजासंबंधीचा मजकूर संपला. इ. स. १६७२ नंतरच्या शिवाजी महाराजासंबंधीच्या हकीकती ईश्वरदासानें दिल्या नाहींत.

संभाजी काल

(पान १६१)

औरंगजेब बादशहा बुऱ्हाणपुरांत येऊन दाखल झाला (१३ नोव्हेंबर १६८१). शहाजादा महंमद आज्जमशहा यास मानाचीं वस्त्रें, हत्ती, दहा घोडे

इत्यादि देण्यांत येऊन तळ–कोंकणांतील संभाजीच्या मुलुखाविरुद्ध त्याची रवानगी करण्यांत आली. त्याच्या बरोबर खालील सरदार तैनात करण्यांत आले. हसन अलीखान बहादुर, फत्तेजंग खान, राव अनूपसिंग, अनिरुद्धसिंह हाडा, कुंवर किशनसिंग आणि इतर. मोंगलांच्या फौजा कोकई घाटावरून खालीं उतरून चहूंकडे पसरल्या. त्यांनीं तो प्रांत उध्वस्त करून टाकला.

याचा वृत्तान्त बादशहाला कळल्यावर त्यानें आज्ञा केली कीं शहाजादा आज्जम यानें हसन अलीखान यास भीमेच्या कांठावर ठेवून स्वतः आपल्याकडे निघून यावें.

(पान १६२)

तों पर्यंत बादशहा औरंगाबादेस येऊन पोहोंचला होता (२२ मार्च १६८२). याच सुमारास मोंगल फौजांना विजापूरच्या राज्याविरुद्ध पाठविण्यांत आलें होतें. दोन महिन्यांनंतर शहाजादा आज्जम हा औरंगाबादेस येऊन बादशहाला भेटला (जुलै १६८३).

(पान १६६)

शहाजादा आज्जम यास विजापूर जिंकून घेण्यासाठीं रवाना करण्यांत आलें (२० आगस्ट १६८३).

(पान १६८)

दिलेरखानाशीं घनिष्ठ संबंध ठेवल्यामुळें बादशहाची गैरमर्जी होऊन शहाजादा आज्जम याची विजापूरची मोहीम थांबली. शहाजादा शाहआलम मुअज्जम यानें आपल्याला कोंकणच्या स्वारीवर पाठविण्यांत यावें अशी बादशहाला विनंती केली. आज्जमची मोहीम मोडल्यामुळें आपल्या प्रगतीची शक्यता निर्माण झाली असें त्याला वाटलें. मुअज्जमची विनंती बादशहानें मान्य केली. शहाजादा कोंकण प्रांताकडे रवाना झाला. (१५ सप्टेंबर १६८३). हसन अलीखान हा भीमेच्या कांठावर होता. शहाजादा मुअज्जम याला त्यानें जाऊन मिळावें अशी त्याला आज्ञा करण्यांत आली. शहाजादा मुअज्जम यानें मजल दर मजल करीत कृष्णा ओलांडली.

(पान १७०)

शहाजादा मुअज्जम हा घाटाच्या (रामदऱ्याचा घाट) तोंडाशीं पोहोंचला. त्या भागांत घनदाट अरण्यें होतीं. नाइलाजानें शहाजादा यानें घाटाच्या तोंडाशीं चार मुक्काम केले. सैन्य आणि बुणगे यांना घाट ओलांडण्यास फार कष्ट पडले. यानंतर शहाजादा मुअज्जम हा आपलीं स्वतःचीं पथकें घेऊन घाट ओलांडून कोंकणांत उतरला. तेथून तो पुढें दोन मजला पार करून गेला असेल नसेल तोंच शहाजादा महंमद अकबर आणि संभाजी हे प्रचंड सैन्य घेऊन त्याच्यावर चालून आले. मोठें निकराचें युद्ध झालें. उभय पक्षांचे अनेक लोक ठार झाले. शेवटीं गनिमांचा धीर

सुटून ते रणांगणांतून पळून गेले आणि रायरी व राजगड या किल्ल्यांचा आश्रयाला जाऊन राहिले.

यानंतर मोंगलांचें सैन्य कूच करीत बिचोली (डिचोली) मुक्कामीं आलें. तेथें मोंगलांनीं छावणी केली. डिचोली हें मोठें शहर असून तेथें इंग्रज, डच, फ्रेंच आणि पोर्तुगीज राहतात. त्यांनीं तेथें मोठमोठे वाडे बांधले आहेत. ते किल्ल्या-प्रमाणें मजबूत आहेत. त्यांनीं आकर्षक अशा मोठ्या बागाहि तयार केल्या असून त्यांतून विविध प्रकारचीं फळझाडें लाविलीं आहेत. शहरांतून कालवेहि बांधण्यांत आले आहेत.

याशिवाय महंमद अकबर आणि संभाजी यांनींहि तेथें मोठ्या हवेल्या बांधल्या आहेत. शहराला लागून एक खोल नदी वाहते. तिला हिंदु पंचगंगा या नांवानें ओळखतात. दर वर्षी भोंवतालच्या प्रदेशांतून हिंदु लोक या नदींत स्नानें करण्यास येतात.

(पान १७१)

सारांश, शहाजादा मुअज्जम यानें महंमद अकबर आणि संभाजी यांनीं बांधलेल्या हवेल्या पाडून टाकल्या आणि बागा नष्ट केल्या. यानंतर कूच करीत तो गोव्याजवळ आला. गोवा हें पोर्तुगीजांचें बंदर आहे. गोव्याजवळ पोंहचल्यानंतर मोगल सैन्यांत रसदेची फार महर्गता झाली. धान्य कोठेंच मिळेनासें झालें. उपास-मारीनें लोकांचे प्राण कंठाशी आले.

ही बातमी खैरियतखान आणि याकूतखान (शिद्दी) यांना कळली. त्यांनीं धान्यानें भरलेलीं जहाजें मोंगलांच्या कडे पाठविलीं. त्यामुळें मोंगल छाव-णींत धान्याची सुबत्ता झाली.

मुअज्जम हा कोंकण प्रांतांत कांहीं दिवस राहिला. यानंतर तो बादशहाकडे गेला (१८ मे १६८४).

बादशहाच्या मनाप्रमाणें मराठ्यांचा मोड झाला नाहीं. त्यांचे किल्लेहि हस्तगत झाले नाहींत यामुळें बादशहानें अहमदनगर येथें आपली छावणी केली. (१३ नोव्हेंबर १६८३). अहमदनगर मुक्कामीं शहाजादा मुअज्जम हा बाद-शहाला येऊन भेटला. त्याला गोवळकोंड्याच्या स्वारीवर पाठविण्यांत आलें.

(पान २०९)

शिरवाणगड (शिरवळ ?) चा ठाणेदार बहादुरखान याच्या पत्रावरून बादशहाला कळलें कीं, शहाजादा अकबर याच्याबरोबर प्रचंड फौज देऊन त्याला उत्तर हिंदुस्थानांत पाठविण्याचा विचार संभाजी करीत आहे. ही बातमी कळतांच बादशहानें शहाजादा आज्जम यास तीस हजारांचें सैन्य बरोबर देऊन अहमद-नगराकडे पाठविलें. अकबर त्याच वाटेनें उत्तर हिंदुस्थानांत जाणार होता.

बादशहानें शहाजादा आज्जम यास आज्ञा केली कीं, अकबरची वाट अडवावी आणि तो जाईल तेथें त्याचा पाठलाग करून त्याला कैद करावें. बहादुरखानाचा मुलगा अजीजखान हा शहाजादा मुअज्जम याच्या तैनातींत होता. त्याला तेथून काढून शहाजादा आज्जम याच्या तैनातींत देण्यांत आलें.

(पान २१०)

विजापूरच्या मोहिमेवरून मोकळीक मिळाल्यावर बादशहानें गोवळकोंडयाकडे कूच केलें. रुहुल्लाखान यास कृष्णेच्या पलीकडील प्रदेशाचा बंदोबस्त करण्यासाठीं पाठविण्यांत आलें होतें. बादशहाचा मुक्काम बीदरजवळ असतांना रुहुल्लाखानानें विनंतिपत्र पाठविलें तें खालील अर्थाचें होतें.

आपण कृष्णेपलीकडील मुलुखाचा बंदोबस्त करण्यास गुंतलों असतांना संभाजीचा सरदार आनंदराव हा बादशाही मुलुखांत चौथ वसूल करण्यासाठीं सैन्य घेऊन आला होता. आपण खानाजादखान (रुहुल्लाखान याचा मुलगा) यास आनंदरावाविरुद्ध पाठविले. उभयतांची लढाई होऊन गनीम पराजय पावून पळून गेले. बादशाहानें मराठ्यांचा पाठलाग करून त्यांचा मोड करावा अशी रुहुल्लाखानास आज्ञा केली. (ही हकीकत १६८७ च्या सुरुवातीची असावी)

(पान २११)

बादशहांना कळविण्यांत आलें तें हें:-शहाजादा अकबर याची वाट अडविण्यासाठीं शहाजादा आज्जम यास पाठविण्यांत आलें होतें. शहाजादा आज्जम हा गंगापुरास (औरंगाबाद जिल्हा) पोंचला यामुळें शहाजादा अकबर हा घाबरला. तो साल्हेरीच्या किल्ल्याजवळ पोहोंचला. साल्हेरीहून जवळच हनवंत गडचा किल्ला आहे. शहाजादा आज्जम हा त्या किल्ल्याजवळ पोंचला आणि त्यानें शहाजादा अकबर याची वाट अडविली. हें पाहून अकबरला आपला बेत सोडून द्यावा लागला. तो साल्हेरीहून निघून कोंकणांत उतरला आणि माहुलीच्या किल्ल्याच्या आश्रयाला जाऊन राहिला.

(पान २१२)

आतां अकबरला आपल्या भटक्या आयुष्याचा कंटाळा आला होता. तो अगदीं हैराण झाला. बादशहापाशीं दयेची याचना करावी असें त्याला वाटलें, पण दुर्गादासाच्या सल्ल्यामुळें त्याला तसें करणें शक्य झालें नाहीं.

यानंतर बादशहाला कळविण्यांत आलें तें हें:-अकबर हा माहुलीहून निघून कल्याण भिवंडीला पोंचला. तेथें तो दोन-तीन दिवस थांबला. त्यानंतर तेथून निघून तो पन्हाळगडापाशीं आला. तेथें त्याचें आणि मोगलांचें घनघोर युद्ध झालें. अकबरचा मार्ग त्यामुळें खुंटला व त्याला फिरून डोंगराळ मुलुखांत निघून जावें लागलें. काकरखान आणि मरहमतखान हे मोगल सरदार फौजेच्या कुमके-

साठीं गेले होते. या लढाईनंतर ते आपल्या इलाख्याला परतले. त्यांना फिरून मोगल फौजेला जाऊन भिळण्याची बादशहानें आज्ञा केली.

(पान २१३)

जुन्नरचा किल्लेदार अबुल्खैरखान यानें विनंतिपत्र पाठविलें कीं, सांगोल्याचा किल्ला फत्ते झाला. किल्लेदारानें लढाई दिली; पण तो पराजित होऊन कैद झाला आहे. किल्लेदाराला बादशहाकडे पाठविण्यांत आलें. तशी त्यानें आज्ञा केली होती (मे १६८७).

बादशहाची मुलगी जीनतुन्निसा हिनें शहाजादा अकबर यास एक उपदेश-पर पत्र लिहिलें. त्याच्या उत्तरांत शहाजाद्यानें बादशहाला आणि जीनतुन्निसा बेगम यांना पत्रें लिहून आपल्या अपराधांची क्षमा मागितली. त्याला बादशहानें उत्तर पाठवून तुम्ही निःशंकपणें आमच्याकडे यावें असें त्यास कळविलें.

(पान २१४)

या गोष्टीला एक महिना झाला. हरकाऱ्यांनीं बादशहाकडे अकबरासंबंधीं खालील बातमी आणली:—

" अकबरानें बाहेर पडण्याची खूप धडपड केली, पण त्याला कुठेंच यश आलें नाहीं. शेवटीं निरुपाय होऊन तो संभाजीकडे गेला. त्याची मदत घेऊन तो माहुलीला गेला. तेथें त्यानें आपला सरंजाम उभा केला. तेथून तो शहापूरला आला. हें स्थळ समुद्रापासून वीस कोसांवर आहे. तेथून दमणला उजवीकडे टाकून जव्हारच्या वाटेनें बाहेर पडावें असें त्यानें ठरविलें आहे. जव्हार हें बादशाही मुलुखाच्या सरहद्दीपासून पांच कोसांच्या अंतरावर आहे. " ही बातमी ऐकून बादशहा म्हणाले, " त्याच्या नाशिबीं भटकणेंच आहे. "

(पान २१५)

बादशहा किलीचखानास म्हणाले, " माहुलीच्या किल्ल्यांत गनिमाचें सैन्य जमलें आहे. गनीम आमच्या सैन्याबरोबर युद्धें करतात. आणि विजापूर सुभ्याच्या परगण्यावर हात घालतात. त्यांचा मोड करावा म्हणून मी गाजीउद्दीन यास सांगितलें होतें, पण तो या कामांत झटला नाहीं. आतां त्या दुष्टांचा मोड करण्यासाठीं मलाच जाणें प्राप्त आहे. "

(पान २१६)

यावर किलीचखानानें म्हटलें, " आपण कष्ट घेण्याचें काय कारण आहे ? आपल्या हाताखालील कोणीहि एक अधिकारी हें काम पाहूं शकेल. मला आज्ञा झाली तर मी जाऊन गनिमांचा मोड करतों. " बादशहानें किलीचखानाची विनंती कबूल केली. किलीचखान हा मोहिमेवर रवाना झाला. त्याच्या बरोबर सरबलंदखान, राजा भीम आणि मानसिंग राठोड हे देण्यांत आले. हें सैन्य कूच

करीत मराठ्यांजवळ पोंचलें. उभय पक्षांत युद्ध सुरू झालें. उभय सैन्यांतील अनेक माणसें ठार झालीं. शेवटीं मोगलांसमोर टिकाव धरतां न आल्यामुळें शत्रु पळून गेला. मोगलांनीं अनेकांना कैद केलें. मृत आणि जखमी यांची व्यवस्था करण्यासाठीं मोगलांचें सैन्य हें युद्धमैदानावरच तळ देऊन राहिलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मराठे फौज घेऊन मोगलांवर चालून आले. मोगल स्वारांनीं घोड्यावर खोगिरी घातल्या. शत्रूशीं लढण्यास ते तयार झाले.

(पान २१७)

ही बातमी बादशहाला कळली. त्यानें मोगल सैन्याला कुमक करण्यासाठीं म्हणून मुनव्वरखान आणि बहरामंदखान यांजबरोबर सैन्य देऊन पाठविलें. गाजीउद्दीनखान आणि रुस्तुमखान यांची विजापूर राज्यांतील किल्ले जिंकून घेण्याच्या कामावर नेमणूक झाली. तें काम आटोपून ते बादशहाकडे आले होते. त्यांनाहि मोगल सैन्याची कुमक करण्यासाठीं म्हणून पाठविण्यांत आलें. तेहि कूच करीत या युद्धांत सामील झाले. मोगलांचे सरदार गाजिउद्दीन यांनीं एकीकडून तर रुस्तुम यांनीं दुसरीकडून मराठ्यांच्यावर हल्ला चढविला. त्यांनीं आपले हत्ती शत्रूवर घातले. युद्ध मोठें निकराचें झालें. रुस्तुमखानाला भाल्याच्या दोन जखमा झाल्या. एक जखम मानेवर आणि दुसरी जखम हातावर. त्याच्या हत्तीला भयंकर जखमा होऊन तो जमिनीवर कोसळला. त्याच्या सोंडेचे दोन तुकडे झाले. मोगलांचे दोन हत्ती या युद्धांत मारले गेले. मारल्या गेलेल्या सैनिकांसंबंधीं काय सांगावें ? प्रेतांचे ढीग लागले होते. अशा रीतीनें युद्ध चालू असतां किलीचखान आणि सरबलंदखान हे पुढें सरसावले. त्यांनीं मोठ्या शौर्यानें लढा चालू ठेविला. या युद्धांत अनेक माणसें मारलीं गेलीं. मोगलांना फार शर्थ करावी लागली. शेवटीं शत्रूचा टिकाव न लागून तो पळून गेला. मोगलांनीं दोन-तीन कोसपर्यंत त्यांचा पाठलाग करून त्याची बरीच मालमत्ता हस्तगत केली. यानंतर मोगलांचें सैन्य परतलें. बादशहाकडे येऊन मोगल सरदारांनीं युद्धाची सगळी हकीकत कळविली. बादशहानें प्रत्येक सरदारावर कृपा दाखवून त्यांचा गौरव केला.

(पान २१८)

विजापूरचा सुभेदार रुहुल्लाखान यानें पुढील माहिती पाठविली. इंदापूरचा ठाणेदार हबीबुल्लाखान याची नेमणूक शहापूरचा किल्लेदार म्हणून झाली होती. तो आपल्या किल्ल्याजवळ जाऊन पोंचला. संभाजी इतस्ततः फिरत होता. त्यानें येऊन किल्ल्यास वेढा घालून तो जिंकून घेतला. हबीबुल्लाखान यास कैद करून संभाजीनें त्याला आपल्याबरोबर नेलें.

हरकाऱ्यांच्याकडून बादशहाला पुढील हकीकत समजली. जव्हारचा जमीनदार तुकाराम त्र्यंबक याचा भाऊ रघुवीर खंडो यानें अकबर याचें मार्गदर्शन केलें.

अकबर हा फिरंग्याच्या मुलुखाच्या हद्दीजवळ पोंचला. तेथून निघून उत्तर हिंदुस्थानाकडे जावें. असा त्यानें बेत केला आहे. बादशहानें शहाजादा आज्जम यास आज्ञा केली कीं शहाजादा अकबर याचा पाठलाग करावा आणि त्याची जाण्याची वाट अडवावी.

हरकऱ्यांनीं बातमी आणली कीं सांगोल्याचा ठाणेदार नूरमहंमद हा होता. संभाजीचें सैन्य त्याच्यावर चालून गेलें. उभय पक्षांत मारामारी झाली. मराठ्यांचें सैन्य अधिक असल्यामुळें नूरमहंमद यास माघार घ्यावी लागली. मराठ्यांनीं मोंगलावर हल्ला करून नूरमहंमदला पकडलें आणि ते त्याला घेऊन गेले.

(पान २१९)

घुसलखान्याच्या दारोगा हयातखान यानें बादशहाला सांगितलें तें हें:—— "हरकाऱ्यांचा दारोगा अलीमहंमद हा म्हणतो कीं, त्याचे हरकारे बातम्या आणण्यासाठीं संभाजीच्या मुलखांत गेले होते. तेथें त्यांना शहाजादा मुअज्जम याचीं माणसें आढळलीं. त्यांच्या ऐकण्यांत असेंहि आलें कीं शहाजादा मुअज्जम याच्या चिथावणीनें संभाजी आपलें सैन्य पाठवून धामधूम करीत आहे." या बातमीनें बादशहाला फार राग आला. त्यानें बहरामंदखानास आज्ञा केली कीं, कांहीं जणांना संभाजीच्या मुलखांत पाठवून तेथें मोगल लष्करांतील माणसें गेलीं असतील त्यांना पकडून घेऊन यावें. त्याप्रमाणें तिघां–माणसांना पकडून आणण्यांत आलें. त्यांची झडती घेण्यांत आली, त्यावेळीं त्यांच्यापाशीं शहाजादा मुअज्जम यानें संभाजीला लिहिलेलीं पत्रें मिळालीं. बादशहानें तीं पत्रें स्वतः वाचून पाहिलीं. शहाजाद्याच्या या कृत्याचा त्याला राग आला. यापूर्वीहि शहाजाद्यानें सिकंदर आदिलशहा आणि कुतुबशहा यांजबरोबर पत्रव्यवहार केला होता. वरील कारणानें बादशहानें त्याला नजरकैदेंत ठेवलें. (एकवीस फेब्रुवारी १६८७)

(पान २२४–२३५)

पेठा प्रांताचा जमीनदार अब्दुलकरीम यानें विनंतीपत्र पाठविलें तें असें:—— परमेश्वराच्या कृपेनें आणि बादशहाच्या भाग्यानें रामसेजचा किल्ला मोगलांच्या ताब्यांत आला आहे. बादशहानें अब्दुलकरीम यास खिलतीचे पोशाक, जडावाचा खंजीर, एक हत्ती, पांचशेंची मन्सब आणि दहा हजार रुपये रोख बक्षीस म्हणून दिले.

साल्हेरचा किल्ला हा बागलाणांत असून प्रसिद्ध आहे. पूर्वी खानजहान बहादुर, दिलेरखान, इखलासखान, राजा रायसिंग, कुतुबद्दीनखान ख्वेशगी आणि इतर मोगल सरदार यांनीं प्रचंड अशा सैन्यासहित हा किल्ला जिंकून घेण्याचे प्रयत्न केले होते. पण किल्ला कांहीं फत्ते झाला नाहीं. मोगल सरदारांना वेढा उठवून परत जावें लागलें. सुल्हेरचा किल्लेदार नेकनामखान हा मोठा शहाणा आणि दूर-

दृष्टीचा मनुष्य होता. खटपट करून साल्हेरचा किल्ला ताब्यांत येण्यासारखा आहे असें त्याला वाटलें. त्यानें कांहीं शहाणीं माणसें साल्हेरचा किल्लेदार कृष्णाजी याजकडे पाठविलीं.

(पान २२६)

नेकनामखानानें कृष्णाजीला गोड गोड बोलून आणि सोनें, नाणें, घोडे इत्यादि वस्तु भेटीदाखल देऊन त्याचें मन आपल्याकडे ओढून घेतलें. त्यानें कृष्णाजीला सांगितलें कीं किल्ला मोगलांच्या हवालीं करावा म्हणजे बादशहाकडून मोठी मन्सब मिळून मानसन्मान वाढेल. अनेक मराठे बादशहाच्या पदरीं लागून मोठमोठ्या जागेवर नेमले गेले होते. हें कृष्णाजीला दिसत होतें. त्यानें किल्ला मोगलांच्या हवालीं केला. नेकनामखानाच्या शिफारशीवरून बादशहानें कृष्णाजीला तीन हजार जात आणि दोन हजार स्वार यांची मन्सब दिली. कृष्णाजीला त्याच प्रांतात जहागीर देण्यांत आली. नेकनामखान यास पांचशें जात आणि पांचशें स्वार अशी त्याच्या मन्सबींत वाढ करण्यांत आली.

(पान २२७)

त्याला झेंड्याचा मान देण्यांत आला. मिर्जा फर्रूकबेग हा पांचशेंचा मन्सबदार होता. साल्हेरचा किल्लेदार म्हणून त्याची नेमणूक करण्यांत आली. किल्ल्याचें नांव सुलतानगड असें ठेवण्यांत आलें (मे १६८७).

बादशहाला कळलें कीं, मराठ्यांचें सैन्य बादशाही छावणीपासून चार कोसांवर आलें आहे. बादशहानें मराठ्यांवर चालून जाऊन त्यांचा मोड करण्यासाठीं पुढील सरदार रवाना केले. गाजिउद्दीनखान, अल्लावरदीखान, मुखलिसखान, जुल्फिकारखान, अब्दुस्समदखान, निजामुद्दीनखान, सुल्तानअलीखान, किशोरसिंह, रायसिंह आणि इतर सरदार. मोगलांची तयारी होईपर्यंत संध्याकाळ झाली. मराठ्यांनीं चहूंकडून हल्ला केला. पण रात्र झाल्यामुळें ते पांगले आणि इकडे तिकडे भटकूं लागले. पण मराठे रात्रीच्या वेळीं छापा घालतील या विचारानें मोगल रात्रभर हत्यारबंद जागे होते. दुसऱ्या दिवशीं मराठ्यांनीं मोगलांवर हल्ला केला.

(पान २२८)

युद्ध मोठें निकराचें झालें. मोगलांतर्फे किशोरसिंह हाडा हा आपले मुलगे आणि इतर सहकारी यांच्या सहित मराठ्यांवर निकरानें तुटून पडला. या युद्धांत किशोरसिंहाचीं दोन मुलें रामसिंह आणि हरनाथसिंह आणि त्यांच्याबरोबर असलेले नव्वद रजपूत सैनिक मारले गेले. तसेच किशोरसिंहाचे नातू केशरसिंह आणि मुहकमसिंह हे सत्तर रजपुतांसहित ठार झाले.

(पान २२९)

या सुमारास सफशिकनखानाचा भाऊ निजामुद्दीनखान हा आपल्या सैनिकांसह चालून आला. मराठ्यांशीं निकरानें लढत असतां तो आपल्या सह-

कान्यांसहित ठार झाला. त्याचा मुलगा मेहदीअलीखान आणि सुल्तानअलीखान आणि इतर कांहीं मोगल अधिकारी हे गंभीर जखमा होऊन रणांगणावर पतन पावले. मोगल सैन्याची स्थिति फार कठीण झाली. हें पाहून बादशहानें स्वतः लढावें म्हणून आपला खाशाचा हत्ती मागविला. तोंपर्यंत गाजिउद्दीनखान, हमीदुद्दीनखान, मुजाहिदखान आणि इतर सरदार हे आपलीं सैन्यें घेऊन युद्धांत चालून गेले आणि शत्रूवर शस्त्रास्त्रांचा वर्षाव करून त्यांनीं त्यांना पळवून लावलें. बादशहानें आपल्या सरदारांचा गौरव केला.

(पान २३०)

शहाजादा आज्जमकडे बातमी आली कीं, दुर्गादास राठोड यानें शहाजादा अकबर यांस जहाजावरून रवाना केलें असून तो स्वतः रतलामच्या प्रांतांत परत गेला आहे.

शहाजादा आज्जम यानें संभाजीचे किल्ले जिंकून घेतले. होते. त्यांच्या किल्ल्या त्यानें बादशहाकडे पाठविल्या.

सुरतेचा कारभारी मोतिमदखान यानें कळविलें कीं, शहाजादा अकबर हा मस्कतच्या बंदरांत पोंचला आहे (फेब्रुवारी १६८७).

(पान २३४–३९)

विजापूर प्रांतांतून बातमी आली कीं, संभाजीचा सरदार रहीमदाद हा बरेंच मोठें सैन्य घेऊन पंचमगडच्या परिसरांत पोंचला. त्यानें तो इलाखा घेतला आहे हें पाहून इहतिशामखान आणि नारोजी राघू हे त्याच्यावर चालून गेले. मोठें निकराचें युद्ध झालें. उभय दलांतील दोन हजार माणसें ठार झालीं. शेवटीं मोगलांनीं रहीमदाद यांस कैद केलें. बादशहानें त्याला दरबारांत पाठविण्यांत यावें म्हणून आज्ञा केली.

(पान २३८)

बादशहानें आज्ञा केली कीं, संभाजीचे जे किल्ले घेण्यांत आले आहेत ते भीमा नदीच्या अलीकडे असतील तर त्यांचा समावेश औरंगाबाद सुभ्यांत करण्यांत यावा. भीमेच्या पलीकडील किल्ले विजापूर सुभ्यांतील, असें समजण्यांत यावें.

(पान २३९)

बादशहा विजापुरास पोंचला. (१५ मार्च १६८८).

(पान २५३)

शहाजादा आज्जम यानें विजापूरचा अधिकारी सय्यद महंमद याजकडून बेळगांवचा किल्ला जिंकून घेतला (मे १६८८). किल्ल्याचें नांव आज्जमनगर असें ठेवण्यांत आलें.

(पान २६९)

असीरगडला शेखजहान नांवाचा किल्लेदार होता. संभाजीची एक नाटकशाळा त्या किल्ल्यांत कैदेंत ठेवण्यांत आली होती. किल्लेदारानें तिच्याशीं अनैतिक संबंध ठेविला. तिला गर्भ राहिला. ही बातमी बादशहाला कळली. बादशहानें किल्लेदाराला दरबारांत बोलाविलें. तो आल्यावर बादशहानें शेखजहान किल्लेदार यास कैद करावें अशी सलाबतखानास आज्ञा केली. सलाबतखानानें त्याला रात्रीच्या वेळीं बोलावू पाठविलें. त्याला निःशस्त्र करून आणा असें त्यानें आपल्या सेवकांना सांगितलें. ही गोष्ट शेखजहानला अपमानकारक वाटली. त्यानें शस्त्रें काढून ठेवलीं नाहींत. याबद्दल संभाषण चालू असतां त्या भरांत शेखजहान यानें आपल्या कमरेचा खंजीर काढला आणि आपल्या पोटांत खुपसून घेतला. खंजिराच्या आघातानें तो जखमी होऊन जमिनीवर पडला आणि बेशुद्ध झाला. ही बातमी बादशहाला कळल्यानंतर त्यानें आज्ञा केली कीं, तूर्त त्याला काजीउलकुजात (न्यायाधीश) याच्या हवालीं करण्यांत यावें. तो बरा झाल्यानंतर त्याला आपल्या हुजुरांत हजर करण्यांत यावें.

मोगल सरदार मोतिमदखान यानें त्र्यंबकचा किल्ला जिंकून घेतला होता. त्याला बक्षीस म्हणून तीस हजार रुपये देण्यांत आले (८ जानेवारी १६८९)

(पान २७०)

बादशहाला कळविण्यांत आलें कीं, पायीनघाट (घाटाखालचा) चा ठाणेदार खिदमततलबखान याच्यावर मराठ्यांनीं हल्ला केला. लढाई निकराची झाली. मोगलांनीं शर्थीची लढाई केली. शेवटीं मराठ्यांचा जय होऊन ते खिदमततलबखान यास कैद करून घेऊन गेले.

(पान २७१)

याच सुमारास एतिकादखान (जुल्फिकारखान) यानें पत्र पाठवून बादशहाला खालीलप्रमाणें कळविलें. हंबीरराव यांचे भाऊ आणि संभाजीचें सरदार हे बादशाही मुलुखांत शिरून धामधूम करीत होते. मी इतर मोगल सरदारांसहित त्यांना मलकापुराजवळ गांठलें. मोठी लढाई झाली. शत्रूंपैकीं अनेक ठार आणि जखमी झाले. आपलेहि कित्येक सैनिक ठार आणि जखमी झाले. शेवटी शत्रू टिकाव धरूं शकले नाहींत. त्यांनीं बादशाही मुलुखांतून बरीच मालमत्ता लुटून आणली होती. ती सर्व टाकून देऊन ते गुल्शनाबाद नाशिकच्या दिशेनें पळून गेले.

बादशहाला कळविण्यांत आलें कीं, मोगल सरदार सय्यद अब्दुल्लाखान हा रायरी (रायगड) ला पोंचला असून किल्ल्याला वेढा घालण्याचा त्याचा विचार आहे. बादशहानें आज्ञा केली कीं, संभाजीचा नातू (मेहुणा) महादजी यानें

रायगड किल्ल्याची मेणाची प्रतिकृति तयार करावी. या कामांत कविकलशाचा मुलगा यानें महादजीची मदत करावी.

(पान २७२)

बादशहाच्या आज्ञेनें किल्ल्याचा नमुना तयार करण्यांस येऊन बहरामंदखानाच्या मार्फतीनें बादशहाच्या समोर ठेवण्यांत आला. बादशहानें शहाजादा आज्जम याच्या फौजेला तयार होण्याची आज्ञा केली. या वेळीं महादजी यानें विनंती केली कीं, मला आज्ञा होत असेल तर मी आपलीं मुलेंमाणसें येथें छावणींत ठेवून शत्रूवर (संभाजी) चालून जाईन आणि त्यांचे अपराध माफ होत असतील तर मी त्यांना दरबारांत आणून हजर करीन. यावर बादशहानें महादजीस तयार राहण्याची आज्ञा केली. अब्दुल्लाखान यास आपला बेत तहकूब करण्याची आज्ञा करण्यांत आली. महादजी आल्यानंतर आवश्यक ते हुकूम सादर करण्यांत येतील असें सांगण्यांत आलें.

याच सुमारास मुहसिनखान यानें बादशहास लिहून कळविलें कीं, पन्हाळगडच्या किल्लेदारानें आपल्या बहिणीला पाठविली असून तिला कांहीं विनंती करावयाची आहे. बादशहानें तिला जीनतुन्निसाबेगम हिच्याकडे पाठविण्यास सांगितलें. जीनतुन्निसाबेगम हिनें तिची विशेष चौकशी केली नाहीं. यावर बादशहानें तिला आपल्यापाशीं बोलावून तिची चौकशी केली. पन्हाळगडच्या किल्लेदाराच्या बहिणीनें बादशहाला सांगितलें कीं, " किल्लेदाराचें म्हणणें आहे कीं, आपल्याला बादशहानें पांच हजार जात आणि स्वार यांची मन्सब द्यावी म्हणजे आपण किल्ला बादशहाच्या ताब्यांत देतों. " यावर बादशहानें आज्ञा केली कीं, मुहसिनखान यानें कोणी मातबर माणूस किल्लेदाराकडे पाठवावा. किल्लेदाराची अर्जी आल्यावर त्याच्या म्हणण्याप्रमाणें फर्मान सादर करण्यांत येईल. किल्लेदाराच्या बहिणीला मूल्यवान शाल, रत्नाचे अलंकार आणि पांचशे रुपये रोख देण्यांत आले.

(पान २९६)

बादशहा विजापुरास होता. (१६८८). तेव्हां त्याला वऱ्हाड, खानदेश आणि बागलाण या प्रांतांतून पुढीलप्रमाणें बातम्या कळविण्यांत आल्याः—' संभाजी आणि हंबीरराव हे आपल्या सैन्यासहित बादशाही मुलखांत पसरले. त्यांनीं गांवेंच्या गांवें उध्वस्त केली. विशेषतः त्यांनीं मुसलमानांतील सय्यद, शेख, विद्वान् मुल्लामौलवी याची फारच दुर्दशा केली. पुष्कळ प्रतिष्ठित माणसें कोकणांत जाऊन राहिलीं होतीं. त्यांचा छळ करण्यांत आला. मोगल अधिकारी हे त्यांच्याशीं लढले, पण त्यांपैकीं कित्येकांना पकडण्यांत आलें. रस्ते बंद करण्यांत येऊन, अनेकांना कैद करून त्यांना किल्ल्यांत नेऊन छळण्यांत आलें. सारांश, मराठ्यांचा

उच्छाद अतिशय झाला म्हणून त्यांचा मोड करण्यासाठीं बादशहांनीं विजापुराहून प्रयाण केलें (१४ डिसेंबर १६८८).

बादशहा अकलूज (जिल्हा सोलापूर) येथें असतांना संभाजीराजे मोगलांच्या हातीं अचानक सांपडले अशी त्याला बातमी लागली (फेब्रुवारी १६८९).

संभाजी राजांचा शेवट

कवि कलशाची फितुरी.

कवि कलश हा संभाजीचा मंत्री होता. राज्यव्यवस्था उत्तम ठेवणें आणि किल्ल्यांची निगा राखणें इत्यादि कामांत तो झटत असल्यामुळें संभाजीची त्याच्यावर कमालीची मर्जी बसली होती. संभाजीच्या कारभाऱ्यांपैकीं कांहींना कविकलशच्या उत्कर्षाबद्दल मत्सर वाटला. त्याला त्याच्या हुद्द्यावरून खालीं आणावें आणि त्याच्या जागीं दुसऱ्यांची स्थापना करावी असें त्यांनीं ठरविलें. या उद्देशानें ते रात्रंदिवस त्याच्या मागें लागले. त्याच्या चांगल्या कामाचाहि विपर्यास करून त्यांनीं त्याला बदनाम केलें. शेवटीं त्यांनीं त्याला हुद्द्यावरून खालीं ओढलें. कवि कलश हा फजीत पावून खेळण्याच्या किल्ल्यांत जाऊन बसला.

कवि कलशचें खेळण्याच्या आश्रयानें जाऊन बसणेंहि त्याच्या विरोधकांना आवडलें नाहीं. त्याचा सर्व नाश करावा म्हणून ते झटूं लागले. खेळण्याच्या किल्ल्यांतहि आपल्याला सुरक्षितता नांहीं असें कवि कलशला वाटूं लागलें. संभाजीचे कांहीं सरदार संभाजीवर चिडले होते. कवि कलश आणि वरील सरदार बादशहाच्या सेवेंत हजर झाले. बादशहाच्याकडून त्यांचा योग्य तो मानसन्मान करण्यांत येऊन त्यांना मन्सबी देण्यांत आल्या.

हें पाहून संभाजीनें त्यांच्या आप्तेष्टांना कैद केलें. त्यांचा भयंकर छळ होऊं लागला. पण कवि कलश आणि त्याच्या बरोबर गेलेले सरदार यांचें बादशहापाशीं ऊर्जित होत असलेलें पाहून संभाजीचे इतर सरदारहि बादशहाच्या सेवेंत हजर होऊन त्याची चाकरी पत्करूं लागले. संभाजीच्या राज्याची घडी बिघडली. याच सुमारास बादशाही सैन्य जुन्नर प्रांतांत पोहोंचलें. त्यानें तो भाग जिंकून घेतला.

याच वेळीं शहाजादा आजम हा प्रचंड सैन्य घेऊन राजगड, रायरी, माहुली इत्यादि किल्ले जिंकून घेण्याच्या उद्देशानें बाहेर पडला. त्यांच्याबरोबर नामांकित सेनापति होते. हे सैन्य शत्रूच्या मुलुखांत पोहोंचल्यामुळें त्या भागांत विलक्षण खळबळ माजली.

कवजीचें कारस्थान

या परिस्थितीमुळें संभाजी फारच घाबरला. आपल्या कारभाऱ्यांपैकीं त्याचा कुणावरहि विश्वास राहिला नाहीं. कवि कलश यास आपल्याकडे बोलावून घ्यावें असा त्यानें विचार केला. त्यानें त्याला समाधानाचीं पत्रें पाठवून कळविलें कीं 'आतांपर्यन्त जें कांहीं घडलें तें विरोधकांच्या कारस्थानामुळें झालें आहे. मला आतां पश्चात्ताप होत आहे. तर तुम्हीं आतां स्नेहभाव बाळगून कोणत्याहि प्रकारची शंका मनांत न धरतां तात्रडतोब निघून यावें आणि माझें साहाय्य करावें. शत्रूशीं झुंजून खाल्ल्या अन्नाचें चीज करावें. आपण येऊं नये, देश दुर्दशेला पोहोंचला तरी हरकत नाहीं असें तुम्हांला वाटत असेल, इमानाला जागूं नये, असें तुम्हांला वाटत असल्यास तुम्ही हवें तें करण्यास मुखत्यार आहांत.'

कवि कलश याला संभाजीनें केलेल्या छळाचा विसर पडला नव्हता. शिवाय तो (कवि कलश) मूळचाच दुष्ट प्रवृत्तीचा होता. संभाजीचा नाश करावा असें त्यानें मनाशीं ठरविलें. त्यानें संभाजीला कळविलें कीं, 'मी तुमचा एकनिष्ठ सेवक आहे. जें कांहीं झालें तें माझ्या दुर्दैवामुळें झालें असें मी समजतों. आपल्या सेवेंत हजर होणें यापेक्षां पुण्य कोणतें? पण माझे शत्रु तिकडे आहेत. ते स्वार्थी आहेत. आपल्याकडे ते माझ्याविरुद्ध कारस्थानें करतील आणि माझ्यावर किटाळ आणतील अशी मला भीति वाटते. असें झालें तर मी पुन्हां संकटात सांपडेन. यामुळें विनंती ही कीं प्रतिष्ठित सरदारांसहित आपण खेळण्यास यावें म्हणजे आपलें दर्शन घडून परस्परांत करारमदार होऊं शकतील. त्यानंतर मी आपली नेमून दिलेली चाकरी बजावीन.'

संभाजीचें दुर्दैव ओढवलें होतें. तो त्या लबाड माणसाच्या बोलण्यानें फसला. थोडीं माणसें बरोबर घेऊन तो खेळण्यास (विशाळगड) आला. त्यानें कवि कलश यास बोलावूं पाठविलें.

संभाजी आल्याची बातमी कवि कलश यास लागली. त्याचा सूड घेण्याचा त्यानें बेत केला. इखलासखान आणि बहादुरखान हे त्या वेळीं पन्हाळगडास वेढा घालून होते. त्यांना कवि कलशनें लिहून कळविलें कीं 'हजार प्रयत्नांनीं मीं सावज पकडलें आहे. तुम्ही वायुवेगानें चालणाऱ्या घोड्यावर स्वार होऊन खेळण्याच्या किल्ल्याला याल आणि सावजाची शिकार कराल अशी आशा करतों. तुम्ही येईपर्यंत मी संभाजीला गोड बोलून झुलवीत ठेवीन."

यानंतर कवि कलश हा संभाजीकडे गेला. त्यानें संभाजीपाशीं आपली राजनिष्ठा व्यक्त केली. त्याला त्याच्या निष्ठेबद्दल खात्री वाटली.

इकडे बहादुरखान आणि इखलासखान यांनीं पन्हाळगडच्या वेढ्याचें काम सोडून दिलें. संभाजीला पकडणें हें अतिशय महत्त्वाचें काम आहे. इतर सर्व कामें

बाजूला सारून हें काम पार पाडलें पाहिजे असें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें त्यांनीं चाळीस कोसांचा प्रवास सहा प्रहरांत पार पाडला आणि खेळणा (विशाळगड) किल्ल्यापर्यंत ते पोहोंचले. त्यांनीं किल्ल्याला वेढा घातला.

आतां संभाजीचे डोळे उघडले. किल्ल्यांत युद्धसामुग्री कांहींच नव्हती. तरीहि त्यानें किल्ल्याचा बंदोबस्त केला. त्याच्याबरोबर बरींच माणसें होतीं. पण त्यांच्यानें टिकाव धरवला नाहीं. शेवटीं संभाजी जिवावर उदार झाला. तळहातावर शिर घेऊन आणि कांहीं सहकारी बरोबर घेऊन तो किल्ल्यांतून बाहेर पडला. आणि मोगल सैन्यावर तुटून पडला. आपण कसेंहि करून निसटून जावें असा त्यानें बेत केला.

पण बहादुरखान आणि इखलासखान हे आपलें सैन्य तयार करून युद्धास तयार झाले. त्यांनीं त्वरा करून चहूंकडून संभाजीला घेरलें, व या वेळीं उभय पक्षांत मारामारी झाली. संभाजीच्या बरोबर असलेले चारशें सैनिक मारले गेले. मोंगलांचे जवळ जवळ अडीचशें सैनिक मृत्युमुखीं पडले. हें पाहून मराठे पळाले. संभाजीनेंहि पळून जाण्याचा बेत केला. पण त्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं. तो मोगलाच्या हातीं कैद झाला. वाईट कर्मांचीं फळें वाईटच होतात. कवि कलश यास त्याच्या कृत्याचीं फळें मिळालीं. संभाजीबरोबर तो पण कैद होऊन मोगलांच्या तावडींत सांपडला.

संभाजीला कैद केल्याची बातमी बादशहाला शहाजादा आज्जम याच्या पत्रावरून समजली. इखलासखानाचा हरकारा खंडूजी यानें बादशहापाशीं येऊन सगळी हकीकत सांगितली. त्यानंतर ही बातमी सगळीकडे जाहीर झाली. या-निमित्त लष्करांत आनंदनिदर्शक अशीं वाद्यें वाजाविण्यांत यावींत अशी बादशहानें आज्ञा केली. बादशहाबरोबर असलेल्या मोठमोठ्या अमीरउमरावांनीं, बादशहाला नजराणा देऊन या विजयाबद्दल त्याचें अभिनंदन केलें. खंडूजी हरकारा यास खूप बक्षीस देण्यांत आलें.

इखलासखान आणि बहादुरखान यांस मन्सबीची वढती, बहुमानाचे पोशाक, जडावाचे खंजीर, हत्ती घोडे इत्यादि देण्यांत येऊन त्यांचा मानसन्मान करण्यांत आला. संभाजीला तरतुदीनें आणि बंदोबस्तानें दरबारांत घेऊन यावें अशी त्यांना आज्ञा करण्यांत आली.

स्वाभिमानी संभाजी

बादशहाच्या आज्ञेप्रमाणें इखलासखान आणि बहादुरखान हे संभाजी, कविकलश आणि त्यांचे इतर साथीदार यांना घेऊन बादशहाच्या छावणींत पोहोंचले. बादशहानें आज्ञा केल्यावरून इखलासखान आणि हमीदुद्दीनखान यांनीं संभाजी, कविकलश आणि त्यांचे इतर साथीदार यांची उंटावरून धिंड काढली.

त्यांची हजार प्रकारें फजीति करण्यांत येत होती. अशा प्रकारें त्यांना छावणींत आणण्यांत आलें. दिवाणखान्याच्या प्रवेशद्वारापर्यंत ते येऊन पोहोंचल्यावर बादशहाच्या आज्ञेनें त्यांना न्यायालयाजवळ उभें करण्यांत आलें. बादशहानें संभाजीकडे पाहिलें. त्याची दुर्दशा पाहून बादशहाच्या मनावर परिणाम झाला. यानंतर बादशहा सिंहासनावरून उतरला आणि त्यानें प्रार्थना करून परमेश्वराचे आभार मानले.

पण संभाजी हा गर्विष्ठ होता. त्याची अशी अवस्था झाली तरी त्यानें बादशहाला ताजीम देण्यासाठीं म्हणून यत्किंचितहि मान लवविली नाहीं. इखलासखान आणि हमीदुद्दीनखान यांनीं त्याला पुष्कळ समजाविलें, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. बादशहानें आज्ञा केली कीं सिकंदरखानाच्या तंबूजवळ एक जागा ठरवून संभाजीला अशाच स्थितींत ठेवण्यांत यावें. कवि कलश आणि त्याचे साथीदार यांच्यावर कडक नजर ठेवण्यांत यावी. त्यांच्या पायांत बेड्या ठोकण्यांत याव्या.

यानंतर दोन दिवसांनीं बादशहानें रूहुल्लाखान यास खालीलप्रमाणें आज्ञा केली: "तुम्ही जाऊन संभाजीपाशीं चौकशी करावी कीं तुझे खजिने, जडजवाहीर आणि इतर संपत्ति, कुठें आहे ? तसेंच बादशाही सरदारांपैकीं कोण कोण तुझ्याशीं पत्रव्यवहार करून संबंध ठेवीत होते."

पण माणसाची जीविताची आशा सुटली कीं तो मनांत येईल तें बडबडत सुटतो. संभाजी हा गर्विष्ठ होता. त्यानें बादशहासंबंधीं घाणेरडे शब्द उच्चारले आणि त्याची निंदा-नालस्ती केली. त्यानें जें कांहीं म्हटलें तें जसेंच्या तसें रुहुल्लाखानानें बादशहाला सांगितलें नाहीं. पण तें बोलणें कशा प्रकारचें होतें याचा त्यानें बादशहाला इशारा दिला. यावर बादशहानें आज्ञा केली कीं संभाजीच्या डोळ्यांत सळई फिरवून (त्याला आंधळा करून) त्याला नवीन दृष्टि द्यावी (वठणीला आणावें).

त्याप्रमाणें करण्यांत आलें. पण संभाजी गर्विष्ठ आणि स्वाभिमानी होता. त्यानें त्या दिवसापासून जेवणखाण सोडलें. त्याच्या पहारेकऱ्यांनीं त्याला अन्नसेवन करण्याबद्दल पुष्कळ सांगितलें. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्याला कांहीं उपास घडले, शेवटीं ही बातमी बादशहाला कळविण्यांत आली. संभाजीचे दिवस भरले होते. बादशहाच्या आज्ञेनें त्याला वधस्थानाकडे नेण्यांत आलें. तेथें त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करण्यांत आले. संभाजीचें डोकें औरंगाबादेहून बुऱ्हाणपुरापर्यंत मिरविण्यांत आलें. यानंतर तें दिल्लीला नेण्यांत येऊन शहराच्या द्वारावर लटकविण्यांत आलें."

संभाजीराजांच्या वधानंतर

(पान २७९)

बादशहानें शहाजादा आज्जम यास संभाजीच्या मुलुखावर चालून जाण्याची आज्ञा केली (डिसेंबर १६८८). जुल्फिकारखान आणि कासिमखान हे शहाजाद्याच्या सैन्यापासून तीन मजला पुढें चालत होते. ते कूच करीत घाटाजवळ आले. मराठ्यांनीं घाटाचे रस्ते रोखून धरले होते. रसदेची येजा बंद झाली. मोगल छावणींत धान्याची अतिशय टंचाई झाली हें पाहून शहाजाद्यानें जुल्फिकारखान, बख्तमंदखान, आणि सिद्दी मिफताहाखान यांस कसलेलें सैन्य बरोबर देऊन घाटमाथ्यावर पाठविलें. ते घाटाच्या तोंडाशीं पोहोंचले. तेथें मोगल सैन्य पायउतारा होऊन घाटांत जमलेल्या मराठ्यावर तुटून पडलें. निकराचें युद्ध होऊन मोगलांनीं घाट ताब्यांत घेऊन तेथील ठाणीं मजबूत केलीं. याच सुमारास जुल्फिकारखान आणि कासिमखान यांनीं कुडमच्या किल्ल्याला वेढा घातला. वेढा दहा दिवस चालला. शेवटीं मोगलांनीं किल्ला जिंकून घेतला.

(पान २९२)

गाजिउद्दीनखान यास साताऱ्याच्या मोहिमेवर रवाना करण्याचें ठरलें होतें (इ. स. १६८८). तो दोन मजला कूच करून गेला तोंच आजारी पडला. या आजारांत त्याचे डोळे गेले (डिसेंबर १६८८).

(पान २९८)

बादशहानें गाजिउद्दीन फिरोजजंग यास रात्री आपल्याशीं बोलावूं पाठविलें. रायरी (रायगड) किल्ल्याची माहिती त्याला देण्यांत येऊन तिकडच्या मोहिमेवर नेमण्यांत आलें. चार दिवसांनंतर त्याला संभाजीचा मोड करून रायगड जिंकून घेण्यासाठीं म्हणून रवाना करण्यांत आलें. मोहिमेसाठीं गाजिउद्दीनखानाला सरकारी खजिन्यांतून दोन लाख रुपये रोख देण्यांत आले. शहाजादा आज्जम, वगैरेंच्या फौजा संभाजीच्या मुलुखांत घुसल्या.

रायगडाचा पाडाव (१९ ऑक्टोबर १६८९)

(पान ३०६)

या सुमारास बादशहाला कळलें कीं, संभाजीचे सरदार खालोजी आणि केशवजी यांनीं संभाजीचीं बायका-मुलें यांना रायरी (रायगड) च्या किल्ल्यांत ठेविलें असून किल्ल्यांत तोफा आणि युद्धाचें इतर सामान जमविलें आहे. त्यांनीं बरेंच सैन्य जमविलें असून शहाजादा आज्जम याजबरोबर असलेलें सैन्य त्या भागांत पोंचलें आहे. त्याजबरोबर ते लढण्याची तयारी करीत आहेत. शहाजादा आज्जम याच्या बरोबर असलेले बहारामंदखान वगैरे सरदार हे महब व सासद हे मराठ्यांचे

किल्ले घेण्यासाठीं गेले होते. त्यांनीं किल्ले जिंकून घेतले आणि त्याची बातमी त्यांनीं बादशहाला कळविली.

(पान ३०७)

बहरामंदखानाच्या सैन्यांत दिलेरखान, रुस्तुमखान, राजा अनूपसिंग वगैरे सरदार होते. त्यांना बादशहानें शहाजादा आजम यांजपाशीं तैनात केलें. याशिवाय सिद्दी मिफताहखान, मानासिंग राठोड, सिद्दी अब्दुल्कादरखान, हाजी अफजल इत्यादि सरदारांनाहि शहाजादा आज्जम याजकडे पाठविण्यांत आलें. थोड्याच दिवसांनीं जुल्फिकारखान बहादुर हा बादशहापाशीं आला. रायगडचा किल्ला जिंकून घेण्याचें बादशहानें ठरविलें. यापूर्वी शहाजादा आज्जम आणि गाजिउद्दीनखान हे त्या किल्ल्यावर चालून गेले होते. पण त्यांच्या मोहिमेचा कांहीं उपयोग झाला नाहीं. यामुळें रायरी (रायगड) जिंकून घेण्यासाठीं बादशहानें जुल्फिकारखान बहादुर याची नेमणूक केली. शहाजादा आज्जम याजकडून हवी ती मदत घेऊन किल्ला जिंकून घ्यावा अशी बादशहानें त्यांस आज्ञा केली.

(पान ३०८ व ३०९)

बादशहाची आज्ञा घेऊन जुल्फिकारखान निघाला तो प्रथम शहाजादा याजकडे गेला. तेथें तो तीन दिवस राहिला. नंतर त्यानें शहाजाद्याकडे असलेले कांहीं सरदार निवडून आपल्याबरोबर घेतले आणि तो तडक रायरीच्या पायथ्याशीं आला. रायरीपासून दोन कोसांवर त्यानें आपला तळ दिला. किल्ला अतिशय मजबूत होता. कोंकणांत त्याच्या तोडीचा दुसरा किल्ला नव्हता. किल्ल्याकडे जाण्यायेण्यासाठीं एकच वाट होती. किल्ल्याच्या भोंवतीं मोठमोठे डोंगर असल्यामुळें किल्ल्याखालीं सुरुंग लावणें अशक्य होतें. जुल्फिकारखान हा आका अलीखान आणि इतर घोडेस्वार यांना घेऊन किल्ल्याच्या अगदीं पायथ्यापर्यंत चालून गेला. किल्ल्यावरून तोफांचा गोळ्यांचा वर्षाव होऊं लागला. जुल्फिकारखानाबरोबर असलेलीं माणसें ठार झालीं. जुल्फिकारखानानें तेथील मराठ्यांची वाडी जाळली आणि तो परत फिरला. किल्ल्यापासून कांहीं अंतरावर बुजुर्गवाडीचा दर्गा आहे तेथें त्यानें छावणी कायम केली होती. तो अद्याप छावणींत पोहोंचला नव्हता, इतक्यांत सातार्‍याच्या दिशेनें हंबीरराव त्याच्यावर चालून आला. मोगलांची रसद तोडणें हा त्याचा उद्देश होता. जुल्फिकारखान आणि हंबीरराव यांचें निकराचें युद्ध झालें. मराठ्यांचीं जवळ जवळ दीड हजार माणसें ठार झालीं. मोगलांचे सुमारे नउशें सैनिक ठार झाले. मराठे टिकाव धरूं शकले नाहींत. ते पळून गेले. रसद तोडण्यासाठीं टुकड्या नेमल्या होत्या त्याहि निघून गेल्या. जुल्फिकारखान यानें किल्ल्याला चहूंकडून वेढलें. किल्ल्याच्या वाटा त्यानें बंद केल्या. आणि दमदमे वगैरे बांधून त्या किल्ल्यावर तोफांचा मारा चालू केला. किल्ल्यांतील लोकांची स्थिति कठीण झाली. किल्ला मोगलांच्या हवाली करण्याशिवाय गत्यंतर नाहीं, हें पाहून किल्लेदारांनीं

जुल्फिकारखानाबरोबर तहाचें बोलणें लाविलें. त्यांनीं मोगलाकडून अभय मागितलें. कौल-करार झाल्यानंतर संभाजीचीं बायका-मुलें आणि किल्ल्यांतील इतर मंडळी मोगलांच्या छावणींत आली. जुल्फिकारखानानें सर्वांना मानसन्मानानें वागविलें.

(पान ३१०)

किल्ला फत्ते झाल्याची (१९ आक्टोबर १६८९) बातमी जुल्फिकारखानानें बादशहाला कळविली. किल्ल्याच्या बंदोबस्ताला त्यानें अधिकारी नेमले.

प्रतापगड

यानंतर जुल्फिकारखान हा प्रतापगडावर चाल करून गेला. त्यानें त्या किल्ल्याला वेढा घातला. तेथें निकराचें युद्ध होऊन मोगलांनीं तो किल्ला जिंकून घेतला. जुल्फिकारखानानें प्रतापगडच्या किल्ल्या, एक माणिक, आणि तीन उंची मोत्यें बादशहाकडे भेट म्हणून पाठविलीं.

बादशहाला किल्ला फत्ते झाल्याची बातमी कळून आनंद झाला. त्यानें विजयाचे चौघडे वाजविण्याची आज्ञा केली. रायगडला उत्तमगड (इस्लाम-गड) हें नांव देण्यांत आलें.

(पान ३११)

बादशहानें जुल्फिकारखान यास संभाजीचीं बायकामुलें बरोबर घेऊन दरबारांत यावें म्हणून आज्ञा केली. जुल्फिकारखानानें संभाजीचीं मुलें, शिवाजी (शाहू), मानसिंग, मदनसिंग, संभाजीची बायको, आई आणि इतर मंडळी यांना बरोबर घेतलें आणि तो बादशहाकडे आला. संभाजीच्या मालमत्तेपैकीं जडजवाहिरानें भरलेल्या दोन पेट्या बादशहासमोर ठेवण्यांत आल्या. बादशहानें त्या फाजलखानाच्या अमानतींत दिल्या. जुल्फिकारखानाबरोबर सरअफराजखान, सय्यद यादगार, हुसेनखान, सय्यद अज्मतुल्लाखान, गजनफरखान, खैर अंदेशखान व द्वारकादास वगैरे मानकरी होते. त्यांनीं नजरा समोर ठेविल्या. पण बादशहानें त्या माफ केल्या. नजरा घेतल्या नाहींत. यानंतर जुल्फिकारखानानें संभाजीच्या तिन्ही मुलांना बादशहाकडे आणलें.

(पान ३१२)

बादशहानें त्या मुलांना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें राजा ही पदवी, मन्सबी, हत्ती, घोडे इत्यादि सरंजाम दिला. त्यांच्या सरंजामाची व्यवस्था करण्यासाठीं बादशाही अधिकारी नेमून दिले. त्यांना चांगलें शिक्षण देण्यांत यावें अशी आज्ञा देण्यांत आली. संभाजीची आई आणि बायको यांना बादशहानें उंची वस्त्रें आणि रत्नाचे अलंकार दिले. संभाजीचे खेळोजी, रामाजी, जानोजी आणि इतर सरदार हे मोगल छावणींत आले होते. त्यांनाहि बादशहानें त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें मन्सबी आणि इतर सरंजाम दिला. शहाजादा अकबर याचीं सोळा माणसें

पण धरून आणलीं होतीं, त्यांपैकीं दोघींना अंतःपुरांत दाखल करून बाकी इतरांना सोडून देण्यांत यावें अशी आज्ञा करण्यांत आली. अब्दुलकादरखान याचीं बायकामुलें संभाजीच्या कैदेंत होतीं. तींहि सुटून मोगल छावणींत आलीं होतीं. त्यांना अब्दुलकादरखानाच्या माणसांकडे सोंपविण्यांत आलें.

संताजी शेख निजामवर चालून जातो

(पान २७३)

मराठे कोल्हापूर भागांत पसरले. खानजमान फत्तेह जंगखान (संभाजी राजांना कैद करणारा मुकर्रबखान) हा त्यांच्यावर चालून गेला. कोल्हापुराजवळ मराठ्यांचें आणि मोगलांचें तुंबळ युद्ध झालें. एक प्रहर आणि चार घटिकापर्यंत हें युद्ध चाललें होतें. मराठ्यांचे सुमारें सातशें सैनिक ठार झाले. मोगलांचे चारशें सैनिक मृत्युमुखीं पडले. मराठ्यांचें सैन्य अधिक होतें. आणि ते ठाण मांडून लढत होते. या युद्धांत खान जमान आणि त्याचा मुलगा खाने आलम यांना तल्वारीच्या आणि भाल्याच्या जबर जखमा झाल्या.

(पान २७४)

पण पुढें टिकाव न धरून मराठे निघून गेले. बादशहाला युद्धाची हकीकत कळल्यानंतर त्यानें महंमद तकीखान यास बरोबर दोन हजार सैन्य देऊन खान जमान याच्या मदतीस पाठविलें. खान जमान यास खिलतींचीं वस्त्रें आणि तरवार हीं बक्षीस म्हणून देण्यांत आलीं. याशिवाय खान जमान आणि त्याचा मुलगा यांच्या जखमा बऱ्या करण्यासाठीं बादशहानें सेब्यास्टियन नांवाचा फिरंगी डाक्टर यास त्याच्याकडे पाठविलें.

टीपः—या युद्धाचा उल्लेख केशव पंडितानें आपल्या राजारामचरितम् या ग्रंथांत खालीलप्रमाणें केला आहे.—" शेख निजामाला जिंकण्यासाठीं पाठविलेल्या संताजी घोरपडे आदींनीं प्रथम निजामाचा पराभव करून नंतर त्याचे हत्ती–घोडे व पुष्कळ द्रव्य हरण केलें. तेव्हां सर्व ऐश्वर्याचा नाश झाला आहे व सर्वांगावर जखमा झाल्या आहेत असा तो खल कसाबसा जीव वांचवून पर्वताच्या पायथ्याशीं बसलेल्या करवीरास गेला. " (बेंद्रेकृत संभाजी पान ६३५).

(पान ३१५)

मोगल पेमगड घेतात

या सुमारास बहरामंदखान यानें शहाजादा आज्जम याचा निरोप घेतला. तो शहाजाद्यापासून निघून पेमगड येथें आला. त्यानें किल्ल्याला वेढा घातला. किल्ल्याचा वेढा दोन महिने वीस दिवस चालला होता. उभय दलांतून तोफांचा आणि बंदुकींचा मारा चालू होता. वेढा चालू असतांना मराठ्यांची फौज

मोगलांवर चालून आली. ते हल्ले करीत आणि निघून जात. एके दिवशीं प्रेमगडचा किल्लेदार अंबोजी यानें मोठ्या सैन्यानिशीं मोगलांवर हल्ला केला. उभय सैन्यें सज्ज झालीं. प्रथम त्यांनीं परस्परांवर बंदुका, जेजले, शुतरनाल, बाण इत्यादींचा मारा केला. यानंतर तीं सैन्यें एक दुसऱ्यांवर चालून गेलीं. मोगल

(पान ३१६)

सैन्यांतील ख्वाजा कमरुद्दीन बख्शी, बादशाही वाकेनवीस आणि इतर कांहीं मन्सबदार हे ठार झाले. सैनिकांपैकीं एक हजार मोगल सैनिक ठार झाले. उत्तम हजारी, आणि त्याचे दोनशें सैनिक आणि पांचशें बर्कंदाज हे जखमी झाले. मराठ्यांचीं जवळ जवळ दोन हजार माणसें ठार अगर जखमी झालीं. त्यानंतर आपला टिकाव न लागल्यामुळें मराठे पळून गेले.

यानंतर बहरामंदखान यानें दमदमे तयार केले आणि त्यांच्यावर तोफा चढवून त्यानें किल्ल्यावर मारा केला. त्यामुळें किल्ल्याचे कांहीं बुरूज ढासळले. किल्ल्यांतील अन्नसामुग्री कमी झाली होती. त्यांतून तोफांचा मारा. यामुळें किल्ल्यांतील लोकांची परिस्थिति कठीण झाली. अंबोजी आणि त्याचे सहकारी यांची खात्री झाली कीं किल्ला मोगलांच्या हवाली करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. त्यांनीं बहरामंदखानाकडून अभयपत्रें मागवून त्याची गांठ घेतली. बहरामंदखानानें मीर नेमत याची किल्लेदार म्हणून नेमणूक केली आणि किल्ला फत्ते झाल्याची बातमी बादशहाला कळविली. बादशहानें खूष होऊन बहरामंदखानावर कृपेची खैरात केली.

(पान ३२०)

मोगल राजगड घेतात (जुलै १६८९)

या सुमारास बादशहाला कळविण्यांत आलें कीं संभाजीचा धाकटा भाऊ राजाराम हा राजगडच्या किल्ल्यांत असून हंबीरराव, प्रतापराव, रुपाजी भोसले व अंबोजी भोसले वगैरे मराठे सरदार हे त्याच्या बरोबर आहेत. हें ऐकतांच बादशहानें राजा किशोरसिंग याला राजगड जिंकून घेण्यासाठीं रवाना केलें. त्याच्याबरोबर मीर इनायतुल्ला, मीर अब्दुस्समद, मिर्जा खजाजुल्ला इत्यादि पन्नास मन्सबदार यांस पाठविण्यांत आलें.

(पान ३२१)

त्यांना ताकीद करण्यांत आली ती ही: अशी कांहीं मसलत करा कीं राजाराम आणि त्याच्या बरोबर असलेले सरदार जिवंत पकडले जावेत. हें नच जमलें तर त्यांना मारण्यांत यावें. पण कोणत्याहि परिस्थितींत त्यांनीं निसटून जाऊं नये '

आज्ञेप्रमाणें राजा किशोरसिंग हा राजगडाजवळ आला. त्यानें किल्ल्याला वेढा घातला. दीड एक महिन्यापर्यंत मराठे आणि मोगल हे एकमेकांवर तोफांचा

मारा करीत होते. योगायोगानें एक दिवस मराठ्यांच्या दारूच्या कोठारांत आग लागली. दारूचा मोठा स्फोट होऊन किल्ल्याचे तट कांहीं ठिकाणीं उडाले. कांहीं दगड मोगलांच्या मोर्च्यांत येऊन पडले. या स्फोटामुळें दगडाखालीं दबून सुमारें दोनशें मराठे ठार झाले.

यामुळें रामराजा (राजाराम) हा घाबरला. त्यानें आपण शरण येतों अशा अर्थाचें बोलणें लाविलें. त्यानें दोन-तीन दिवसांपर्यंत तहाचीं बोलणीं रेंगाळत ठेविलीं. नंतर एके रात्रीं संधि साधून तो प्रतापराव, हंबीरराव इत्यादि सरदारांसह किल्ला सोडून पळून गेला. यानंतर किशोरसिंगानें किल्ला घेतला. किल्ला घेण्यांत आला, पण राजाराम पळाला, अशी बातमी शहाजादा आज्जम यास देण्यांत आली. त्यानें ती बादशहाला कळविली. बातमी आणणाऱ्या हरकाऱ्याला शंभर रुपये आणि शहाजाद्याचा वकील मीर गियासुद्दीन यास खिलतीचा पोशाक अशीं बक्षिसें बादशहानें दिलीं. किशोरसिंगाच्या मन्सबींत दोनशें स्वारांची वाढ करण्यांत आली. अबुल्खैरखान यास राजगडचा किल्लेदार म्हणून नेमण्यांत आलें (जुलै १६८९).

राजारामाच्या हालचाली (इ. स. १६८९)

(पान ३२२)

बादशहानें सय्यद अब्दुल्लाखान आणि बहादुरखान यांस आज्ञा केली कीं विश्वासू हेर नेमून त्यांच्या करवी राजाराम कोठें आहे याची बातमी आणावी. बातमी लागतांच तावडतोब कूच करून त्याच्यावर हल्ला करून त्याला पकडावें अगर ठार मारावें.

याच सुमारास बातमी आली कीं, राजारामाचा सरदार केशवजी पंडित हा प्रबळ सैन्य घेऊन कर्नाटकाच्या दिशेनें जात आहे. यामुळें सय्यद अब्दुल्लाखान आणि बहादुरखान यांनीं राजारामाचा पाठलाग तहकूब ठेवून केशवजी पंडिताकडे आपला मोर्चा वळविला. या सुमारास घाटाखालच्या प्रदेशाचा फौजदार नाहर-खान यानें कळविलें कीं राजाराम आपल्या इलाख्यापासून पंचवीस कोस अंतरावरून चालला असून तो बिदनूरच्या दिशेनें प्रवास करीत आहे,

यावर बादशहानें जुल्फिकारखान बहादुर यास त्याच्या (राजारामाच्या) विरुद्ध रवाना केलें. त्याच्याबरोबर सर अफराजखान, गजनफरखान, अजमतुल्ला-खान, फतेउल्लाखान, मुजाहिदखान, बर्कंदाजखान, राजा इंद्रसिंह, राजा शिवसिंग, कान्होजी आणि माम्पोजी यांना देण्यांत आलें. अब्दुलकरीमखान खानाजाद यास पांचशेंची मन्सब वाढविण्यांत येऊन त्याला जुल्फिकारखानाच्या सैन्याच्या आघाडी-वर ठेवण्यांत आलें.

(पान ३२३)

जुल्फिकारखानाच्या सैन्याच्या एक मजल पुढें त्यानें राहावें अशी त्याला आज्ञा करण्यांत आली. जुल्फिकारखानानें चार-पांच मजला कूच केलें. इतक्यांत तो केशवजी पंडित याचा पाठलाग सोडून जुल्फिकारखानाला येऊन मिळाला. नंतर तो अब्दुलकरीमखानाच्या आघाडीच्या पथकांत सामील झाला. या सुमारास राजारामानें सय्यद अब्दुल्लाखान यास हिंदवी भाषेंत पत्र लिहिलें, कीं बादशहांनीं माझे अपराध माफ करावेत म्हणजे मी त्यांची निष्ठापूर्वक सेवा करीन. सय्यद अब्दुल्लाखानानें तें पत्र जुल्फिकारखानाकडे पाठविलें. त्यानें तें जसेंच्या तसें बादशहाकडे रवाना केलें. बादशहानें खानांस लिहिलें कीं राजारामाकडे अभयपत्र पाठविण्यांत यावें. पण तो धूर्त आणि कुटिल आहे. त्यानें हा डाव हेतुपुरःसर रचला आहे. त्याच्या लिहिण्यावर विश्वास ठेवूं नये. तुम्ही सावधपणें वागावें.

(पान ३२४)

राजारामाला मनःपूर्वक शरण येण्याची इच्छा आहे याबद्दल तुम्हांला खात्री पटली तर राजारामाला माझ्याकडे घेऊन या, म्हणजे त्याची विनंति मान्य करतां येईल.

या सुमारास बिदनूरच्या राणीचा वकील यंकोजी हा बादशहाकडे आला. त्याच्याबरोबर बानूजी पंडित हा होता. बादशहानें त्या दोघांना बक्षिसें दिलीं. राणी आणि तिचीं मुलें यांच्याकरितांहि भेटी रवाना केल्या. राणीनें खंडणीदाखल सात लाख रुपये द्यावे असें ठरलें. त्यापैकीं पांच लाख रुपये बादशहाकडे पाठविण्यांत यावे, आणि दोन लाख रुपये विजापूर सुभ्याच्या खजिन्यांत भरण्यांत यावे. याशिवाय जुल्फिकारखानाकडे एक लाख रुपये पोहोंचते करण्यांत यावे. ही रक्कम वसूल करण्यासाठीं बादशहानें आपले अधिकारी बिदनूरच्या वकिलाबरोबर लावून दिले.

सय्यद अब्दुल्लाखान यानें राजारामाचा तुंगभद्रेच्या कांठापर्यंत पाठलाग केला. त्या ठिकाणीं राजारामाचा मातबर सरदार जिवाजी हा त्याला येऊन मिळाला. राजाराम हा तुंगभद्रा ओलांडून बिदनूरच्या मुलुखांत गेला. ही हकीकत सय्यद अब्दुल्लाखानानें बादशहाला लिहून कळविली. बादशहानें जिवाजी पंडित याजविषयीं चौकशी केल्यावर सय्यद अब्दुल्लाखान यानें विनंती केली कीं,

(पान ३२५)

जिवाजी पंडित यांस तीन हजार (स्वतःची) आणि दोन हजार स्वार यांची मन्सब व पंचवीस हजार रोख असें बक्षीस देण्यांत यावें. बादशहानें सय्यद अब्दुल्लाखानाच्या विनंतीप्रमाणें केलें. यानंतर बादशहानें सय्यद अब्दुल्लाखान यास आज्ञा केली कीं, तुम्ही तुंगभद्रा ओलांडून राजारामाचा पाठलाग करावा. आज्ञे-

प्रमाणें खानानें तुंगभद्रा ओलांडली. यानंतर सय्यद अब्दुल्लाखानानें बादशहाला पुढीलप्रमाणें कळविलें, 'आपण तुंगभद्रा ओलांडून बिदनूरच्या राज्यांत पोहोंचलों. तेथें कळलें तें हें—राजाराम बिदनूरपाशीं पोहोंचला. तेथून त्यानें एक मनुष्य किल्ल्यांत रवाना करून आपल्याला किल्ल्यांत आश्रय मिळावा म्हणून राणीला विनंती केली. पण राणी आणि राजाराम यांच्यांत पूर्वीपासून वैमनस्य असल्यामुळें राणीनें किल्ल्याचे दरवाजे बंद करून घेतले आणि त्यांना आंत येऊं दिलें नाहीं, यावर राजारामाचा धीर सुटला. तो तेथून पळून आपला चुलता व्यंकोजी याच्या आश्रयाला गेला. मी त्याच्या मागोमाग गेलों. मी व्यंकोजीला सांगून पाठविलें कीं तुला आपलें हित हवें असेल तर तूं राजारामाला कैद करून आमच्या हवाली कर.

(पान ३२६)

नाहीं तर तुझ्यावर बादशहाचा कोप होईल.' यावर व्यंकोजी घाबरला. मोगलांचें ऐकिलें नाहीं, तर आपल्यावर संकट ओढवेल. बरें आपल्या पुतण्याला, राजारामाला मोगलांच्या हवालीं करावें तर आपला दुर्लौकिक होईल. असें वाटून शेवटीं त्यानें राजारामाला म्हटलें, 'मोंगलाच्या फौजा मागें लागल्या आहेत. तुझ्यापाशी काय आणि माझ्यापाशी काय, फौजफांटा नाहीं. आपण मोंगलांचा प्रतिकार करूं शकणार नाहीं. तुझें येथें राहणें योग्य नाहीं. तूं बिदनूरच्या राणीपाशीं जा. त्याशिवाय दुसरा उपाय नाहीं.' हें ऐकून राजाराम हा प्रतापराव, हंबीरराव आणि रुपाजी भोसले यांना बरोबर घेऊन परत बिदनुराकडे येण्यास निघाला. हें सय्यद अब्दुल्लाखान यास कळतांच तो सैन्य घेऊन त्याच्या पाठलागावर निघाला. पण सूर्योदय होईपर्यंत राजारामानें वीस कोसांची मजल मारली होती. वाटेंत एक तीर्थस्थान आढळल्यामुळें तो थांबला. तेथें तो धर्मकृत्यें करण्यांत गुंतला. इतक्यांत सय्यद अब्दुल्लाखान हा आपलें सैन्य घेऊन तेथें पोहोंचला. हें पाहून राजाराम घाबरला. अशा वेळीं रुपाजी आणि अंबाजी भोसले हे त्याला म्हणाले, 'बंधो ? तूं काय म्हणून काळजी करीत आहेत ? तू निश्चिंत रहा. आम्ही आपल्या पथकासहित पुढें होऊन शत्रूचा प्रतिकार करूं.

(पान ३२७)

तुम्ही संधि साधून आपला घोडा दौडवा." सारांश, अब्दुल्लाखान जवळ येऊन पोहोंचला. त्यावेळीं रुपाजी आणि अंबाजी भोसले हे पांचशें सैनिक बरोबर घेऊन त्याच्यावर चालून गेले. या गडबडींत राजाराम हा निवडक माणसें बरोबर घेऊन निघून गेला. सय्यद अब्दुल्लाखान यानें आपल्या माणसांना बजाविलें होतें कीं कसून चौकशी करा आणि कसेंहि करून राजारामाला जिवंत पकडा. मोगलांनीं मराठ्यांना वेढलें. मोठ्या निकराचें युद्ध झालें. मराठ्यांचे दोनशें सैनिक ठार अगर

जखमी झाले. मोगलांचीं १७० माणसें ठार अगर जखमी झालीं. शेवटीं मोगलांनीं रुपाजी भोसले आणि त्याचे सत्तर सहकारी यांना कैद केलें. पण अंबाजी भोसले हा कांहीं जणांच्या बरोबर पळून गेला. सय्यद अबदुल्लाखान हा रुपाजी भोसले आणि इतर कैदी यांना घेऊन लष्करांत पोहोंचला. त्यानें बादशहाला घडलेली हकिकत लिहून पाठविली.

यावर बादशहानें राणीला लिहिलें कीं, "राजाराम हा तुमच्या जवळ आला आहे असें कळतें. तर तुम्ही त्याला तावडतोब अब्दुल्लाखानाच्या सोबतीनें आमच्याकडे रवाना करावें."

(पान ३२८)

पण राजाराम हा राणीला निकटचा होता. तिनें राजारामाच्या मागील अपराधाकडे दुर्लक्ष करून त्याला आपल्या जवळ ठेविलें. तिनें बादशहाला कळविलें कीं, "राजाराम येथे आलेला नाहीं. सय्यद अब्दुल्लाखानानें रुपाजी भोसले आणि इतर मराठे यांना कैद केलें आहे. त्या माणसांत राजाराम असावा." यावर बादशहानें म्हटलें कीं, राणीनें आपल्या चुलत्याला [राजारामाला] लपवून ठेविलें आहे. आणि वर ही गोष्ट घडली नाहीं असें ती दाखवीत आहे. बादशहानें सय्यद अब्दुल्लाखान आणि बहादुरखान यांस आज्ञा केली कीं तुम्ही बिदनुरावर चाल करून जा आणि राणीचा मुलूख उध्वस्त करा. मोगलांनीं राणीच्या मुलखाची नासाडी केली. खुद्द राणीला बिदनूर सोडून कोमगडच्या किल्ल्यांत जाऊन राहावें लागलें. तेथून तिनें बादशहाला कळविलें कीं, "राजाराम हा माझ्यापाशीं आला आहे असें कांहीं स्वार्थी माणसांनीं आपल्याला कळविलें आहे. ते केवळ माझ्या द्वेषामुळें होय. तो मागें माझ्याकडे आला होता. आमचें आपसांत वैमनस्य असल्यामुळें मीं त्याला माझ्या येथें राहूं दिलें नाहीं. त्यामुळें तो आपल्या चुलत्याकडे निघून गेला. कृपा करून लबाड लोकांच्या सांगण्यावरून माझ्यावर कोप धरूं नये. ...

... माझें राज्य उध्वस्त करण्यासाठीं मोगल फौजा तैनात झाल्या आहेत, त्या परत बोलावण्यांत याव्या.' राणीनें ही विनंति यार अलीबेग याच्या मध्यस्थीनें केली. बादशहानें विनंती मान्य करून फौजा परत बोलावण्याची आज्ञा केली. राणीनें खंडणीचे आठ लाख रुपये आणि शिवाय नजराणा म्हणून दरवर्षी पंचवीस हजार रुपये भरावे. तळकोंकणच्या मोगल अधिकाऱ्यांपाशीं पांचशें स्वार आणि दोन हजार पायदळ तैनात ठेवावे अशी बादशहानें आज्ञा केली. यानंतर बादशहानें राणीच्या जोतक पंडित या वकिलाकरवीं राणीला उंची वस्त्रें, अलंकार इत्यादि पाठविले. वकिलांनाहि मानाचे पोशाख देण्यांत आले. राणीनें खंडणीबाबत एक लाख पंधरा हजार होन, दोन हत्ती, दहा घोडे बादशहाकडे पाठविले.

(पान २७४)

रुस्तुमखानाचा पराजय

(२५ मे १६९०)

या सुमारास मोगल सरदार रुस्तुमखान विजापुरी हा साताऱ्याजवळ येऊन पोहोंचला. साताऱ्याचा किल्ला जिंकून घ्यावा असा त्यानें बेत केला. ही बातमी मराठे सरदार संताजी घोरपडे व जाधव, परखे (?) इत्यादींना समजली. ते प्रचंड सैन्यासहित रुस्तुमखानावर चालून आले. रुस्तुमखानानें आपला मुलगा गालिबखान याजबरोबर पांच हजार सैन्य आणि पांच हत्ती देऊन त्याला आपल्या सैन्याच्या आघाडीवर ठेविलें. अजून युद्धाला तोंड लागलें नव्हतें तोंच मराठ्यांच्या बर्कंदाजांनीं (बंदुकी चालविणारें पायदळ) मोगल फौजेवर बंदुकींचा मारा केला.

(पान २७५)

मोगल सैन्याच्या आघाडीला हत्ती उभे करण्यांत आले होते. बंदुकींच्या गोळ्यांचा त्यांच्यावर वर्षाव होऊं लागतांच ते मागें फिरून आपल्याच सैन्यांत पळूं लागले. मोगलांचे कांहीं सैनिक मराठ्यांच्या बंदुकींच्या माऱ्यानें जखमी झाले होते. मागें पळत सुटलेल्या आपल्याच हत्तींच्या पायाखालीं कित्येक मोगल सैनिक चिरडले गेले. हें पाहून रुस्तुमखान आपल्या सैनिकांसहित पुढें धावला. इतक्यांत मराठ्यांच्या सैन्यांतील गजदळानें मोगल सैन्यावर चाल केली. याचा परिणाम असा झाला कीं मोगलस्वारांचे घोडे हे घाबरून उधळले. मोगलस्वारांनीं त्यांना आवरून मराठ्यांशीं लढावें असा प्रयत्न केला. पण कांहीं केल्या घोडे मैदानांत टिकेनात. असें असलें तरी रुस्तुमखान हा आपल्याबरोबर राहिलेल्या सैनिकांना घेऊन शत्रूशीं शौर्यानें लढत राहिला. त्याच्या हल्ल्यापुढें मराठ्यांचीं आघाडीवर असलेलीं पथकें मागें हटलीं. तोंपर्यंत रुस्तुमखानाचें पांगलेलें सैन्य पुन्हा एकत्र आलें. मोगलांनीं आतां मराठ्यांच्या मुख्य सैन्यावर हल्ला केला. या सैन्यांत संताजी घोरपडे आणि परखे हे होते, मोगलांच्या हल्ल्यानें मराठ्यांचें सैन्य पळूं लागलें. (गनिमी कावा) मोगलांनीं त्यांचा पाठलाग करून अनेकांना ठार मारलें.

(पान २७६)

या सुमारास मराठ्यांच्या दुसऱ्या तुकडीनें मोगलांवर हल्ला केला. या हल्ल्यामुळें कांहीं मोगल सैनिक जखमी झाले, मराठ्यांनीं मोगलांचे झेंडे हस्तगत केले. यामुळें चिडून रुस्तुमखानानें आपला हत्ती मराठ्यांवर घातला. याच सुमारास मराठ्यांच्या गोळीबारामुळें रुस्तुमखानाच्या अंगावरील कपड्यांनीं पेट घेतला. मराठ्यांचे कर्नाटकी–बर्कंदाज सैन्याच्या आघाडीला होते. ते मोगलांच्या पिछाडीवर तुटून पडले. आणि त्यांनीं मोगलांची छावणी लुटण्यास सुरवात केली. यामुळें मोगलांचा धीर सुटून ते पळूं लागले. रुस्तुमखानाला बाणाच्या आणि

बंदुकीच्या गोळ्यांच्या जखमा लागून तो बेशुद्धावस्थेंत आपल्या हत्तीवरून खालीं जमिनीवर पडला. मराठा सरदार बाबाजी (मानाजी) मोरे यांनीं रुस्तुमखानाला पकडून मराठा फौजेंत नेलें. रुस्तुमखानाचा मुलगा गालिबखान यानें आपल्या सैन्यासहित मराठ्यांवर हल्ला केला. या युद्धांत बाणांच्या आणि भाल्यांच्या जखमा लागून गालिबखान हा मैदानांत पडला. त्यावेळीं मोगल सैन्यांतील दीड हजार माणसें ठार झालीं. मराठ्यांचीं पण अनेक माणसें ठार आणि जखमी झालीं.

(पान २७७)

हें होत असतां हंबीरराव हा पांच हजार स्वार आणि पायदळ घेऊन साताऱ्या किल्ल्यांतून बाहेर पडला. त्यानें मोगलांच्या फौजेवर हल्ला केला. रुस्तुमखानाच्या बायका आणि कुटुंबांतील इतर स्त्रियांनीं हें संकट पाहून खंजीर हातांत घेऊन आत्महत्या करण्याचा बेत केला. पण हंबीररावानें ओरडून सांगितलें कीं, रुस्तुमखान जिवंत आहे. मी तुमच्यावर हल्ला करीत नाहीं. तुम्ही आत्महत्येचा विचार करूं नका.

हें बोलणें चालू असतांना मराठ्यांची एक तुकडी रुस्तुमखानाच्या छावणींत घुसली. त्यांनीं रुस्तुमखानाची आई, बायको आणि मुलगी यांना पकडून साताऱ्या किल्ल्यावर नेलें.

ही बातमी बादशहाला कळली. त्यानें आज्ञा केली कीं गाजिउद्दीनखान बहादुर आणि दिलेरखान यांनीं कूच करून साताऱ्याला वेढा घालावा. मरहमतखान, सय्यद अब्दुस्समद खान, महंमद तकीखान आणि महंमद मुरादखान हे फत्तेहजंग खानापाशीं तैनात होते. त्यांना तेथून बदलून गाजीउद्दीन खानापाशीं तैनात करण्यांत आले.

सिद्दी अब्दुलकादर जखमी होतो

लक्ष्मेश्वर परगण्याचा अधिकारी सिद्दी अब्दुलकादर हा मरहमतखानाच्या फौजेंत सामील होण्यासाठीं निघाला होता. वाटेंत रुपाजी भोसले यानें आपल्या सैन्यानिशीं त्यांच्यावर हल्ला केला. पण अब्दुलकादर यानें मराठ्यांशीं निकराचें युद्ध केलें. पण मराठ्यांचें सैन्य संख्येनें अधिक होतें. या लढाईत अब्दुलकादर जखमी झाला. त्याचे पन्नास सैनिक ठार झाले. मराठ्यांनीं मोगलांची संपत्ति, मालमत्ता, सर्व लुटली आणि ती घेऊन ते निघून गेले.

रुस्तुमखानाचीं बायकामुलें

(पान २७८)

या सुमारास बादशहाला कळविण्यांत आलें तें हें; रुस्तुमखानाच्या दोन बायका आणि दोन मुलें हीं मोगल छावणींत पोहोंचलीं आहेत. मराठ्यांनीं

रुस्तुमखानाच्या छावणीवर हल्ला केला त्या वेळीं या बायका आणि मुलें यांनीं जुने कपडे अंगावर घालून आम्ही रुस्तुमखानाच्या दासदासी आहोंत असें मराठ्यांना सांगितलें. त्यामुळें मराठे त्यांच्या वाटेस गेले नाहींत. मग संधि पाहून तीं माणसें पळून रानावनांत लपून राहिलीं. रात्र झाल्यावर त्यांनीं फकिराचा वेष केला आणि रात्रंदिवस रानावनांतून प्रवास करीत ते शेवटीं बादशाही मुलखांत पोहोंचले.

ही बातमी बादशहाला कळतांच त्यानें आपला गुर्जबरदार (हुजऱ्या) मीर हसन यास पालखी आणि चार घोडे बरोबर देऊन रुस्तुमखानाच्या बायका माण. सांना घेऊन येण्यासाठीं पाठविलें. बादशहानें पुढील निरोप रुस्तुमखानाला कळविण्याची व्यवस्था करण्यांत यावी अशी आज्ञा केली. ' तुझ्या दोन बायका आणि दोन मुलें हीं छावणींत पोहोंचलीं आहेत, त्यांची व्यवस्था करण्यांत येत आहे. तुझी सुटका करण्यासाठीं फौजा तैनात करण्यांत आल्या आहेत. ''

इतक्यांत रुस्तुमखानाचा निरोप आला कीं आपण मराठ्यांना एक लाख होन देण्याचें कबूल केलें आहे. याशिवाय माझी आई आणि मोठा मुलगा यांना मराठ्यांच्यापाशीं ओलीस ठेविले आहे. या अटीवर माझी सुटका झाली असून मीं सध्यां सांगोल्याला आलों आहे. छावणींत येण्याची परवानगी असावी. यावर बादशहानें सांगितलें कीं सध्यां तुम्ही आहांत तेथेंच राहा. एकंदरींत रुस्तुमखान हा मराठ्यांच्या कैदेंत सोळा दिवसपर्यंत होता.

मोगल सातारा घेतात.

(पान ३१६)

साताऱ्याच्या किल्ल्यांत हंबीरराव हा सरदार होता. त्यानें मराठ्यांची मोठी फौज तयार केली. तो किल्ल्यांतून आपल्या सैन्यासहित बाहेर पडला आणि तो मोगलांशीं लढूं लागला. हें पाहून बादशहानें सातारचा किल्ला जिंकून घेण्याचा विचार केला. मोगल सैन्याची आघाडी शहाजादा आज्म आणि गाजिउद्दीनखान याच्या नेतृत्वाखालीं देण्यांत आली.

(पान ३१७)

हें सैन्य साताऱ्याजवळ येऊन पोहोंचलें. सेनापतींनीं किल्ल्यापासून तीन कोसांवर आपला तळ दिला. सातारचा किल्ला उंच आणि मजबूत आहे. त्याच्या भोंवतीं डोंगर आणि अरण्यें आहेत. ती वाट ओलांडणें म्हणजे कठीण काम आहे. किल्ल्यांत मराठ्यांच्या पाशीं बऱ्याच तोफा असून त्यांनीं बुरुजाबुरुजावर तोफा चढविल्या होत्या. सातारचा वेढा सुरू होऊन तीन महिने झाले. उभय सैन्यांतून रात्रंदिवस तोफांचा मारा चालू होता. पण मोगलांना किल्ला जिंकून घेणें जमेना,

हें पाहून बादशहा स्वतः सातारा जिंकून घेण्याच्या इराद्यानें निघाला. तो साताऱ्याजवळ पोहोंचला. तसें शहाजादा आज्म, गाजिउद्दीनखान बहादुर, बहरा-

मंदखान इत्यादि सरदार त्याला सामोरे गेले. बादशहानें शहाजादा आजम याच्या छावणीपासून एक कोसावर आपला तळ दिला. किल्ल्याच्या भोंवतीं चहूंकडे मोर्चे बांधण्यांत येऊन त्यावर निरनिराळे सरदार नेमण्यांत आले. यानंतर किल्ल्यावर रात्रंदिवस तोफांचा भडिमार करण्यांत आला. मधून मधून मराठ्यांच्या तुकड्या मोगलांवर तुटून पडत आणि मारामारी करून निघून जात.

(पान ३१८)

कधीं मोगल हल्ला करून किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत पोहोंचत. आणि मग किल्ल्यांतलि लोक वरून वजनानें मोठया असलेल्या दगडधोंड्यांचा त्यांच्यावर वर्षाव करीत. तोफांच्या आणि दगडाधोंड्याच्या माऱ्यानें कित्येक मोगल ठार झाले. मराठ्यांनीं रसदेच्या सगळ्या वाटा रोखून धरल्या होत्या. त्यामुळें मोगल लष्करांत धान्याची भयंकर टंचाई झाली. मोगलांची अतिशय दुर्दशा झाली. उपासमारीमुळें अनेक माणसें आणि जनावरें मृत्युमुखीं पडलीं. बादशहा आणि अमीर उमराव यांनीं किल्ला घेण्याची शिकस्त केली, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पण बादशहानें निर्धारच केला होता कीं किल्ला जिंकून घेतल्याशिवाय दुसरें काम म्हणून करावयाचें नाहीं.

हें पाहून गाजिउद्दीनखानानें साताऱ्याचा किल्लेदार आणि हंबीररावाचा भाऊ कृष्णाजीराव याच्याकडे पुढील निरोप पाठविला " तुमचा सरदार संभाजी हा बादशहाशीं लढला, पण कैद होऊन बादशहाच्या कोपाग्नीला बळी पडला. त्याचीं बायकामुलें बादशहापाशीं आलीं. संभाजीनें बादशहाचे असंख्य अपराध केले होते, पण त्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं.

(पान ३१९)

त्यानें संभाजीच्या मुलांना मोठमोठया मन्सबी आणि सरंजाम दिले. मोगल साम्राज्याशीं विरोध करणें म्हणजे स्वतःचा नाश ओढवून घेणें आहे. तुम्ही किल्ला बादशहाच्या हवालीं करून आपलें हित करून घ्यावें हें योग्य होय; नाहींतर काय घडणार आहे तें तुम्हांला दिसूनच येईल. "

किल्लेदारानें गाजिउद्दीनखानाचें म्हणणें मान्य केलें. त्यानें विनंती केली कीं, बादशहानें आपल्याला अभयाचा कौल द्यावा आणि त्याच्यावर आपल्या हाताचा ठसा उमटवावा. त्याप्रमाणें गाजिउद्दीनखानानें बादशहाला विनंती करून त्याच्याकडून कौलनामा घेतला आणि किल्लेदाराकडे पाठविला. कृष्णाजीनें यानंतर गाजिउद्दीनखानाला पुढीलप्रमाणें कळविलें— " तुम्ही उद्यां पहाटे सैन्य तयार करून किल्ल्याच्या मुख्य द्वारावर येऊन हल्ला चढवावा. मी तोफांचे पोकळ बार करीन यानंतर तुम्ही निःशंकपणें किल्ल्याच्या दरवाजांतून आंत दाखल व्हावें.

त्याप्रमाणें करण्यांत आलें. गाजिउद्दीनखान आणि इतर सरदार सैन्यासहित किल्ल्याच्या दरवाजापाशीं पोहोंचले. किल्ल्यांतून तोफांचे वायबार करण्यांत आले.

(पान ३२०)

मोगल किल्ल्यांत दाखल झाले. कृष्णराव आणि त्याचे इतर सरदार हे येऊन गाजिउद्दीनखानास भेटले. गाजिउद्दीनखानानें त्याला आलिंगन देऊन त्याला बादशहाकडे नेलें. बादशहानें त्याला मोठी मन्सब दिली. किल्ला फत्ते झाल्याबद्दल त्यानें चौघडे वाजविण्याची आज्ञा केली. अली अहमद हा पांचशें (स्वतःकरितां) आणि शंभर स्वार यांचा मन्सबदार होता. त्यांत दोनशें स्वतःकरितां आणि पन्नास स्वार यांची वाढ करून बादशहानें त्याला सातारच्या किल्लेदार म्हणून नेमलें. बादशहानें असदखान यास आज्ञा केली कीं, किल्ल्याचे नकाशे काढण्यांत येऊन या विजयानिमित्त म्हणून साम्राज्यांत चहूंकडे पाठविण्यांत यावेत, म्हणजे साम्राज्याच्या सेवकांना धन्य धन्य वाटेल आणि ते परमेश्वराचे आभार मानतील. बादशहाच्या आज्ञेची अंमलबजावणी करण्यांत आली.

——

खुतूते शिवाजी

खुतूते शिवाजी

लंडनच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथांत एक फारसी हस्तलिखित आहे. या ग्रंथाचें नांव आहे " खुतूते शिवाजी " म्हणजे शिवाजीचीं पत्रें. या हस्तलिखिताची आणखी एक प्रत कलकत्त्याच्या एशियाटिक सोसायटींत आहे. सर जदुनाथ सरकार यांनीं एक प्रत तयार करवून आपल्या संग्रहीं ठेविली होती. या प्रतीचीच एक फोटोप्रत माझे मित्र डॉक्टर पु. म. जोशी, संचालक सरकारी दप्तरखाना, मुंबई यांच्या प्रयत्नानें मला पाहण्यास मिळाली.

या संग्रहांत एकंदरींत बत्तीस पत्रें आहेत. त्यांपैकीं शिवाजी महाराजांचीं अशीं दोनच पत्रें आहेत. बाकीचीं पत्रें शिवकालापासून शाहुकालापर्यंतचीं आहेत. औरंगजेब, शहाजादा अकबर, जुल्फिकारखान, दिलेरखान, जयसिंग, शाहूमहाराज, कोल्हापूरकर संभाजी, प्रतापराव गुजर इत्यादींचीं पत्रें यांत समाविष्ट आहेत. एक पत्र अकबरकालीन फारसी कवि उर्फी याचें आहे. अर्थात् त्याचा इतर ऐतिहासिक पत्रांशीं कांहीं संबंध नाहीं.

या ग्रंथाच्या सुरवातीस एक आणि शेवटीं एक अशीं दोनच पत्रें शिवाजीमहाराजांचीं आहेत. म्हणून कुणीतरी या ग्रंथाला " शिवाजीचीं पत्रें " असें नांव दिलेलें दिसतें. या संग्रहांतील पत्रें हीं मूळ नसून नकला आहेत. हा संग्रह कुणीं केला आणि तो लंडन एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथालयांत कसा दाखल झाला हें समजण्यास मार्ग नाहीं. फारसी लेखनशैलीचा अभ्यास करण्यासाठीं म्हणून पत्रें, फर्मानें, सनदा इत्यादींचा संग्रह तयार करून जवळ बाळगण्याची पद्धत मोगलकाळांत प्रचलित होती. इतिहाससंशोधकांना अशा प्रकारचे पांचपन्नास तरी संग्रह सांपडले आहेत. खुतूते शिवाजी हा संग्रह अशाच प्रकारचा एक होय. त्यांतील मजकुरावरून हीं पत्रें खोटीं अगर बनावट असावीं असें वाटत नाहीं.

वरील एकतीस पत्रांपैकीं पंचवीस पत्रांचे इंग्रजी अनुवाद सर जदुनाथ यांनीं केले असून हे अनुवाद 'मॉडर्न रिव्ह्यू ' या मासिकांतून, आणि हाउस ऑफ शिवाजी, शिवाजी ॲण्ड हिज टाइम्स, स्टडीज इन औरंगजेब्स रेन, या जदुनाथांच्या ग्रंथांतून प्रसिद्ध झाले आहेत. कोल्हापूरकर संभाजी याचें बंकापूरचा पठाण सरदार दिलेरखान यास एक, आणि शाहूमहाराजांचीं निजामुलमुल्कास दोन, जयसिंगाचें एक, आणि जुल्फिकारखानाचीं दोन अशी एकंदरींत सहा पत्रें जदुनाथांच्या अनुवादांत आलीं नाहींत.

मूळ संग्रहांत पत्रांचा क्रम आहे तो घटनांच्या तारखांप्रमाणें नाहीं. मराठी अनुवाद करतांना हीं पत्रें मजकुरांतील घटनांच्या तारखा पाहून त्या क्रमानें दिलीं

आहेत. हीं पत्रें किती महत्त्वाचीं आहेत हें अभ्यासकांना सांगण्याची आवश्यकता नाहीं. जदुनाथांनीं आपल्या ग्रंथांतून या पत्रांचा पूर्णपणें उपयोग करून घेतला आहे. शिवाजी महाराजांनीं जिजियाच्या निषेधार्थ औरंगजेबाला लिहिलेलें पत्र, शहाजादा अकबर यानें औरंगजेब, कविकलश आणि संभाजीराजे यांना वेळोवेळीं लिहिलेलीं पत्रें, जुल्फिकारखान यानें महाडहून शहाजादा आज्जम यास आणि रायगडाहून वजीर असदखान यास लिहिलेलीं पत्रें, (इ. स. १६८८-८९), शाहूमहाराजांनीं जंजिऱ्याच्या शिद्यासंबंधानें निजामुल्मुल्काला लिहिलेलीं पत्रें हीं महत्त्वाचीं ठरतात. कोल्हापूरकर संभाजी यांनीं शाहूमहाराजांना रामराजाच्या जन्मासंबंधीं लिहिलेलें पत्र पाहतां रामराजाची जन्मतारीख आतां निश्चित झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या फारसी पत्रांचा मुळावरून केलेला मराठी अनुवाद अभ्यासकांना उपयुक्त वाटेल अशी आशा आहे.

शायिस्ताखानाच्या शिवाजी महाराजांवरील मोहिमेंत औरंगजेबाचा वजीर महंमद जाफर याचा मुलगा नामदारखान हा मोगल सैन्याच्या आघाडीवरील पथकांचा मुख्य होता. इ. स. १६६१ आणि ६२ मध्यें त्याच्या आणि मराठ्यांच्या अनेक लढाया झाल्या. पेणजवळील मिरा डोंगर येथें शिवाजी महाराजांनीं त्याच्यावर हल्ला केला होता. या एकदोन वर्षांच्या काळांतच नामदारखानानें पुढील पत्र शिवाजी महाराजांना लिहिलें असावें. पत्र उपरोधिक आहे. या पत्राचा इंग्रजी अनुवाद करतांना तें दिलेरखानाचें आहे असें जदुनाथांनीं लिहिलें आहे, तें बरोबर दिसत नाहीं.

(१)

नामदारखानाचें शिवाजी महाराजांना पत्र

" नशिबाची आपल्याला साथ मिळो. आपल्या भेटीची अतिशय इच्छा आहे. आपण महालदाराबरोबर पाठविलेलीं पत्रें मिळालीं. त्यांतून तहाचा मजकूर आपण लिहिला होता तो समजला. पण लढल्यावांचून तहाचें बोलणें करणें हें निरर्थक आहे. प्रथम लढाई व्हावी आणि मग तहाचीं बोलणीं व्हावीं. बादशहाच्या आज्ञेनें आम्ही हिंदुस्थान (उत्तर) सोडून तुमच्या मुलखांत फेरफटका करण्यास आलों आहोंत. इच्छा ही कीं या डोंगराळ मुलखांत युद्धाचा अनुभव घ्यावा. आम्ही येथें आपले पाहुणे म्हणून आलों आहोंत. पण आपण कोठें दिसतच नाहींत. आपल्या ताब्यांत मजबूत किल्ले आहेत. आपल्या इलाख्यांत उंच डोंगर आणि खोल दऱ्या आहेत. आपलें सैन्य कसलेलें आहे. हें सर्व असूनहि आपला पत्ता कोठेंच नाहीं. आणि आतां आपण तहाच्या गोष्टी बोलतां. याचा विचार आपण यापूर्वीच करण्यास हवा होता. पण आतां जें तुम्ही केलें तें स्वागतार्हच होय.

दुसरें पत्र म्हणजे शिवाजी महाराजांनीं औरंगजेबाच्या अधिकाऱ्यांना लिहिलेलें आहे. जदुनाथांच्या मतें हें पत्र इ. स. १६६४ चें असावें. माझ्यासमोर असलेल्या हस्तलिखिताच्या फोटोप्रतींत या पत्राचें पहिलें पान नाहीं, त्यामुळें पत्रांतील पहिल्या चौदा ओळी मी जदुनाथांच्या इंग्रजी अनुवादावरून घेतल्या आहेत.

(२)

शिवाजी महाराजांचें औरंगजेबाच्या अधिकाऱ्यांना पत्र

दूरदृष्टीच्या विचारवंतांना ही गोष्ट माहीत असावी कीं, गेलीं तीन वर्षें बादशहाचे प्रसिद्ध सेनापति आणि अनुभवी कारभारी या भागांत येत आहेत. माझा मुलूख आणि किल्ले जिंकून घ्यावे अशी बादशहानें त्यांना आज्ञा केली. या आज्ञेच्या उत्तरांत ते बादशहाला लिहून कळवितात कीं, " हा मुलूख आणि किल्ले हे लवकरच आपल्या हातीं येतील. " अपार कष्टरूपी घोडादेखील या कठीण मुलखांत संचार करूं शकत नाहीं. हा मुलूख सर होणें हें अत्यंत कठीण आहे. ही गोष्ट त्यांना माहीत नाहीं. खोट्या गोष्टी लिहून बादशहाकडे पाठविण्याची त्यांना लाजहि वाटत नाहीं. उलट ते सत्य गोष्टी वाऱ्यावर सोडून देतात. ते खरी वस्तुस्थिति लिहून पाठवितील तर श्रेयस्कर होईल. माझा देश म्हणजे उघड्या आणि विशाल मैदानांत असलेलीं बीदर आणि कल्याण हीं स्थळें नव्हत कीं मोर्चे लावून आणि हल्ले चढवून जिंकून घेणें होऊं शकेल. माझ्या मुलुखांत पर्वताच्या रांगा आहेत. त्या दोनशें फर्संग लांब आणि चाळीस फर्संग रुंद पसरल्या आहेत. माझ्या मुलुखांत ओलांडण्यास अवघड असे नद्यानाले ठिकठिकाणीं आहेत. अत्यंत मजबूत असे साठ किल्ले बांधण्यांत आले आहेत. कांहीं किल्ले समुद्रकांठावर बसले आहेत. म्हणून आदिलशहाकडून अफजलखान हा प्रचंड सैन्यानिशीं आला. तो असमर्थ बनून नाश पावला. जी कांहीं वस्तुस्थिति आहे ती तुम्ही बादशहाला लिहून कां कळवीत नाहीं ? यामुळें तुमचा नाश होण्याचें टळेल.

अफझलखानाच्या मृत्यूनंतर, अमीरुलउमरा शायिस्ताखान हा उंच पर्वतांनीं आणि खोल दऱ्यांनीं व्यापिलेला हा जो माझा मुलूख, त्याच्यावर चालून आला. तीन वर्षेपर्यंत त्यानें प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अगदीं अल्पावधींत मी शिवाजीचा पराजय करून त्याचा मुलूख जिंकून घेईन असें त्यानें बादशहाला लिहून कळविलें. अशा खोट्या वृत्तीचा जो व्हावयाचा तोच परिणाम झाला. त्याची फजिती होऊन त्याला निघून जावें लागलें. ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे.

(कविता) प्रत्येक ठिकाणीं घोडा दौडविणें शक्य होईलच असें नाहीं. कांहीं ठिकाणीं ढाली टाकून देणेंच इष्ट ठरतें.

माझ्या देशाचें रक्षण करणें हें माझें कर्तव्य होय. स्वतःची प्रतिष्ठा कायम राखण्याकरितां तुम्ही बादशहाकडे खोट्या गोष्टी लिहून पाठवितां. पण माझ्यावर परमेश्वराची कृपा आहे. या देशावर आक्रमण करण्याच्या उद्देशानें येणारा कोणीहि असो. त्याची इच्छा फलद्रूप झाली नाहीं.

(कविता) या रक्ताच्या नदीची सर्व शहाण्या माणसांना भीति वाटते, कारण यांतून आपली नाव सुरक्षितपणें नेणें कुणालाच शक्य झालें नाहीं. ”

(३)

जयसिंगाचें सफशिकनखान यास पत्र

(१६६५)

“ आपलें कुशल इच्छितों. आमच्या सैन्याकडून पराजित होऊन शिवाजी बादशहांना शरण आला. पुरंदरचा किल्ला फत्ते झाला. त्याचे बावीस किल्ले आमच्या ताब्यांत आले. या हकीकतीचा तपशील असा––शिवाजीचे वकील आमच्याकडे येजा करीत होते. पण मी ओळखलें कीं, जोंपर्यंत आम्ही आपलें बळ दाखविणार नाहीं तोंपर्यंत त्याच्या बोलण्यांत खरेपणा येणार नाहीं. त्यामुळें आम्ही त्यांच्या विनंतीला नकार देऊन वकीलांना परत पाठविलें. रुद्रमाळचा किल्ला आमच्या ताब्यांत आला. दाऊदखान आणि रायसिंग यांना मी शिवाजीचा मुलूख उध्वस्त करण्यासाठीं रवाना केलें. राजगड आणि इतर किल्ल्यांच्या जवळ पोहोंचून धामधूम करण्यासाठीं म्हणून मी सैन्याच्या तुकड्या नेमल्या. कांहींनीं रोज आणि कांहींनीं एक दिवसाआड गस्त घालीत राहावें असें ठरविलें. शत्रूंपैकीं कुणालाहि आपलें डोकें वर काढतां येईनासें झालें. मी ठिकाठिकाणीं ठाणीं स्थापन केलीं; शत्रूची थोडीशी जरी बातमी आली कीं, आमचीं सैन्यें शत्रू असेल त्या ठिकाणीं पोहोंचतील अशी व्यवस्था करण्यांत आली. शिवाजीनें गुल्शनाबाद नाशिकच्या प्रांताकडे आपले स्वार आणि पायदळ पाठविले होते. तो प्रांत उध्वस्त करावा असा त्याचा हेतु होता. त्या पथकांना त्याच्या सैन्यांतून फोडण्यांत आलें. त्यांना आमच्याकडे वळविण्यांत आलें. त्यांना बक्षिसाचीं आणि मानमतराबाचीं आश्वासनें देण्यांत आलीं.

शिवाजीची परिस्थिति दिवसेंदिवस कठीण होत गेली. त्याला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप वाटूं लागला. त्यानें आपण काय केलें तर चांगलें आणि काय केलें तर वाईट याचा विचार केला. त्यानें ठरविलें कीं बादशहांना विनंती करून आपला जीव आणि आपलें राज्य हीं वांचवावीं. बादशहानें कबूल केलें तर यापेक्षां चांगलें कोणतें ? हें झालें नाहीं तर आदिलशाही कोंकण सोडून द्यावा आणि आदिलशहाशीं मिळून युद्ध अधिक निकरानें चालू करावें. याकरितां त्यानें

जिल्काद महिन्याच्या मध्यांत (सुमारें वीस मे १६६५) पंडितराव यास पाठविलें. ही गोष्ट माझ्या हेरांकडून कळली होती. ”

हें पत्र येथें अपूर्ण स्थितींत आहे.

(४)

दिलेरखानाचें शिवाजी महाराजांना पत्र

(पत्रांतील मजकुरावरून हें पत्र बहादुरखानाचें असावें. या पत्राचा काळ इ. स. १६७५ हा आहे. तहाचीं बोलणीं करून महाराजांपाशीं बहादुरखानाला फजीत व्हावें लागलें.)

“ राजश्रेष्ठ प्रिय बंधू, राजे शिवाजी यांस, धन्य परमेश्वराची, आपलें भाग्य थोर. आपल्याबद्दल मी बादशहापाशीं विनंती केली ती मान्य करण्यांत आली आहे. तुमच्यावर अपेक्षेपेक्षांहि अधिक अशी बादशहाची कृपा झाली आहे आणि पुढेंहि होईल. तुमच्या मुलाला सहा हजारी मन्सब (स्वतःची) आणि सहा हजार स्वारांची मन्सब (त्यांपैकीं पांच हजार हे तीन घोडे आणि दोन घोडे बाळगण्याचा अधिकार असलेले, से अस्पा, दो अस्पा). ऐंशी लक्ष दाम (सुमारें एक लाख रुपये) देणगी म्हणून ध्वज आणि नगारे, नौबती इत्यादि मानसन्मान देण्यांत आला आहे. हें पत्र पाहतांच संभाजीला पाठवावें म्हणजे बादशहाच्या कृपेनें तो उत्कृष्ट कामागिरी बजावील. आपल्यावर बादशहाची जी कृपा झाली आहे ती महंमद सयीद याच्या पत्रावरून कळेल. आपल्या उभयतांना ही घटना स्वागतार्हच आहे. परमेश्वर करील तर यापुढें आपल्या स्नेहसंबंधाला इष्ट अशाच गोष्टी घडतील. ”

(५)

प्रतापराव गुजर याचें सुरतेचे अधिकारी आणि नागरिक यांना पत्र

(इ. स. १६७२)

सुरतेचे अधिकारी, कानूनगो, देसाई, व्यापारी, दलाल, महाजन, इंग्रज, फ्रेंच आणि डच या कंपन्यांचे लोक आणि सामान्य जनता यांनीं काळजीपूर्वक जाणावें कीं, शिवाजी महाराजांच्या आज्ञेप्रमाणें सुरतेंतील आयात-निर्यात होणाऱ्या मालमत्तेवर जो कर आकारला जातो, त्याचें एकंदरींत उत्पन्न काय होतें याचा तपशील लिहिण्यांत यावा. या उत्पन्नाची चौथाई महाराजांच्या सैन्यानें घ्यावी. या कामाकरितां महाराजांनीं माझी नेमणूक केली आहे. महाराजांच्या आज्ञेप्रमाणें मी तुम्हांला लिहीत आहें. नशिबानें तुमचें मार्गदर्शन केलें आणि माझ्या हुकुमांची अंमलबजावणी करण्यांतच तुमचें हित आहे हें तुम्हांला पटलें तर मी माझा अधिकारी पाठवीत आहे. तो म्हणेल त्याप्रमाणें करा, म्हणजे तुमचें

आमचें चांगलें होईल. नाहींतर शूर आणि विजयी सैन्य लवकरच या भागांत सहल-शिकार करण्यासाठीं येऊन थडकेल. या गांवांतील घरन् घर धुळीला मिळविण्यांत येईल. या गांवाचे अवशेषहि राहणार नाहींत. या शहरांतील सर्व माणसें आमच्या तावडींत सांपडतील. एकाहि माणसाला सुटून जातां येणार नाहीं. बादशहाची मदत येईल या समजुतीनें तुमचीं डोकीं फिरलीं असतील तर यांत तुमचा सर्वनाश आहे असें समजा. आमच्या विजयी सैन्यानें दोन वेळां हा प्रांत आपल्या टांचाखालीं रगडून काढला आहे. बादशहा आमचें काय करूं शकला? तुमच्या तोफांचा आणि बंदुकींचा धूर तुमच्या डोक्यांत सांठला असेल, (तुम्हांला आपल्या तोफांचा आणि बंदुकींचा गर्व असेल), आणि आपला किल्ला अजिंक्य आहे असें तुम्हांला वाटत असेल तर एक गोष्ट लक्षांत ठेवा. आमचें विजयी सैन्य येथें लवकरच येऊन पोहोंचेल. पिंजारी कापूस धुनकतो त्याचप्रमाणें आमचें सैन्य तुमच्या किल्ल्याचा दगड आणि दगड धुनकून काढील आणि तुमच्याच शहराच्या तोफांनीं आणि बंदुकींनीं तुमचें शहर उध्वस्त करून टाकील.

साल्हेर आणि माहुली (मुल्हेर पाहिजे) हे किल्ले अतिशय मजबूत आहेत. मनुष्य आपल्या कल्पनेच्या दोऱ्यानेंहि त्या किल्ल्यांचे बुरूज हस्तगत करूं शकत नाहीं. असें असूनहि आम्ही तोंडांतून शब्द बाहेर पडण्यास जो वेळ लागेल तेवढ्यांत (अल्पावधींत) ते किल्ले महाराजांच्या कृपेनें जिंकून घेतले. मग सुरतेच्या तहाची काय कथा? डोंगरदऱ्यांतून फिरणाऱ्या आमच्या वीरांपुढें त्याची काय मातब्बरी आहे? बहादुरखान आणि दिलेरखान हे तुमच्या बादशहाचे सेनापति आहेत. फजीत पावून, मनगटें चावीत, निराशेनें जमिनीवर आदळआपट करीत साल्हेरसमोरून त्यांना पुण्याकडे पळून जावें लागलेंच ना.

केवळ तुमच्यावर दया म्हणून, तुमचें उत्तर येईपर्यंत माझें सैन्य पाठविण्याचें मीं थांबविलें आहे. परमेश्वरानें तुम्हांला सद्बुद्धि दिली, तुमचा गाफीलपणा दूर झाला आणि उपदेशाचे शब्द तुम्हीं ऐकलेत तर त्यांत तुमचें हित राहील. नाहींतर तुम्हांवर पश्चात्ताप करण्याची पाळी येईल."

खालील पत्र शिवाजी महाराजांनीं औरंगजेबाला लिहिलें असुन त्यांत जिजिया करासंबंधीं मजकूर आहे. पत्राचा लेखक नीलप्रभु हा आहे. जदुनाथांच्या मतें हें पत्र इ. स. १६७९ मध्यें पाठविण्यांत आलें.

(६)

शिवाजी महाराजांचें औरंगजेबास पत्र

आपला दृढ हितचिंतक शिवाजी हा परमेश्वराची कृपा आणि आपली मेहेरबानी (ही सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट आहे) याबद्दल आभार मानून आपल्याला कळवितों कीं,

माझ्या दुर्दैवामुळें मी आपली परवानगी न घेतांच आपल्या दरबारांतून निघून आलों. पण आपली हरप्रकारें सेवा करण्यास मी तयार आहें. सर्वांवर आपली कृपा राहो. एक हितचिंतक म्हणूनच मी कांहीं गोष्टी आपल्यासमोर मांडीत आहे.

अलीकडे माझ्या ऐकण्यांत आलें आहे कीं, माझ्यावरील मोहिमेमुळें आपला खजिना रिकामा झाला आहे. यामुळें हिंदूंच्याकडून जिजिया कर वसूल करून त्या उत्पन्नानें राज्याचा आणि सरंजामाचा खर्च भरून काढावा असें आपण ठरविलें आहे.

बादशहा सलामत, आपल्या साम्राज्याचा संस्थापक जो अकबर, त्यानें बावन्न वर्षें राज्य केलें. खिस्ती, यहुदी, मुसलमान, दादू पंथीय, नक्षत्रपूजक, मलकिये, नास्तिक, ब्राह्मण, जैन, सारांश, सर्व जमातींबरोबर शांततेनें आणि समभावानें वागण्याचें उत्कृष्ट धोरण त्यानें स्वीकारलें होतें. सर्वांचें संरक्षण आणि कल्याण व्हावें हें त्याचें ध्येय होतें. म्हणूनच तो जगद्गुरु या नांवानें प्रसिद्ध झाला. याचा परिणाम असा झाला कीं, जिकडे त्याची दृष्टि वळे तिकडे भाग्यश्री आणि जयश्री त्याच्यासमोर हजर राहात. बहुतेक मुलूख त्याच्या ताब्यांत आला.

यानंतर नुरुद्दीन जहांगीर बादशहा यांनीं बावीस वर्षेंपर्यंत या जगावर आपल्या कृपेची सांवली धरली. आपलें जीवन (जीवन म्हणजेच सत्कृत्यें) त्यानें अमर केलें. त्यानें आपलें जीवन सार्थक केलें. शहाजहान बादशहानें बत्तीस वर्षें राज्य केलें. सत्कृत्याच्या योगें त्यानेंहि आपलें जीवन सार्थक केलें. यामुळें हे बादशहा जिकडे दृष्टि वळवीत तिकडे त्यांना यश लाभत असे. या बादशहाच्या कारकिर्दींत अनेक प्रांत आणि किल्ले त्यांच्या ताब्यांत आले. सत्कृत्यें करणाऱ्या या बादशहांचें नांव त्यांच्या मागेंहि जिवंत राहिलें आहे. त्यांची थोरवी काय वर्णावी ? तिची कल्पना या गोष्टीवरून येईल कीं, आलमगीर बादशहानें त्यांचें अनुकरण करण्याचा प्रयत्न केला, पण त्याला त्यांत यश न आल्यामुळें तो आश्चर्यचकित झाला आहे.

त्या बादशहांनीं मनांत आणिलें असतें तर जिजिया कर लादण्याची त्यांना शक्ति होती. पण सर्व लहानथोर माणसें हीं परमेश्वराचीं आहेत आणि सगळे धर्म हीं परमेश्वराच्या आराधनेचीं साधनें होत असें ते समजत. त्यांनीं धर्मद्वेषाचा विचारहि मनांत येऊं दिला नाहीं. त्यांची दयाळू वृत्ति आणि त्यांनीं केलेलीं सत्कृत्यें यांची स्मृति जगांत सदैव जागृत आहे. सर्व लहानथोर त्यांची स्तुति करतात आणि त्यांना दुवा देतात. त्यांच्या कारकीर्दींत प्रजा शांततेनें नांदत होती म्हणून त्यांचें वैभव दिवसेंदिवस वाढत गेलें आणि त्यांना आपल्या कामांत यश येत गेलें.

पण आपल्या काळांत अनेक प्रांत आणि किल्ले आपल्या ताब्यांतून निघून गेले आहेत. उरलेले प्रांत आणि किल्ले पण लवकरच आपल्या हातून निघून जातील.

प्रांत उध्वस्त करण्यांत मी कोणत्याहि प्रकारें कसूर करणार नाहीं. तुमची प्रजा चिरडली जात आहे. तुमच्या महालांचे आणि परगण्यांचे वसूल दिवसेंदिवस कमी होत आहेत. जेथें एक लाखाचें उत्पन्न होतें तेथें एक हजार वसुल होणेंहि कठीण झालें आहे. बादशहा आणि शहाजादे यांच्या वाड्यांत जर दारिद्य आढळून येऊं लागलें आहे तर अमीर, उमराव आणि मन्सबदार यांची परिस्थिति काय झाली आहे हें दिसतच आहे. सांप्रतच्या काळांत तुमचे स्वार सैनिक असंतुष्ट आहेत, मुसलमान आक्रोश करीत आहेत आणि हिंदु पोळले आहेत. लोक भाकरीला मोताद झाले आहेत. आपल्या हातांनीं आपलें कपाळ बडवून घेत असल्यामुळें त्यांचीं तोंडें लाल झालीं आहेत.

त्यांची अशी दुर्दशा झाली असतां त्यांच्यावर जिजिया कराचा बोजा आपण लादला आहे. हें आपल्यानें करवलें तरी कसें? ही अनिष्ट बातमी पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत पसरेल. जनमनांत ही गोष्ट नमूद होईल कीं, हिंदुस्थानचा बादशहा हा भिक्षापात्र हातांत घेऊन ब्राह्मण, जैन, साधु, जोगी, संन्यासी, बैरागी, गरीब-गुरीब, मोताद आणि कंगाल झालेल्यांच्याकडून जिजिया वसूल करण्यास निघाला आहे. यांतच त्याला मर्दुमकी वाटते. तैमूर घराण्याचें नांव तो मातींत मिळवीत आहे. अशी भावना लोकांच्या मनांत खोलवर रुजेल.

बादशहा सलामत, कुराणांत परमेश्वराला रब्बुल आलमीन, विश्वनाथ म्हटलें आहे. रब्बुल मुसलमीन (मुसलमानांचा नाथ) असें म्हटलें नाहीं. वास्तविक पाहतां, इस्लाम आणि हिंदुधर्म हे दोन्ही परमेश्वराच्या रूपाचे मधुर आविष्कार होत. मशिदींत परमेश्वराचें स्मरण करण्यासाठीं अजां (बांग) देतात. मंदिरांतील घंटानाद हा परमेश्वराच्या आराधनेसाठींच होय. धर्माच्या बाबतींत द्वेष आणि कट्टरपणा दाखविणारा प्रत्येकजण परमेश्वराच्या आज्ञेविरुद्ध वागत आहे असेंच म्हटलें पाहिजे. परमेश्वरानें निर्माण केलेल्या या चित्रावर रेघोट्या ओढूं पाहणें म्हणजे चित्रकारावर (परमेश्वरावर) दोषारोप करणें आहे.

(कविता) कोणत्याहि कृतींत दोष काढणें म्हणजे कर्त्याला नांवें ठेवण्यासारखें आहे. तसें करूं नका.

न्यायबुद्धीनें पाहतां जिजिया हा कोणत्याहि दृष्टीनें योग्य ठरत नाहीं. हिंदुस्थानांत हा नव्यानें सुरू करण्यांत येत आहे. हा अन्याय होय. तुम्हांला धर्माच्या आणि न्यायाच्या दृष्टीनें हा कर लादणें आवश्यकच वाटत असेल तर आपण तो कर राजा रामसिंग (राजसिंग ?) याजकडून घेण्यास हवा. कारण ते हिंदूंचे पुढारी आहेत. यानंतर या हितचिंतकांकडून (माझ्याकडून) कर वसूल करणें मुळींच अवघड जाणार नाहीं."

औरंगजेबाचें शहाजादा अकबर यास पत्र

औरंगजेबाचा मुलगा शहाजादा अकबर यानें आपल्या बापाविरुद्ध बंड करून संभाजीराजापाशीं आश्रय घेतला. त्यानें पुन्हा आपल्याकडे परत यावें म्हणून औरंगजेबानें त्याला पत्रें लिहिलीं. त्यांपैकीं दोन पत्रें आणि त्यांना अकबरानें दिलेलें उत्तर हीं खालीं दिलीं आहेत.

(१)

माझा प्रिय पुत्र, माझ्या काळजाचा भाग, माझ्या प्राणासमान असलेल्या महंमद अकबर यानें माझ्या कृपेची आशा धरून जाणावें कीं, माझ्या सर्व मुलांपेक्षां मी तुला अधिक प्रिय मानतों. या गोष्टीला परमेश्वर साक्षी आहे. पण दुर्दैव तुझें, त्या सैतान रजपुतांच्या सल्ल्याला बळी पडून तूं येथील स्वर्गसुखापासून वंचित झालास आणि आतां तूं रानावनांतून आणि डोंगरदऱ्यांतून भटकत आहेस. यावर मी काय उपाय करावेत ? मीं तुझी काय आणि कशी मदत करावी ? तूं यावेळीं अत्यंत दुर्दशेंत आहेस. तुझें दारिद्य, तुझें वणवण भटकणें, इत्यादींच्या बातम्या ऐकून मला अत्यंत दुःख झालें. इतकेंच नव्हे तर हा माझा जीव मला नकोसा झाला. यापेक्षां अधिक काय सांगावें. तूं एक सम्राटाचा पुत्र होतास. तूं एक प्रतिष्ठित असा शहाजादा होतास. याचा तूं विचार केला नाहींस. तुझा भोळेपणा किती म्हणून सांगावा ? तुला आपल्या तरुण वयावरहि दया आली नाहीं. तूं आपल्या बायका पोरांच्यावरहि दया दाखविली नाहींस ? त्यांना तूं पशुतुल्य आणि क्रूर अशा रजपुतांच्या ताब्यांत दिलेस. आणि एखाद्या चेंडूप्रमाणें तूं कधीं उंच उधळत तर कधीं जमिनीवर पडत भटकत आहेस.

परमेश्वरानें प्रत्येक पित्याच्या हृदयांत आपल्या पुत्रासंबंधीं प्रेमाची भावना निर्माण केली आहे. तूं केलेले अपराध भयंकर आहेत, पण त्यांची तुला अशी जबर शिक्षा मिळावी असें मला वाटत नाहीं.

(कविता) हा मुलगा मातीचा निवळ ढिगारा का असेना, आईबाप त्याला काजळाप्रमाणें आपल्या डोळ्यांत धारण करतात.

जें झालें तें झालें. तुझ्या नशिबानें तुला आपल्या कृतकर्माचा पश्चात्ताप होत असेल तर, तुला वाटेल त्या ठिकाणीं येऊन तूं मला भेटावें. तुला पूर्णपणें क्षमा करण्यांत येईल. तुला कल्पनाहि नसेल इतकी तुझ्यावर कृपा करण्यांत येईल. तूं आतांपर्यंत इतके कष्ट भोगलेस. त्याऐवजीं तुला पूर्ण आराम मिळेल (कष्टाचें उट्टें निघेल). यासाठीं तूं येऊन हजर झालेंच पाहिजेस असें नाहीं. पण ज्या अर्थीं तूं फजीत पावला आहेस, त्याअर्थीं तूं मला एकदा भेटून आपला झालेला दुर्लौकिक नाहींसा करावा हें योग्य होय. जसवंतसिंग हा रजपुतांचा पुढारी होता. तो दारा शुकोहला जाऊन मिळाला. पण शेवटीं काय झालें ? त्यानें अपेक्षा केली त्याच्या

उलट त्याला फळ मिळून त्याला पश्चात्ताप करावा लागला. हें असेंच होणार याची खात्री ठेव. नशीब तुझी साथ करो आणि परमेश्वर तुला योग्य मार्ग दाखवो.

(२)

बादशहाची कृपा झालेला, भाग्यशाली अकबर यानें जाणावें कीं ही किती दुःखाची गोष्ट आहे. तुझी बुद्धिमत्ता आणि शहाणपणा याबद्दल मला अतिशय दुःख होत आहे. निष्ठेच्या आणि ताबेदारीच्या मार्गापासून तूं भटकलास. तूं कुटिल वृत्ति धारण केलीस. राज्याचा लोभ धरून तूं आपल्या बापावरच तलवार उपसलीस. बादशहाच्या कोण्या मुलानें आपल्या बापाविरुद्ध लढण्याची तयारी केली ? तूं अत्यंत उद्धटपणानें आणि अविचारानें पुढें चालून आला आहेस. मुलूख जिंकण्याची तुला इच्छा झाली असेल तर यापेक्षां अधिक चांगली अशी गोष्ट कोणती असूं शकेल ? एकनिष्ठ सरदार आणि हितचिंतक सहकारी यांना घेऊन तूं इराक (इराण) देशावर जा. तेथील बादशहा शहा अब्बास हा नेहमीं युद्धांत गुंतलेला असतो. तुझ्या पित्याचें (माझें) कंधारवरील प्रभुत्व त्यानें नाहींसें केलें. तूं जाऊन त्याचा देश उध्वस्त कर. सत्पुत्राचें हेंच कर्तव्य होय. तखतावर बसण्याच्या इच्छेनें बापाबरोबर तूं कां लढावेंस ? यशाची किल्ली परमेश्वराच्या हातांत असते. राज्यपदाचा लाभ परमेश्वराच्या कृपेनेंच होत असतो. यापेक्षां इष्ट अशी कोणती गोष्ट असूं शकेल ? म्हणून तूं नम्रपणें आपला अविचार टाकून द्यावा आणि मला शरण यावें. तूं नम्र होऊन मला शरण आलास तर मी कदाचित् कृपा करीन. ही माझी तुला निक्षून केलेली ताकीद आहे असें समज. या बावतींत मुळींच दिरंगाई करूं नकोस.

शहाजादा अकबर याचें औरंगजेबास उत्तर

आपलें फर्मान (आज्ञापत्र) मिळालें. आपल्या पत्रांत आपण मला अनेक प्रकारें उपदेश केला आहे. त्याचेंच उत्तर मी देत आहें.

आपण लिहिलें आहे-" मी तुला आपल्या इतर पुत्रांपेक्षां अधिक प्रिय समजत होतों. काय तुझें नशीब, तूं सर्व सुखांना पारखा होऊन दुर्दशेंत सांपडला आहेस. बादशहा सलामत, आपल्या पित्याची मर्जी संतुष्ट राखणें, आणि त्याच्या आज्ञेचें पालन करणें हें प्रत्येक पुत्राचें कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें पुत्राच्या हिताची काळजी घेणें आणि त्याचा जो हक्क आहे तो त्याला मिळवून देणें हें पित्याचें कर्तव्य आहे. धन्य परमेश्वराची, पुत्र म्हणून माझीं जीं कर्तव्यें होतीं तीं बजावण्यांत, आणि आपली सेवा करण्यांत मी कोणत्याहि प्रकारें कसूर केली नाहीं. आपण माझ्यावर जी कृपेची आणि मेहरबानीची वृष्टि केली त्याचें पूर्ण वर्णन तर जाऊं द्या, त्यांपैकीं कांहींचेंहि वर्णन करणें अशक्य आहे. वडील माणसें नेहमीं आपल्या लहान मुलांच्याकडे विशेष लक्ष देतात. तसें त्यांनीं केलेंच पाहिजे. पण हा शिरस्ता आपण सोडून दिला. आपल्या लहान मुलांच्याकडे आपण दुर्लक्ष केलें. मोठ्या

मुलाला आपण शहा, ही पदवी दिली. आणि त्याला आपण आपला युवराज म्हणून नेमलें. आपलें हें कृत्य कोणत्या अर्थानें न्याय्य म्हणतां येईल ? सर्व पुत्रांना समान हक्क आहेत. एकाला वर चढविणें आणि इतरांना खालीं पाडणें हें कोणत्या तत्त्वाप्रमाणें आहे ? खरा बादशहा म्हणजे परमेश्वर. त्यानें असें कां केलें आणि तसें कां केलें नाहीं असें कोणी म्हणूं शकणार नाहीं. तसें करण्याची कोणाला शक्ति आहे ? पण आपण धर्मनिष्ठ आहांत, आपण धर्मशास्त्राचें पालन करतां, आपण सत्यनिष्ठ आहांत, असा आपला सर्वत्र लौकिक आहे.

(कविता) "हा कोणाचा कुणाला आपला मित्र म्हणेल ? याचें कुणाशीं जुळेल काय ?"

आपणच हा मार्ग स्वीकारला आहे. आतां तो मार्ग निरर्थक आहे असें आपण कसें म्हणूं शकतां ?

(कविता) "माझ्या बापानें (आदिमानव, आदम) केवळ गव्हाच्या दोन दाण्यांसाठीं स्वर्ग विकून टाकला. मी बाजरीच्या एका दाण्याकरितां स्वर्गसुख टाकून दिलें, नाहींतर मी कृतघ्नच म्हटलें पाहिजे."

बादशहा सलामत, माणसें आपण होऊन कष्ट आणि श्रम आपल्यावर ओढून घेतात. अकबर, जहांगीर, शहाजहानसारख्या बादशहांनीं अपार कष्ट केले तेव्हां कोठें त्यांना आपल्या ध्येयांत यश आलें. आत्यंतिक अशीं संकटें सहन केल्याशिवाय अमृताचा लाभ होत नाहीं. या गोष्टी इतिहासावरून स्पष्ट होतात. प्रत्येक फुलाला वांहीं कांटे असतात आणि प्रत्येक खजिन्याच्या संरक्षणाला साप असतो.

(कविता) पाणीदार तल्वारीचें जो चुंबन घेऊं शकतो, हाताळूं शकतो त्यालाच भाग्यवधू माळ घालते.

कष्टानंतर सुख हा निसर्गाचा नियम आहे. त्यास अनुसरूनच माझ्या सांप्रतच्या कष्टाचें आणि श्रमाचें सार्थक होईल. माझ्या मनासारखें होईल. आणि हें सर्व त्या परमेश्वराच्या कृपेनें घडून येईल, अशी मला दृढ आशा आहे. सध्यांच्या माझ्या श्रमाचा शेवट सुखांत आणि आनंदांत होईल, अशी माझी श्रद्धा आहे. आपण लिहिलें आहे कीं, "जसवंतसिंग हा रजपुतांचा पुढारी होता. त्यानें दाराशुकोहची सोबत कितपत केली हें जगजाहीर आहे. या जमातीचा (रजपुताचा) विश्वास कधींच धरतां येत नाहीं.

बादशहा सलामत, आपण योग्य तेंच बोललांत, वस्तुस्थिति अशी आहे कीं. दाराशुकोह हा रजपुत जमातीविषयीं द्वेष बाळगीत असे. त्याचीं फळें त्याला भोगावीं लागलीं. तो रजपुतांशीं प्रथमपासूनच गोडीनें वागता तर त्याच्या योजनांचें असें वाटोळें झालें नसतें. यापूर्वी होऊन गेलेले अकबर आणि इतर बादशहा यांनीं रजपुतांशीं अतिशय घनिष्ठ असे संबंध जोडले. रजपुतांच्या पाठिंब्यानें त्यांनीं

हिंदुस्थान आपल्या ताब्यांत आणिला. या रजपूत जमातींच्या बळावरच महाब्रतखान यानें जहांगीर बादशहाला आपल्या ताब्यांत घेतलें आणि कुटिल कारस्थानें करणाऱ्या लबाड लोकांना शिक्षा केली.

आपण दिल्लींत होता त्या वेळीं तेथें (दुर्गादास राठोड याच्या नेतृत्वाखालीं) रजपूत तीनशेंपेक्षां अधिक नव्हते. त्यांनीं त्या वेळीं जें अद्‌भुत शौर्य दाखविलें तें जगप्रसिद्ध आहे. यापूर्वीं असें शौर्य कुणी गाजविलेलें ऐकिवांत नाहीं.

शुजाशीं आपण युद्ध करीत होतां त्या वेळीं जसवंतसिंगानें आपल्याविरुद्ध जी अमर्याद वागणूक केली ती पाहतां त्याला क्षमा करणें शक्य नव्हतें. पण आपण जाणूनबुजून त्याच्या अपराधाकडे कानाडोळा केला. याच जसवंतसिंगाला आपण गोड बोलून दाराशुकोहच्या पक्षांतून फोडलें. आणि आपल्याला यश मिळालें. या रजपूत जमातीच्या इमानाची धन्य होय. आपल्या मालकाकरितां आपले प्राण अर्पण करण्यास रजपूत मागेंपुढें पाहात नाहींत. गेलीं तीस (येथें सी म्हणजे तीसच्या ऐवजीं से म्हणजे तीन पाहिजे) वर्षें रजपुतांनीं इतकें शौर्य गाजविलें आहे कीं बादशहा, त्याचे प्रतापी पुत्र, नामांकित वजीर आणि प्रतिष्ठित उमराव यांच्यानें रजपुतांचा मोड होऊं शकला नाहीं. यामुळें ते सगळे (बादशहा, शहाजादे इत्यादि) दिङ्मूढ झाले आहेत. मोहीम सुरू होऊन इतकीं वर्षें झालीं तरी अजून पहिलाच दिवस आहे असें म्हटलें पाहिजे.

आणि असें कां होऊं नये ? आपल्या कारकीर्दींत आपल्या वजिरांना कांहीं अधिकार नाहींत. आपल्या अमीरउमरावांवर आपला विश्वास नाहीं. आपले सैनिक दरिद्री बनले आहेत, कारकून बेकार झाले आहेत, आणि सावकारांच्यापाशीं भांडवल राहिलें नाहीं.

दक्षिण प्रांताची अशीच दुर्दशा झाली आहे. वास्तविक पाहतां हा विस्तीर्ण दक्षिण प्रदेश म्हणजे भूवरील स्वर्गच होय. आणि बुऱ्हाणपूर म्हणजे विश्वरूपी सुंदरीच्या गालावरील तीळ होय. पण तें शहर आज उध्वस्त होऊन गेलें आहे. औरंगाबाद शहर हें आपल्याच नांवानें वसविण्यांत आलें आहे. पण शत्रुसैन्याच्या आघातानें तें पाऱ्यासारखें अस्थिर झालें आहे.

हिंदु तर दुहेरी संकटांत सांपडले आहेत. शहरांतून त्यांच्यावर जिजियाचें ओझें आणि बाहेर शत्रूंचे हल्ले अशी त्यांची स्थिति आहे. प्रजेवर चोहींकडून अशा प्रकारचीं संकटें कोसळत असतां त्यांनीं काय म्हणून आपल्याला दुवा (!) देऊं नये आणि आपले गोडवे गाऊं नयेत ? प्रतिष्ठित आणि मातबर माणसें नाहींशीं झालीं आहेत. आपला राज्यकारभार हलकट आणि लबाड लोकांच्या हातीं आला आहे. विणकर, शिंपी, साबूविके अशा प्रकारचीं माणसें आतां राज्य चालवीत आहेत. या लोकांच्या अंगावर लबाडीची कफनी आणि हातांत विश्वासघाताची

स्मरणी हीं दिसून येतात. तोंडानें शुष्क वचनें आणि परंपरा यांची ते बडबड करीत असतात. आणि आपण त्यांना मोठेपणा देऊन, त्यांना ग्याब्रेल आणि इस्राफील सारखे चतुर समजून, त्या कारभाऱ्यांच्या पूर्ण आहारीं गेला आहांत. गहूं दाखवून जव विकणारी अशीं लबाड माणसें आपल्याला पर्वत म्हणजे गवत असें सांगून बनवितात.

(कविता) आलमगीर बादशहा गाजी याच्या राजवटींत साबूविके काजी आणि सदर बनले आहेत. विणकरी आणि पिंजारी हे आम्ही बादशहाच्या बैठकीला असतों, अशी बढाई मारीत आहेत. हलकट माणसांना विलक्षण अधिकार लाभले आहेत. आज विद्वान् प्रतिष्ठित माणसें त्यांच्या दाराशीं ताटकळत उभीं असलेलीं आढळून येत आहेत. विद्वान कल्पनाहि करूं शकत नाहींत इतकी प्रतिष्ठा मूर्खांना लाभली आहे. अशा भयंकर काळापासून परमेश्वर आम्हांला वांचवो. या काळांत गाढवाकडून अरबी घोड्यांची विटंबना होत आहे. अधिकारी निरर्थक आणि वायफळ बडबड करतात. न्याय तर फिनिक्स पक्ष्याप्रमाणें दृष्टीस पडेनासा झाला आहे. कारभारी आणि सरकारी नोकरवर्ग तर अधिकाराच्या जागांचा व्यापार करीत आहे. हुद्दे आणि जागा यांचा व्यापार होत आहे. न्यायानें आणि निष्ठेनें वागण्या-ऐवजीं हे अधिकारी लोकांचा छळ करीत आहेत. राज्याचे मीठ खाणारेच मिठाचीं भांडीं फोडूं लागले आहेत. कृतघ्नपणें वागूं लागले आहेत. हें राज्य मोडकळीस येण्याचे दिवस जवळ आले असें वाटूं लागलें आहे.

ही परिस्थिति माझ्या पाहण्यांत आली. आपल्या स्वभावांत बदल घडून येईल अशीं चिन्हें दिसेनात. शेवटीं आपल्या कुळाच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीनें मीं असें ठरविलें कीं जुलमी आणि गर्विष्ठ लोकांचा या राज्यांतून कांटा काढावा, विद्वान् आणि शहाणीं अशीं माणसें यांना पुढें आणावें, या राज्यांतील जुलूम जबरदस्ती मुळापासून नाहींशी करावी म्हणजे प्रजा आरामांत राहील आणि माणसें निश्चिंत मनांनीं आपल्या उद्योगधंद्यांत मग्न राहतील. असें केल्यानें आपला सुलौकिक आणि सुकीर्ति हीं जगांत टिकून राहातील. हें काम आपण माझ्यावर सोंपवून स्वतः मक्केच्या यात्रेला निघून जावें म्हणजे लोक आपल्याबद्दल धन्योद्‌गार काढतील. असें जर आपण केलेंत तर किती बरें चांगलें होईल.

आपण आपलें आतापर्यंतचें आयुष्य राज्यकारभारांत आणि इतर ऐहिक गोष्टी करण्यांत घालविलें आहे. हें जग म्हणजे एक स्वप्न आहे. याचा काय भरवसा धरावा. आतां आपण पारलौकिक गोष्टींचा विचार करावा. परलोकांत श्रेय कसें मिळवितां येईल याची आपण काळजी करण्याची वेळ आली आहे.

आपण मला भेटीसाठीं बोलाविलें आहे. पण मी वयानें लहान आहे. शंके-कुशंकेनें मी व्याकुळ झालों आहे. आपणच मोजकीं माणसें बरोबर घेऊन एखाद्या

ठरलेल्या ठिकाणीं आलांत तर मी आपल्या भेटीस येईन आणि आपल्या आज्ञेचें निःशंकपणें पालन करीन. अधिक काय लिहावें ?"

वरील तिन्ही पत्रांचा सर जदुनाथ सरकार यांनीं इंग्रजींत अनुवाद केला असून तो त्यांच्या 'स्टडीज इन औरंगजेब्स रेन' या ग्रंथांत प्रसिद्ध झाला. त्यांच्या समोर खतूते शिवाजी या हस्तलिखिताची कलकत्ता प्रत पण असावी. कारण त्यांच्या अनुवादांत थोडा अधिक मजकूर आला आहे. माझ्यासमोर असलेल्या एशियाटिक सोसायटी लंडन येथील प्रतींत तो मजकूर नसल्यामुळें मीं त्याचा अनुवाद केला नाहीं.

औरंगजेबाचा मुलगा अकबर यानें इ. स. १६८० मध्यें आपल्या बापाविरुद्ध बंड केलें. पण त्यांत त्याला अपयश आल्यामुळें तो इ. १६८१ च्या जून महिन्यांत संभाजीराजांकडे आला. अकबर हा महाराष्ट्रांत इ. स. १६८७ च्या सुरवातीपर्यंत होता. इ. स. १६८७ च्या फेब्रुवारी महिन्यांत तो राजापूर येथें जहाजांत बसून इराणांत निघून गेला. या काळांतील त्याचा, संभाजी आणि कविकलश यांच्याशीं झालेला कांहीं पत्रव्यवहार पुढें दिला आहे.

अकबरचें संभाजीराजांना पत्र (११ मे १६८१)

सर्व वैभवशाली राजांमध्यें श्रेष्ठ, एकनिष्ठ, आमच्या अमर्याद कृपेचा विषय असलेले संभाजी यांनीं स्वतःला आमच्या कृपेचे उमेदवार जाणून समजावें कीं, आपल्या राज्यकारभाराच्या सुरवातीपासूनच आलमगिराचा हा उद्देश होता कीं हिंदवासियांची (अहले हिंद) सरसकट आणि पूर्ण दुर्दशा करावी. त्याचा हा उद्देश जसवंतसिंगाच्या मृत्यूनंतर चांगलाच उघडकीस आला. त्याची राण्यावरील (उदेपूर्च्या) मोहीम याच उद्देशासाठीं होती.

सर्व मानवांना परमेश्वरानें निर्माण केलें आहे. तो सर्वांचा रक्षणकर्ता आहे. आम्ही जर बादशहा आहोंत तर, हिंदुस्थानांतील या जमीनदारांच्या (रजपूत राजे) नाशासाठीं प्रयत्न करणें हें केव्हांहि योग्य होणार नाहीं. या (रजपुतांच्या) बाबतींत आलमगीरची वागणूक अमर्याद झाली. माझी खात्री झाली कीं या लोकांचा (रजपुतांचा) नाश झाला तर हिंदुस्थान कांहीं आमच्या घराण्याच्या हातांत राहणार नाहीं. आपल्या या वारसाचा विचार मीं केला. रजपूत हे जुन्या काळापासून दौलतीचे हितचिंतक आहेत. त्यांच्यावर मला दया आली. राणा राजसिंह आणि दुर्गादास राठोड यांनींहि विनंती केली. या सर्व गोष्टीवरून मीं ठरविलें कीं आपण स्वार होऊन अजमीरवर चालून जावें आणि बादशहाबरोबर युद्ध करावें. परमेश्वराची काय मर्जी आहे तें दिसून येईल.

याच सुमारास राण्याचा (उदेपूरच्या) मृत्यु झाला. यामुळें कांहीं दिवसांसाठीं हें काम लांबणीवर पडलें. एक महिन्यानंतर राणा जयसिंग

(राजसिंगाचा मुलगा) यानें आपल्या बापानें केलेलीच विनंती मला केली. पादशहाकुलीखान हा त्याचें राज्य उध्वस्त करण्यासाठीं झिलवाऱ्याकडे गेला होता. त्याच्या द्वारें जयसिंहानें मला विनंती केली ती अशी, हिंदुस्थानची अब्रू आणि प्रतिष्ठा टिकून राहावी अशी तुमची इच्छा असेल तर आम्ही सर्वजण तुम्हांला येऊन मिळण्यास तयार आहों.

या दोन मोठ्या जमातींच्या (शिसोदिया व राठोड) विनंतीवरून मी आपला वारसा (राज्य) हस्तगत करण्याच्या उद्योगाला लागलों. मी आलमगिराच्या तळापासून एक कोसावर पोहोंचलों. त्या वेळीं रात्रीचे तीन तास सरले होते. दुसऱ्या दिवशीं युद्ध करावें असें ठरलें. इतक्यांत मृत्यूनें जणू आपले पाश टाकून त्या नामर्द पादशहाकुलीखानास नेलें. पादशहाकुलीखान आलमगिरापाशीं पोहोंचला. त्याच क्षणीं आलमगीरनें त्याला ठार करविलें. या एका गोष्टीमुळें माझा उद्देश निष्फळ होणार होता असें नाहीं. पण शिसोदिया आणि राठोड यांना माझ्याकडे घेऊन येण्यांत पादशहाकुलीखानानें काम केलें होतें. त्या दोन्ही जमातींना शंका आली कीं, या प्रकरणांत कांहीं तरी धोका असावा. या विचारानें त्या जमाती आपापल्या मुलुखाकडे निघून गेल्या. यामुळें माझ्या लष्करांत बेदिली होऊन आमचे सैनिक टिकून राहण्याच्या ऐवजीं पळून गेले; आणि युद्धाचा प्रसंगच उद्भवला नाहीं. त्यामुळें माझ्या कुटुंबियांतील थोडीं माणसें घेऊन मी मारवाडांत गेलों. दुसऱ्या दिवशीं रात्री दुर्गादास राठोड हा आपल्या सैन्यानिशीं मला येऊन भेटला. तो माझ्याबरोबर राहिला. मारवाडांत मला दोन तीन वेळां भटकण्याचा प्रसंग आला. माझा पाठलाग करण्याच्या कामावर शहाजादा मुअज्जम याची नेमणूक झाली होती. त्याच्यानें माझा पाठलाग करणें होईना. त्यानें आपलें सैन्य पसरविलें आणि मारवाडांत ठिकठिकाणीं ठाणीं कायम केलीं. यामुळें मी राणा जयसिंग याच्या मुलुखांत गेलों. राण्यानें मला घोडे आणि इतर जिनसा दिल्या आणि माझ्या राज्यांत तुम्ही रहा अशी त्यानें मला विनंती केली. पण त्याचा मुलूख हा राजधानीला (मोगल) जवळ आहे. यामुळें तेथें राहणें मला इष्ट वाटलें नाहीं. तुमचें शौर्य आणि मर्दुमकी ही लक्षांत घेऊन इकडे निघून येण्याचें मीं ठरविलें. परमेश्वरकृपेनें जमादिलावल महिन्याच्या पहिल्या तारखेस (९ मे १६८१) मी महेश्वर येथें नर्मदा नदी सुखरूपपणें ओलांडली. दुर्गादास राठोड हा माझ्याबरोबर आहे. माझ्याबद्दल तुम्ही निशंक रहा. परमेश्वरकृपेनें मला राज्य प्राप्त झालें तर नांव माझें आणि राज्य तुमचें असें राहील. आलमगीर हा तुमचा आणि माझा शत्रु आहे हें लक्षांत घ्या. त्यामुळें आपण दोघांनीं मिळून आपलें उद्दिष्ट साध्य होईल असें करण्याचा निश्चय करा.

कविता; हें जग चंचल आणि अस्थिर आहे. फक्त चांगलें काम केल्याची कीर्ति तेवढी टिकून राहते. हीच मर्दाची व मर्दुमकीची कसोटी होय. जास्त काय लिहूं ?

शहाण्या माणसांना विशेष सांगण्याची आवश्यकता नाहीं. साधा इषारा पुरे. तारीख जमादिलावल महिन्याची तिसरी तारीख हिज्री १०९२ (११ मे १६८१).

२

अकबरचें संभाजीला पत्र (२० मे १६८१)

हिंदुस्थानांतील त्या राजश्रेष्ठानें (संभाजीनें) या माझ्या पत्रांत लिहिल्या-प्रमाणें वागावें म्हणजे जगांत (आणि धार्मिक दृष्टीनें) त्याचा सुलौकिक होईल. यापूर्वी मी तुम्हांला एक पत्र पाठविलें होतें. तें बहुतेक मिळालें नसावें. नाहींतर तुम्हीं त्याचें उत्तर पाठविलें असतें. आतां मी येऊन पोहोंचेपर्यंत तुम्ही पत्रें पाठ-विण्यांत कसूर करूं नये. त्या एकनिष्ठ राजाची (संभाजी) वार्ता ऐकण्यासाठीं मला दीर्घ काळापासून उत्कंठा लागली आहे. अधिक काय लिहिणें ? तुम्हांला भेटण्याची आतुरता आहे. (२० मे १६८१)

३

अकबराचा दिवाण याचें संभाजीराजांना पत्र (२७ डिसेंबर १६८१)

तळ कोकणांतील बातम्यावरून मुर्शदजाद्यांना (अकबर) कळलें कीं, तुमचा नोकर नारो कोन्हेर हा चौल परगण्याच्या आपटे या गांवाहून निघून दापोली या गांवीं येऊन राहिला आहे. दंडराजपुरीची प्रजा तेथून (दंडराजपुरी) पळून चौलच्या आश्रयाला येत आहे. नारो कोन्हेर हा या प्रजेला लुटतो. लोकांची माल-मत्ता घेऊन त्यांना (लोकांना) तो तुमच्याकडे पाठवितो. चौलचा रहिवासी विठोजी याच्या नावा, तांदूळ आणि गुरेंढोरें तुमच्या माणसांनीं धरलीं आहेत. अशा गोष्टीमुळें प्रजा हैराण होते. या पत्राबरोबर हरकाऱ्याकडून आलेले हें बातमी-पत्रहि पाठवीत आहें. त्यावरून सर्व हकीकत कळून येईल. आज्ञा (अकबराची) झाली आहे कीं, तुम्ही दापोलीहून आपलीं मांणसें काढून घ्यावींत, आणि लोकांची मालमत्ता घेण्यांत आली आहे ती कोंकणचा दिवाण करीमबेग याच्या द्वारें त्या लोकांना परत करण्यांत यावी. प्रजेपैकीं कुणालाहि पीडा देण्यांत येऊं नये अशी ताकीद तुम्ही यापुढें द्यावी. याप्रमाणें अंमल केल्याची हकीकत आपण कळवावी, म्हणजे बांदशहा (अकबर) समोर मांडण्यांत येईल. राज्यारोहण शक (जुलूसे वाला म्हणजे अकबराच्या राज्यारोहणाचा शक) बारा, जिल्हज महिन्याची सव्वीस तारीख).

वरील पत्रांतील जुलूम शक बारा हा आंकडा चुकीचा असून बाराऐवजीं दोन हा आंकडा वाचावा असें जदुनाथांनीं सुचविलें आहे. जदुनाथांचें म्हणणें बरोबर दिसतें. अकबर यानें आपल्याला बादशहा म्हणून जाहीर केल्यावर आपला

जुलूस शक सुरू केला. त्याची दुसऱ्या वर्षाची जिल्हज महिन्यांची वरील तारीख म्हणजे सत्तावीस डिसेंबर १६८१ ही होय.

श्री. वेंद्रे आपल्या संभाजी चरित्रांत (पान २०५ तळटीप) म्हणतात-- " एका पत्रावर १२ बारा राजशक आहे....जुलूस ऐवजी राजशक म्हटलें असल्यानें तो प्रचलित शिवाजीचा राजशक घेणें प्राप्त आहे " पण मूळ फारसी पत्रांत राजशक हा शब्द वापरला नाहीं. जुलूसेवाला म्हणजे अकबराचा जुलूस हेच शब्द आहेत. त्यामुळें वेंद्रयांचें म्हणणें बरोबर दिसत नाहीं.

४

अकबरचें कविकलश यास पत्र (२७ जुलै १६८४)

तुम्ही पाठविलेलें पत्र मिळालें. त्यांत संभाजीराजे पाचवड (पाचाड) मुक्कामीं पोहोंचले आणि त्यांची आणि तुमची भेट झाली असा मजकूर आहे. महमद आज्जम (शहाजादा) याचा वकील तेथें आला असें समजलें. तो कशा-करितां तेथें आला आणि त्याच्या बरोबर काय बोलणीं झालीं आहेत हें कळलें नाहीं. तुम्हांला तह करणें योग्य वाटत असेल तर तह करा. पण माझ्याबद्दल म्हणावयाचें तर मी कांहीं तहाला अनुकूल नाहीं. पण तुम्ही पत्रव्यवहार करण्यास हरकत नाहीं. तुम्ही इकडे येणें आवश्यक आहे. तें सोयीचें होईल. अनेक राजकारणें तडीस जातील. तुम्ही जाणावें कीं, राजकारणाच्या मसलतीसाठीं पाव-साळयाचा मोसम अनुकूल असतो. तहाच्या गोष्टीवर अवलंबून बेखबर (गाफील) राहूं नका. कारण उभय पक्षांत खरा तह असा नाहीं. पावसाळयानंतर भीमगडचें प्रकरण समोर येईलच. आपलें पुढील हित कशांत आहे हें तुमचें तुम्हांलाच चांगलें समजेल. शाबान महिन्याची चोवीस तारीख, हिज्री १०९२.

हिज्री वर्ष हस्तलिखितांत, १०९० असें होतें. त्याचे कोणी १०९२ केलें आहे. पण त्याचें इंग्रजी सन १६८१ किंवा १६८२ ची सुरुवात, असें येत असल्यामुळें जदुनाथांनीं हिज्री वर्ष १०९५ असावें असें गृहीत धरून या पत्राची तारीख सत्तावीस जुलै १६८४ असें ठरविलें आहे. या पत्राचें दुसरें वैशिष्ट्य असें कीं, फारसी पत्रांतूनहि राजकारण हा शब्द वापरण्यांत आला आहे.

५

अकबरचें कविकलश यास पत्र

मी रबिलावल महिन्याच्या चौदा तारखेस (वीस फेब्रुवारी १६८४) सुरक्षितपणें जैतापुरास पोहोंचलों. हें पत्र पोहोंचतांच तुम्ही ताबडतोब माझ्या भेटीस निघावें म्हणजे आपली लवकर गांठ पडेल. यांत विलंब होऊन कामाला

विपरीत वळण लागेल असें न होवो. कीरतसिंगाला (संभाजीराजांनीं गोव्याला पाठविलेला वकील) आतांपर्यंत निरोप देण्यांत आला असेलच. हें काम निकडीचें आहे. या पत्राला मी दिलेली तोंडी आज्ञाच असें समजा.

६

अकबरचें कविकलश यांस पत्र (२० ऑगस्ट १६८४)

तुम्ही आजारी होता असें कळलें होतें. आतां तुमची प्रकृति सुधारली असेल. तहाचें ठरविणें हें तुमच्या आणि राजांच्या (संभाजी) हातीं आहे. तहाच्या वाटाघाटीवर (नुसते शब्द आणि ध्वनीच ना) विसंबून गाफील राहणें हें शहाणपणाचें नाहीं. आतां पावसाळा संपला आहे. भीमगडचें प्रकरण तुम्ही विसरलांत कीं काय ? फिरंग्यांशीं (पोर्तुगीज) तहाच्या वाटाघाटी झाल्या. त्यांत तुम्ही मला मधें घातलें होतें. त्याचें पुढें काय झालें तें कळलें नाहीं. महमद आज्जम (शहाजादा) यांच्या वकिलानें काय सांगितलें ? त्याच्याशीं काय ठरलें ? विजापूरची परिस्थिति काय आहे ? रमजान महिन्याची एकोणीस तारीख हिज्री १०९०

जदुनाथांनीं १०९० ऐवजीं हिज्री वर्ष १०९५ धरलें आहे. कारण पत्रांतील मजकुराशीं तें वर्ष जुळतें. त्याची इसवी तारीख वीस ऑगस्ट १६८४ ही येते.

७

अकबरचें कविकलश यास पत्र

तुमचीं दोन पत्रें मिळालीं. मजकूर समजला. आम्ही राजवाडी (विचोली)-हून निघालों. हेतु हा कीं, तुम्ही आम्हांला या ठिकाणीं येऊन भेटावें. पण तें कांहीं जमलें नाहीं. आतां भेटीसाठीं म्हणून तुम्ही मुहरम महिन्याची तीन तारीख (तीस नोव्हेंबर १६८४) ठरविली आहे. मुहरम महिन्याच्या एक तारखेपासून दहा तारखेपर्यंत हे दिवस आम्ही आमच्या धर्माप्रमाणें सुतकाप्रमाणें पाळतों या दिवसांत कोणतेंहि चांगलें काम हातीं घेणें आम्ही इष्ट समजत नाहीं. तुम्ही मुहरम महिन्याची अकरा किंवा बारा ही तारीख मुक्रर करून तसें आम्हांला कळवावें, म्हणजे त्याच दिवशीं आम्ही साखरपें येथून निघून मलकापुरास येऊं. लवकर उत्तर यावें. हें काम निकडीचें आहे हें जाणावें.

८

अकबरचें कविकलश यास पत्र

तुमचें पत्र मिळालें. मुहरम महिन्याच्या तेरा तारखेस (दहा डिसेंबर १६८४) ग्रहणानिमित्त आपल्याला स्नानासाठीं म्हणून कोल्हापुरास जाणें

आवश्यक आहे असें तुम्हीं लिहिलें आहे. आपण या महिन्याच्या सोळा तारखेस मलकापुरास येऊन सतरा तारखेस भेटूं असेंहि तुम्ही लिहिलें आहे. आम्ही मुहरमचे दहा दिवस थांबलों ते केवळ सुतकाचे दिवस म्हणून. हे दहा दिवस संपले कीं, मुहरमच्या अकरा तारखेस आम्ही साखरप्याहून निघून मलकापुरास येऊं. तुम्हीं पण त्या दिवशीं मलकापुरास येऊन मला भेटावें. भेट झाल्यानंतर तुम्ही कोल्हापुरास जावें. विलंब लावूं नये. याउपर तुमची मर्जी.

९

अकबरचें संभाजीराजांस पत्र (डिसेंबर १६८४)

आमच्या बंधूंना (संभाजी) विदित व्हावें कीं, तुमचें येणें म्हणजे एक अत्युत्तम गोष्ट होय. मी पण मलकापुरास येत आहे. आपली गांठ पडावी आणि आपलें उद्दिष्ट साध्य व्हावें हीच इच्छा. अधिक काय लिहावें ? भेटीची इच्छा आहे.

१०

अकबर याचें संभाजीराजांस पत्र (१८ जानेवारी १६८५)

छत्रपति संभाजीराजे यांस विदित व्हावें. मोगल (घाटाखालीं) उतरून आले. या वेळीं कविकलश यांनीं ठाण मांडून झुंज दिली हें महमूदखान व खिदमत परस्तखान यांच्या लिहिण्यावरून कळलें. कविकलश हा आपला उत्कृष्ट एकनिष्ठ सेवक आहे. कुणाच्या मत्सरानें त्याचा नाश होईल असें परमेश्वर न करो. कविकलशावर आपली कृपा राहावी आणि आपण त्याचें कल्याण करावें हें योग्य होय. आतांपर्यंत मोगल माघारे परतले असतीलच. तुमच्या लिहिण्याप्रमाणें तुम्ही खेळण्याकडे रवाना झाला असाल. तसें असल्यास कळवावें म्हणजे मी पण येऊन या मोहिमेंत तुमच्या बरोबर राहीन. सफर महिन्याची बावीस तारीख हिज्री १०९२.

हिज्री १०९२ हें वर्ष बरोबर नसून तें १०९६ पाहिजे असें जदुनाथांनीं ठरविलें आहे. म्हणजे इसवी तारीख अठरा जानेवारी १६८५ ही येते. पत्रांतील मजकुरांशी ही तारीख जुळते. जेधे शकावलीप्रमाणें " शहादीखान पुण्याहून दौड करून बोरघाटे उतरोन गागोलीस आला. कविकलशे जाऊन भांडण दिले. फिरोन घाटावरी घातला. " या घटनेची तारीख शकावलीप्रमाणें चौदा जानेवारी १६८५ ही येते. या घटनेचा उल्लेख वरील पत्रांत असल्यामुळें जदुनाथांनीं पत्राचें १०९६ हिज्री हें वर्ष धरलें आहे तें बरोबर आहे.

वरील दहा पत्रांपैकीं सात पत्रें इ. स. १६८४ आणि १६८५ चीं आहेत. पहिलीं तीन पत्रें इ. स. १६८१ चीं आहेत. या पत्रांसंबंधीं श्री. बेंद्रे आपल्या संभाजी चरित्रांत (पान २०४ व २०५) यावर म्हणतात—" यानंतरची (म्हणजे जानेवारी १६८४ नंतरची)' अकबराचीं आठ पत्रें उपलब्ध आहेत."

त्यासंबंधीं तळटीपेंत ते म्हणतात—"या पत्रांवर १०९० हिज्री मुळांत (नकल) आहे व एका पत्रांवर १२ राजशक आहे." शेवटचीं सात पत्रें पाहिलीं तर श्री. बेंद्रे म्हणतात तसें सर्व पत्रांवर १०९० हिज्री हें साल नाहीं. पत्रक्रमांक पांच, सात, आठ आणि नऊवर साल दिलेलेंच नाहीं. पत्र क्रमांक चारवर हिज्री १०९२ (१०९० चें कोणीतरी १०९२ केलेलें), सहावर १०९० आणि नऊवर १०९२ असे हिज्री साल नमूद आहे. जुलूसशक बारा नमूद आहे तो पत्र क्रमांक तीन-वरच होय. जुलूस म्हणजे अकबराचें राज्यारोहण होय. जुलूसवाला या शब्दामागें बारा हा आंकडा दिला आहे. तो दोन पाहिजे हें जदुनाथांचें मत बरोबर आहे. यांच पत्राची हजरी तारीख १०९३ धरण्यांत आली आहे, तें पत्रांतील मजकुरा-वरून पाहतां बरोबर आहे. श्री. बेंद्रे समजतात तसें सर्व पत्रें १०९३ चीं म्हणजे इ. स. १६८२ चीं असें जदुनाथ समजत नाहींत. ते इतर पत्रांना इ. स. १६८४ व १६८५ याच तारखा देतात.

शहाजादा अकबर याच्या महाराष्ट्रांतील हालचालीवर वरील पत्रांनीं प्रकाश पडतो. कबजीबद्दल त्याला आस्था वाटत होती हेंहि एका पत्रावरून स्पष्ट होतें. अकबराच्या हालचाली थोडक्यांत खालीलप्रमाणें होत्या.

शहाजादा अकबर हा कोंकणांत पाली येथें एक जून १६८१ रोजीं आला. तेरा नोव्हेंबर रोजीं संभाजीराजांनीं त्याची गांठ घेतली. जंजिऱ्याच्या मोहिमेंत अकबर हा संभाजी बरोबर होता (इ.स. १६८१) अखेर इ. स. १६८२ च्या डिसेंबर महिन्यांत पालीहून निघून तो बांदा या गांवी (गोव्याच्या उत्तरेस पंचवीस मैल आणि वेंगुर्ल्याहून पंधरा मैल पूर्वेस) येऊन राहिला. इ. स. १६८३ त तो जहाज-मार्गें हिंदुस्थान सोडून जाण्याच्या खटपटींत होता. संभाजीराजे आणि पोर्तुगीज यांच्या युद्धानंतर तहाच्या वाटाघाटींत अकबर आणि कविकलश यांनीं पुढाकार घेतला (२० जानेवारी १६८४). या नंतरचें वर्ष त्यानें साखरपें आणि मलकापूर या ठिकाणीं काढलें. इ. स. १६८६ च्या जून महिन्यांत त्यानें सैन्यासहित मोगल हद्दींत (नगर जिल्ह्यांत) घुसण्याचा प्रयत्न केला. पण चाकणजवळ मोगलांनीं त्याचा पराभव करून त्याला परतविलें. आपला उद्देश सफल होत नाहीं हें पाहून शहाजादा अकबर हा फेब्रुवारी १६८७ मधें राजापूर बंदरांतून समुद्रमार्गें इराण-कडे निघून गेला.

शहाजादा अकबर याचें बंड मोडण्यासाठीं म्हणून औरंगजेब हा आपल्या प्रचंड सैन्यासहित दक्षिणेंत उतरला. मराठ्यांनीं अकबराला आश्रय दिला. यांतूनच मराठे आणि मोगल यांची प्रचंड झुंज सुरू झाली. त्या कालखंडावर थोडाबहुत प्रकाश वरील पत्रांनीं पडतो म्हणून तीं महत्त्वाचीं ठरतात.

मोगल सेनापति जुल्फिकारखान यानें रायगडच्या वेढ्याच्या सुमारास (१६८९) लिहिलेली दोन, आणि इ. स. १६९९ आणि १७०२ मध्यें

औरंगजेबानें परशुरामपंत आणि रामचंद्रपंत यांना लिहिलेली तीन अशा पांच पत्रांचा मूळ फारसीवरून अनुवाद देण्यांत आला आहे. विशाळगडाहून परततांना औरंगजेबाला कोणत्या अटी पत्कराव्या लागल्या तो मजकूर शेवटच्या पत्रांत असून उद्बोधक वाटेल.

मोगल सेनापति जुल्फिकारखान याचें शहाजादा अज्जम यास पत्र–
(१६८९)

या पत्राचा काळ मार्च १६८९ हा असावा. औरंगजेबानें, संभाजीवर चालून जाण्यासाठीं म्हणून शहाजादा अज्जम यास डिसेंबर १६८८ मध्यें रवाना केलें. शहाजादा अज्जम यानें चाकण येथें आपली छावणी केली. त्याचा सेनापति जुल्फिकारखान हा रायगडाला वेढा घालावयाच्या इराद्यानें घाटाखालीं उतरुन महाडपर्यंत पोहोंचला. तेथून त्यानें शहाजाद्याला पुढें दिलेलें पत्र लिहिलें :

पत्र

विनंती कीं आज रायरी (रायगड) पासून सहा कोसांवर असलेल्या महाड येथें मी पोहोंचलों. आज गुरुवार असून या महिन्याची आठ तारीख आहे. प्रथम आमच्या लष्करानें येथील गांवें आणि ठाणीं लुटलीं. शत्रू किल्ल्याच्या पायथ्याशीं होते. त्यांच्यावरहि आम्हीं हल्ले केले. किल्ल्याच्या पायथ्याशीं असलेलीं ठाणींहि आम्हीं सोडलीं नाहीं. येथें रतनगडचा किल्ला आहे. या किल्ल्याच्या पायथ्याशीं असलेलीं ठाणीं पण उध्वस्त केलीं. येथील शेतें आणि फळबागाहि आम्हीं नष्ट केल्या. मला आढळून आलें आहे कीं राजाराम हा नाममात्र आहे. त्याचे सरदार हंबीरराव, निळो आणि दोघे खंडूजी हे सैन्याची जमवाजमव करीत आहेत. तेच राजारामाच्या नाशाला कारणीभूत होतील. त्यांनीं रूपाजी भोसले यालाहि बोलावून घेतलें आहे. परमेश्वराच्या आणि बादशहाच्या कृपेनें शत्रूंची हानि होऊन त्यांना शिक्षा मिळेल अशी मला आशा आहे. गांगोलीच्या मुक्कामीं शत्रूनें आमच्यावर रात्रीं हल्ला केला. त्यांनीं आमच्यावर बाण फेकले आणि गोळ्यांचा वर्षाव केला. पण आमचे शूर सैनिक सावध होते. त्यांनीं शत्रूंचा प्रतिकार करून त्यांना परतवून लाविलें. आजहि महाडच्या वाटेवर असलेल्या सोनगडाच्या डोंगरावर शत्रु जमले आणि त्यांनीं आमच्यावर तोफांचा आणि बंदुकींचा मारा केला. आमचें सैन्य डोंगरावर चढलें. आमच्या सैनिकांनीं शत्रूंना मार देत किल्ल्याच्या दरवाजापर्यंत रेटलें.

तोंपर्यंत समुद्राच्या खाडीला भरती आली. किल्ल्याच्या पायथ्याशीं जाण्यायेण्याची वाट होती ती फक्त तीनचार हातच रुंद होती. त्यांतच दिवस मावळून रात्र झाली. या चकमकींत खैर अंदेशखान आणि त्याचे मोगल यांनीं चांगलीच कामगिरी बजाविली.

मला बंदुकची, बेलदार, सुतार, जंगलें तोडणारे, जमिनी खणणारे, मशालजी इत्यादि लागतील. याबद्दल मीं यापूर्वी आपणास विनंती केली होती. येथें जास्त काम पायदळ शिपायांचेंच आहे. ते आमच्यापाशीं विशेष नाहींत. कर्नाटकी, बेलदार आणि इतर युद्ध साधनें यांची आवश्यकता आहे. चार पांच हजार माणसें लवकर पाठवावींत. त्यांपैकीं एक हजार तरी बहेलिये (पायदळ बंदुकची) हवेत. दारू आणि लहान आणि मोठे गोळे लवकर पाठवावे. जंगलें तोडणारेहि लवकर पाठवावेत. आतांपर्यंत कोंकणांत (घाटाखालीं) ठाणीं कायम झालीं आहेत. आतां रायरी (रायगड) च्या जवळ ठाणीं कायम करावयाचीं आहेत. माझ्यापाशीं किती (थोडें) सैन्य आहे हें आपल्याला माहीतच आहे. म्हणून अधिक सैन्य पाठवावें.

(२)

जुल्फिकारखान याचें आपल्या बापाला, वजीर असदखान याला लिहिलेलें पत्र

औरंगजेबाचा मुख्य वजीर असदखान याचाच मुलगा जुल्फिकारखान हा होय. यानेंच रायगड, जिंजी इत्यादि किल्ले मराठ्यांच्याकडून जिंकून घेतले. इ. स. १६८९ मध्यें जुल्फिकारखानानें रायगडला वेढा घातला. हें पाहून राजाराम हा पांच एप्रिल रोजीं रायगडावरून निघून प्रथम प्रतापगडाकडे गेला. जुल्फिकारखानानें स्वतः राजारामाचा पाठलाग न करतां आपला एक सरदार प्रतापगडाकडे पाठविला याबद्दल औरंगजेबानें त्याच्यावर ठपका ठेविला असें दिसतें. त्याबद्दल जुल्फिकारखानानें आपला बाप, मुख्य वजीर असदखान यांस पत्र लिहिलें तें पुढें दिलें आहे.

पत्र

विनंती. बादशहांच्या आज्ञेनें आपण लिहिलेलीं दोन पत्रें मिळालीं. त्याप्रमाणें अंमलबजावणी करण्यांत येत आहे. पत्रांत बादशहानें कांहीं ताकिदी दिल्या आहेत. मी सर्व प्रकारें अपराधी आहे. केवळ स्वामिनिष्ठेच्या भावनेनें, मी क्षणाचीहि विश्रांति न घेतां रात्रंदिवस काम करीत आहे. बादशहांनीं मला दोष दिला आहे हें माझें दुर्दैव होय. मी जावळीला गेलों नाहीं. मी प्रतापगडाला वेढा घातला नाहीं. मी या कामासाठीं फक्त फत्तेहजंगखानाला पाठविलें म्हणून हा ठपका आहे. मीं असें कां केलें याचीं कारणें सांगतों. तो लबाड शत्रु (राजाराम) हा रायरी (रायगड) हून निघाला. तो एका ठिकाणीं असा टिकून राहीना. तो डोंगराळ भागांतून आणि रानावनांतून भटकत निघून गेला. तो पुन्हां इकडे परत येईल अशी बातमी आली होती. न जाणो तो पुन्हां रायरीकडे आणि आम्ही जिंकून घेतलेल्या मुलखाकडे यावयाचा. जाणकारांनीं सल्ला दिला कीं राजारामाच्या पाठलागावर निघण्याच्या ऐवजीं आपण या ठिकाणींच तळ देऊन राहावें हें बरें. आतां त्याचा पाठलाग

होतो आहे. मी स्वतः त्याच्या मागें जाण्याचा प्रयत्न करीन. पण जावळीचा भाग किती डोंगराळ आहे आणि वाट किती अवघड आहे हें स्पष्टच आहे. खरें पाहिलें तर निहारखान हा तेथून जवळच आहे. पार घाटावरून कोंकणांत उतरण्याची त्यानें तयारी केली. पण अद्यापपर्यंत त्याला तसें करणें जमलें नाहीं. शत्रु (राजाराम) हा घाबरलेला आहे. तो एका ठिकाणीं स्वतःला कोंडून घेत नाहीं. तो या किल्ल्यां-तून त्या किल्ल्यांत आणि या प्रदेशांतून त्या प्रदेशांत असा भटकत असतो. तो प्रतापगडांतहि टिकून राहिला नाहीं. तेथून तो वरघाटावरील वासोटा या किल्ल्या-कडे निघून गेला. मी ज्या सरदाराला नेमलें होतें तो बख्शी बहरामंदखानाच्या सहकार्यानें शत्रूच्या पाठलागासाठीं आणि त्याच्या ठाण्याला वेढा घालण्यासाठीं झटत होता.

बख्शी बहरामंदखान हा दोन दिवस येथें होता. त्यानें सगळी व्यवस्था केली. या (पाठलाग) संबंधीची सर्व माहिती मिळविली. नंतर तो एक दिवस आधीं बादशहाकडे रवाना झाला. इतक्यांत बादशहाचीं पत्रें आलीं. बख्शी बहरा-मंदखान हा फार लांब गेला नव्हता. म्हणून बादशहांच्या पत्रांतील मजकूर मी त्याला कळविला. त्यानें उत्तरादाखल मला लिहिलें कीं तुम्ही या कामावर (राजा-रामाचा पाठलाग) ज्यांची नेमणूक केली आहे, तो त्या नेमणुकीस पात्र आहे. प्रतापगडाच्या वेढ्याच्या वेळीं मी त्याला पाहिला आहे. आतां (राजारामाच्या पाठलागाची) व्यवस्था झाली आहे. मी आतां बादशहाकडे जात आहे.

पावसाळ्यामुळें कामांत विलंब लागत आहे. त्याला (राजारामाला) आम्ही रायरीच्या (रायगडाच्या) किल्ल्यांतून बाहेर काढला आहे. त्याचे सरदार आणि त्याची प्रजा यांना आम्हीं त्याच्यापासून वेगळें केलें आहे. आम्ही त्याच्या सैन्यांत फूट पाडली आहे. तो (राजाराम) आतां वांचूं शकेल असें वाटत नाहीं. अधिक काय लिहावें ?

(३)

औरंगजेबाचे रामचंद्रपंत अमात्य यांस पत्र—औरंगजेबानें साताऱ्याला वेढा दिला (डिसेंबर १६९९ ते एप्रिल १७००), त्याच्या आधीं लिहिलेलें हें पत्र आहे. परशुराम त्र्यंबकच्या हातीं बादशहाचें जें पत्र पडलें तें हेंच असावें असें जदुनाथांनीं सुचविलें आहे. मराठे सरदारांत फूट पडावी हा या पत्रामागील हेतु स्पष्ट आहे.

पत्र

रामचंद्र (रामचंद्रपंत अमात्य) यांनीं जाणावें कीं दैव अनुकूल झाल्या-मुळें तुम्हांला दूरदृष्टि आली आणि तुम्ही तरब्रियतखानाला (मोगल तोफखान्या-वरील अधिकारी) पत्र लिहिलें तें आमच्या वाचण्यांत आलें. पत्रांत तुम्ही मांडलेल्या

बहुतेक मागण्या मान्य करण्यांत आल्या आहेत. तुम्ही आतां एकनिष्ठेनें सेवा करावी. तुम्हीं लिहिलें आहे त्याप्रमाणें तुम्ही त्वरित अंमलबजावणी करावी, तुम्ही त्या दुर्दैवी आणि अपेशी माणसाला (राजारामाला) आपल्यामधून हाकलून लावावें. आतां त्याचें आयुष्य थोडें बहुत शिल्लक असेल आणि आमच्या विजयी सैन्याच्या भीतीनें तो पळ काढूं पाहात असेल, तर तुम्ही त्याचे (राजारामाचे) सगळे किल्ले आम्हांला देऊन टाकावे. हें काम तुम्ही पार पाडलेत तर तुमच्यावर बादशहाची मोठीच कृपा होईल. तुमच्या जमातीमध्यें इतर कुणालाहि मिळाला नाहीं असा दर्जा, मान-मरातब आणि इतमाम यांचा तुम्हांला लाभ होईल आणि जर का दुर्दैवानें स्वतःचें हित आणि नफानुकसान समजून घेण्याची तुम्हांला बुद्धि नसली आणि तुमच्या पत्रांतील मजकूर खोटा असला तर लक्षांत ठेवा. त्या काफरानें (राजारामानें) आमचे पुष्कळ अपराध केले आहेत आणि अतिशय उद्धटपणा दाखविला आहे. तो लवकरच आमच्या गाजींच्या तावडींत सांपडेल आणि आपल्या नरकवासी भावांप्रमाणें (संभाजी) वध पावेल. आमच्या शक्तीचा प्रभाव तुम्हांलाहि दिसून येईल. तुमची मालमत्ता नष्ट होईल. तुम्ही आपल्या प्राणास मुकाल. तुमच्या कुटुंबांतील लहान थोर अशीं सर्व माणसें कैद होऊन वध पावतील. जमदिलावल महिन्याची सतरा तारीख, राज्यकारभाराचें त्रेचाळीसावें वर्ष (एकतीस ऑक्टोबर १६९९).

(४)
औरंगजेबाचें परशुरामपंत यास पत्र (आक्टोबर १६९९)

पन्हाळगडचा किल्लेदार त्र्यंबक (परशुराम त्र्यंबक) यांनीं जाणावें कीं आमचीं सैन्यें त्या लबाड राजारामाचे किल्ले जिंकून घेऊन त्याचा नायनाट करण्याच्या उद्देशानें चाल करून येत आहेत. लवकरच आमची छावणी मुर्तुजाबाद (मिरज) येथें कायम होईल. परमेश्वरकृपेनें त्याचे (राजारामाचे) सर्व किल्ले आणि इलाखे आमच्या ताब्यांत येतील. राजारामाला कैद करण्यांत येऊन, त्याचा भाऊ नरकवासी संभाजी याजप्रमाणें त्याचाहि वध करण्यांत येईल. तुमच्या किल्ल्यांतील कांहीं माणसें आम्हांला शरण येऊं पाहात आहेत. तुमच्या सुदैवानें सुबुद्धि होऊन तुम्ही किल्ला आमच्या हवालीं करावा. तुम्ही असें केलेंत तर बादशहाची तुमच्यावर विशेष कृपा होऊन तुम्हांला मोठा मानमरातब देण्यांत येईल.

तुम्ही असें केलें नाहींत तर परमेश्वरकृपेनें किल्ला लवकरच जिंकून घेण्यांत येईल. तुमचा काय परिणाम होईल तो दिसून येईल.

तुम्ही आणि तुमचीं बायकापोरें यांना कैद करण्यांत येऊन सर्वांचा वध करण्यांत येईल. जमादिलावल महिन्याची सतरा तारीख, राज्यकारभाराचें सेचाळीसावें (येथें त्रेचाळीसावें पाहिजे असें जदुनाथांचें म्हणणें आहे) वर्ष (एकतीस ऑक्टोबर १६९९).

(५)

औरंगजेबाचें परशुरामपंतास पत्र (२७ मे १७०२ औरंगजेबानें सहा डिसेंबर १७०१ रोजीं विशाळगडाला वेढा घातला. मे (१७०२) महिन्यांत मराठ्यांशीं वाटाघाटी करून त्यानें किल्ला ताब्यांत घेतला. त्या वेळीं लिहिलेलें हें पत्र.

पत्र

परशुराम यानें जाणावें कीं तुम्ही आमचे इतके अपराध केले आहेत कीं, त्यांना क्षमा नाहीं. पण शहाजादा बेदार बख्त यांच्या लिहिण्यावरून समजलें कीं तुम्हांला आपल्या कृतकर्मांचा पश्चात्ताप झाला आहे. पुढील अटीवर तुम्ही खेळण्याचा किल्ला देण्यास तयार आहांत. मोगल सैन्य यापुढें मराठ्यांचे किल्ले न घेतां आपल्या मुलुखाकडे परत जाईल. तुम्हीं आणि तुमचे सहकारी यांचे अपराध माफ करून त्यांना जीवदान देण्यांत यावें. शहाजाद्यापाशीं तुम्ही जी विनंति केली ती मान्य करण्यांत येत आहे. शहाजाद्याच्या लिहिण्यावरून आज्ञा करण्यांत येत आहे ती अशी : तुम्ही शहाजाद्यांना भेटावें आणि खेळण्याचा किल्ला ताब्यांत द्यावा. नंतर तुमचे अपराध माफ करण्यांत येऊन तुम्हांला आणि तुमच्या सहकाऱ्यांना जीवदान देण्यांत येईल. आमचीं सैन्यें तुमचा मुलूख आणि किल्ले जिंकून घेण्यासाठीं पुढें चाल करून जाणार नाहींत. उलट ती आपल्या मुलुखाकडे परत फिरतील.

तुम्ही आतां खेळण्याचा किल्ला लवकर आमच्या हवालीं करावा. तुम्ही निश्चित असावें. तुम्ही आणि तुमचे सहकारी यांनीं निर्धास्तपणें किल्ला सोडून निघून जावें. तुम्ही आपल्या वचनाप्रमाणें वागावें. त्याविरुद्ध कांहीं करूं नये. मुहरम महिन्याची अकरा तारीख, राज्यकारभाराचें सेचाळीसावें वर्ष (२७ मे १७०२).

शाहू आणि जंजिऱ्याचे शिद्दी

येथें शाहुकालीन अशा सहा पत्रांचा मूळ फारशीवरून मराठींत केलेला अनुवाद दिला आहे. यांपैकीं कांहीं पत्रें महत्त्वाचीं आहेत. कोल्हापूरकर शिवाजीला सात हजारची मन्सबदारी, राजा ही पदवी आणि विजापूर सुभ्याच्यापैकीं निम्मा रुसुम वसूल करण्याचा अधिकार यासंबंधीचें फर्मान महत्त्वाचें आहे. कोल्हापूरकर संभाजीनें निजामाशीं हातमिळवणी केल्याचें कांहीं पत्रांवरून सूचित होतें. शाहू आणि जंजिऱ्याचे शिद्दी यांजमध्यें निजामानें तडजोड करण्याचा प्रयत्न केला आणि इंग्रजांनीं मध्यस्थी केली. यासंबंधींची शाहूनें निजामाला लिहिलेलीं दोन पत्रें अतिशय महत्त्वाचीं आहेत. पत्रांचा मराठी अनुवाद पुढें दिला आहे :

(१)

बहादुरशहा बादशहा याचें शिवाजीराजे कोल्हापूरकर यांना पत्रः-

हें पत्र इ. स. १७०९ च्या सुमारास लिहिलेलें असावें.

पत्र—

आमच्याबद्दल निष्ठा व्यक्त करणारें तुम्हीं लिहिलेलें विनंति-पत्र पावलें. तुमच्यावर बादशहाची कृपा झालेली आहे. तुम्हांला सात हजारी आणि सात हजार स्वारांचे मन्सबदार म्हणून नेमण्यांत आलें आहे. तुम्हांला राजा ही पदवी देण्यांत आली आहे. सुभे दारुज्जफर (विजापूर) च्या महालांपैकीं निम्मा रुसूम तुम्ही आणि निम्मा राजा शाहू यांनीं घ्यावा अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. त्याचा तपशील सोबत देण्यांत आला आहे. याबद्दल तुम्ही आभारी असावें आणि आमच्याबद्दल निष्ठा बाळगावी. दक्षिणच्या सुभेदाराशीं तुम्हीं सर्व प्रकारें सहकार्य करावें. फौजदार आणि ठाणेदार (मोगल अधिकारी) यांना सर्व प्रकारें साहाय्य करणें आपलें कर्तव्य आहे असें तुम्ही समजावें. तुमच्या सहकाऱ्यांकडून बादशाही मुलखाला कोणत्याहि प्रकारें उपसर्ग होणार नाहीं अशी तुम्ही व्यवस्था करावी. अधिक तपशील तुम्हांला नुसरतजंग (जुल्फिकारखान) याच्या पत्रावरून कळून येईल. रबिलावल महिन्याची दुसरी तारीख, राज्यकारभाराचें (येथें वर्ष दिलें नाहीं.) सुभे विजापूर, कर्नाटक, कोंकण, निजामुल्मुल्की, कोंकण आदिलखानी बारा मावळ.

(२)

कोल्हापूरकर संभाजी याचें निजामुल्मुल्काला पत्र; सुरवातीपासून मी आपल्या कृपेवर विसंबून आहे. आपल्या कृपेनें माझ्या दौलतीचें ऊर्जित होईल अशी माझी भावना आहे. आपले आभार मानण्यांत आणि आपलें गुणवर्णन करण्यांत मी काळ घालवीत असतों. असें असूनहि आपल्याकडून कांहीं पत्र येऊं नये याचें आश्चर्य वाटतें. गोविंदरावांच्या द्वारें मी तोंडी विनंती केली होती तिच्या उत्तराचीहि मी वाट पाहात आहे. आतां आपण माझी आठवण काढून आनंदित करावें.

या काळांत शत्रूचे सरदार पन्हाळगड आणि कोल्हापूर जिंकून घेण्यासाठीं चाल करून येत आहेत. मिरजहि घेण्याचा त्यांचा बेत आहे. येथून अकरा कोसांवर असलेल्या कऱ्हाडपर्यंत ते आले आहेत. पुढेंहि चाल करून येण्याचा त्यांचा इरादा आहे. किल्ल्यावर शिबंदी, तोफा, दारूगोळा, अन्नसामुग्री, गवत, सारांश किल्ल्याच्या संरक्षणास लागणारा सगळा सरंजाम तयार ठेवण्यांत आला आहे. युद्धाची सर्व तयारी करण्यांत आली आहे. या उपर परमेश्वराची मर्जी जशी असेल तसें घडून येईल.

(३)

बहादुरदिलखान यांस पत्र.

हें पत्र बहुधा कोल्हापूरकर संभाजी याचें असावें. "स्नेहभावानें भरलेलें आणि आमच्याकडून फौजेची कुमक मिळाली या अर्थाचें आपलें पत्र मिळालें. आपली मोहीम यशस्वीपणें पार पाडण्यांत आम्ही मदत करूं. तिकडे दुर्लक्ष झालें नाहीं आणि होणार नाहीं. आमच्या फौजा किल्ले घेण्यांत गुंतल्या आहेत. त्यांना बोलावण्यांत आलें आहे. त्या लवकरच येऊन पोहोंचतील. तुम्ही ठाण मांडून राहावें. युद्ध करण्यांत घाई करूं नये. दमानें घ्यावें, लवकरच आमच्या विजयी फौजा तुमच्या मदतीस येतील."

बहादुरदिलखान हा निजामाचा सरदार होता. कोणत्या संदर्भांत हें पत्र लिहिण्यांत आलें आहे हें स्पष्ट होत नाहीं.

(४)

बंकापूरचा सुभेदार दिलेरखान यांच्या नांवें पत्र.

"या सुमारास उदाजी कोटकर हा कोल्हापूरचा आसरा घेऊन आमच्या सैन्यावर चालून आला. रमजान महिन्याच्या पांच तारखेस आमच्या सैन्यानें हल्ला केला. किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत आमचें सैन्य पोहोंचलें. किल्ल्यांतून बाहेर पडलेले लोक पळाले आणि परत किल्ल्यांत निघून गेले. तो लबाड मनुष्य (उदाजी कोटकर) फजीत पावून आमच्या हातीं सांपडला. त्याचा सगळा गर्व नाहींसा झाला. त्याचे बरेच लोक आम्हांला शरण आले आहेत. या विजयानंतर आमचे सरदार हिंदुराव घोरपडे मुमलकत मदार आणि सेनापति चंद्रसेन जाधवराव हे आम्हांला भेटण्यास आले. आमच्या कांहीं किल्लेदारांनीं बंड केलें आहे. ते किल्ले जिंकून घेऊन बंडखोर सरदारांचा पाडाव करणें आहे. या कामावर आम्ही आमचें सैन्य आणि सरदार पाठवीत आहोंत. तुमच्यापाशीं जें कांहीं सैन्य आहे तें घेऊन तुम्ही, हिंदुराव आणि चंद्रसेन जाधवराव यांस या मोहिमेंत साह्य करावें. यानें स्नेहभावाची वृद्धि होईल."

या पत्रावरून हें कोणत्या संदर्भांत लिहिलें गेलें आहे हें स्पष्ट होत नाहीं. हें पत्र बहुधा कोल्हापूरकर संभाजी यानें लिहिलें असावें

(५)

यापुढील दोन पत्रें शाहूनें निजामुलमुल्क यास लिहिलीं असून तीं जंजिऱ्याचे शिद्दी यांजवरील मोहिमेसंबंधीं आहेत. पत्राचा काळ इ. स. १७३४–३५ चा असावा.

पत्र.

आपल्यामध्यें अंतर बरेंच आहे पण असें असूनहि परस्परांबद्दल स्नेहभाव आहे. राजपुरीचे शिद्दी यांनीं समुद्रांतील आपल्या स्थळांच्या जोरावर आपलें डोकें वर काढलें असून ते अविचारानें धामधूम करीत आहेत. त्यांनीं समुद्रकिनाऱ्यावर राहाणाऱ्या लोकांचा छळ केला आहे आणि अद्यापि ते करीत आहेत. गर्विष्ठपणामुळें त्यांनीं बादशहाचे हुकूमहि धाब्यावर बसविले आहेत. सनदा आणि बादशाही परवाने या द्वारें रायरीचा किल्ला (रायगड) आणि इतर स्थळें (समुद्रकिनाऱ्यावरील) हीं या राज्यांत आलीं होतीं; पण तीं स्थळें त्यांनीं सोडलीं नाहींत. बादशहाची आज्ञा नसतांना त्यांनीं शिवसिंगाकडून (रायगडचा किल्लेदार) तीं स्थळें आपल्या ताब्यांत घेतलीं. सर्वांशीं स्नेहभावानें आणि शांततेनें राहावें असें माझें धोरण राहिलें आहे. त्यामुळें या प्रकरणांत मी आपलाहि वेळ घेतला नाहीं आणि त्यांना (शिद्दयांना) हि त्रास दिला नाहीं. पण शांततामय धोरणहि विचित्र तऱ्हेनें परिणामकारक ठरतें. शिद्दयांचे अधिकारी हे स्वतः शिद्दयांच्या छळाला कंटाळले होते. त्यांनीं आपण होऊन मला विनंती केली. आणि त्यांनीं किल्ले आणि त्यांच्या खालील इलाखे हे बाजीराव प्रधान आणि श्रीपतराव प्रतिनिधि यांचे हवालीं केले.

या सुमारास कांहीं शिद्दी सरदार यांनीं सुरूर याच्या मुलाला मारलें. ते जंजिरा बळकावून बसले. त्यांचीं स्थळें जिंकून शिद्दयांचा मोड करण्याचें आमच्या सरदारांनीं (बाजीराव व श्रीपतराव) ठरविलें. आमच्या सैन्यानें राजपुरीपासून अंजनवेलीपर्यंत मोहीम केली. शिद्दी अत्यंत त्रस्त होऊन अगदीं जेरीस आले. ते आक्रोश करूं लागले. शेवटीं आपल्या पत्राप्रमाणें शिद्दयांशीं तह करण्याचें ठरविलें. या कामावर बाजीराव याची नेमणूक करण्यांत आली. अजून वाटाघाटी चालूंच होत्या. इतक्यांत शिद्दयांनीं वाटाघाटी मोडल्या आणि अविचारपूर्वक त्यांनीं सैन्य गोळा करून महाड आणि पाचाड हीं स्थळें आपल्या ताब्यांत घेतलीं.

रायगडच्या वाटा त्यांनीं रोखून धरल्या. ही बातमी कळतांच या मोहिमेवर आम्ही नेमलेला सरदार उदाजी पवार हा शिद्दयांवर चालून गेला. त्यानें त्यांची दाणादाण उडविली. युद्धांत त्यानें शिद्दी अंबर अफवानी याचें डोकें कापलें. यानंतर त्यानें पाचाड घेतलें. महाड हें सिद्दीसाद याचें निवासस्थान होय. तें जिंकून घेण्यासाठीं तो महाडवर चालून गेला. सिद्दीसाद याचें आयुष्य अद्यापि शिल्लक होतें. तो महाडच्या किल्ल्यांत शिरून बसला. किल्ल्याचा त्याला आसरा मिळाला. आमच्या तोफांच्या आणि बंदुकींच्या माऱ्यानें घाबरून तो बाहेर पडला आणि फजीत पावून जंजिऱ्याकडे निघून गेला. त्याच्या तोंडाला अपयशाचें काळें लागलें आहे. तेथेंहि न थांबतां तो अंजनवेलीला पोहोंचला. शिद्दयांच्या ताब्यांत किनाऱ्यापैकीं एक तृतीयांश भाग राहिला आहे. इतर ठिकाणीं त्यांचें कांहीं राहिलें नाहीं.

आमचे सरदार शिवाजी खंडेराय प्रभु चिटणीस आणि उदाजी पवार यांनीं बाणकोट आणि महाड हीं ठाणीं जिंकून घेतलीं. चिपळूणाच्या डोंगरांतून निघून ते वरील ठाणीं जिंकून घेऊन एकत्र आले. यानंतर आपल्या प्रचंड सैन्यानिशीं ते चालून गेले असून अंजनवेलीपासून गोवळकोटपर्यंतच्या इलाख्याला त्यांनीं वेढा घातला. उदाजी पवार त्या ठिकाणीं पोहोंचला आहे. शिवाजी खंडेराव हा अंजनवेलीला मोर्चे लावण्यासाठीं हरप्रकारें झटत आहे. मोर्चे गोळयाच्या एका टप्प्यापर्यंत सरकत आहेत. पुढील अंतरहि दूर करण्यांत येईल. समुद्राच्या मार्गानेंहि किल्ल्याचा वेढा चालू आहे. तोफांच्या माऱ्यानें किल्ल्याच्या भिंती हादरत आहेत. अल्पावधींत किल्ला फत्ते होऊन शिद्दयांचीं पाळेमुळें खणून काढण्यांत येतील.

इंग्रजांचा वकील येथें आला. तो म्हणतो कीं शिद्दयांचें आम्हांला अगत्य आहे. या युद्धाचा शेवट तहानें झाला नाहीं तर आम्ही शिद्दयांना हरतऱ्हेनें मदत करण्यांत कसूर करणार नाहीं. त्यांची मालमत्ता व संपत्ति आम्ही आमच्या जागीं हलवून सुरक्षित ठेवूं. शिद्दयाचीं बायका-मुलें आणि इतर कुटुंबीय यांना त्यांना पसंत पडेल त्या ठिकाणीं पोहोंचवूं. नाहींतर आमच्या स्थळावर नेऊन आम्ही त्यांचीं सर्व प्रकारें व्यवस्था ठेवूं.

यामुळें आम्ही इंग्रजांच्या मध्यस्थीनें तह घडवून आणीत आहोंत; याउपरहि शिद्दयांनीं तह मोडला तर इंग्रज कांहीं शिद्दयांना मदत करणार नाहींत. शिद्दयांनीं आमच्या राज्याला आणि आमच्या जहाजांना उपसर्ग केला नाहीं तर आम्हीहि त्यांच्या स्थळावर चढाई करणार नाहीं. इंग्रजांची वरील विनंति आम्ही मान्य केली आहे. आपले दिवस नेहमीं आपल्या मनाप्रमाणें पार पडोत.'

(६)

शाहूचें निजामुल्मुल्काला पत्र.

आपल्या पत्राची वाट पाहात होतों. स्नेहभावानें युक्त असें आपलें पत्र मिळालें. आनंद झाला. शिद्दीसाद हा महाडचें ठाणें सोडून पळून गेला. तो राजपुरीकडे गेला. पण तेथील शिद्दयांनीं त्याला आंत येऊं दिलें नाहीं. त्यामुळें तो तेथून निघून बाणकोटकडे गेला. उदाजी पवार तेथें पोहोंचल्यावर शिद्दीसाद हा पांच गलबतें बरोबर घेऊन निघाला. तो सुरतेकडे जाण्यास निघाला आहे असें ऐकिवांत आहे. बाणकोटला पोहोंचल्यावर उदाजी पवारानें त्या स्थळावर चोहोंकडून हल्ला चढविला. किल्ल्यांतील शिद्दीचे लोक घाबरून जहाजें, गलबतें, होड्या इत्यादींवर स्वार झाले. या गडबडींत कित्येक लोक पाण्यांत पडून मेले आणि कित्येकजण आमच्या हल्लयामुळें ठार झाले. आमच्या इकडील बकाजी महाडीक यास गंभीर जखमा झाल्या. आमचीं चाळीस माणसें ठार झालीं. आणि

सुमारें सत्तर माणसें जखमी झालीं. बरेंच सैन्य घेऊन उदाजी पवार हा खुष्कीच्या मार्गानें शिद्दी साद याचा पाठलाग करीत आहे. तो किनाऱ्यावर कुठेंहि उतरूं पाहील तर उदाजी पवार त्या ठिकाणीं पोहोंचेल. किनाऱ्यावरील फौजदारांना त्यांनीं शिद्दी साद यास किनाऱ्यावर उतरूं देऊं नये अशा प्रकारच्या आज्ञा देण्यांत आल्या आहेत. असें जर त्यांनीं केलें नाहीं तर त्यांचीं स्थळें उध्वस्त करण्यांत येतील असें त्यांना बजावण्यांत आलें आहे. आपले दिवस आपल्या मनाप्रमाणें पार पडोत.'

वरील दोन्ही पत्रांचा संदर्भ लक्षांत येण्यासाठीं जंजिऱ्याच्या शिद्दीवरील मोहिमेची माहिती देणें आवश्यक आहे. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (इ. स. १७०७) जंजिऱ्याच्या शिद्दयांनीं रायगड, महाड, बाणकोट इत्यादि स्थळें आपल्या ताब्यांत घेतलीं. तीं परत घेण्यास मराठ्यांना इ. स. १७३३ च्या सुमारास अवसर मिळाला. जंजिऱ्याचा शिद्दी रसूल हा इ. स. १७३३ च्या फेब्रुवारींत वारला. त्याचा मुलगा अब्दुल्ला याचा खून करण्यांत आला. अब्दुल्लाचा मुलगा अब्दुलरहमान हा मराठ्यांचा आश्रय घेण्यासाठीं त्यांच्याकडे आला. या संधीचा फायदा घेऊन मराठ्यांनीं रायगडचा किल्ला आपल्या ताब्यांत आणिला (पांच जून १७३३). रायगड परत घेण्याचा प्रयत्न शिद्दी अंबर अफवानी यानें केला, पण रायगडजवळ झालेल्या युद्धांत (दहा जानेवारी १७३४) उदाजी पवार यानें केलेल्या हल्लयांत शिद्दी अंबर हा ठार झाला. शिद्दी साद हा महाडच्या किल्लयांत आसरा घेऊन बसला होता. मराठ्यांनीं त्याला हुसकावून लावून महाड आपल्या ताब्यांत घेतलें (२४ फेब्रुवारी १७३४). आठ मार्च रोजीं बाणकोट मराठ्यांच्या हातीं आलें. यानंतर मराठ्यांनीं अंजनवेल आणि गोवळकोट या दोन स्थळांवर चाल केली.

हा काळ मार्च व एप्रिल १७३४ हा होय.

इंग्रजांच्या मध्यस्थीचा जो उल्लेख या वरील पत्रांत आहे तो मराठ्यांनीं रायगड घेतल्यानंतर (पांच जून १७३३) आणि शिद्दी अंबर अफवानी यानें रायगडावर पुन्हां हल्ला करण्याचा प्रयत्न केला (दहा जानेवारी १७३४) यांमधील काळांत इंग्रजांनीं तह झाला नाहीं तर आपण शिद्दयांना मदत करूं असें मराठ्यांना सांगून मराठे आणि शिद्दी यांचा तह घडवून आणला. (डिसेंबर १७३३). या तहानें रायगड, आणि त्याच्या खालचा प्रदेश मराठ्यांच्या ताब्यांत राहिले. शिद्दयांच्या ताब्यांत जंजिरा, उंदेरी, अंजनवेल आणि गोवळकोट हेच भाग राहिले. हा तह मोडून शिद्दी अंबर रायगडावर चालून आला आणि दहा जानेवारी १७३४ रोजीं मारला गेला.

मराठे आणि शिद्दी यांच्यांत सलोखा व्हावा असा निजामानें प्रयत्न केला होता हें वरील पत्रांवरून दिसून येतें. इंग्रजांच्या धोरणावरहि या पत्रांमुळें प्रकाश पडतो. या दृष्टीनें हीं पत्रें महत्त्वाचीं ठरतात.

(७)

संभाजी कोल्हापूरकर याचें शाहूस पत्र

' विनंति. माझे बंधु शिवाजी हे वारले. त्या वेळीं त्यांची दुसरी बायको पांच महिन्यांची गर्भवती होती. त्यामुळें आपल्या धर्मास अनुसरून ती सती गेली नाहीं. शिवाजीला जाऊन आतां पाव वर्ष झालें. परमेश्वरकृपेनें जिल्काद महिन्याच्या चार तारखेस ती सुखरूपपणें प्रसून होऊन मुलगा झाला आहे. ही आनंदाची बातमी मी आपल्याला कळवीत आहे.

मूळ पत्र मराठींत असावें. त्याचा फारसी अनुवाद या संग्रहांत समाविष्ट करण्यांत आला असावा. या पत्रावरून ताराबाईचा नातू आणि कोल्हापुरकर शिवाजी याचा मुलगा रामराजा याची जन्मतारीख निश्चित करतां येते. रियासतकार सरदेसाई आपल्या मराठी रियासत पेशवा बाळाजी बाजीराव या ग्रंथांतील पान एकोणीसवर लिहितात.

" रामराजाच्या जन्माची मिति उपलब्ध नाहीं. इ. स. १७२६ च्या मार्च एप्रिलांत बाप देवी येऊन वारला. त्यानंतरचा याचा जन्म. "

वरील पत्रांत रामराजाच्या जन्माची तारीख जिल्काद महिन्यांचीं चौथी होय असें संभाजीनें शाहाला स्पष्टपणें कळविलें आहे. पत्रांत हिज्री वर्ष दिलें नाहीं, पण कोल्हापुरकर शिवाजीचा मृत्यु इ. स. १७२६ त झाला त्या वेळीं हिज्री वर्ष अकराशें अडतीस (११३८) चालू होतें. त्या वर्षाची जिल्काद महिन्याची चार तारीख ही रामराजाची जन्मतारीख होय. हिज्री ११३८ चार जिल्काद म्हणजे गुरुवार तेवीस जून इ. स. १७२६ व आषाढ वद्य पंचमी शके १६४८ अशी तारीख येते.

वरील दृष्टीनें हें पत्र महत्त्वाचें होय.

हफ्त अंजुमन

मिर्जा राजा जयसिंग यांचीं पत्रें

जयसिंगाचीं पत्रें

शायस्ताखान हा शिवाजी महाराजांच्या हातून फजीत पावून निघून गेल्या-नंतर, औरंगजेबानें त्याच्या जागीं मिर्जा राजा जयसिंग याची नेमणूक केली. बाद-शहाचा निरोप घेऊन जयसिंग हा दाक्षिणेकडे जाण्यास निघाला. नऊ जानेवारी १६६५ रोजीं त्यानें नर्मदा नदी ओलांडली. दहा फेब्रुवारीला तो औरंगाबाद येथें पोहोंचला. औरंगाबादेचा सुभेदार शहाजादा मुअज्जम याची भेट घेऊन तेरा फेब्रुवारीस त्यानें औरंगाबाद सोडलें. तीन मार्च रोजीं तो पुण्यास आला.

जयसिंग हा अनुभवी आणि कुशल असा सेनापति होता. शिवाजी महा-राजांविरुद्ध लढण्यासाठीं त्यानें अत्यंत काळजीपूर्वक अशी आपली तयारी केली. बुऱ्हाणपुराला पोहोंचल्यापासूनच त्यानें शिवाजी महाराजांविरुद्ध निरनिराळ्या राजेरजवाड्यांशीं संधान बांधण्यास सुरवात केली. जावळीचे मोरे, जव्हारचे राजे इत्यादींना त्यानें आपल्या पक्षांत आणलें. पोर्तुगीजांकडे वकील पाठवून त्यांनीं शिवाजीला मदत करतां कामा नये, अशा अर्थाच्या त्यानें पोर्तुगीजांना सूचना दिल्या. विजापूरचा आदिलशहा आणि शिवाजीमहाराज यांचें मोगलांविरुद्ध अंतस्थ सूत आहे याची त्याला खात्री होती. त्या दोघांवर सारखी नजर राहावी म्हणून त्यानें सासवड येथें आपला तळ दिला. त्यानें घाटाखालीं उतरून कोंकणची मोहीम हातीं घ्यावी अशी औरंगजेबानें त्याला सूचना केली. पण ती त्यानें नाकारली.

त्या वेळीं शिवाजी महाराजांच्या ताब्यांत पुणें जिल्ह्याचा अर्धा भाग, कल्याण–भिवंडी हा कुलाबा जिल्ह्याचा बव्हंश भाग, रत्नागिरी जिल्हा, साताऱ्या-पैकीं प्रतापगड आणि कोल्हापूर जिल्ह्यापैकीं विशाळगड, मलकापूर, इतका प्रदेश होता. पन्हाळगड हा त्यांना सोडून द्यावा लागला होता. सातारा, परळी इत्यादि किल्ले अद्यापि त्यांच्या ताब्यांत आले नव्हते. जयसिंगानें या लहानशा राज्याला, चहूंकडून घेरून त्याची जवळजवळ नाकेबंदी केली. लोहगड, पुणें, लोणी, शिरवळ, शिवापूर इत्यादि ठिकाणीं त्यानें मजबूत ठाणीं कायम केलीं. कुतुबुद्दीन-खान, इहतिशामखान, सुजानसिंग बुंदेला, राजा रायसिंग राठोड इत्यादींच्याबरोबर तीन तीन हजारांच्या तुकड्या देण्यांत आल्या. मराठे मोगल इलाख्यांत घुसूं पाह-तील त्याला आळा घालावा, मोगल तुकड्यांनीं राजगड, रोहिडा, कोंडाणा, लोह-गड याभोंवतालचा प्रदेश उध्वस्त करावा आणि मराठे एके ठिकाणीं जमतील तर असा जमाव होऊं देऊं नये, अशी सर्व प्रकारची व्यवस्था जयसिंगाने केली.

पुरंदरला वेढा व तह

इकडे दिलेरखानानें पुरंदरला वेढा घातला. वेढा दिवसेंदिवस कडक होत चालला. मोगलांचीं सैन्यें, राजगड, कोंडाणा, लोहगड इत्यादि किल्ल्यांपर्यंत पोहोंचून भोंवतालचा प्रांत बेचिराख करूं लागलीं. विजापूरकरांना जयसिंगानें धाकदपटशा आणि प्रलोभनें, आश्वासनें इत्यादींच्या द्वारें शिवाजी महाराजांपासून वेगळें केलें होतें. दोन जून १६६५ ला मोगलांनीं पुरंदरच्या लगतच्या किल्ल्याचे पांच बुरूज हस्तगत केले.

शिवाजी महाराजांनीं या सर्व गोष्टींचा विचार केला. जयसिंगाची तयारी, त्याचा तडफदारपणा आणि आपलीं स्वतःचीं मर्यादित साधनें, हीं सर्व लक्षांत घेऊन शिवाजी महाराजांनीं ११ जून १६६५ रोजीं पुरंदरजवळ जयसिंगाची भेट घेतली आणि पुरंदरचा तह घडवून आणला.

या मोहिमेसंबंधीं जयसिंगानें औरंगजेबाला वेळोवेळीं जीं पत्रें लिहिलीं तीं त्याचा चिटणीस उदयराज ऊर्फ तालेयारखान यानें हफ्त अंजुमन या नांवानें तयार केलेल्या फारसी पत्रसंग्रहांत आढळतात. हफ्त अंजुमनच्या तीन प्रती उपलब्ध आहेत. एक प्रत प्यारिसच्या राष्ट्रीय ग्रंथालयांत आहे. दुसरी प्रत बनारस येथें एका कायस्थ कुटुंबापाशीं आढळली. तिसरी प्रत जयपूर येथें उपलब्ध झाली.

पॅरिसची प्रत अपूर्ण आहे. या प्रतींत जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत (इ. स. १६६५) जयसिंगानें औरंगजेबाला पाठविलेलीं अकरा पत्रें आढळतात. तोंपर्यंत शिवाजी महाराज आणि जयसिंग यांची गांठ पडली नव्हती. बनारस आणि जयपूर येथील प्रतींत यापुढील पत्रें असून त्यांत पुरंदरचा वेढा, शिवाजी जयसिंग भेट, शिवाजी महाराजांची औरंगजेबाला अर्जी, पुरंदरचा तह, विजापुरावर जयसिंगाची मोहीम इत्यादींचा तपशील आला आहे. यांपैकीं कित्येक पत्रांचा इंग्रजी अनुवाद जदुनाथ सरकार यांनीं केला असून तो त्यांच्या हाऊस ऑफ शिवाजी या ग्रंथांत आढळतो. याशिवाय सदरील बनारस प्रतींतील पत्रांचें इंग्रजी भाषांतर श्री. जे. एन्. सरकार हे करीत असून तें बेंगॉल पास्ट अँड प्रेझेंट (जानेवारी, जून, जुलै, डिसेंबर १९६२) या नियतकालिकांत प्रसिद्ध झालें आहे. भाषांतर अद्यापि पूर्ण झालें नाहीं.

पण यदुनाथ सरकार यांनीं प्यारिस प्रतींतील कांहीं पत्रांचेच अनुवाद केलेले मला आढळून आले. या प्रतीची एक फोटोप्रत माझे मित्र डॉक्टर पी. एम्. जोशी, संचालक, सरकारी दप्तरखाना, मुंबई, यांच्या प्रयत्नानें मला उपलब्ध झाली. या प्रतींतील अकरा पत्रांचा मूळ फारसीवरून केलेला मराठी अनुवाद पुढें दिला असून त्यावरून जयसिंगाची युद्धकुशलता, त्याचा धोरणी स्वभाव आणि तडफदारपणा या गुणांची कल्पना येईल.

मिर्झा राजा जयसिंग याचीं औरंगजेबास पत्रें

(१)

रजब महिन्याच्या पहिल्या तारखेस (आठ जानेवारी १६६५) आपलें पत्र मिळालें. रजबच्या दुसऱ्या तारखेस (नऊ जानेवारी १६६५) मी नर्मदा पार झालों. मी पुढें जात आहे. मी कोठेंहि विनाकारण वेळ दवडणार नाहीं. मी शहाजाद्याची (औरंगाबादेचा सुभेदार शहाजादा मुअज्जम) गांठ घेईन. तेथें तीन दिवसांच्या वर राहणार नाहीं. आपल्या आज्ञेप्रमाणें मी पुण्याला पोहोंचेन. तेथें जें कांहीं घडेल तें मी आपल्याला कळवीन.

(२)

विनंती कीं रजब महिन्याच्या बारा तारखेस (एकोणीस जानेवारी १६६५) शुक्रवारीं मीं बुऱ्हाणपुरास पोहोंचलों. शहाजाद्यापाशीं (औरंगाबादेंत) तीन दिवसांच्यावर राहावयाचें नाहीं असें ठरलें असल्यामुळें सैन्याची आणि सरंजामाची सगळी पाहणी करण्यासाठीं मला बुऱ्हाणपुरास अधिक दिवस मुक्काम करावा लागणार आहे. रजबच्या चोवीस तारखेस मंगळवारीं (एकतीस जानेवारी) येथून कूच करून पुढील मार्ग आक्रमिण्याचें मीं ठरविलें आहे. शाबान महिन्याच्या चार तारखेस शुक्रवारीं (दहा फेब्रुवारी १६६५) मी शहाजाद्याची गांठ घेऊन शाबानच्या सात तारखेस सोमवारीं (तेरा फेब्रुवारी १६६५) तेथून पुढें रवाना होईन.

(३)

जावळीचे जमीनदार चंद्रराय याजसंबंधीं मी लवकरच आपल्याला लिहिणार आहे. मी त्याला बोलावूं पाठविलें होतें. याच सुमारास चंद्रराय आणि त्याचे भाऊ याजकडून सुधा नांवाचा ब्राह्मण माझ्या एका सेवकाबरोबर आला. चंद्रराय वगैरेंना सुरक्षिततेची हमी आणि खर्चासाठीं रक्कम मिळेल अशी त्याची अपेक्षा होती. मीं त्याला कौल दिला. खर्चासाठीं रक्कम दिली. आणि चंद्रराय आणि त्याचे भाऊ यांना लवकर घेऊन येण्यासाठीं रवाना केलें आहे.

माझे इतर इसम मीं रवाना केले होते. पुरंदरच्या पायथ्याशीं शिवाजीचे नोकर अलमाजी व खडकोली जदुनाथांचे मतें आत्माजी आणि कहर कोळी, आणि त्यांचे दोन भाऊ हे होते. त्यांच्या पदरीं तीन हजार माणसें असून तोफांचें रक्षण करण्याचें काम त्यांच्याकडे होतें. त्यांच्या एका वकिलाला माझे इसम घेऊन आले. त्यांची इच्छा बादशाही चाकरी पत्करावी अशी आहे. त्यांना समाधानाची आणि खातरजमेचीं पत्रें गेलीं आहेत. ते लोक आल्यावर त्यांची कामगिरी पाहून त्यांना काय मन्सबी द्याव्या यासंबंधीं लिहीन.

मी बुऱ्हाणपूर येथें असतांना जव्हारच्या जमीनदाराकडून एक इसम आला होता. बादशाही चाकरींत दाखल होण्याची जमीनदारानें इच्छा दर्शविली आहे. मी त्याला (वकिलाला) सांगितलें कीं राजानें माझ्याकडे यावें किंवा आपला मुलगा किंवा भाऊ यास पाठवावें. त्यानें बादशाही चाकरींत भरीव अशी कामगिरी करून दाखवावी म्हणजे त्याच्यावर बादशहाची कल्पनातीत कृपा होईल. हें त्यालाच दिसून येईल. बादशहांनीं त्याच्या नांवानें फर्मान दिलें आहे तें माझ्याजवळ आहे. योग्य वेळीं मी तें त्याला देईन. या मोहिमेंत त्याचा बराच उपयोग होईल. त्याला काय मानमरातब द्यावा यासंबंधीं मी नंतर लिहीन. दुसरी गोष्ट म्हणजे मी फरसमील (फ्रयांसिस्को) आणि दीगमील (दियोगो दि मेलो) या दोन फिरंग्यांना समुद्रकांठच्या बंदरावर पाठविलें आहे. शिवाजीचें आरमार असून त्यांचा समुद्रांतून संचार चालू आहे. त्याला हवें असेल त्या ठिकाणीं तो आपलीं जहाजें पाठवितो. मी फिरंग्यांच्या बरोबर फिरंगी अधिकाऱ्यांना लिहून पाठविलें आहे कीं तुम्ही मोगल अधिकाऱ्यांशीं सहकार्य करावें, बादशहाच्या आज्ञेप्रमाणें वागावें आणि शिवाजीशीं कांहीं संबंध ठेवूं नये.

ज्या कामावर माझी नेमणूक झाली त्याचाच मी रात्रंदिवस विचार करीत असतों. परमेश्वरकृपेनें आणि आपल्या भाग्यानें हें कार्य यशस्वी करीन. प्रत्येक बाबतींत आपल्या मार्गदर्शनाची अपेक्षा बाळगून आहे.

मी बुऱ्हाणपुराला पोहोंचण्याच्या दोन दिवस आधीं दाऊदखान तेथें पोहोंचला होता. बुऱ्हाणपूरच्या सुभ्याची व्यवस्था त्याच्याकडे आहे. याशिवाय आपल्या आज्ञेस अनुसरून आपलें सुसज्ज सैन्य घेऊन या मोहिमेंत माझ्याशीं सहकार्य करण्याची जबाबदारी त्याच्यावर आहे. त्यानें विनंती केली आहे ती ही—माझा मुलगा पाटणा येथें आहे. त्याच्याबरोबर कसलेले आणि उमदे शिपाई आणि अधिकारी आहेत. तर माझ्या मुलाला पाटण्याहून इकडे लवकर निघून येण्याविषयीं आज्ञा व्हावी. सुजानसिंगासंबंधीं पण मी अशीच विनंती करीन. मी लवकर कामाच्या ठिकाणीं जाऊन पोहोंचेन. वाजवी होतें तें लिहिलें आहे.

(४)

विनंती कीं शाबान महिन्याच्या चार तारखेस (दहा फेब्रुवारी १६६५) शुक्रवारीं मी शहाजादा (मुअज्जम) याची गांठ घेतली. ते माझ्याशीं अतिशय मेहरबानीनें वागले.

शाबानच्या पांच तारखेस (अकरा फेब्रुवारी १६६५) संध्याकाळीं मी त्यांची एकान्तांत गाठ घेतली. मी त्यांना सांगितलें तें हें—आतां बादशहाच्या (औरंगजेब) कृपाछत्राखालीं आपण नांदत आहोंत यापेक्षां अधिक भाग्याची अशी कोणती गोष्ट असूं शकेल ? आपले बादशहा हे परमेश्वरभक्त, धर्मनिष्ठ, न्यायी आणि राज्यकारभारकुशल आहेत. जगांतील सत्ताधिपांनीं त्यांच्यापासून धडा घ्यावा. आपण

कोणीहि त्यांच्या मर्जीविरुद्ध कांहीं करूं नये. हें ऐकून शहाजादा म्हणाले, "तुम्ही म्हणतां तसेंच आहे. आम्ही आमच्या निष्ठेपासून ढळणार नाहीं."

यानंतर सफशिकनखान यासंबंधीं मी शहाजाद्यांना सांगितलें कीं हा मनुष्य कामाचा आहे. त्याच्यावर आपली मेहेरबानी असावी. तें त्यांनी कबूल केलें. सफशिकनखान हा आज्ञाधारक, एकनिष्ठ आणि प्रामाणिक असून माझ्या विश्वासांतील आहे.

आपल्या आज्ञेप्रमाणें मी शहाजाद्यापाशीं तीन दिवसांच्यावर थांबलों नाहीं. शाबान महिन्याच्या सात तारखेस (तेरा फेब्रुवारी १६६५) मी शहाजाद्यांचा निरोप घेतला आणि आपल्या उद्दिष्ट स्थळाकडे रवाना झालों. येथें काय काय करण्यास हवें तें मी आपल्याला कळवीन आणि आपली जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें वागेन.

(५)

विनंती, शाबान महिन्याच्या एकोणतीस तारखेस (सात मार्च १६६५), महाराजा जसवंतसिंग हे येथून (पुण्याहून) आपल्या हुजुरांत येण्यास निघाले.

या मोहिमेंतील सर्वांत पहिलें आणि आवश्यक काम म्हणजे आपलीं ठाणीं मजबूत करणें हें होय. तेंच काम मीं प्रथम हातीं घेतलें. जुन्नरपासून तळकोंकणच्या घाटापर्यंतच्या (लोहगड किल्ल्याच्या समोर असलेल्या) प्रदेशावर मी कुतुबुद्दीनखान याची नेमणूक केली आहे. त्यानें मागितलें तितकें सैन्य मीं त्याला दिलें. मी त्याला तांकीद केली आहे कीं, लोहगडच्या समोर एखादी योग्य जागा पाहून तेथें मजबूत ठाणें कायम करावें आणि तेथें तीन हजार स्वारशिपाई ठेवावे. ताडदुर्ग किल्ल्याच्या समोरहि असेंच ठाणें कायम करून तेथेंहि मुबलक सैन्य ठेवण्यांत येईल. शिवाजीचें येणेंजाणें जेथून आहे त्या प्रत्येक भागांत ठाणीं कायम करण्यांत येतील. शिवाजीचें येणें-जाणेंच त्या भागांतून बंद करण्यांत येईल. स्वतः कुतुबुद्दीनखान यानें सारखें फिरत राहून ठाण्यावर लक्ष ठेवावें आणि शिवाजीला आक्रमण करण्याची कोणतीच संधि देऊं नये असें मीं त्याला बजाविलें आहे.

बादशाही मन्सबदार (अधिकारी) या इलाख्यांत प्रजेचें रक्षण करण्याच्या कामावर होते. आमचीं ठाणीं कायम झाल्यावर या अधिकाऱ्यांचे (मुल्की) तेथें राहणें अनावश्यक आहे. त्यांना आपल्याकडे बोलावून घ्यावें असें मी कुतुबुद्दीनखान यास सांगितलें आहे.

त्या भागांतील देशमुख-देशपांड्यांच्याकडून मुचलके घेण्यांत यावेत. आपल्या बादशाही इलाख्यांतील कोणीहि, मग तो जमीनदार असो कीं रयत असो, शिवाजीबरोबर अंतस्थ असा संबंध राखतां कामा नये. असें कोणी करील तर त्याला शिक्षा करण्यांत येईल. यासाठीं देशमुख–देशपांड्यांच्याकडून मुचलके घेण्यांत आले आहेत. कुतुबुद्दीन खानापाशीं स्वतः आणि ठाण्याठाण्यांतून मुबलक

सैन्य आहे. मी त्याला वरील प्रकारच्या सूचना दिल्या आहेत तूं आपलें काम चांगलें पार पाडलेंस तर बादशाहाची तुझ्यावर कृपा होईल असें आश्वासन देऊन मी त्याला पाठविला आहे.

आपल्या आज्ञेप्रमाणें इहतिशामखान यास चार हजारांचें सैन्य देऊन मी पुण्याच्या ठाण्यावर नेमलें आहे. लोहगड आणि पुणें यांतील अंतर चवदा पंधरा कोसांचें आहे. लोहगडच्या प्रमाणें या दोन्ही स्थळांच्या मध्यें डोंगराचे घाट आहेत. तेथेंहि दोन हजार सैनिकांचें ठाणें कायम करणें आवश्यक होतें. तेंहि कायम करण्यांत आलें आहे.

विनंति कीं, प्रथम तळकोंकणांत उतरून छावणी करावी असा माझा बेत होता. पण इकडे आल्यानंतर मला दिसून आलें कीं, या अवधींत विजापूरचा आदिलखान आणि दुष्ट शिवाजी यांचा एकोपा झाला आहे. त्यामुळें तळकोंकणच्या वाटेनें जाणें मला योग्य वाटलें नाहीं. मी दूर अंतरावरून (तळकोंकणांतून) चाल करून जात आहे आणि विजापूरच्या इलाख्यापासून लांब आहे हें पाहून शिवाजी आणि आदिलखान हे एक होतील आणि त्यांच्यावर कोणतेंच बंधन राहणार नाहीं. त्यांना आमच्याबद्दल धाक वाटणार नाहीं. या कारणानें मी सासवड येथें आपली छावणी कायम केली आहे. सासवड हें शिवाजीचें पुरंदर आणि इतर इलाखे यांना लागून आहे. विजापूरच्या प्रदेशालाहि तें जवळ पडतें. रमजान महिन्याच्या सात तारखेस (चौदा मार्च १६६५) मी सासवडच्या दिशेनें निघालों.

आदिलखानानें (विजापूरचा) मुल्ला खुर्रम नांवाचा इसम वकील म्हणून पाठविला आहे. तो तेथें येऊन आमचें सैन्य आणि छावणी पाहील, आणि मग माझा जो कांहीं निरोप असेल तो आदिलखानाला कळवील.

बादशहा सलामत, या भागांत आल्यावर मला दिसून आलें कीं आपल्याला पायदळ सैन्याची अतिशय आवश्यकता आहे. दहा हजार पायदळ सैन्य आपल्या खास दिमतींतून वापरण्यासंबंधीं आपण आज्ञा केली आहे. त्यांपैकीं पांच हजार तळकोंकणांत तैनात होतील. बाकीचे इतर ठाण्यावर नेमले गेले आहेत. याशिवाय मी सात हजार पायदळ शिपायांचें सैन्य उभें करीत आहे. ठिकठिकाणांहून मी हें सैन्य बोलावून घेत आहे. माझे अधिकारी सैन्यभरतीसाठीं फिरतील. सैनिकांना ते माझ्याकडे घेऊन येतील. त्यांत कोणी अडथळा करूं नये अशी आपण आज्ञा करावी. कोराखातमपूर भागांत उत्कृष्ट शिपाई मिळतात. तेथून मी दोन हजार शिपाई बोलाविले होते. पण त्या परगण्याचा चौधरी पूरणमल यास तेथील फौजदार यानें कैद केलें. त्यानें तिकडून सैनिकांना येऊं दिलें नाहीं. पण ते दोन हजार सैनिक इकडे येण्यांत दोन फायदे आहेत. एकतर ते बादशाही चाकरींत राहतील आणि दुसरें म्हणजे ते आपल्या प्रांतापासून दूर राहतील. फौजदारांनीं

त्यांच्या येण्याला अडथळा कां करावा हें कळत नाहीं. हे दोन हजार बंदुकची आणि धनुर्धारी (तिरंदाज) तिकडून इकडे येण्यांत कोणताच अडथळा निर्माण होऊं नये म्हणून आपण फौजदाराला आज्ञा करावी.

दुसरी गोष्ट अहमदनगर आणि परिण्डा हे किल्ले माझ्या छावणीपासून जवळ आहेत. आमचे युद्धकैदी त्या किल्ल्यांतून ठेवण्यांत यावेत असें मी तेथील किल्लेदारांना लिहिलें. याशिवाय मी इतर कांहीं बाबींविषयीं त्यांना लिहिलें. त्यांना या बाबतींत आपली आज्ञा हवी आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं पावसाळ्यानंतर मी माझ्या छावणींत बसून राहणार नाहीं. येथें भक्कम ठाणें कायम करीन आणि जेथें जेथें म्हणून गेल्यानें ही मोहीम यशस्वी होण्याची शक्यता आहे तेथें मी तडक कूच करून जाईन. आपण परिण्डा आणि अहमदनगर येथील किल्लेदारांना आज्ञा करावी कीं, मी युद्धकैदी किंवा सैन्याचा सरंजाम आणि इतर सामुग्री पाठविली तर त्यांची व्यवस्थितपणें देखरेख करावी. याशिवाय मी त्यांना लिहीन त्याप्रमाणें अंमलबजावणीविषयींहि त्यांना आपण कळवावें.

बादशहा सलामत—कर्नाटकच्या जमीनदाराकडे कुणाला तरी पाठवावें असें मीं ठरविल्याचें आपल्याला कळविलें होतें. येथें आल्यावर आदिलखान (विजापूर) आणि शिवाजी यांचा एकोपा झाल्याचें मला आढळून आलें. त्यामुळें कर्नाटकच्या जमीनदारांना बादशाही कृपेचे उमेदवार करून त्यांना विजापूरकरांपासून फोडावें असें मीं ठरविलें. म्हणजे ते तिकडून फुटून मला येऊन मिळतील. म्हणून मी कांहीं माणसें त्यांच्याकडे पाठविलीं आहेत. ते बादशाही चाकरींत प्रविष्ट होतील अशी मला आशा आहे. यावर जें घडेल तें मी आपल्याला कळवीन.

या मोहिमेंतील मोगल अधिकारी आणि इतर सेवक यांची आर्थिक स्थिति असमाधानकारक आहे. ते मदतीची याचना करीत आहेत. त्यांपैकीं प्रत्येक गरजूला आर्थिक मदत ही दिली पाहिजे. अगदींच मदत केली नाहीं तर हीं माणसें कामांतून जातील. म्हणून मी सरकारी खजिन्यांतून एक लाख रुपये काढून घेऊन माझ्या जवळ ठेविले आहेत. माझ्यापाशीं कोणी येऊन मदत मागितली तर कर्ज म्हणून मी त्याला मदत करीन. कुणाकुणाला मीं रकमा दिल्या तें मी आपल्याला कळवीनच; ही मदत मी आपल्यासाठीं घेतली नाहीं. म्हणून ही सरकारांतून दिली गेली असें समजून तशी आज्ञा व्हावी. वाजवी समजून ही विनंती केली आहे.

बादशहा सलामत—सेनेचें नेतृत्व करावयाचें म्हणजे शिपायांना, आपल्याला प्रोत्साहन मिळेल आणि प्रसंगविशेषीं शिक्षाहि होऊं शकेल अशी भावना राहिली पाहिजे. शिपाई सैनिक काय, आणि इतर संबंधित माणसें काय, त्यांचें आपण हित अहित करण्याचा आपल्याला अधिकार असला पाहिजे.

अमीरुलउमरा (शायस्ताखान) हे येथील सुभेदारीवरून हटले. (आतां शहाजादे आले आहेत.) येथील परिस्थिति पुढीलप्रमाणें आहे— सैन्यांतील

सैनिक आणि अधिकारी यांच्या बदल्या, नेमणुका, तनखा, जहागिरी, देणींघेणीं, बडतर्फी इत्यादींचा संबंध औरंगाबादेंतील अधिकारी यांच्या अधिकारांत आहे. आपलें कांहींहि काम काढून घेणें असेल तर लष्करांतील माणसाला येथील आपलीं कामें टाकून औरंगाबादेस जावें लागतें आणि तेथील कारभाऱ्याच्या मर्जीप्रमाणें वागावें लागतें. आपल्या सैन्यांतील सैनिक आणि अधिकारी यांची सेनापतीला पूर्ण माहिती असल्यामुळें कुणाशीं कसें वागावें हें त्याला कळतें. पण त्यांना बढती देणें, किंवा शिक्षा करणें त्याच्या हातांत नाहीं अशी येथें स्थिति आहे. शहाजादे हे जाणकार आहेत. या मोहिमेची जबाबदारी ज्यांच्यावर राहील ते आपल्या आज्ञेप्रमाणें शहाजाद्यांपाशीं रुजू होऊन विनंती करतील.

पण माझी विनंती ही कीं, दक्षिणच्या सुभ्यांतील सरंजामदारांच्या नेमणुका, बढत्या, बडतर्फ्या किंवा इतर सेवकांच्या नेमणुका, तैनाती, देणीं—घेणीं, यांचा संबंध औरंगाबादेच्या अधिकाऱ्यांशीं आहे तो बदलून ते अधिकार माझ्याकडे देण्यांत यावेत. ज्यांना तनखा, जागिरी हव्या आहेत त्यांनीं माझ्याकडे रुजू व्हावें अशी आज्ञा व्हावी. हा सेवक आपल्याच देखरेखीखालीं तयार झाला आहे. सरकारचें नुकसान होईल अशी कोणतीहि गोष्ट या सेवकाच्या हातून होणार नाहीं. जें जें कांहीं घडेल तें मी दिरंगाई न करतां आपल्याला कळवीत जाईन. सैन्यांतील अधिकारी आणि इतर सेवक यांना कळलें कीं त्यांचें बरें वाईट करण्याचा अधिकार माझ्याकडे आहे, तर ते मनःपूर्वक आपलीं कामें करूं लागतील. सरकारी कामें चांगलीं पार पडावीं याशिवाय माझा दुसरा कोणताच हेतु नाहीं. माझी विनंती आपल्या मर्जीस येत नसेल तर कांहीं हरकत नाही. माझें म्हणणें आपल्यापर्यंत पोहोंचलें हेंच समाधान. माझी विनंती मान्य झाली नाहीं असें लोकांना कळलें तर माझा अधिकार राहाणार नाहीं. म्हणून हा अर्ज गहाळ होईल अशी आशा करतों.

बादशहा सलामत—अफजल भटारा विजापुरी (अफजुलखान) याचा मुलगा फाजल हा बादशाही चाकरींत येऊं इच्छितो. त्याला जाणणारे लोक सांगतात कीं त्याला पांचहजारी आणि पांचहजार स्वारांची मन्सब दिल्यास फारच उपयुक्त होईल. विजापूर दरबारांत त्याला यापेक्षां कमी मिळत नाहीं. आपल्या बापाला (अफजलखानाला) मारलें म्हणून तो शिवाजीचा द्वेष करतो. त्याचें मन वळविण्यासाठीं मी त्याला पत्र लिहिलें आहे. आणि तूं अर्ज करून तुला काय हवें आहे तें लिही असें त्याला कळविलें आहे.

अशींच इतर माणसें येतील त्यांना मी समजावून त्यांचें मन वळविणार आहे. शिवाजीचे कांहीं सहकारी त्याला सोडून बादशाही चाकरींत येतील असा रंग दिसूं लागला आहे. त्यांना आणि इतरांना मन्सबी आणि जहागिरी इत्यादि देण्यासंबंधीं आपली जशी आज्ञा होईल तशी अंमलबजावणी केली जाईल.

बादशहा सलामत, सय्यद मन्सूरखान हा येथें आहे. त्याचें म्हणणें असें कीं, त्याचें घरदार आहे, त्या जिल्ह्यांतील अधिकारी, त्याचा भाऊ आणि इतर आप्त-स्वकीय यांना विनाकारण त्रास देत आहेत. त्यांच्यावर लक्ष असावें आणि त्यांना कोणत्याहि प्रकारें त्रास होणार नाहीं अशी काळजी घेण्यासंबंधीं अधिकाऱ्यांना ताकीद करण्यांत यावी.

(६)

विनंती की, मी ठिकठिकाणीं ठाणीं कायम केलीं आणि रमजान महिन्याच्या सात तारखेस (चौदा मार्च १६६५) मी सासवडला रवाना झालों. हें मी यापूर्वीच्या पत्रांत आपल्याला कळविलें आहे. या सुमारास बातमी आली कीं शिवाजी हा लोहगडाजवळ आला असून मी कूच करून पुढें निघतांच बादशाही मुलुखावर हल्ला करण्याचा त्याचा बेत आहे. हें ऐकून मला पुण्याच्या परिसरांत कांहीं मुक्काम करणें भाग पडलें. कुतुबुद्दीनखान हा खजिना पोहोंचविण्यासाठीं म्हणून जुन्नरला गेला होता. लोहगडच्या समोर आपलें ठाणें कायम होत आहे तर तूं तिकडे ताबडतोब रवाना हो म्हणजे मी पुढें कूच करीन असें मी कुतुबुद्दीन खानाला लिहिलें. रमजान महिन्याच्या चौदा तारखेस (एकवीस मार्च १६६५) तो, जुन्नरहून, मीं सांगित-लेल्या ठाण्याकडे रवाना झाला. तें ऐकून मी रमजान महिन्याच्या सोळा तारखेस (तेवीस मार्च १६६५) लोहगडच्या परिसरांतून पुढें निघालों. विजापूरचा वकील मुल्ला खुर्रम हा मला त्याच मुक्कामीं भेटला. त्यानें आदिलखानाचें काय म्हणणें आहे तें सांगितलें. मी पण त्याला पोक्तपणाच्या पुष्कळ गोष्टी सांगितल्या. त्यानें आपल्या धन्याला लिहून कळविलें असून तो उत्तराची प्रतीक्षा करीत बसला आहे. तो खरा आहे कीं खोटा आणि प्रतिकूल आहे हें अल्पावधींत कळून येईल. मला या बाबतींत जें कांहीं करणें योग्य वाटेल तें मी आपल्याला लिहून कळवीन.

बादशहा सलामत, मी लोणी या मुक्कामीं पोहोंचलों. हें गांव पुण्यापासून सासवडच्या दिशेनें पांच कोसांवर आहे. पुरंदरच्या पठारावर तें वसलें आहे. मराठे बादशाही मुलुखावर ज्या दोन मार्गांनीं आक्रमण करतात त्या मार्गावर हें गांव वसलें आहे. येथें एक भक्कम ठाणें कायम करणें आवश्यक आहे. म्हणून मी रामा आणि हणमंत (हणमंतराव निंबाळकर) यांना तीनशें स्वार, पायदळ, आणि बंदुकची देऊन येथील ठाणेदारीवर नेमलें आहे. मी तेथें तीन मुक्काम केले आणि तेथील गढी दुरुस्त आणि सुरक्षित केली.

रामा आणि हणमंत यांची हकीकत अशी आहे–हे मूळचे सुप्याचे राहणारे, निजामशाही काळांत हे वरंदाज आणि सुसंपन्न होते. बऱ्याच वर्षांपासून हे चांद्याच्या जमीनदाराच्या पदरीं होते. आपला निरोप घेऊन येत असतां मी आपल्याला चांद्याच्या जमीनदाराविषयीं सांगितलेंच होतें. चांद्याच्या जमीनदाराला मी कळविलें

होतें कीं तूं किंवा तुझा मुलगा हे या मोहिमेंत भाग घेऊं शकलात तर तुमचीं वतनें तुम्हांला परत मिळतील. रामा आणि हणमंत हे त्याचे अधिकारी होते. त्यांनाहि मी वरील अर्थाचीं पत्रें लिहिलीं. यावर ते चांद्याच्या जमीनदाराची नोकरी सोडून माझ्याकडे आले. चांद्याचा जमीनदार अगर त्याचा मुलगा हे येऊं शकले नाहीत. त्याचा विचार मी नंतर करीन. रामा आणि हणमंत हीं माणसें आपल्या फार उपयोगी पडतील. लोणीचें ठाणें महत्त्वाचें आहे. त्याचें रक्षण ते करतील. त्यांना काय मन्सब द्यावी याबद्दल वेगळी विनंती केली आहे. त्यांना या गांवाची (लोणी) जहागीर दिल्यास बरें होईल. गांवाचा वसूल पन्नास रुपये आहे. दोनशें स्वार सैनिक घेऊन ते हें ठाणें सांभाळूं शकतील. त्यांचे उरलेले शंभर सैनिक इतरत्र नेमले जाऊं शकतील.

बादशहा सलामत—शिरवळ येथें पूर्वी आपलें ठाणें नव्हतें. तेथें ठाणें कायम करणें अतिशय जरूरीचें आहे. तेथें मी सय्यद अब्दुल अजीज शुजातखानी याची नेमणूक केली आहे. पूर्वी त्याला एक हजारी आणि हजार स्वारांची मन्सब होती. आतां त्याला पांचशेंची आणि तीनशें स्वारांची मन्सब आहे. सय्यद अब्दुल अजीज हा अनुभवी आणि जाणकार असा शिपाईगडी आहे. मी त्याच्याबरोबर तीन हजार स्वार—सैनिक देऊन त्याला शिरवळकडे पाठविलें आहे. त्याच्या मन्सबींत मीं पांचशेंची आणि स्वारांच्या मन्सबींत तीनशेंची वाढ करून मीं त्याचा उत्साह वाढविला आहे. तो आतां एक हजाराचा आणि तीनशें स्वारांचा मन्सबदार बनला आहे. या बाबतींत आपली जी आज्ञा.

जावळीचे जमीनदार बाजी चंद्रराय, आणि अंबाजी गोविंदराव, आणि माणकोजी धनगर यांना मी आपल्याकडे बोलाविलें होतें. त्याबद्दल मी आपल्याला यापूर्वी कळविलें होतें. ते मला येऊन भेटले. त्यांना कितीच्या मन्सबी देण्यास हव्या याचा तपशील वाकनीसाच्या यादीवरून आपल्याला कळेल. त्यांना मी सय्यद अब्दुल अजीजखान, याच्याबरोबर पाठविलें आहे. त्या भागाची ते शक्य तितकी माहिती काढतील. परमेश्वर करील तर शिवाजीचा समूळ नाश होईल. तो कांहीं गडबड करूं म्हणेल तर त्याचा बंदोबस्त करतां येईल. आपल्या ज्या कांहीं सूचना असतील त्यांची मी वाट पाहात आहे.

शहाजाद्यांनीं लिहून कळविलें आहे कीं, विजापूर राज्यांतील निलंगा येथील किल्लेदार मलिकमहंमद हा किल्ला आपल्या हवालीं करून बादशाही नोकरींत प्रविष्ट होऊं इच्छितो. मीं उत्तरांत लिहिलें कीं किल्ला महत्त्वाचा आणि भोंवतालचा प्रदेश समृद्ध असल्यास तो हस्तगत करण्यास हरकत नाहीं. पण निलंग्याला मातीची गढी आहे आणि तो तालुकाहि समृद्ध नाहीं. बादशहाच्या आज्ञेवांचून या प्रकरणांत आपण घाई करणें योग्य होणार नाहीं. किल्लेदाराला आपण आशा लावून ठेवावी. आणि सगळी हकीकत बादशहांना कळवून त्यांची आज्ञा होईल तसें करावें.

बादशहा सलामत, आदिलखान (विजापूर) आणि शिवाजी यांचा एकोपा झाला याबद्दल मला तिळमात्र संशय नाहीं. पण ती जूट आतां मी फोडीत आहें. आपल्या सैन्यांतील कांहीं अफगाणांना व्यापाऱ्यांचें सोंग देऊन विजापूर राज्यांतील कांहीं किल्ल्यांकडे पाठविलें आहे. एखादा किल्ला सर करून घेणें शक्य असल्यास तसें करून विजापूरकरांना खडबडून जागें करावें असा माझा बेत आहे.

सिद्दी जौहर यानें निरोप पाठविला आहे कीं सोलापूरचा किल्ला माझ्या ताब्यांत आहे. मला पांच हजारी आणि तीन हजार स्वारांची मन्सब मिळाली तर मीं तो किल्ला मोगलांच्या हवाली करीन. पण हीं दक्षिणचीं माणसें बोलल्या-प्रमाणें वागत नाहींत. त्यांच्यावर क्वचितच विश्वास ठेवतां येईल. पण मातबर माणसें पाठवून हें प्रकरण यशस्वी होईल असा रंग दिसला तर यासंबंधीं आपल्या काय सूचना आहेत? ही मसलत कशी तडीस जाईल हें सांगतां येत नाहीं. म्हणून आपण आपल्या सूचना गुप्तपणें आणि त्वरित पाठवाव्या.

(७)

विनंती कीं मी सासवडला पोहोंचणार असल्याची हकीकत यापूर्वी आपल्याला कळविली आहे. मी घाटाची वाट नीट करविली. रमजान महिन्याच्या बावीस तारखेस गुरुवारीं (एकोणतीस मार्च १६६५) मी तोफा, रेहकले आणि अघाडीचें सैन्य दिलेरखानाबरोबर पुढें रवाना केलें. त्यानें दोन कोस पुढें जाऊन घाट चढून मुक्काम करावा, असें मीं त्याला सांगितलें. रमजान महिन्याच्या तेवीस तारखेस शुक्रवारीं (तीस मार्च १६६५) मी पण पुढें निघालों. दाऊदखान यास मी घाटाच्या पायथ्यापाशीं सोडलें. दुपारपर्यंत त्यानें सैन्य घाटावर सुरक्षितपणें आणावें अशी मीं सूचना दिली. जे कांहीं उरतील त्यांना चंदावल- (पिछाडी) च्या पथकांनीं आणावें असें ठरलें. मध्यान्हीच्या सुमारास मी घाटमाथ्यावर दोन कोसांवर कायम केलेल्या छावणींत पोहोंचलों.

त्याच दिवशीं म्हणजे शुक्रवारीं सकाळीं दिलेरखान हा आघाडीचीं पथकें बरोबर घेऊन पुढें निघाला होता. 'माझ्या छावणीसाठीं एखादी जागा निवड' असें मीं त्याला सांगितलें होतें. योग्य जागा शोधून काढण्याच्या प्रयत्नांत तो पुरंदरच्या किल्ल्याजवळ पोहोंचला. किल्ल्याच्या वाटेवर शत्रूंच्या चौक्या होत्या, त्यांना इकडे लोक 'माची' असें म्हणतात. या चौक्या डोंगराच्या चढणीवर पसरल्या होत्या. शत्रूचे सैनिक डोंगरावरून खालीं उतरले. त्यांच्या हातांत बंदुकी होत्या. त्यांनीं आमच्या पथकावर हल्ला केला. पण मोगलांनीं त्यांना हटविलें. आणि त्यांना पाठलाग करून माची हस्तगत केली. शत्रूंपैकीं कांहीं मारले गेले. बाकीचे पळून गेले. पुरंदर किल्ला कधीं मोगलांच्या ताब्यांत आला नव्हता. किल्ल्याची माची आम्ही अशा रीतीनें हस्तगत केली याला कारण परमेश्वराची कृपा आणि बादशहाचें भाग्य हेंच होय!

दिलेरखानाकडून ही बातमी कळली त्या वेळीं रायसिंग राठोड, कीरतसिंग, इत्यादि माझ्या छावणींत होते. मी त्यांच्या बरोबर तीन हजार सैन्य देऊन त्यांना ताबडतोब दिलेरखानाकडे रवाना केलें. दाऊदखान यास मीं आज्ञा केली कीं छावणचिं मी पाहून घेईन. तूं पुढें जाऊन किल्ल्याची टेहेळणी कर आणि याबद्दल जें कांहीं आवश्यक असेल तें अंमलांत आण. दाऊदखान हा घाटाच्या पायथ्याशीं होता. त्याला ही बातमी कळली. तो अनुभवी आणि जाणकार आहे. माझ्याकडे येऊन पुढें जाण्यांत दिरंगाई होण्याचा संभव आहे हें ओळखून तो सरळ पुरंदरच्या किल्ल्याकडे रवाना झाला.

तोंपर्यंत संध्याकाळ झाली. छावणींत माझ्याशिवाय कोणीच नव्हतें. रात्रीं पुढें कूच करण्यांत अडचणी होत्या म्हणून मी तेथेंच मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशीं म्हणजे रमजान महिन्याच्या चोवीस तारखेस (एकतीस मार्च १६६५) शनिवारीं मी पुढें रवाना झालों, सैन्य सुरक्षित असावें याची मीं खबरदारी घेतली. पुरंदर आणि सासवड या दोन्ही स्थळांच्या मध्यभागीं मीं मुक्काम केला. दोहोंमधील अंतर दोन कोसांपेक्षां अधिक नाहीं. त्या ठिकाणीं पोहोंचतांच मी प्रथम दाऊदखान आणि कीरतसिंग हे ज्या ठिकाणीं तळ करून होते तेथें पोहोंचलों. तेथून मी किल्ल्याची पाहणी केली. किल्ला मजबूत आहे. शिवाजीच्या किल्ल्यांपैकीं इतका बळकट असा दुसरा किल्ला नाहीं. हा पूर्वी निजामशाहींत होता. तो आतां शिवाजीच्या ताब्यांत आहे. वेढा घालून जाण्यायेण्याच्या वाटा बंद केल्याशिवाय किल्ला हातीं येणें शक्य नाहीं. या किल्ल्यानें सगळा डोंगरच व्यापला आहे असें म्हणतां येईल. किल्ला मणबूत करण्यांत आलेला आहे. शिवाजीचे राजगड आणि इतर किल्ले हे येथून जवळ आहेत. किल्ल्यावर त्यानें सैन्य जमविलें आहे. आदिलखानाचा आणि शिवाजीचा एकोपा झाला. या गोष्टी घडल्या, पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. किल्ला न घेणें हें केव्हांहि योग्य होणार नाहीं.

या गोष्टीचा मीं पुष्कळ विचार केला. शेवटीं मी असें ठरविलें कीं रुद्रमाळ जिंकून घ्यावा. पुरंदर किल्ल्याचा हा एक प्रमुख भाग असला तरी पुरंदरपासून वेगळा असा हा किल्ला म्हणतां येईल. हर प्रयत्नानें रुद्रमाळ ताब्यांत आणण्याचें मीं ठरविलें. पावसाळा एक महिन्यानें सुरू होईल. आपल्याला जास्त अवधि नाहीं. परमेश्वराच्या कृपेनें आणि बादशहाच्या भाग्यानें रुद्रमाळ हातीं येईल अशी आशा आहे. त्यामुळें शिवाजीचा सर्वांत मजबूत असलेला पुरंदरचा किल्ला आमच्या ताब्यांत येऊं शकेल. पावसाळ्याच्या पूर्वी पुरंदर आमच्या ताब्यांत आला नाहीं तरी आम्ही रुद्रमाळ येथें मजबूत ठाणें कायम करूं. आणि पावसाळ्यानंतर पुढील योजनेचा विचार करूं.

(८)

विनंती कीं रुद्रमाळचा किल्ला म्हणजे पुरंदरची किल्ली, रुद्रमाळ म्हणजे पुरंदरचा रक्षक किल्ला. शिवाजीचा मोड करण्याच्या कामांतील आमचें हें प्रथम आणि महत्त्वाचें कार्य होय. शव्वाल महिन्याच्या आठ तारखेस (चवदा एप्रिल १६६५) शुक्रवारीं रुद्रमाळ आमच्या ताब्यांत आला. त्याची तपशीलवार हकीकत अशीः

आम्ही किल्ल्याला वेढा घातला हें आपल्याला पूर्वीं कळविलेंच आहे. यानंतर आम्ही अवघड अशा डोंगराच्या माथ्यावर तोफा चढवूं लागलों. तोफा ओढण्याच्या कामावर मी आपलीं सगळीं शागीर्दपेशा माणसें लावलीं. प्रथम आम्ही अब्दुल्लाखान नांवाची तोफ रुद्रमाळच्या समोर असलेल्या डोंगरावर चढविली. या कामांत आम्हांला तीन दिवस लागले. यानंतर पुढील साडेतीन दिवसांत आम्ही फत्ते लष्कर नांवाची तोफ चढविली. तिसरी तोफ हवेली ही पण जवळ जवळ वर डोंगरावर पोहोंचविण्यांत आली होती. या अवधींत आमच्याकडून रुद्रमाळ किल्ल्यावर तोफांचा सारखा भडिमार चालू होता. किल्ल्याच्या बुरुजाचा पाया डळमळूं लागला. आमचे बेलदार हे बुरुजाच्या पायथ्याशीं जाऊन खणूं लागले (सुरुंगासाठीं).

शव्वाल महिन्याच्या सात तारखेस (तेरा एप्रिल १६६५) गुरुवारीं मध्यान्हापर्यंत दिलेरखान यानें आपलीं माणसें आणि इतर सैनिक यांना बुरुजावर चढविलें. चढण इतकी अवघड होती कीं एका वेळीं दोनच माणसें आणि तींहि कष्टानें, बुरुजापर्यंत जाऊं शकत. पण दिलेरखानाच्या माणसांनीं खूप परिश्रम करून बुरुजावर ताबा मिळविला. शत्रूपैकीं कांहींजण मारले गेले आणि कांहीं जखमी झाले. शत्रूचे सैनिक निराश झाले. आमचें सैन्य रुद्रमाळाच्या आंतील कोटाच्या वेशीवर पोहोंचलें आणि किल्ला घेण्याच्या तजविजीस लागले. पण किल्ल्यांतील शिबंदी शरण आली. त्यांनीं अभयाची याचना केली. शरणागतांना मारणें ही आपली पद्धत नाहीं म्हणून किल्ल्यांतील लोकांना अभय देण्यांत आलें. शव्वाल महिन्याच्या आठ तारखेस (चौदा एप्रिल १६६५) शुक्रवारीं किल्ल्यांतील लोकांनीं किल्ला आमच्या ताब्यांत दिला. नंतर ते किल्ल्यांतून बाहेर निघाले. त्यांनीं माझी गांठ घेतली. आपल्याला शिवाजीकडे जाऊं द्यावें अशी त्यांनीं विनंती केली. वास्तविक पाहतां त्यांना सोडून देणें योग्य नव्हतें. पण पुरंदर किल्ल्यांतील लोकांना (आपल्यालाहि पुढें मागें अभय मिळेल अशी) आशा वाटत असल्यास तिचा भंग होऊं नये या धोरणानें मी त्यांचें समाधान करून त्यांना निरोप दिला.

दिलेरखान आणि त्याचे सहकारी यांनीं उत्कृष्ट कामगिरी केली याबद्दल त्यांना धन्यवाद! खरें म्हणजे हें बादशहाच्या भाग्यानें घडलें. शत्रूनें आपली स्वतःची झालेली अशी दुर्दशा यापूर्वीं अनुभविली नव्हती. परमेश्वरकृपेनें

त्यांना यापेक्षांहि वाईट दिवस पाहावे लागतील. शिवाजीला चांगलाच धडा मिळाला आहे.

बादशहा सलामत, येथें पावसाळ्यांत छावणी करून राहावें लागेल. दुसरें कांहीं काम राहाणार नाहीं. म्हणून मीं असें ठरविलें आहे कीं, पुरंदरला वेढा घालावा आणि तो जिंकून घेण्याचा प्रयत्न करावा. परमेश्वर कृपा करील तर पावसाळा सुरू होण्यापूर्वी किंवा तें न जमल्यास ऐन पावसाळ्यांत मी पुरंदरचा किल्ला जिंकून घेईन. सगळें सैन्य या कामासाठीं एकत्र झालें असून माझ्या म्हणण्या-सारखें काम करून दाखवील याची आपण खात्री बाळगावी. पावसाळ्यांत हा किल्ला सर झाला तर आम्ही सगळे मोगल सरदार शिवाजीचा संपूर्ण मोड करण्याच्या मागें लागूं. नाहींतर दिलेरखान हा किल्ल्याच्या समोर बसून राहील. किल्ला घेतल्याशिवाय तो येथून हलणार नाहीं. दाऊदखान, राजा रायसिंग आणि इतर सरदार, हे शत्रूचा प्रदेश उध्वस्त करण्याच्या कामावर नेमले आहेत. मी त्यांच्याबरोबर ठिकठिकाणीं फिरत राहीन.

बादशहा सलामत, माझा बेत असा होता कीं ठिकठिकाणच्या ठाण्यावरचीं पथकें इकडे बोलावून घ्यावीं. लष्करच्या कहींचे (रसद आणणे, शत्रूची माहिती काढणें वगैरे) काम या पथकांना द्यावें; आणि दाऊदखानाच्या नेतृत्वाखालीं सैन्य तयार करून त्याला राजगडाकडे पाठवावें म्हणजे शत्रु गडबडून जाईल.

सरफराजखान हा लष्करांत आला नाहीं. तो आपल्या जागेवरून तमाशा पाहात बसला आहे. दुसऱ्यांना धडा मिळावा म्हणून मी त्याची मन्सब एक हजारानें आणि एक हजार स्वारानें कमी केली आहे. त्याच्या तनखा–जागिरीचा वरीलपुरता भाग जप्त करून खालसा करावा अशा अर्थाची आज्ञा आपण सुभ्याच्या अधिकाऱ्यांना पाठवाल अशी आशा करतों.

ठाण्यावरचीं पथकें इकडे येऊन दाखल झाल्यानंतर, मी सैन्यें (राजगडाकडे) पाठविण्याची योजना अंमलांत आणीन.

बादशहा सलामत, यापूर्वी तोफांचा उपयोग केवळ भुईकोट किल्ल्याविरुद्ध करतां येतो असा समज होता. पण या मोहिमेंत एक गोष्ट दिसून आली. डोंगरी किल्ल्यावर हल्ला करण्यासाठीं तोफांना डोंगराच्या कमरेपर्यंत (मध्यापर्यंत) चढवितां येणें शक्य आहे. या भागाला इकडे माची म्हणतात. त्या भागावरून किल्ल्यावर परिणामकारक असा मारा करतां येतो. रुद्रमाळच्या वेढ्यांत आम्हीं असेंच केलें.

या मोहिमेंत आम्हाला प्रामुख्यानें शिवाजीच्या डोंगरी किल्ल्यावरच हल्ले करणें आहे. आणि एखादाच किल्ला आहे असें नाही. म्हणून विनंती कीं मरहूम-खानखानान यांच्या तोफा आपल्याजवळ आहेत, त्यांपैकीं दोन-तीन मोठ्या तोफा मला देण्यांत येतील तर फार कृपा होईल. दौलताबाद आणि बुऱ्हाणपूर येथील

अधिकाऱ्यांना आपण आज्ञा करावी कीं, तेथें नव्यानें तयार झालेल्या तोफा आहेत त्या माझ्याकडे पाठवाव्या. वाजवी होते तें लिहिलें आहे.

(९)

आपण पाठविलेलें पत्र व राज्यारोहण दिनाचा खिलतीचा पोशाक हीं शव्वाल महिन्याच्या वीस तारखेस (सव्वीस एप्रिल १६६५) मिळालीं. मी आपल्याला कळविलेल्या योजना आणि मांडलेल्या सूचना आपण मान्य केल्या हें मी माझें भाग्य समजतों.

चौलचें बंदर आणि तळकोंकणचे इतर भाग मी जिंकून घ्यावे अशी आपण आज्ञा केली होती. पण इकडील परिस्थितिबद्दल मी अनेक पत्रांतून आपल्याला कल्पना दिली होती. शिवाजी आणि आदिलशहा यांची दुर्दशा करावी या विचारानें आणि हीच मसलत योग्य असें समजून, मी प्रथम सासवडकडे आलों. त्यानंतर पुरंदरच्या किल्ल्याला वेढा घालावा लागला. दिलेरखान हा इतर मोगल अधिकाऱ्यांना (त्यांची यादी सोबत दिली आहे) बरोबर घेऊन पुरंदरच्यासमोर तळ देऊन बसला आहे. मला चहूंकडे फिरावें लागतें आणि शत्रूचा तपास काढावा लागतो.

अशा परिस्थितींत चौलचें बंदर आणि तिकडील प्रदेश जिंकून घेण्याचा बेत करावयाचा तर त्याकरितां सुसज्ज असें वेगळें सैन्य तयार करावें लागेल. हें सैन्य स्वयंपूर्ण हवें. इतर सैन्याच्या मदतीची त्यास गरज पडूं नये. या सैन्याला त्या ठिकाणीं उत्तम रीतीनें ठाण मांडून बसणें जमलें पाहिजे. अशाच प्रकारचें सैन्य पाठवावें लागेल. या वेळीं हें कठीण आहे. बरें, असें सैन्य पाठविलें तरी या पावसाळ्यांत इतक्या लांब अंतरावर सैन्याला रसद पाठविणें हेंहि कठीणच !

दाऊदखानाला आपलें सैन्य घेऊन प्रदेश उध्वस्त करण्याच्या कामावर मीं नेमलें आहे. तें तो पार पाडीत आहे. मी ही मोहीम पुढच्या वर्षावर ढकलीत नाहीं. पावसाळा संपतांच मी शिवाजीचा मोड करण्याच्या मागें लागेन. या अवधींत (आम्ही कांहीं करीत नाहीं असें समजून) शिवाजी निश्चिंत होऊन गाफील राहील. या अवधींत गुजरातेच्या बंदरांतून आपलीं जहाजें आणि गराबा हीं निघून शिवाजीच्या प्रदेशावर (समुद्रकिनाऱ्याच्या) चाल करून जातील तर त्याची पुष्कळ संपत्ति आपल्या हातीं पडेल.

(आदिलशाही) तळकोंकण या प्रदेशासंबंधीं मी आदिलखान (आदिलशहा) याचा वकील मुल्ला खुर्रम याजबरोबर बोलणीं केलीं होतीं. त्यानें आदिलखानाला सर्व हकीकत लिहून पाठविली. आदिलखानानें आपल्या उत्तरांत पुढीलप्रमाणें लिहिलें आहे.

" मी आपला एकनिष्ठ सेवक आहें. मी कायेनें, वाचेनें आणि मनानें शिवाजीच्या विरुद्ध आहे." माझ्याकडून आपल्याला जी पेशकश (खंडणी)

भरावी लागते त्यांतील बराचसा भाग आपण माफ केला तर त्या रकमेंतून मी सैन्य सरंजाम तयार करून तळकोंकणचा प्रांत (शिवाजीकडून) जिंकून घेण्यासाठीं सैन्य रवाना करीन.

दुसरें असें कीं कराराप्रमाणें शिरवळचें ठाणें माझ्या हद्दींत आहे. तेथें मोंगल लष्कर पाठविण्याची जरूर नाहीं. माझें लष्कर तेथें राहील. या गोष्टीला आपण मान्यता द्यावी. ''

याच्या उत्तरांत मीं म्हटलें कीं तुमच्या बोलण्यांत आणि वागण्यांत तफावत आहे. तळकोंकण घेण्याशीं याचा काय संबंध आहे ? तळकोंकण कोठें आणि पाईन घाट कोठें ? तुम्ही बादशहाचे एकनिष्ठ सेवक राहून त्यांची कृपा संपादन केलीत तर तुमचें राज्य सुरक्षित राहील. तुम्ही आपल्या सैन्याचा विचारच करूं नये. आमच्या सैन्याच्या मानानें तुमचें सैन्य काय करूं शकेल ?

आपल्याला खंडणींत सूट मिळाल्यास आम्ही तळकोंकण घेऊं असें तुम्ही म्हणतां. हें तुमचें म्हणणें कितपत योग्य आहे ? आणि या रकमेच्या खर्चानें तुम्ही तळकोंकण कसें घेऊं शकाल ? तुमचा मुलूख तुम्हांला देण्यांत आला तर ती बादशहाची कृपा म्हणून समजा. नाहींतर आज जो कांहीं मुलूख शिवाजीच्या ताब्यांत आहे आणि पुढें राहील तो बादशाही मुलूखच समजला जाईल. परमेश्वरकृपेनें आणि बादशहाच्या भाग्यानें तो आमच्या ताब्यांत येऊन बादशाही मुलूख बनेल. तो आमच्या ताब्यांत आल्यानंतर तुमच्या विनंतीचा विचार करण्यांत येईल.

शिरवळसंबंधीं तुमची विनंती अयोग्य आणि अप्रस्तुत आहे. माझा शिवाजीशीं बिघाड झाला आहे असें आज तुम्ही म्हणतां, स्पष्ट याचा अर्थ असा कीं आतांपर्यंत तुमच्यांत आणि त्याच्यांत एकोपा होता. म्हणजे तुम्ही बादशहाबरोबर विरोध पत्करला. अशा परिस्थितींत बादशहाबरोबर झालेले करार कायम राहणार नाहींत. तुम्हांला योग्य हेंच कीं तुम्ही वाईट विचार मनांतून काढून टाकून बादशहाशीं निष्ठेनें वागा. अद्याप बादशहांनीं तुम्हाला शिक्षा केली नाहीं. तुम्ही असें न वागाल तर तुमचा परिणाम काय होईल हें कुणाहि विचारवंताला समजूं शकेल.

बादशहा सलामत, खरें पाहिलें तर आदिलखान (आदिलशहा) आणि शिवाजी यांचा एकोपा आहे ही गोष्ट विशेष महत्त्वाची नाहीं. पण आपलीं सैन्यें इतर मोहिमांत गुंतलीं आहेत, यामुळें विजापूरकरांशीं एकदम कडक धोरण स्वीकारणें योग्य नव्हे असें मला वाटलें. तसेंच त्यांना निराश करणेंहि बरें नाहीं असें मीं ठरविलें. म्हणून मी मुल्ला खुर्रम यास येथेंच ठेविलें. आपल्यातर्फे आपले सेवक इब्राहीम, आणि गोविंद पंडित आणि माझा एक ब्राह्मण नोकर यांना मी आदिलखानाकडे (आदिलशहा) पाठविलें. त्याला मी तपशीलवार पत्र लिहिलें आहे त्या पत्राची एक प्रत मी आपल्याकडे पाठवीत आहे.

गोवळकोंड्याचा कुतुबुल्मुल्क (कुतुबशहा) यानें एका विश्वासू ब्राह्मण मुत्सद्दयाबरोबर एक पत्र आणि जडजवाहीर हीं पाठविलीं आहेत. हीं रत्नें आपल्या लायकीचीं नाहींत. पण त्याचें कौतुक (कुतुबशहाचें) म्हणून तें जडजवाहीर मी आपल्याकडे पाठवीत आहें.

कर्नाटकाच्या जमीनदारांकडे मीं माणसें पाठविलीं होतीं. शिवाप्पा नाईक (बिदनूर) आणि बसवापट्टणचा जमीनदार यांनीं बादशहाबद्दल आपली निष्ठा व्यक्त केली आहे. मी त्यांना समाधानाचीं पत्रें आणि भेटीदाखल वस्त्रें पाठविलीं आहेत. यानंतर जें कांहीं ठरेल तें आपल्याला मी लिहून कळवीन.

विजापुराहून बातमी आली आहे कीं बहलोल हा नरकांत गेला आहे. हे सगळें बादशहाच्या भाग्यानें घडलें आहे.

माझ्या म्हणण्याप्रमाणें आपण मुखत्यारखान आणि इस्माईलखान यांच्या नांवें हुकूम पाठविले हा माझा मान आहे असें मी समजतों. सैन्यासंबंधीचे सगळे अधिकार आपण मला दिलेत हें मी आपलें मोठें भाग्यच समजतों. नायबशफीखान हा दप्तर येथें घेऊन आल्यानंतर मी आपल्याला प्रत्येक प्रकरणाबद्दल लिहीन आणि आपल्या आज्ञेप्रमाणें वागेन. शहाजाद्यांना (मुअज्जम) पण मी सगळी हकीकत लिहून कळवीन. कामें चांगलीं पार पाडावींत याशिवाय माझा अन्य हेतु नाहीं. परमेश्वरकृपेनें आणि आपल्या भाग्यानें मी शिवाजीचा लवकरच नायनाट करीन. येथील प्रकरणें आपल्या इच्छेप्रमाणें पार पडतील.

बादशहा सलामत, राजगड हें शिवाजीचें मुख्य ठिकाण आहे. त्या भागांत मी सुसज्ज अशीं सैन्यें पाठविलीं आहेत. असें करण्याचीं कारणें म्हणजे पुढील-प्रमाणें होत :

पाहिलें कारण म्हणजे आदिलखान (आदिलशहा) आणि शिवाजी यांना दाखवून द्यावयाचें होतें कीं, आमचें सगळें सैन्य एकच किल्ल्याच्या वेढ्यांत गुंतून राहिलें नाहीं. इतर मोहिमांसाठीं पण आमचीं सैन्यें सुसज्ज आहेत.

दुसरें कारण असें कीं, आतांपर्यंत शिवाजीचें सैन्य बादशाही मुलखांत घुसून उच्छाद मांडीत असे. आतां आमचीं सैन्यें त्याच्या प्रदेशांत घुसून तो प्रांत उध्वस्त करतील हें त्याला दाखवून द्यावयाचें आहे. तो किंवा त्याचीं सैन्यें पुन्हा तयार होऊन येण्याची संधीच देण्यांत येणार नाहीं. त्याचा प्रदेश उध्वस्त करावा इकडे माझें सतत लक्ष राहील.

वरील कारणामुळें मी दाऊदखान, राजा रायसिंग राठोड, आणि इतर सरदार यांच्याबरोबर सहा हजारांपेक्षां अधिक सैन्य देऊन, राजगड, रोहिडा आणि कोंडाणा या भागांत त्यांना तैनात केलें आहे. त्यांना मीं आज्ञा केली आहे कीं, तो प्रांत पूर्णपणें निर्जन आणि बेचिराख करून टाकावा. आणि शत्रूचे सैनिक युद्धास

प्रवृत्त होऊन चालून आले तर त्यांचा निःपात करावा. शिवाजीचीं ठाणीं उध्वस्त करावीं आणि त्याच्या प्रांतांत उच्छाद मांडून तेथील मालमत्ता लुटावी अशा अर्थाचीं पत्रें मी लोधीखान आणि कुतुबुद्दीनखान यांना पाठविलीं आहेत. हेतु हा कीं, चहूंकडून धामधूम उडवून शिवाजीच्या सैन्याची पांगापांग होईल असें करावें. बालाघाट (घाटावरचा) आणि पाईनघाट (घाटाच्या पायथ्याशीं) या प्रांतांत आम्ही अल्पावधींत विलक्षण धामधूम उडवून देऊं अशी मला आशा वाटते. तळकोंकणचा मन्सुबा परमेश्वर करील तर, पुढील वर्षी उत्तम तऱ्हेनें तडीस जाईल. आवश्यक वाटलें तें लिहिलें आहे.

(१०)

विनंती कीं आपलें पत्र जिल्काद महिन्याच्या पहिल्या तारखेस (सहा मे १६६५) मिळालें. आपण लिहिलें आहे कीं तुमच्या मुत्सद्दीगिरीवर माझा पूर्ण विश्वास आहे. शिवाजीचा संपूर्ण नायनाट करण्यासाठीं तुम्हांला जें कांहीं योग्य वाटेल तें करा. यावर विनंती कीं माझ्यामध्यें शहाणपणाचे आणि धोरणीपणाचे जे गुण आहेत, ते सर्व मी आपल्या तालमींत वाढल्यामुळें प्राप्त झाले आहेत. ज्या कामावर माझी नेमणूक झाली आहे त्याचाच मला रात्रंदिवस ध्यास लागला आहे. त्याशिवाय दुसरा विचार नाहीं. परमेश्वराच्या कृपेनें आणि आपल्या भाग्यानें शिवाजी हा लवकरच नेस्तनाबूद होईल अशी मला आशा आहे.

सोलापूरच्या प्रकरणासंबंधीं आपण कांहींच लिहिलें नाहीं. व्यापाऱ्यांचें सोंग देऊन मीं पाठविलेली माणसें अद्याप परत आलीं नाहींत. दाक्षिणी लोकांच्या शब्दावर विश्वास ठेवतां येत नाहीं. विजापुराकडून उत्तर येईपर्यंत मला जसें योग्य दिसेल तसें मी करीनच. पण आपली इच्छा काय आहे हें मला कळलें तर बरें.

बादशहा सलामत, शिवाजीचा प्रदेश उध्वस्त करण्यासाठीं दाऊदखान, राजा रायसिंग आणि इतर सरदार यांना मी रवाना केलें होतें. ती हकीकत मी आपल्याला यापूर्वी कळविली आहे. शव्वाल महिन्याच्या एकवीस तारखेस हे सरदार रोहिडा किल्ल्याच्या जवळ पोहोंचले (सत्तावीस एप्रिल १६६५). त्या भागांतील सुमारें पन्नास खेडीं त्यांनीं जाळून उध्वस्त केलीं. डोंगराच्या कुशींत चार समृद्ध खेडीं होतीं. अद्यापपर्यंत मोगलांच्या फौजा तिकडे गेल्या नव्हत्या. आमच्या तुकड्या त्या खेड्यांवर चालून गेल्या. आपल्याला अधिक कुमक हवी असें त्यांनीं सांगून पाठविलें. दाऊदखानानें आघाडी (हरावल) ची फौज देऊन राजा रायसिंग आणि अचलसिंग कछवाहा यांना त्याची मदत करण्यासाठीं म्हणून पाठविलें. बादशहाच्या भाग्यानें शत्रू तीं गांवें सोडून पळून गेले. आमच्या सैन्यांनीं तीं गांवें जाळून उध्वस्त केलीं. अनेक माणसें आणि जनावरें यांना पकडण्यांत आलें. शव्वाल महिन्याच्या बावीस तारखेस (अठ्ठावीस एप्रिल १६६५) आमच्या सैन्यानें तेथेंच तळ दिला. दुसऱ्या दिवशीं आमचें सैन्य राजगडाच्या रोखानें निघालें. वाटेंतील

गांवें जाळीत आणि सगळा प्रदेश उध्वस्त करीत शव्वाल महिन्याच्या चोवीस तारखेस (तीस एप्रिल १६६५) आमचें सैन्य राजगड किल्ल्याच्या पायथ्याशीं पोहोंचलें. आमच्या आघाडीच्या पथकांतील सैनिक किल्ल्याच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोंचले होते; पण किल्ल्यांतील लोकांना बाहेर पडण्याची हिंमत झाली नाहीं. आमचे सैनिक तेथें थांबले नाहींत. त्यांनीं जवळपासचीं खेडीं जाळून बेचिराख केलीं. तो भाग डोंगराळ आहे, म्हणून तेथून दोन कोसांवर योग्य जागा पाहून आमच्या सैन्यानें तेथें तळ दिला. शव्वाल महिन्याच्या पंचवीस तारखेस (एक मे १६६५) हें सैन्य शिवापुरास परतलें. शव्वाल महिन्याच्या सव्वीस तारखेस (दोन मे १६६५) या सैन्यानें कोंडाण्याच्या भोंवतालचा प्रदेश उध्वस्त केला.

मी दाऊदखानाला लिहिलें कीं, लोहगड भागांत शिवाजीचें सैन्य गोळा झालें आहे असें ऐकण्यांत आहे तर तुम्ही जरूर असेल तितकें सैन्य बरोबर घेऊन तिकडे जा आणि शत्रूचा मोड करून या. दाऊदखान हा शव्वाल महिन्याच्या सत्तावीस तारखेस (तीन मे १६६५) पुण्याला आला. कुतुबुद्दीनखान याला पण मीं लिहिलें होतें. त्यानें धामधूम आवरती घेतली. शिवाजीच्या इलाख्यांतील कांहीं कैदी आणि जनावरें हीं घेऊन तो पुण्यास आला. तेथें त्याची आणि दाऊदखान याची गांठ पडली. शव्वाल महिन्याच्या अठ्ठावीस तारखेस (चार मे १६६५) पुण्याहून पांच सहा कोस अंतरावर असलेल्या चिंचवड या गांवीं त्यांनीं तळ दिला. एकोणतीस तारखेस (पांच मे १६६५) दाऊदखान, राजा रायसिंग इत्यादींनीं आपलें सैन्य तयार करून पुढें कूच केलें. टेहळणीसाठीं त्यांनीं मोगलांचीं पथकें पुढें रवाना केलीं. हीं पथकें पोहोंचतांच शत्रुसैन्य गोळा होऊन त्यांच्याशीं मारामारी करूं लागलें. आमचीं पथकें ठाण मांडून लढूं लागलीं. त्याबरोबरच त्यांनीं दाऊदखानाकडे कुमकेची मागणी केली. दाऊदखानानें राजा रायसिंग, अचलसिंग, आणि कुतुबुद्दीनखान यांस पाठविलें. त्यांच्या तुकड्यांनीं शत्रूवर चाल केली. आणि बाण व बंदुकी यांचा मारा केला. निकराची लढाई झाली. शत्रूपैकीं कित्येकजण मारले गेले. कित्येक जखमी झाले. बाकीचे लोहगडच्या दिशेनें पळून गेले. मोगलांनीं त्यांचा पाठलाग केला आणि लोहगड आणि जवळील इतर तीन किल्ल्यांच्या मधील मैदानांत आपला तळ दिला. कुतुबुद्दीनखान यानें उत्कृष्ट कामगिरी केली. तो धन्य होय. राजा रायसिंग यानेंहि त्याला उत्तम प्रकारें साथ दिली. आपल्या सेवकांनीं बालाघाट आणि पाईन घाटावर असलेल्या शत्रूंचा मोड करून प्रदेश पूर्णपणें उध्वस्त केला. यानंतर जिल्कादच्या चौदा तारखेस (एकोणीस मे १६६५) ते मुख्य लष्करांत येऊन दाखल झाले.

कुतुबुद्दीनखान आणि त्याचे इतर सहकारी यांचें आपण कौतुक कराल अशी मी आशा करतों. त्यांच्या संबंधीं मी माझा मुलगा रामसिंग यास लिहिलें

होतें, तें त्यानें आपल्याला कळविलें असेलच. माझी विनंती मान्य झाल्यास मला आणि कुतुबुद्दीनखान यांना धन्यता वाटेल.

बादशहा सलामत, आमच्या कांहीं तुकड्या चहूंकडे देश उध्वस्त करण्यासाठीं फिरत आहेत. बरेंचसें सैन्य किल्ल्याच्या वेढ्यांत गुंतलें आहे. मुख्य तळावर थोडेंच सैन्य राहिलें आहे. असें असूनहि परमेश्वरकृपेनें आणि आपल्या भाग्यानें कांहींचें रक्षण आणि सतत गस्त घालीत राहणें हीं कामें चालू आहेत. किल्ल्याचा वेढा अधिक कडक करण्यांत आला आहे. आपला निरोप घेतेवेळीं आपण आज्ञा केली होती कीं शिवाजीच्या प्रदेशांत मोहीम करण्यास अनुकूल काल सहा महिने असतो. म्हणून तुम्ही तेथें लवकर जाऊन पोहोंचावें. त्या वेळीं मीं आपल्याला कळविलें होतें कीं, मोहिमेचीं स्थळें व्यवस्थितपणें निवडण्यांत आलीं तर आपली फौज बारा महिन्यांच्यावर गुंतून राहणार नाहीं. पण आतां परमेश्वरकृपेनें अशी परिस्थिति आहे कीं किल्ल्याचा वेढा जोरांत चालू आहे. परमेश्वर करील तर पावसाळ्यांत काम उरकून टाकण्यास कसूर होणार नाहीं. योग्य वाटलें तें लिहिलें.

(११)

विनंती कीं जिल्काद महिन्याच्या चोवीस तारखेस (एकोणतीस मे १६६५) आपलें पत्र पावलें. पांच तोफा आपण तांतडीनें रवाना केल्या ही आपली कृपाच होय. दौलताबादेंतील तोफा महमदहुसेन याच्या देखरेखीखालीं होत्या. सफशिकनखान यानें तोफा रवाना करण्यांत खूप श्रम घेतले. आम्हांला या मोहिमेसाठीं लागणारें सर्व प्रकारचें साहित्य पुरविण्यांत सफशिकनखान यानें कांहीं कमी केलें नाहीं. त्याच्यासंबंधीं मी आपल्याला लिहिलें असून त्यानें अशाच प्रकारें यापुढेंहि उत्तम काम करीत असावें अशा अर्थाची त्याला आपली आज्ञा व्हावी.

बादशहा सलामत, पुरंदरच्या वेढ्यासंबंधीं आपण लिहिलें आहे. रात्रंदिवस मी त्याच उद्योगांत गुंतलों आहे. वास्तविक पाहतां पावसाळ्यांत मोहिमांचीं कामें थांबतात. पण ऐन पावसाळ्यांत आम्ही वेढ्याचें काम हातीं घेतलें आहे. आपल्या कृपेनें जीं कामें एक महिन्यांत पार पडणें शक्य नव्हतें तीं एकेका दिवसांत तडीस जाऊं लागलीं आहेत. वेढ्याचा एक एक दिवस म्हणजे मी एक वर्ष असें समजतों. रोज येथें कामें उत्तम रीतीनें पार पडत आहेत. पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाला आवश्यक आणि किल्ल्याला लागून असलेला खडकाळा या स्थळांचे पांच बुरुज आणि लाकडी तटानें युक्त असलेलें शत्रूचें एक आश्रयस्थान हीं आम्ही जिंकून घेतलीं. आमच्या लष्करांतून आपल्याकडे येणाऱ्या सरकारी रिपोर्टांत याचा तपशील दिलेला असल्यामुळें मी या पत्रांत त्यासंबंधीं अधिक लिहीत नाहीं. पुरंदरचा किल्ला आम्हीं लवकर जिंकून घेऊं याची आपण खात्री बाळगावी.

बादशहा सलामत, राजा सुजानसिंग हा आपल्या सैन्यासहित लष्करांत दाखल झाला. राजगड आणि रोहिडा या दिशेनें शत्रूची येजा असे. तो मार्ग रोखून धरण्यासाठीं मी सुजानसिंगाची नेमणूक केली. तो कोणत्याहि प्रकारची टाळाटाळ न करतां राजगड रोहिड्याकडे रवाना झाला. सुजानसिंग हा कामाचा मनुष्य आहे. तो वेळेवर लष्करांत दाखल झाला नाहीं म्हणून त्याची मन्सब पांचशेंनीं कमी करण्यांत आली होती. ती त्याला परत मिळावी अशी विनंती आहे. म्हणजे तो आपला सरंजाम वगैरे व्यवस्थितपणें चालवूं शकेल आणि सैन्य बाळगून त्याचा खर्च चालविण्यांत त्याला अडचण पडणार नाहीं. लष्करांतील अधिकाऱ्यांचे आणि सैनिकांचे पगार आणि लष्करावरील इतर खर्च यासंबंधीं सगळे कागदपत्र उम्दतुल्मुल्क जाफरखान (मुख्य वजीर) याजकडे पाठविले आहेत. ते आपल्या-समोर येतीलच.

बादशहा सलामत, आपल्या आज्ञेप्रमाणें मी मुल्ला याहया याचा भाऊ मुल्ला अहमद यास लिहून कळविलें कीं तुम्ही विजापूरला राहून बादशहाचीं कामें करूं शकलांत तर चांगलेंच आहे. तुम्ही दोन कामें करावीं. एक म्हणजे शिवाजी आणि आदिलखान यांच्यांतील एकोपा मोडावा. दुसरें म्हणजे विजापूरचें सैन्य आमच्याकडे तैनात झालें पाहिजे. मुल्ला अहमद यांनें सांगून पाठविलें आहे कीं' मला जितकें जमेल तितकें या प्रकरणांत मी करण्यास तयार आहे.

मी विजापूरचा वकील मुल्ला खुर्रम यास म्हटलें कीं विजापूरकरांकडून काय धोरण आंखलें जात आहे याची आपल्याला कांहीं माहिती नाहीं. तिकडून मुल्ला अहमद हा वकील होऊन आला तर बरें. इतक्यांत मुल्ला याहया याच्या पत्रावरून कळलें कीं, आदिलखान (आदिलशहा) याजकडे मी माणसें पाठविलीं होतीं; तीं तेथें पोहोंचल्यानंतर आदिलखानानें त्याला (मुल्ला अहमद) मध्यस्थ म्हणून नेमलें आहे. तें पत्र मी आपल्याकडे पाठवीत आहे. विजापूर आणि त्याभोंवतालच्या प्रदेशासंबंधीं तपशीलवार हकीकत महमद इब्राहीम यानें लिहून पाठविली आहे. ती मी आपल्याकडे पाठवीत आहे. ती आपल्या नजरेखालून जाईलच.

समारोप

शेवटच्या पत्रांत उल्लेखिलेले बुरूज मोगलांनीं दोन जून १६६५ रोजीं जिंकून घेतले. पुरंदरचा किल्ला आतां मोगलांविरुद्ध फार दिवस टिकाव धरूं शकेल असें दिसेना. अशा परिस्थितींत शिवाजीमहाराजांनीं मोगलांबरोबर तह करण्याचें ठरविलें. त्यांनीं अकरा जून १६६५ रोजीं जयसिंगाची गांठ घेतली. तेवीस जूनच्या पुरंदरच्या तहानें जयसिंगाची मोहीम संपली. वरील पत्रांनीं जयसिंगाच्या हालचालीवर उत्तम प्रकाश पडतो. या दृष्टीनें अद्याप अप्रकाशित असलेलीं वरील पत्रें मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें म्हणून महत्त्वाचीं ठरतात.

लुत्फुल्लाचीं पत्रें

(१६९० ते १७०४)

लुत्फुल्लाचीं पत्रें

मराठ्यांचें राज्य नष्ट करावें हा उद्देश मनांत धरून औरंगजेब हा प्रचंड सैन्यासहित नोव्हेंबर १६८१ मध्यें दाक्षिणेंत उतरला. पंचवीस वर्षें तो मराठ्यांशीं झगडत होता. या काळांत मराठ्यांनीं औरंगजेबाशीं निकराचा लढा दिला. या संग्रामांत संभाजी, राजाराम यांचे मृत्यु झाले. येसूबाई आणि शाहू यांना मोगलांच्या कैदेंत पडावें लागलें. मराठ्यांना तामिलनाड प्रांत सोडून द्यावा लागला. उत्तर कोंकण आणि बागलाण हे प्रांत मोंगलांच्या ताब्यांत गेले. उलट मराठ्यांनीं गुजरात आणि माळवा या प्रांतांत प्रवेश केला. मोंगलांनीं घेतलेले स्वराज्यांतील किल्ले सोडविले आणि मोंगल सैन्यास गनिमी काव्यानें सळो की पळो करून मोगलांचें साम्राज्य खिळखिळें करून सोडलें. शेवटीं निराशेनें त्रस्त होऊन औरंगजेब हा अहमदनगर मुक्कामीं वीस फेब्रुवारी १७०७ रोजीं मरण पावला.

पंचवीस वर्षांच्या या मोगल मराठा संघर्षावर मराठींतून फार थोडी साधनें उपलब्ध आहेत. उलट फारसी भाषांतून या विषयावर मुबलक साहित्य आढळतें. मोगल दरबारांतील दैनंदिन्या म्हणजे अखबारांत, साकी मुस्तैदखान आणि ईश्वरदास नागर यांनीं लिहिलेलीं औरंगजेबाचीं चरित्रें, खाफीखान कृत मोगल साम्राज्याचा इतिहास, भीमसेन सक्सेना याचें आत्मचरित्र अशीं अनेक फारशी साधनें उपलब्ध झालीं आहेत.

याशिवाय मोगल अधिकाऱ्यांनीं बादशहाला किंवा इतर अधिकाऱ्यांना लिहिलेलीं अनेक फारसी पत्रें बाहेर आलीं आहेत. शहाजहान बादशहाचा सुप्रसिद्ध वजीर सादुल्लाखान यांचा मुलगा लुत्फुल्लाखान हा एक नामांकित सरदार असून तो मराठ्यांच्या विरुद्ध लढत होता. लुत्फुल्लाखानाची बहीण ही मोगल सरदार शहाबुद्दीन ऊर्फ गाजिऊद्दीन फीरोजजंग याची बायको आणि पुढें प्रसिद्धीस आलेला निजामुल्मुल्क याची आई होय. साकी मुस्तैदखान यानें मासिरे आलमगिरी या नांवाचें औरंगजेबाचें चरित्र लिहिलें आहे. त्या ग्रंथावरून आपल्याला लुत्फुल्लाखानाच्या हालचालीची बरीच माहिती मिळते. ती खालीलप्रमाणें आहे. लुत्फुल्लाखानाचे हुद्दे पुढीलप्रमाणें होते.

इ. स. १६६९ एप्रिल, डाक चौकीचा दारोगा.

इ. स. १६७० अर्जी मांडण्याच्या कामाचा दारोगा.

इ. स. १६७६ हत्तीखान्याचा दारोगा.

इ. स. १६७८ पुन्हा अर्जी मांडण्याच्या कामावर.
इ. स. १६८० लाहोरचा नायब सुभेदार.
इ. स. १६८० डिसेंबर, गुसलखान्याचा दारोगा.
इ. स. १६८१ जुलै, पुन्हा अर्जी मांडण्याच्या कामावर.
इ. स. १६८२ फेब्रुवारी, बातम्या वाचून दाखविण्याचें काम.
इ, स. १६८२ सप्टेंबर, खास चौकीचा दारोगा.
इ. स. १६८७ शहाजादा मुअज्जम यांच्या सेवकांचा मुख्य अधिकारी.
इ. स. १६९० मे, खटाव (सातारा प्रांत) चा ठाणेदार.
इ. स. १६९१ जून, खास चौकीचा दारोगा.
कांहीं दिवसांसाठीं बडतर्फ.
इ. स. १६९२ आक्टोबर अकलूज (असदनगर) चा ठाणेदार.
शहाजादा मुइजुद्दीन याजबरोबर पन्हाळगडच्या वेढ्यांत १६९३–९४
इ. स. १६९६ खास चौकीचा दारोगा.
इ. स. १६९९ नोव्हेंबर, विजापूरचा सुभेदार.
इ. स. १७०१ ऑगस्ट, औरंगाबाद सुभ्याचा सुभेदार.
इ. स. १७०२ ऑगस्ट, वऱ्हाडच्या सुभेदारीवर नेमणूक.
मृत्यु इ. स. १७०२ अगर १७०४.

लुत्फुल्लाच्या पदरीं माधोराम या नांवाचा मुन्शी अगर प्रमुख फारसी लेखक होता. त्या काळांत अधिकाऱ्यांनीं मजकूर सांगावयाचा, पण तो अलंकारिक भाषेत सजवून लिहावयाचा मुन्शींनीं. डौलदार भाषेंत पत्रें अगर वृत्तान्त लिहिणाऱ्या तज्ञ मुन्शींचा एक वर्गच मोगल काळांत पुढें आला होता. त्यांनीं लिहिलेल्या पत्रांचे संग्रह त्या काळांत लोकप्रिय झाले. फारसी भाषेचे विद्यार्थी, सरकारी नोकर वर्ग आणि विद्वान् लेखक, अशा संग्रहाचा कसोशीनें अभ्यास करीत. अशा संग्रहापैकीं एक म्हणजे इन्शाये माधोराम म्हणजे माधोरामचें लिखाण हा होय. माधोराम हा लुत्फुल्लाच्या पदरीं होता हें वर सांगितलें आहे. इ. स. १६९२ च्या अखेरीस औरंगजेबाचा नातू आणि शहाजादा मुअज्जम याचा मुलगा शहाजादा मुइजुद्दीन ऊर्फ जहांदार शहा (हा इ. स. १७१२ मध्यें काहीं काळ बादशहा झाला होता.) यानें पन्हाळगडाला वेढा घातला होता. त्या काळांतील एका चकमकीचा वृत्तांत लिहून बादशहाकडे सादर करण्यांत आला. तो वृत्तांत माधोरामनें तयार केला होता. या लेखांतील पत्रक्रमांक चाळीस हा तोच वृत्तान्त होय.

लुत्फुल्लाचा मृत्यु इ. स. १७०२ अगर १७०४ मध्यें झाल्यानंतर माधोराम हा जहांदार शहाच्या पदरीं लागलेला दिसतो. जहांदार शहाचा सरदार कोकलताशखान याचीं अनेक पत्रें माधोरामनेंच तयार केलेलीं दिसतात. जहांदारशहाला राज्यावरून काढण्यांत आलें. आणि फर्रुखसैर हा गादीवर आला (इ. स. १७१३). त्या धामधुमींत माधोरामचें बरेंच सामान नष्ट झालें. पण त्याचा पुतण्या हरप्रसाद यानें माधोरामनें लिहिलेलीं पत्रें मोठ्या कष्टानें मिळवून एकत्रित केलीं. आणि त्यांना इन्झाये माधोराम हें नांव दिलें. या संग्रहाचें तीनदां लिथोमुद्रण झालें आहे. मुद्रित प्रती दुर्मिळ झाल्या आहेत.

माझ्यासमोर असलेली हस्तलिखित प्रत कलकत्त्याच्या नॅशनल लायब्ररींतून आणलेली आहे. मुंबई विद्यापीठाचे ग्रंथपाल श्री. मार्शल यांच्या प्रयत्नानें मला ही प्रत उपलब्ध झाली. या प्रतीच्या शेवटीं जो मजकूर आहे त्यावरून असें दिसतें कीं, ब्रह्मावर्त येथें बाजीराव पेशव्यांच्या पदरीं मुहिबुल्लाखानाचा मुलगा करीमुल्ला नांवाचा नोकर होता. त्याच्या हातीं इ. स. १८०४ मध्यें लिहिलेली सदर ग्रंथाची प्रत आली. त्या प्रतीवरून त्यानें जी प्रत तयार केली ती नॅशनल लायब्ररींतील प्रत होय.

या ग्रंथांत एकंदरींत दोनशें ब्याऐंशी पत्रें आहेत. त्यांपैकीं एकशें चौऱ्याऐंशीं पत्रें लुत्फुल्लाचीं आहेत. सुमारें पन्नास पत्रें जहांदारशहा अगर त्याचा सरदार कोकलताशखान याजकडून लिहिलीं गेलीं आहेत. त्यापुढचीं पन्नास पत्रें स्वतः माधोराम यानें आपल्या परिचितांना लिहिलेलीं आहेत.

वरील पत्रांपैकीं मराठे आणि मोंगल यांच्या संघर्षावर प्रकाश पाडणारीं अशी चाळीस पत्रें मी निवडलीं आहेत. त्यांपैकीं एकूण चाळीस पत्रें लुत्फुल्लाचीं असून एक पत्र जहांदारशहाचें आहे.

या पत्रांतील काळ हा साधारणपणें इ. स. १६९० पासून १७०० पर्यंतचा म्हणतां येईल. इ. स. १६८९ च्या मार्च महिन्यांत संभाजी राजांचा वध झाला. मोगलांनीं रायगड, प्रतापगड, माहुली, राजगड, तोरणा, रोहिडा इत्यादि किल्ले घेतले. राजाराम हा रायगडाहून पन्हाळगड येथें पोहोंचला. पण तेथेंहि फार काळ न राहतां तो जिंजीकडे रवाना झाला. तो जिंजीला नोव्हेंबर १६८९ मध्यें पोहोंचला. इकडे महाराष्ट्रांत मोंगलांविरुद्ध लढा चालू ठेवण्यासाठीं त्यानें रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचिव, परशुरामपंत प्रतिनिधि हे मुत्सद्दी आणि संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव इत्यादि सरदार नेमले. येसूबाई आणि शाहू हीं मोंगलांच्या कैदेंत सांपडलीं होतीं. अशा परिस्थितींत मराठ्यांनीं कच न खातां मोगलांशीं लढा चालू ठेवला. इ. स. १६८९ संपण्यापूर्वी संताजीनें मोगल सरदार मुकर्रबखान (यानेंच संभाजी राजांना धरलें होतें.) याजवर

निकराचा हल्ला करून त्याला कोल्हापुराकडे पळवून लाविलें. या लढाईत मुकरब खानाला भयंकर जखमा झाल्या (ईश्वरदास नागरकृत फुतूहाते आलमगीरी आणि केशव पंडितकृत राजारामचरितम्). इ. स. १६९० मध्यें मराठयांनीं राजगड, तोरणा, रोहिडा, प्रतापगड इत्यादि किल्ले जिंकून घेतले. पंचवीस मे १६९० रोजीं संताजी घोरपडे यानें मोगल सरदार सर्जाखान याचा दणदणीत पराजय करून त्याला कैद केलें. आपल्या सुटकेसाठीं सर्जाखानाला जबर खंडणी भरावी लागली.

याच सुमारास औरंगजेबानें लुत्फुल्ला याला खटाव प्रांताचा ठाणेदार करून रवाना केलें. दहा जुलै १६९० रोजीं लुत्फुल्ला हा खटाव येथें पोहोंचला. त्याच रात्रीं संताजीनें लुत्फुल्लावर हल्ला केला. (पत्र क्रमांक दोन) यानंतर थोड्याच दिवसांनीं पिलिव मुक्कामीं (म्हसवडच्या पूर्वेस बारा मैल, अकलुजच्या दक्षिणेस पंधरा मैल) संताजी, धनाजी, डफळे, मोरे इत्यादींनीं मोगलांवर हल्ला केला. (पत्र क्रमांक एक). माधोरामच्या पत्रावर तारखा दिलेल्या नाहींत. लुत्फुल्ला हा खटाव येथें वर्षभर होता. (१६९१ च्या मेपर्यंत) यानंतर तो पुन्हा अकलूज येथें ठाणेदार होऊन आला तो १६ ऑक्टोबर १६९२ ते १५ डिसेंबर १६९२ या काळांत. संताजी व धनाजी हे जिंजीकडे होते. त्यामुळें खटाव आणि पिलीव येथील लढाया इ. स. १६९० मधील होत असें अनुमान जदुनाथ सरकार यांनीं काढलें आहे तें बरोबर दिसतें. रहिमतपुर, वसंतगड या ठिकाणीं लुत्फुल्लाचे युद्धप्रसंग झाले. रामचंद्रपंतांशीं त्याचा मुकाबला झाला. हा काळ १६९१–१६९२ चा असावा. मराठी कागदपत्रावरून वरील घटनांवर कांहीं प्रकाश पडूं शकतो किंवा नाहीं हें पाहणें आवश्यक ठरेल.

राजारामानें इ. स. १६८९ मध्यें पन्हाळगड सोडल्यानंतर तो किल्ला मोगलांच्या ताब्यांत आला. पण मराठयांनीं इ. स. १६९२ मध्यें तो परत जिंकून घेतला. औरंगजेबानें तो परत जिंकून घेण्यासाठीं आपला नातू शहाजादा मुइजुद्दीन याची रवानगी केली (आक्टोबर १६९२). त्याचा अतालीक (रक्षक, गार्डियन) म्हणून लुत्फुल्ला याची नेमणूक करण्यांत आली. मुइजुद्दीनचा वेढा मार्च १६९४ पर्यंत चालला होता. या वेढयाच्या प्रसंगीं मोगल आणि मराठे यांच्या चकमकी उडाल्या. त्याचीं अतिशयोक्तीचीं वर्णनें लुत्फुल्ला आणि जहांदार शहा यांच्या पत्रांतून सांपडतील. जहांदार शहा म्हणतो त्याप्रमाणें परशुरामपंत कांहीं या चकमकींत ठार झाला नाहीं. लुत्फुल्लाच्या पत्रांत अशाच प्रकारच्या एका चकमकींत हिंमतराव नांवाचा मराठा सरदार हा देवगडाहून पन्हाळगडांत रसद पोहोंचविण्याच्या प्रयत्नांत असतांना ठार झाला असा उल्लेख आहे. हा हिंमतराव कोण याचा मराठी कागदपत्रावरून छडा लावणें आवश्यक आहे.

मुइजुद्दीन यानें पन्हाळगड याला वेढा घातला खरा, पण इ. स. १६९४ च्या मार्च महिन्यांत त्याला वेढयाचें काम सोडून नामुष्कीनें परत जावें लागलें. या वेढयाची हकीकत अखबारांत वरून जदुनाथ सरकार यांनीं तयार केली आहे. ती त्यांच्या औरंगजेब चरित्रांत सांपडेल. तीवरून या वेढयाची पुढीलप्रमाणें माहिती मिळते. शहाजादा मुइजुद्दीन हा आक्टोबर १६९२ च्या अखेरिस पन्हाळगडापाशीं येऊन पोहोंचला. लगेच वेढयाला सुरुवात झाली. मुइजुद्दीनबरोबर इफ्तिखारखान, लुत्फुल्ला, सफशिकनखान इत्यादि सरदार होते. वेढा वर्षभर रेंगाळला. आक्टोबर १६९३ मध्यें धनाजी जाधव, रामचंद्रपंत अमात्य, आणि शंकराजी नारायण सचिव यांच्या नेतृत्वाखालीं मराठयांचें सैन्य मोगलांवर चालून आलें. वीस आक्टोबर रोजीं युद्धाला तोंड लागलें. मराठ्यांनीं किल्ल्यांत रसद पोहोंचती केली. आणि मोंगलांच्या मोर्च्यांवर हल्ले चढविले. सफशिकनखानाच्या हाताखालीं असलेल्या कांहीं तोफा मराठ्यांनीं पळवून किल्ल्यांत पोहोंचविल्या. या चकमकी कांहीं दिवस चालू होत्या. यांत कांहीं मोगल अधिकारी ठार झाले.

ही बातमी ऐकून औरंगजेबानें फीरोजजंग [निजामुल्मुल्काचा बाप] आणि खानाजादखान यांना शहाजाद्यांच्या कुमकेस पाठविलें. पाटण गांवापाशीं त्यांनीं मराठ्यांना मागें हटविलें. पण किल्ल्यांत रसद पोहोंचली होती. आणि मोगलांना आपले उध्वस्त मोर्चे पुन्हां उभे करावे लागले. वेढ्यांत कांहीं जीव राहिला नाहीं. शेवटीं आठ मार्च १६९४ रोजीं वेढ्यांचें काम सोडून देऊन मुइजुद्दीन हा बादशहाकडे रवाना झाला. लुत्फुल्ला वगैरे सरदारहि त्याच्याबरोबर निघाले.

जदुनाथ सरकार यांनीं अखबारात वरून वीस आक्टोबर १६९३ रोजीं झालेलें युद्ध आणि इन्शाये माधोराम (या लेखांतील चाळिसावें पत्र) मध्यें वर्णिलेली घटना एकच होय. अशी कल्पना केलेली दिसते. पण युद्धाचे तपशील पाहतां या वेढ्याच्या प्रसंगीं मराठे व मोगल यांच्या चकमकी झाल्या. अखबारांत वरून दिलेली घटना, लुत्फुल्लाच्या पत्रांत दिलेली घटना आणि जहांदारशहाच्या रिपोर्टांत वर्णिलेला हल्ला ह्या वेगळ्या असल्या पाहिजेत आणि त्यांचा काळ ऑक्टोबर १६९३ ते मार्च १६९४ हा असला पाहिजे. अखबारातमध्यें धनाजी जाधव, रामचंद्रपंत आणि शंकराजी यांचा उल्लेख आहे. जहांदारशहाच्या रिपोर्टांत रामचंद्रपंत आणि परशुरामपंत यांचा उल्लेख आहे. तर लुत्फुल्लाच्या पत्रांत हिंमतराव या मराठा सरदाराचा उल्लेख आहे. पन्हाळगडाच्या या वरील वेढ्यासंबंधीं राजारामाचीं दोन पत्रें उपलब्ध आहेत.

"श्री स्वस्तिश्री राज्याभिषेक शके एकोणीस अंगिरानाम संवत्सरे, फाल्गुन शुद्ध सप्तमी मंदवासरे क्षत्रिय कुलावंतस श्री. राजाराम छत्रपति यांनीं

मशरुल विठोजी केसरकर पंच सहस्री पदादि नामजाद किल्ले पावनगड यासी आज्ञा केली ऐसीजे किल्ले मजकुरास मोंजदीन फौजेनिशीं येऊन वेढा घातला आणि बैसला. कित्येक प्रकारें किल्ल्यास लगट केला होता. त्याशीं तुम्ही हिंमत धरून लोकांचा दिलासा करून शर्तीनीशी भांडण दिलें. मोर्चा मारून चालविला. पुढेंहि गनिमांचा हिसाब धरीत नाहीं हे वर्तमान राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांनीं लिहिलें. त्यावरून कळो आले. तुमचा मजुरा बहुतच झाला. ”

दुसरें पत्र

“ श्री स्वस्तिश्री राज्याभिषेक शके वीस श्रीमुखनाम संवत्सरे बहुल दशमी रविवासरे क्षत्रिय कुलावंतस श्री राजाराम छत्रपति यांनीं राजश्री भानजी रघुनाथ देशाधिकारी व लेखक व वर्तमान व भावी सुभा प्रांत मलकापुर यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री काशी रंगनाथ उपनाम बोर्पे आपल्या राज्यांतील पुरातन सेवक रा. कै. छत्रपति स्वामी यांचे कारकिर्दींत बहुत दिवस कष्ट मशागती केल्या आहेत. सांप्रत किल्ले पनाला यास मोगल गनीम व मोजद्दीन वेढा घालून बसला होता. ते समयीं कित्येक स्वामिकार्यानिमित्त यासी तेथें किल्ले निसबत नामजाद ठेविले होते. तेथेंहि स्वामिसेवा एकनिष्ठेनें केली. स्वामिकार्यांचे मर्दाने स्वामींच्या पाया एकनिष्ठ आहेत हे जाणून स्वामी यावरी कृपाळू होऊन यासी तर्फ मलकापुर सुभा मजकूरपैकीं इनाम देवविला असे.

मराठीतून उपलब्ध असलेलीं मर्यादित साधनें पाहतां फारसी भाषेंतून आढळणारीं जीं कांहीं आणि जितकीं कांहीं साधने आहेत तीं मराठींत आल्याशिवाय या कालखंडाचा अभ्यास पूर्ण झाला असें म्हणतां यावयाचें नाहीं. लुत्फुल्लाच्या पत्रांवरून संताजीचा खटाववरील हल्ला, पिलीव येथील मोगल आणि मराटे यांची लढाई, पन्हाळगडचा वेढा इत्यादि घटनांसंबंधीं अधिक माहिती आपल्याला मिळते, हें या पत्रसंग्रहाचें वैशिष्ट्य होय.

मासिरे आलमगिरींतील उल्लेखावरून लुत्फुल्लाखान हा वऱ्हाडच्या सुभेदारीवर रुजू होण्यास जात असतां इ. स. १७०२ च्या सप्टेंबर किंवा आक्टोबरमध्यें मरण पावला. इन्शाये माधोराममध्यें एका पत्रांत शहाबुद्दीन ऊर्फ गाजिउद्दीन फीरोजंग यानें नेमाजी शिंदे याचा सिरोंजजवळ पराभव केला आणि त्यामुळें औरंगजेबानें त्याला ‘ सिपाहसालार ’ ही पदवी दिली (मार्च १७०४) याबद्दल फीरोजजंगाचें अभिनंदन केलें आहे. एक तर या ग्रंथांतील हें पत्र माधोरामनें लुत्फुल्लाच्या ऐवजीं इतर कुणाच्या तर्फे तयार केलें असावें अगर मासिरे आलमगिरींतील उल्लेख चुकलेला असावा. या प्रश्नाचा तूर्त तरी उलगडा होण्यास साधन नाहीं.

माधोरामच्या वरील पत्रांतून तारखा जवळजवळ आढळत नाहींत असें म्हटलें तरी चालेल. हिजरी सन दिलेच नाहींत. क्वचित् ठिकाणीं महिना आणि तारीख हीं दिलीं आहेत. पत्रेंहि कालानुक्रमानें तयार करण्यांत आलीं नाहींत. अनुवादांत मूळ हस्तलिखितांतील पत्रांचा क्रम ठेवण्यांत आला आहे. पत्रावर इसवी सनाच्या तारखा दिल्या आहेत. त्या पत्रांतील घटनांचा विचार करून दिल्या आहेत. सर्वच पत्रांवरील तारखा अचूक असतील असा प्रकार नाहीं. पुढें दिलेल्या निवडक पत्रांचा अनुवाद अभ्यासकांना उपयुक्त वाटेल अशी आशा आहे.

पत्र क्रमांक एक

विनंती कीं, संता आणि धना (संताजी व धनाजी) हे आपल्या काफर सैन्यासहित म्हसवड भागांत पसरले असून त्वरेनें त्यांचा मोड करावा अशा अर्थाचें आपलें आज्ञापत्र मिळालें. मी तात्रडतोब त्या कामगिरीवर रवाना झालों. मी कसबे पिलीव (म्हसवडच्या पूर्वेस बारा मैल आणि अकलूजच्या दक्षिणेस पंधरा मैल) येथें मुक्काम केला. दुसऱ्या दिवशीं मी तेथून रवाना झालों. वाटेंत डोंगरांतून आणि दऱ्यांतून शत्रूचे सैनिक पसरले होते. शत्रूपाशीं आठ हजार स्वार आणि अगणित पायदळ असें सैन्य होतें. त्या सैन्यानें चाल करून आमच्या सैन्याला चहूंकडून कोंडलें. मी आपली सैन्यरचना केली. आमच्या सैन्याबरोबर असलेली सगळी सामुग्री मी सैन्याच्या मध्यभागीं ठेवली. आमचें सैन्य शत्रूशीं लढण्यास सज्ज झालें. युद्धाला सुरुवात झाली. युद्ध निकराला येऊं लागलें. काफर डफळे याजपाशीं दोन हजारांपेक्षां अधिक कर्नाटकी बंदुकची होते. बंदुका आणि बाण यांच्या वर्षावामुळें प्रळयकाळाचा भास झाला. शत्रूचें सैन्य आमच्या सैन्याच्या ज्या बाजूंवर चाल करून येई तिकडे आमचे सैनिक निकरानें प्रतिकार करून त्याला मागें हटवीत. अशा रीतीनें ही लढाई संध्याकाळपर्यंत चालली होती. शेवटीं संताजी आणि धनाजी हे पांच हजार निवडक स्वारांनिशीं आमच्या सैन्यावर चालून आले. पण आमच्या सैन्यानें त्यांची तमा बाळगली नाहीं. आमचें सैन्य ठाण मांडून उभें राहिलें. शेवटीं शत्रूपैकीं अनेक माणसें मृत अगर जखमी झालीं आणि त्यांच्या सैन्याचा पराजय झाला. आमचा मोठाच विजय झाला. या युद्धांत शत्रूपैकीं जवळ जवळ एक हजार माणसें ठार झालीं. अनेक माणसें जखमी झालीं. आमचे जवळ जवळ दोनशे सैनिक ठार झाले. जखमी सैनिकांची संख्या तीनशेच्यावर असावी.

या कामगिरीचें चीज करण्यांत येईल अशी बादशहाच्या अधिकाऱ्यांना आशा आहे.

पान पांच पत्र क्रमांक २, जुलै १६९०
बादशहास (औरंगजेब) लिहिलेलें.

विनंती कीं, शत्रूचा मोड करून ठाणीं कायम करण्याची आपण आज्ञा केली होती. आपला निरोप घेऊन मी निघालों. पंधरा मजला प्रवास करून शव्वाल महिन्याच्या नऊ तारखेस मी खटाव गांवांत मुक्काम केला. आमच्या जासुदांनीं बातमी आणली कीं, संताजी हा दहाबारा हजार स्वार आणि अगणित पायदळ अशा सैन्यासहित साताऱ्याच्या पायथ्याशीं आहे. (खटाव साताऱ्याच्या पूर्वेस पंचवीस मैलांवर आणि शव्वाल महिन्याची नऊ तारीख म्हणजे सहा जुलै इ. स. १६९०). पाऊस सारखा पडत होता. आमच्या फौजेला तळ देऊन मोर्चे कायम करण्यास वेळ मिळाला नाहीं. संताजीनें ही संधि साधली. रात्रीच्या शेवटच्या प्रहरीं आमचें सैन्य गाफील असतांना त्यानें आमच्यावर हल्ला केला. शत्रुसैन्याच्या आरड्याओरड्यामुळें आमचें सैन्य खडबडून जागें झालें. पण जागे होऊन तयार होण्यास नाहींतरी वेळ लागणारच. अशाहि परिस्थितींत आमचे सैनिक घाबरले नाहींत. त्यांनीं घोड्यावर खोगिरी चढविल्या आणि शस्त्रें धारण करून ते तयार झाले.

माझा मुलगा महंमद खलील हा मराठ्यांच्या या धाडशी आक्रमणामुळें मुळींच डगमगला नाहीं. त्यानें आपल्या चौकीचे (पहाऱ्याचे) बंदुकची आणि शागीर्दपेशा यांना गोळा केलें आणि तो मराठ्यांच्या समोर गेला. त्यावेळीं पाऊस पडत होता. ऐन पावसांत महंमद खलील यानें शत्रूवर बाणांचा आणि गोळ्यांचा वर्षाव करून, मराठे छावणीच्या बाजारांत आणि बोळांत घुसले होते, त्यांना हाकलून लाविलें. तोंपर्यंत आमचे सरदार मामूरखान व खुदावंदखान आणि इतर हे तयार होऊन धांवले. ते घोड्यावर स्वार होऊन आणि शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज होऊन मैदानांत ठाण मांडून उभे राहिले. उभय सैन्यांतील लढाई निकराला येऊं लागली.

याच सुमारास मी आपल्या पथकासहित माझ्या सैन्यास जाऊन मिळालों. मी माझा मुलगा महंमद खलील, मामूरखान आणि इतर सरदार यांना पुढें चालून जाण्यास आज्ञा केली. तो गर्विष्ठ संताजी आपल्या सैन्यासहित आमच्या सैन्यांवर घसरला. त्यावेळीं हाणामारी आणि वीरांच्या आरोळ्या यामुळें कल्पांताचा भास झाला. आमचे वीर शौर्यानें लढत होते. त्यांनीं शत्रुसैनिकांपैकीं अनेकांचा संहार केला. पण त्याची तमा न बाळगतां मराठे पुन्हां पुन्हां चालून येत.

हें युद्ध एक प्रहरापर्यंत निकरानें चाललें होतें. यानंतर मराठे मागें हटले. माझा मुलगा महंमद खलील आणि इतर सरदार यांनीं वर्धनगडच्या पायथ्यापर्यंत

(खटावच्या वायव्येस आठ मैलांवर) मराठ्यांचा पाठलाग केला. संताजीनें वर्धनगडचा आश्रय घेतला. त्याचे अनेक सैनिक डोंगर दऱ्यांतून पांगले. आमचे सैनिकहि छावणीला परत आले. आमचा फारच मोठा विजय झाला.

या लढाईंत जवळ जवळ पांचशें मराठे मारले गेले. कित्येक जखमी झाले. शंभर माणसें पाडाव होऊन आमच्या हातीं सांपडलीं. तीनशें घोडी, नगारे आणि ध्वज, चारशें भाले आणि बंदुका इतकी सामुग्री आम्हांला हस्तगत झाली. आमच्या सैन्यांतील सदुसष्ट माणसें ठार आणि शंभर माणसें जखमी झालीं. आमच्या सर्वच सैनिकांनीं मोठें शौर्य गाजाविलें. ते सर्वजण अपल्या कृपेची अपेक्षा करून आहेत.

पान सात पत्र क्रमांक तीन (३) (इ. स. १६९०)
औरंगजेब बादशहाला उद्देशून

' विनंती कीं, आपलें फर्मान पावलें. मराठ्यांचा मोड करण्यांत मी कामगिरी बजावली त्याबद्दल माझ्या मन्सबींत पांचशेची वाढ करण्यांत आली हें फर्मानावरून कळलें. काफरांचा मोड, त्यांचे किल्ले जिंकून घेणें आणि त्यांचा प्रदेश उध्वस्त करणें या माझ्या कामांत आपलें मार्गदर्शन लाभत आहे. माझ्या श्रमाचें चीज झालें. '

पान आठ पत्र क्रमांक ४ (१६९०) बादशहाला पत्र.

' विनंती कीं, खिलातीचा पोशाख आणि मन्सबींत पांचशेंची वाढ केल्याचें फर्मान हीं पावलीं. माझा मुलगा महंमद खलील यानें जी कामगिरी बजावली तीबद्दल त्याच्या मन्सबींत शंभर (जात) आणि पन्नास स्वार यांची वाढ करण्यांत आल्याबद्दलचें आपलें फर्मान मिळालें. या भागाचा बंदोबस्त, ठाण्याची स्थापना, ठाणेदारांच्या नेमणुका आणि इतर संबंधित बाबीबद्दल वेगळें लिहिलें आहे. तें आपल्या नजरेखालून गेलें असेल. त्यावर जी आज्ञा होईल तीस अनुसरून अंमलबजावणी करण्यांत येईल. '

पान नऊ पत्र क्रमांक ५ इ. स. (१६९९)

इ. स. (१६९९) च्या अखेरीस औरंगजेबानें लुत्फुल्ला याची विजापूरच्या सुभेदारीवर नेमणूक केली. त्यासंबंधींचें बादशहास पत्र.

' विनंती कीं, विजापूर प्रांताची सुभेदारी, विजापूरच्या किल्ल्याचा अधिकार, ही आपण मला दिलीत. खिलतीचा पोशाख आपण पाठविलात. माझ्या मन्सबींत पांचशें (जात) आणि आठशें स्वार अशी वाढ केली. यासंबंधींचें

आपलें फर्मान पावलें. परमेश्वर करील तर (इन्शाल्ला) सुभेदाराची सगळीं कर्तव्यें मी पार पाडीन. रयतेला दिलासा देणें, पुंडांचा बंदोबस्त करणें, बंडखोरांना प्रांतांतून काढून लावणें, फौजेचा बंदोबस्त ठेवणें, रसदेचे सांठे तयार ठेवणें, इस्लामी धर्मशास्त्राप्रमाणें न्यायनिवाडा करणें या सर्व गोष्टी मी व्यवस्थितपणें करीन.'

पान दहा पत्र क्रमांक ६, इ. स. १६९९

औरंगजेबाचा मुलगा आज्जम यांस पत्र.

'आपलें आज्ञापत्र आलें कीं, मी म्हसवडाहून निघून आपल्या पथकासहित आपल्याकडे यावें. आज्ञेप्रमाणें मी ताबडतोब म्हसवडाहून निघालों. तेथून मी महिमान गडाच्या पायथ्याशीं येऊन मुक्काम केला आहे. या आठवड्यांत मी येऊन आपल्या सेवेंत रूजू होईन. त्या प्रांतावर आपली नेमणूक झाली आहे. त्याचा बंदोबस्त कसा करतां येईल आणि किल्ले कसे जिंकून घेतां येतील याबद्दल मी आपल्याला अर्ज करीन.'

औरंगजेबानें इ. स. १६९९ च्या डिसेंबरांत सातारला वेढा घातला त्यावेळीं शहाजादा आज्जम त्याच्याबरोबर होता. त्या सुमाराचें हें पत्र असावें.

पान दहा, पत्र क्रमांक ७. औरंगजेबाचा नातु आणि शहाजादा आज्जम याचा मुलगा शहाजादा बेदारबख्त यांस पत्र.

'आपला हुकूम मिळाला. काफरांचा (मराठ्यांचा) मोड करण्यासाठीं तुम्हीं खटावहून ताबडतोब आपल्या सैन्यासहित येऊन आम्हांला सामील व्हावें. आणि आम्हीं परवानगी देईपर्यंत आमच्याबरोबर रहावें अशी आपण आज्ञा केली आहे. आपल्या आज्ञेप्रमाणें त्याच दिवशीं मी खटावहून निघून साताऱ्याच्या पायथ्याशीं आलों आहे. आपल्या येण्याची वाट पाहात आहे. आपली आज्ञा होईल तिकडे जाऊन आपल्या आज्ञेप्रमाणें कामगिरी बजावीन.'

पान बारा, पत्र क्रमांक ८. इ. स. १६९२ च्या पूर्वीं, बख्शी रुहुल्लाखान यांस पत्र.

"मी सध्यां औरंगाबादेंत आहे. बंगालमधून खजिना येत आहे. तो बादशहाकडे पोहोंचविण्याची कामगिरी माझ्यावर सोंपविण्यांत आली आहे. ती पार पाडतांच मी आपल्याला येऊन भेटेन."

पान चवदा पत्र क्रमांक ९. इ. स. १६९७ (?) गाजिउद्दीन फिरोजजंग यांस पत्र.

लुत्फुल्लाखान याची बहीण ही गाजिउद्दीन फीरोजजंग याची बायको. म्हणजे लुत्फुल्लाखान हा निजामुल्मुल्काचा मामा.

पान चवदा पत्र क्रमांक १०. उम्दतुल्मुल्क मुखत्यारखान यांस पत्र.

'आपलें पत्र मिळालें. आज या महिन्याची दहा तारीख आहे. आज मी बादशाही खजिना बरोबर घेऊन निघत आहे. लवकरच बादशहाच्या सेवेंत हजर होईन. त्यावेळीं आपली गांठ पडेलच.'

पान एकवीस, पत्र क्रमांक ११. इ. स. १७००, मिर्जायार अलीबेग यांस.

परळीचा किल्ला हस्तगत झाला असें आपण कळविलेंत. किल्ल्यांतील लोकांनीं आपल्या शूर सैन्याची धास्ती घेतली आणि ते किल्ला सोडून बाहेर पडले. आपल्या सैन्यांत जयसूचक नगारे झडूं लागून सर्वत्र आनंदी आनंद झाला. हें कळलें. धन्य परमेश्वराची, आमच्या फौजेच्या प्रभावामुळें, आणि आमच्या तोफांच्या भडिमारामुळें शत्रूची हिंमत खचली आणि आम्हांला विजय प्राप्त झाला. किल्ल्यांतील लोक घाबरून गेले असले पाहिजेत. म्हणून तर ते शरण आले. त्यांची हिंमत खचली असली पाहिजे म्हणून तर ते किल्ल्याच्या बाहेर निघाले. या विजयाबद्दल अभिनंदन. इस्लामच्या समशेरीनें काफरांचा नाश होवो.

पान बावीस पत्र क्रमांक १२. इ. स. १६९३ खेम सांवत यांस पत्र.

खेम सावंत यांस, हेरांच्या बातमीवरून कळतें कीं, तुमचे सैनिक आणि सहाय्यक हे प्रतिस्पर्ध्याला (मराठ्यांना) सामील झाले असून पन्हाळगडासमोरील आमच्या मोर्च्यांवर हल्ला करण्याच्या विचारांत आहेत. तर ही आज्ञा मिळतांच तुम्हीं त्यांना अशा विचारांपासून परावृत्त करावें. एकनिष्ठ सेवेमुळेंच तुम्हांला इह आणि पर या दोन्ही लोकांत श्रेयाचा लाभ होणार आहे हें लक्षांत ठेवावें.'

पान तेवीस पत्र क्रमांक १३. परंड्याचा किल्लेदार इज्जतखान यांस.

'धन्य परमेश्वराची, आमची विजयी फौज शत्रूचा रात्रंदिवस पाठलाग करीत होती. शेवटीं तिनें शत्रुसैन्याला गांठलें. आमचें सैन्य शौर्यानें लढलें. शत्रूचें सैन्य संख्येनें अधिक होतें. पण आमच्या सैन्यासमोर त्यांचा टिकाव लागला नाहीं. त्यांचीं बरींच माणसें मृत अगर जखमी झालीं. यानंतर ते पळून गेले. याचा तपशील हरकाऱ्याच्या तोंडून आपल्याला कळला असेलच. इफ्तिखारखान हे उद्यां येथून बादशहाकडे जाण्यास निघत आहेत. घाईगर्दीमुळें त्यांना आपलें सगळें सामान परंड्याच्या किल्ल्यांत सोडून द्यावें लागलें. तें आपण इकडे ताबडतोब रवाना करावें'

पान चोवीस पत्र क्रमांक १४. फजायलखान यांस.

इ. स. १६९०-९१.

आपलें पत्र मिळालें. त्यांत आपण लिहिलें आहे तें हें. संताजीबरोबर भांडण झाल्यामुळें धनाजी हा जिंजी प्रांताकडे जाऊं शकत नाहीं. कर्नाटकच्या सरहद्दपर्यंत त्याचा पाठलाग करा. तो एखाद्या किल्ल्यांत जाऊन बसला तर तुम्ही त्या किल्ल्याच्या पायथ्याशीं ठाण मांडून रहा आणि आजूबाजूचा प्रदेश पार बेचिराख करून टाका. आपलें वरील अर्थाचें पत्र रबिलावल महिन्याच्या एकवीस तारखेस मिळालें. तो (धनाजी) जिंजीला जाणें शक्य नाहीं. आमची विजयी फौज चिकोडीपासून एका मजलेवर पोहोंचली. हें पाहातांच टिकाव न धरतां शत्रू त्या भागांतून पळून गेला. तो वर्धनगडच्या किल्ल्यांत शिरला. बादशहाच्या आज्ञेप्रमाणें मी किल्ल्याच्या पायथ्याशीं तळ दिला असून भोंवतालचा प्रदेश उध्वस्त करण्याचें काम करीत आहे. परमेश्वर करील तर हा सगळा प्रदेश बेचिराख करून सोडीन. त्या शत्रूला (धनाजी) हुसकून लावण्याची मी पराकाष्ठा करीन आणि त्याचा निकाल लावीन. '

फजायलखान हा औरंगजेबाचा मीरमुन्शी म्हणजे प्रमुख लेखक होता. त्याचा मृत्यु तेरा मार्च १७०३ रोजीं झाला. वरील पत्र नक्की कोणत्या वर्षाचें आहे समजत नाहीं.

पान पंचवीस पत्र क्रमांक १५. फजायलखान यांस पत्र.

मी आपल्याला पत्र पाठविलें होतें. त्यांत धनाजी हा चिकोडीच्या जवळ असून मी भूम व परंडा या भागाकडे जात आहे असें कळविलें होतें. यांवर बादशहांनीं विचारणा केली कीं, धनाजीचा मोड करण्याच्या कामावर तुम्हांला नेमलें असतां तुम्हीं भूम परंड्याकडे कां जात आहांत ? अशा अर्थाचें आज्ञापत्र जमादिलाबल महिन्याच्या पांच तारखेस पावलें. मेहरबान, मी बादशहाचा निरोप घेतला तो आनंदपूर (इंदापूर) मुक्कामीं आलों. चारी सुभ्यांवर देखरेख ठेवणें आणि शत्रूचा (धनाजीचा) प्रतिकार करणें हीं कामें मला लावून देण्यांत आलीं होतीं. परंडा भागांतून मराठ्यांना हुसकून लावणें हें महत्त्वाचें आहे असें मला वाटलें. मी रिजवानखान यांस तिकडे पाठविलें. मी स्वत: आनंदपूर (इंदापूर) येथेंच तळ दिला. मराठ्यांना बादशाही मुलखांत घुसूं देऊं नये असें मी ठरविलें. सध्या मराठे चिकोडी भागांत धामधूम करीत आहेत. मी त्यांच्यावर चाल करून जाऊन त्यांचा मोड करीन. ते पळून गेले तर त्यांचा पाठलाग करीन. मी त्यांना कोठेंच टिकूं देणार नाहीं. भूम परंडा या भागाकडे जाण्याचा माझा विचार खरा नव्हता.

पान बत्तीस पत्र क्रमांक १६ बख्शी बहरामंदखान यांस,

माझा मुलगा महंमद खलील याच्या मन्सबींत वाढ व्हावी म्हणून तुम्हीं खटपट केलीत याबद्दल धन्यवाद. मराठ्यांनीं रात्रीच्या वेळीं सगळे गाफील असतांना आमच्या छावणीवर एकाएकीं हल्ला केला. त्यावेळीं माझ्या मुलानें शौर्याची शर्थ केली. हें आपल्याला कळलेंच असेल.

पान त्रेचाळीस, पत्र क्रमांक १७. इ. स. १६९१–९२.
मुखत्यारखान यांस,

आपल्याकडून निरोप घेऊन मी निघालों. मराठ्यांचा पाठलाग करून त्यांचा मोड करावा म्हणून मी रवाना झालों होतों. सात मजला मारून मी शव्वाल महिन्याच्या नऊ तारखेस नर्मदेवर (निरा नदी असावी) पोहोंचलों. नीला (?), डफळे, माने वगैरे हे पंधरावीस हजार सैन्यासहित या भागांत फिरत होते. आमच्या सैन्याच्या धाकानें ते पळूं लागले. या धांवपळींत ते कृष्णेच्या परिसरांत असलेल्या रहिमतपूर या गांवाकडे गेले. मी त्यांचा पाठलाग केला. ते नदी ओलांडीत होते. त्याच वेळीं मी त्यांच्यावर तुटून पडलों. मराठे मागें वळले आणि आमच्या सैन्यावर बाण आणि बंदुकी यांचा मारा करूं लागले. त्या काफर डफळेपाशीं दोन हजारांपेक्षां अधिक कर्नाटकी बर्कंदाज (बंदुकची) यांचें पायदळ होतें. त्यानें धाडसानें आमच्यावर आक्रमण केलें. त्यांच्या बंदुकीच्या माऱ्यामुळें प्रलयकाळाचा भास झाला. आमचे सरदार अब्दुलकादर, खुदावंदखान, अचलसिंह चव्हाण, तोफखान्याचा दारोगा आगा आशूरबेग, नजमुद्दीनखान आणि हुजरातीचे इतर अधिकारी हे मैदानांत ठाण मांडून राहिले. त्यांनीं चांगलेंच शौर्य गाजविलें. त्यांनीं शत्रूंपैकीं अनेकांना ठार मारलें. मराठ्यांचें सैन्य संख्येनें अधिक होतें. पण त्यांचा पराजय होऊन तें पळूं लागलें. नदी ओलांडून जातांना त्यांपैकीं अनेक लोक बुडून मेले. मराठ्यांचे सुमारे पांचशें सैनिक ठार झाले. शंभर माणसें कैद झालीं. त्यांचा वध करण्यांत आला. या युद्धाची हकीकत बातमीदारांकडून बादशहांना कळली असेल. सहकाऱ्यांच्या कामाचें काय चीज करावें याबद्दल वेगळें लिहिण्यांत येईल.

पान सेचाळीस, पत्र क्रमांक १८. इ. स. १६९२. बख्शी बहरामंदखान यांस.

शत्रूचें सैन्य संख्येनें अधिक असतांनाहि मी त्यांचा पराजय केला याबद्दल बादशहाकडून फर्मान आणि खिलतीचा पोषाख हीं पावलीं. ही मोठीच कृपा आहे. या कृपेला पात्र होण्यासारखें मी काय केलें आहे ? ही परमेश्वराची कृपा होय.

पान एकूणपन्नास, पत्र क्रमांक १९. औरंगाबादेचा अधिकारी यांस,

बातमी आली कीं, औरंगाबाद शहरांतील कर्णपुऱ्याचा रहिवासी खान मुहंमद हा लबाड लोकांच्या चिथावणीप्रमाणें वागत आहे. औरंगाबादेंत घोडे विकत घेऊन ते तो मराठ्यांच्या मुलुखांत पाठवीत आहे. बादशहांनीं हुकूम केला आहे कीं, खान मुहंमदची धिंड काढून, आणि त्याला फजित करून दौलताबादेच्या किल्लेदाराच्या हवालीं करावें आणि त्याबाबत किल्लेदाराची पोंच घ्यावी. अशा गोष्टी अनिष्ट होत हें जाणून यापुढें खबरदार राहाणें.

पान पन्नास. पत्र क्रमांक २०. मामूरखान यांस.

तुमचीं पत्रें मिळालीं. मराठे चाल करून येण्याच्या इराद्यानें साताऱ्याच्या किल्ल्याजवळ जमले असून मी कुमक पाठवावी असें तुम्हीं लिहिलें आहे. मराठे मोठ्या संख्येनें एकत्र झाले आहेत. ही बातमी मला हेरांच्याकडून यापूर्वी कळली होती. तुमच्या कुमकेंत पथकें पाठवावीं असा मी विचार केला, पण शत्रुसैन्य मोठें, कुमक पुरेशी होणार नाहीं असें ठरवून मी स्वतः सैन्य घेऊन निघालों आहे. पहिल्याच दिवशीं मी पंधरा कोसांची मजल मारली. तुम्हीं ठाण मांडून निर्धारानें रहावें आणि शत्रूचा प्रतिकार करावा. मी त्वरेनें कूच करीत आलोंच समजा.

पान बावन्न, पत्र क्रमांक २१.

वांग्जर (वारूगड ?) चा किल्लेदार मानसिंग राठोड यांस, फळफळावळ-वाल्याच्या करंड्या घेऊन कहार येत होते. त्यांच्यावर चोरांनीं भररस्त्यांत हल्ला करून त्यांना लुटलें. ते चोर पकडावे म्हणून यापूर्वी तुम्हांला लिहिलें होतें. पण तुम्हीं त्यांचा बंदोबस्त केला नाहीं. आतां तुम्हांला आज्ञा करण्यांत येते कीं, तुम्हीं गाफीलपणा टाकून द्यावा. कसून चौकशी करून गुन्हेगारांचा छडा लावावा आणि त्यांना ठार करून त्यांचीं प्रेतें रस्त्याच्या कडेवरील झाडांना लटकवावीं म्हणजे इतरांना जरब बसेल. नाहींतर तुमच्यावर गैरमर्जी होऊन तुम्हांला नोकरीवरून बडतर्फ करण्यांत येईल.

पान त्रेपन्न. पत्र क्रमांक २२. इ. स. १६९८.

महंमद अमीनखान (निजामुल्मुल्काचा चुलता यांस), आपल्याला सद्र (न्यायाधीश) च्या जागेवर नेमण्यांत आलें हें ऐकून आनंद झाला. माझी नेमणूक नोबारू या स्थळाच्या फौजदारीवर झाली आहे. त्या प्रांतांतून शत्रूला हुसकून लावावें अशी आज्ञा झाली आहे. मी लवकरच उम्दतुल्मुल्क यांचा निरोप घेऊन रवाना होत आहे.

पान चौपन्न. पत्र क्रमांक २३. इ. स. १६९२.

बख्शी रूहुल्लाखान यांस,

शत्रूचा मोड करण्यासाठीं आपण फौजेसहित या भागांत येणार असें कळलें होतें. आपली गांठ पडेल अशी अपेक्षा होती. पण योगायोगानें आपल्या फौजेची हालचाल दुसऱ्या वाटेनें झाली. मराठ्यांचा मोड करण्यासाठीं म्हणून माझी नेमणूक असदनगर (अकलूज) जिल्ह्यावर झाली. तुमच्या भेटीची अपेक्षा मनांतल्या मनांत राहून गेली.

पान ६०. पत्र क्रमांक २४. इ. स. १७०४.

गाजिउद्दिन फिरोजजंग यांस,

नेमा शिंदे हा मोठें सैन्य घेऊन माळव्यांत घुसला. तेथें त्यानें मोठी धामधूम उडविली. पण आपल्या सैन्यामुळें त्याला चांगली तंबी मिळाली. मराठ्यांचें सैन्य उधळून गेलें. पल्ला लांबचा असूनहि आपण तांतडीनें जाऊन पोहोंचलांत आणि शत्रूला कांहीं लाभ न होतां परत फिरावें लागलें. ही मोठीच गोष्ट झाली. याबद्दल बादशहानें आपल्याला सिपाहसालार ही पदवी दिली. हें ऐकून अतिशय आनंद झाला.

पान सहासष्ट. पत्र क्रमांक २५. इ. स. १६९२.

राजपुत्र मुइजुद्दीन यांस,

बादशाही फौजा पन्हाळ्याला वेढा घालून आहेत. या कामांत आपला सल्लागार म्हणून माझी नेमणूक झाली असून मी तांतडीनें पन्हाळ्याला पोहोंचावें अशी बादशहाची आज्ञा झाली आहे. मी त्याच दिवशीं असदनगर (अकलूज) हून रवाना झालों आणि कसबे बहावलीच्या मैदानांत येऊन पोहोंचलों. लवकरच आपल्या सेवेंत येऊन रूजूं होत आहे.

पान सदुसष्ट. पत्र क्रमांक २६. इ. स. १६९२.

बादशहाला पत्र,

शहाजादे मुइजुद्दीन पन्हाळ्याला वेढा घालून आहेत. त्यांचा सल्लागार म्हणून आपण माझी नेमणूक केल्याचें फर्मान मिळालें. ही आपली फार मोठी कृपा होय. आपलें फर्मान मिळतांच मी असदनगर (अकलूज) हून रवाना झालों. लवकरच आपल्या जागेवर रूजूं होईन. आपण आज्ञा केल्याप्रमाणें किल्ला घेण्याच्या कामीं मी प्रयत्नांची पराकाष्ठा करीन.

पान अडूसष्ट. पत्र क्रमांक २७. इ. स. १६९२–९३.

मीर रहमतुल्लाखान यांस,

हेरांच्या बातम्यांवरून कळलें कीं, मराठे हे तुमच्या मोर्चावर चाल करून येण्याच्या इराद्यानें देवगडच्या दिशेकडून पन्हाळ्याकडे येऊं पाहात आहेत. तर

तुम्हीं शत्रूच्या या कार्व्याबद्दल खबरदारी बाळगून त्यांचा प्रतिकार करण्यास सज्ज रहावें. खबरदारी बाळगण्यांत कोणत्याहि तऱ्हेनें कसूर करूं नये. तुमच्या मन्सबींत वाढ करण्याबद्दल आज्ञा झाली कीं, ही युद्धाची वेळ आहे. विजय मिळाल्यानंतर तुमची मागणी पूर्ण करण्यांत येईल.

पान एकूणसत्तर. पत्र क्रमांक २८. इ. स. १६९२–९३.

राजा किशनसिंग (चांद्याचा राजा ?) यास.

हरकऱ्याकडून कळलें कीं, तुमचे मोर्चे डाव्या बाजूला आहेत. मराठे हे तुमच्या मोर्च्यांच्या वाटेनें किल्ल्यांत रसद पाठवितात. यावर आज्ञा झाली कीं दक्षता आणि खबरदारी घेण्यांत यावींत. तसं होत असल्याचें दिसत नाहीं. हें पत्र पाहतांच मराठे येण्याच्या वाटेवर ठाणीं आणि चौक्या बसवा आणि हुशारीनें वागा. हेरांपैकीं कांहींचा वध करून त्यांचीं प्रेतें झाडांना लटकवा म्हणजे इतरांना दहशत बसेल.

देशीं जाण्यास परवानगी मिळावी अशी तुम्ही विनंती केली आहे. यावर आज्ञा झाली कीं या वेळीं बादशाही कामगिरी ही कोणत्याहि इतर कामापेक्षां श्रेष्ठ आहे. तुम्हांला देशीं जाण्यास परवानगी देणें हें तुम्हांलाच विषाप्रमाणें अनिष्ट ठरेल. काळ वेळ ओळखून तुम्ही रजा न मागणें हेंच बरें. आपली नेमून दिलेली कामगिरी चोखपणें बजावणें.

पान एकाहत्तर. पत्र क्रमांक २९.

इ. स. १६९२–९३. फजाइलखान यास,

विनंती कीं रबिउस्सानी महिन्याच्या नऊ तारखेस शुक्रवारीं रात्र संपण्याच्या-वेळी ही हकीकत घडली. हिंमतराव (हणमंतराव ?) (मराठा सरदार) हा स्वार आणि कर्नाटकी पायदळ असें सैन्य आणि रसद नेणारी दहा हजार माणसें बरोबर घेऊन देवगडच्या घाटाच्या मार्गानें आला. तो पन्हाळगडच्या प्रवेशद्वाराच्या बाजूनें आला. तिकडील मोर्च्यांवर इतमाजी हा सरदार होता. तो आपला जुना सरदार आहे. त्या मोर्च्यांच्या अघाडीला आणि पिछाडीला मोगलांचीं पथकें हुशारीनें उभीं होतीं. हिंमतराव याच्या येण्याची बातमी लागतांच हीं पथकें युद्धास सज्ज झालीं. रात्रीच्या अंधारांत युद्धाला तोंड लागलें. उभय पक्षांकडून बाणांचा आणि बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव होऊं लागला. युद्ध निकराचें होऊं लागलें. याच वेळीं योगायोगानें हिंमतराव याच्या डोक्याला गोळी लागून तो गतप्राण झाला. यामुळें मराठ्यांचा धीर खचला. त्यांच्या सैन्यांतील गोंधळ आमच्या सैनिकांच्या लक्षांत आला. आमच्या सैनिकांनीं मशाली पेटाविल्या आणि ते मोर्च्यांतून बाहेर पडले. त्यांनीं शत्रूवर बंदुकी, जंबूरक इत्यादींचा मारा करून कित्येकांना ठार अगर

जखमी केलें. यानंतर त्यांनीं मराठ्यांची सगळी रसद हस्तगत केली. ही बादशहाची कृपाच म्हटली पाहिजे. माझें हें पत्र बादशहासमोर मांडण्यांत यावें. इतमाजी याला त्याच्या कामगिरीबद्दल पदवी देऊन त्याच्या मन्सबींत वाढ करण्यांत यावी.

पान पंचाहत्तर. पत्र क्रमांक ३०. इ. स. १६९६.

जानबाजखान यांस,

संतानें (संताजी) कासिमखान, खानाजादखान आणि सफशिकनखान यांचीं सैन्यें नष्ट केलीं. त्यांची परिस्थिति फार धोक्याची झाली आहे. आज त्यांना कुमक पोहोंचविण्याच्या कामावर माझी नेमणूक झाली आहे.

पान पंचाहत्तर. पत्र क्रमांक ३१. इ. स. १६९२.

बख्शी रूहल्लाखान यांस,

तुमच्या उत्कृष्ट कामगिरीच्या बातम्या आल्या त्यामुळें तुमची स्तुति होत आहे. सरकारी खजिना तातडीनें पोहोंचविण्याचें काम माझ्याकडे देण्यांत आलें आहे. मार्गांत दुष्ट पाळेगार (मराठे) टोळ आणि मुंग्या याप्रमाणें पसरले आहेत. ते धामधूम करण्यास सज्ज आहेत ही गोष्ट लपलेली नाहीं. परमेश्वरावर भरंवसा ठेवून मी या कामावर निघत आहे.

पान शहात्तर. पत्र क्रमांक ३२. इ. स. १६९२–९३.

अमानतखान यांस,

हरकाऱ्यांच्या बातम्यांवरून कळलें कीं मराठ्यांचे जमाव असदनगर (अकलूज) भागांत पसरले आहेत. त्यांचा मोड करण्याच्या कामावर तुम्हांला नेमलें आहे. पण बादशहाची आज्ञा ही कीं, तुमच्याजवळ सैन्य कमी आहे. यामुळें तुम्ही घाई करूं नये. म्हसवडचा ठाणेदार दूल्हाखान याला तुम्हांला जाऊन मिळण्यास सांगण्यांत आलें आहे. तुम्ही दोघांनीं मिळून त्या भागांतून मराठ्यांना काढून लावावें.

पान एकुणऐंशी. पत्र क्रमांक ३३.

वजीर असदखान यांस,

आपलें पत्र पावलें. मराठ्यांचा प्रदेश उध्वस्त करावा आणि वसंतगडचा किल्ला घेण्याचा प्रयत्न करावा अशी आपण आज्ञा केली आहे. माझ्यापाशीं सैन्य कमी होतें. शत्रुसैन्य अधिक होतें. असें असूनहि मी त्याच दिवशीं रवाना झालों. तीन मजला आक्रमून मी कृष्णा नदीच्या कांठावर वसंतगडच्यासमोर पोहोंचलों. नदीला पूर होता. नावांची संख्याहि फार नव्हती. मराठ्यांनीं नदीच्या पलीकडच्या कांठावर मोर्चे कायम केले होते. तेथें त्यांनीं तोफा सज्ज ठेविल्या होत्या-

याशिवाय कर्नाटकी बंदुकवाल्यांचीं पथकेंहि त्यांनीं तयार ठेविलीं होतीं. मोगल सैन्याच्या वाटा त्यांनीं बंद केल्या होत्या. मला नदीच्या कांठावर दहा दिवस थांबावें लागलें. नदीला उतार कोठें मिळेल आणि आपलें सैन्य नदीच्या पलीकडे कसें नेतां येईल याचा मी प्रयत्न करीत होतों. या सुमारास खटावच्या देशमुखानें बातमी आणली कीं, शमशेरपूर खेड्यापाशीं नदीला उतार आहे. ही बातमी कळतांच मी तात्काळ कूच केलें आणि सूर्योदय होण्यापूर्वी मी आपल्या सैन्यासहित शमशेरपूरला आलों. आमच्या स्वारांनीं आपले घोडे नदींत घातले. आमचें सैन्य नदीपार झालें. शत्रु-सैन्याच्या लक्षांत ही गोष्ट येतांच तें पळून किल्ल्याच्या आश्रयाला गेलें. आमच्या शूर वीरांनीं त्यांचा पाठलाग केला. किल्ल्याभोंवतीं असलेल्या वाड्या जाळण्यांत आल्या. संध्याकाळीं आमच्या सैन्यानें नदीच्या कांठावर तळ दिला. परमेश्वर करील तर सगळें सैन्य नदीपार करवीन. वसंतगडला वेढा घालणें आणि ठाणीं कायम करणें यासंबंधीं मी कळवीन. हें पत्र आपण बादशहासमोर ठेवाल अशी आशा आहे.

पान ब्याऐंशीं. पत्र क्रमांक ३४. इ. स. १६९९.
बख्शी बहरामंदखान यांस,

बादशहाची आज्ञा आहे कीं, ज्या अर्थी विजापूरचें रक्षण करण्याच्या कामावर आणि त्या प्रांताच्या फौजदारीच्या हुद्यावर माझी नेमणूक करण्यांत आली आहे त्या अर्थी त्या प्रांतांत जेथें जेथें म्हणून पाळेगार (मराठे) डोकें वर उचलतील तेथें त्यांच्यावर तडक चालून जावें आणि त्यांचा संहार करावा. त्यांचीं पाळेमुळें उखडून काढावीं. बादशहाच्या मर्जीप्रमाणें करण्यांत येईल.

पान ब्याऐंशी. पत्र क्रमांक ३५. इ. स. १६९९.
बख्शी बहरामंदखान यांस,

बादशहानें मला आज्ञा केली कीं, बख्शी रुहुल्लाखान यांची कोंकण जिंकून घेण्याच्या कामावर नेमणूक झाली आहे. ते रवाना झाले आहेत तर तुम्ही (म्हणजे मी) त्यांना जाऊन मिळावें. आणि दोघांनीं मिळून मोहीम पार पाडावी. धन्य परमेश्वराची, आमच्या सैन्यांनीं तो प्रदेश उध्वस्त केला. त्या प्रांताचा अधिकारी रामचंद्र (रामचंद्रपंत अमात्य) हा होता. तो अतिशय गर्विष्ठ होता. तो मोठें सैन्य घेऊन आला. आणि त्यानें आमची वाट अडविली. मार्गांत घनदाट अरण्यें होतीं. आपल्या सैन्यासहित तो आमच्यावर चालून आला. त्यानें मोठें शौर्य दाखविलें. युद्ध मोठें निकराचें झालें. उभय पक्षांकडून हजारों गोळ्यांचा वर्षाव झाला. शत्रूंपैकीं अनेक लोक जखमी झाले. आमच्या आघाडीच्या पथकांनीं मोठे श्रम करून पुढें कूच करण्यासाठीं मार्ग शोधून काढला. हा

मार्ग अवघड होता. पण आमच्या सैन्यानें त्याची पर्वा केली नाहीं. त्या मार्गा-वरूनच ते पुढें झाले आणि त्यांनीं शत्रूवर हल्ला केला. या हल्ल्यामुळें मराठे गोंधळून गेले. टिकाव न धरतां ते चहूंकडे पांगले. रामचंद्र (रामचंद्र अमात्य) हा डोंगरदऱ्यांत पळून गेला. त्यानंतर आमचें सैन्य त्या घोर अरण्यांतून बाहेर पडलें. त्या भागांतील मराठ्यांचा नाश करण्याचा आणि तो प्रदेश उध्वस्त करण्याचें काम चालू आहे.

पान पंचाऐंशी. पत्र क्रमांक ३६.

मीरखान (खवाशांचा दारोगा) यांस,

आपलें लष्कर सर्वत्र पसरलें आहे. पावसामुळें नद्यांना पूर आले आहेत. रसद मिळण्याची शक्यता नाहीं. वर्धनगडच्या शिबंदीनें आणि किल्ल्याच्या भोंवतीं डोंगर-दऱ्यांतून लपून बसलेल्या शत्रूंनीं हें सर्व पाहिलें. किल्ल्यांतील लोकांनीं अभयाची याचना केली. त्यांनीं तसा निरोप पाठविला. रात्रीच्या अंधारांत ते किल्ला सोडून निघून गेले. अशा रीतीनें युद्धाचा प्रसंग न येतां किल्ला आपल्या ताब्यांत आला. किल्ल्याच्या किल्ल्या पाठविल्या आहेत. माझा मुलगा महंमद खलील यानें तूर्त किल्ल्यांत प्रवेश केला आहे. किल्लेदार म्हणून कुणाचीं तरी नेमणूक बादशहाकडून व्हावी ही विनंती.

पान श्याऐंशी. पत्र क्रमांक ३७.

राजा रामनाथ यांस,

आज्ञेप्रमाणें आपण आपल्या फौजेसहित रवाना झालांत हें कळून आनंद झाला. प्रमुखांनीं उद्गार काढले कीं हे मोठे गुणशाली आहेत. आतां पन्हाळा भागांत युद्ध सुरू आहे. बादशहाची कामगिरी करून दाखवायची आहे. तुमच्या नेमलेल्या स्थळीं तुम्ही लवकर जाऊन रूजूं व्हावें. भावी उन्नतीच्या दृष्टीनें हें अतिशय श्रेयस्कर ठरेल.

पान सत्त्याऐंशी. पत्र क्रमांक ३८.

राजा किसनसिंग (चांदा) यांस,

तुमची मंजूर झालेली रजा संपली. तुम्ही आतां विलंब लावूं नये. मरा-ठ्यांच्या बरोबर युद्धें चालूं आहेत. बादशहाची मर्जी आपण लक्षांत ठेवावी आणि आपलें सैन्य घेऊन तडक नेमलेल्या स्थळीं रुजूं व्हावें. नाहीं तर बादशहाची गैरमर्जी होईल. आज्ञेप्रमाणें करावें.

पान एकूणनव्वद. पत्र क्रमांक ३९.

शेर अंदाजखान यांस,

विजापूरच्या सुभेदारीवर आपली नेमणूक झाली आहे. बादशहाचा हुकम

फीरोजजंग (गाजिउद्दीन) याजकडे आला आणि त्यांच्याकडून माझ्याकडे आला. तर तुम्ही लवकर इकडे निघून यावें.

शहाजादा मुईजुद्दीन जहांदारशहा याचें औरंगजेबास पत्र.

इ. स. १६९३.

विनंती कीं, पन्हाळगड जिंकून घेण्याच्या कामावर आपण माझी नेमणूक केली. त्याप्रमाणें मी वेढ्याचें काम चालवीत आहे. अलीकडे किल्ल्यांतील लोकांपाशीं धान्य आणि इतर सामुग्रीचा सांठा कमी होऊन या टंचाईमुळें किल्ल्यांतील लोक मेटाकुटीस आले. त्यांनीं पुन्हां आमच्याकडे निरोप पाठवून आपल्या अपराधाची क्षमा मागितली. त्यांनीं आपल्याला जीवदान मिळवून किल्ल्याच्या बाहेर जाऊं देण्यांत यावें म्हणून विनंती केली- आपली मर्जी नव्हती म्हणून त्यांच्या मागण्या मान्य केल्या नाहींत.

या सुमारास रामचंद्र (रामचंद्रपंत अमात्य) आणि परशुराम (परशुरामपंत प्रतिनिधि) हे चालून आले. त्यांच्याबरोबर ऐंशी हजार स्वार आणि असंख्य पायदळ असें सैन्य होतें. किल्ल्यांत रसद पोहोंचवावी आणि आंतील लोकांना मदत करावी हा त्यांचा हेतु होता. त्यांच्याबरोबर तोफा, रेहकले, बाण, जंबूरक, जेजले आणिं इतर शस्त्रास्त्रें होतीं. ते मोठ्या धाडसानें या दिशेनें चालून आले. कांहींजण नावांतून नदी ओलांडून आले. बरेचसें सैन्य पोहून नदीपार झालें. युद्धाच्या हेतूनेंच हें सैन्य चालून आलें होतें. ही बातमी ऐकतांच मी आपल्या सैन्याची रचना केली.

सरमस्तखान, अफजलखान, शेर अंदाजखान, मीर महंमदखान आणि इतर मोगल यांना मी करावलीला (टेहळणीचें आघाडीचें पथक) ठेविलें. तोफखान्याचा दारोगा सफशिकनखान याच्याकडे तोफखाना सज्ज ठेवण्याचें काम सांगण्यांत आलें. आघाडीच्या (अल्तमश) पथकावर मरहमतखान याला ठेवण्यांत आलें. हरावलीवर लुत्फखान हा जबरदस्त सैन्यासहित उभा राहिला. चांद्याचा राजा किशनसिंग याला त्याच्या सैन्यासहित आणि कांहीं मोगल सरदारासहित उजव्या फळीवर नेमण्यांत आलें. राजा छत्रसाल आणि कांहीं हरवाणी सरदार हे डाव्या फळीला होते. मी, माझा मुलगा अईजुद्दीन, खास चौकीचे अधिकारी, हसनखान व अब्दुल्कादरखान वगैरे सरदार हे मध्यभागी होते. अशा प्रकारें रचना झाल्यानंतर आमचें सैन्य आपल्या जागेवरून हलून रणांगणावर शत्रुसैन्याच्या समोर आलें. प्रथम उभय सैन्यांतून बाण आणि बंदुकी यांचा मारा झाला. हळुहळु युद्ध निकराला येऊं लागलें. मोठमोठ्या तोफा चालू झाल्या. आमच्या सैन्यानें मोठें शौर्य गाजविलें. परशुराम हा शत्रुसैन्याचा पुढारी होता. तो

रामचंद्र (अमात्य) याच्या बरोबरीचा होता. योगायोगानें एक गोळी त्याच्या डोक्यांत लागली. तो नर्काला गेला (मरण पावला). शत्रूचा धीर खचला हें पाहून आमचे स्वार पुढें चाल करून गेले. त्यांनीं आपलीं शस्त्रें तीक्ष्ण करून शत्रूंचा संहार करण्यास सुरुवात केली. बराच वेळ ही मारामारी चालू होती. शेवटीं शत्रूला टिकाव धरणें अशक्य होऊन त्यानें पळ काढला. मार्गांत नदी होती. अनेकांनीं नदींत उड्या घेतल्या. त्यांत बरेचजण बुडून मेले. शत्रूच्या पायदळ सैन्या-पैकीं अगणित माणसें ठार झालीं. प्रेतांचे ढीग लागले. परमेश्वरकृपेनें आणि बादशहाच्या भाग्यानें आम्हांला मोठाच विजय मिळाला. गनिमांच्या सर्व तोफा, दोन हजार भाले, तितक्याच बंदुका, घोडी आणि शत्रूचा सर्व सरंजाम हीं सर्व आमच्या ताब्यांत आलीं. शत्रूच्या तोफा, रेहकले, जेजले व बंदुका हीं सर्व बादशाही तोफखान्याच्या खात्यांत दाखल करण्यांत आलीं आहेत. आपलें कृपाछत्रच आमच्यावर सदैव राहो.

* * *

THE AMERICAN REVIEW is published
in collaboration with **DIALOGUE**
Magazine, International Communication Agency,
Washington, **D.C. DIALOGUE** is a quarterly
journal of opinion and analysis on subjects
of current intellectual and cultural
interest in the United States.
The views expressed in its
pages are those of the
authors and do not
necessarily reflect the
views or policies of the
U.S. Government.

Printed and published by Michael Pistor for
the United States International Communication Agency,
American Center,
24, Kasturba Gandhi Marg,
New Delhi-110 001 on behalf of
the American Embassy, New Delhi-110 021
and printed at
Indraprastha Press (CBT), Nehru House,
4, Bahadur Shah Zafar Marg,
New Delhi-110 002.

Managing Editor:
Ombica Gupta